S P E A K | R E A D | W R I T E



# माय मराठी ३
# My Marathi 3

पाठ्यपुस्तक | TEXTBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI




SUHAS LIMAYE MADHURI PURANDARE
JYOTSNA BHIDE BHARATI KELKAR
ZAMEER KAMBLE

UNIVERSITY OF MUMBAI

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

सुहास लिमये / Suhas Limaye
माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare
ज्योत्स्ना भिडे / Jyotsna Bhide
भारती केळकर / Bharati Kelkar
जमीर कांबळे / Zameer Kamble

# माय मराठी ३

# My Marathi 3

पाठ्यपुस्तक / Textbook for Communicative Marathi

**संपादक / Editor**

विभा सुराणा / Vibha Surana, आनन्द काटीकर / Anand Katikar

**संकल्पना आणि निर्मिती / Concept and Production**

जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ / Department of German, University of Mumbai

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

**ISBN No.: 978-93-5351-823-3**
**First Edition : 2020**
**पहिली आवृत्ती : २०२०**

क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन - शेअर अलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0)
Published under Creative Commons Attribution - ShareAlike License (CC BY-SA 4.0)
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

- **प्रकल्प समन्वयक / Project Co-ordinator**
  विभा सुराणा / Vibha Surana

- **लेखक / Authors**
  सुहास लिमये / Suhas Limaye, माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare,
  ज्योत्स्ना भिडे / Jyotsna Bhide, भारती केळकर / Bharati Kelkar,
  जमीर कांबळे / Zameer Kamble

- **सहलेखक / Co-authors**
  सोनाली गुजर / Sonalee Gujar, कृत्तिका भोसले / Kruttika Bhosale

- **संपादक / Editor**
  विभा सुराणा / Vibha Surana, आनन्द काटीकर / Anand Katikar

- **संपादकीय मंडळ / Editorial Team**
  सोनाली गुजर / Sonalee Gujar, मेहेर भूत / Meher Bhoot,
  प्र॰ना॰परांजपे / P.N. Paranjape, कृत्तिका भोसले / Kruttika Bhosale,
  गौरी ब्रह्मे / Gauri Brahme, जुईली म्हात्रे / Jueli Mhatre,
  गिरिषा टिळक / Girissha Tilak, सायली थारळी / Sayali Tharali

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / Technical Support for Marathi**
  वूडस्टॉक स्टुडिओ / Woodstock Studio, कन्फ्युशिअस इन्स्टिट्यूट, मुंबई विद्यापीठ / Confucius Institute, University of Mumbai, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ / Department of Marathi, University of Mumbai, अश्वमेध सॉफ्टवेअर सोल्युशन्स / Ashwamedh Software Solutions,
  गुरुनाथ कलमकर (मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ) / Gurunath Kalamkar (Department of Marathi, University of Mumbai), पूजा चितळे / Pooja Chitale,
  मनीष बावकर / Manish Bawkar, तुषार घाटे / Tushar Ghate

- **चित्रे / कला, मांडणी, अक्षर जुळणी**
  **Illustrations / Layout Design**
  दत्तात्रय पाडेकर / Dattatraya Padekar, सौरभ भोसले / Saurabh Bhosale,
  गिरिषा टिळक / Girissha Tilak, सायली थारळी / Sayali Tharali

- **प्रकाशक / Publisher**
  मुंबई विद्यापीठ / University of Mumbai, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई /
  Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

- **संकेतस्थळ / Website**
  www.rmvs.marathi.gov.in www.mu.ac.in https://www.learn-marathi.com

- **ई-पत्ता / E-mail Address :** rmvs_mumbai@yahoo.com

Online Access Link : https://mu.ac.in/mymarathi3
Textbook, Workbook, Glossary and Free DVD ₹ **1250** **$ 25** **€ 20**

# प्रस्तावना

अन्यभाषक भारतीय त्याचप्रमाणे परदेशी तरुण आणि प्रौढ व्यक्तींना मराठी भाषा शिकण्यासाठी 'माय मराठी' हे तृतीय स्तराचे पाठ्यपुस्तक आहे. सर्वसमावेशक सामग्रीतून संवादात्मक, कृतिशील अशा पायाभूत आधारावर ह्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेचे काटेकोर पण परिणामकारक अध्ययन करण्याकरता हा एक अद्ययावत पद्धतीने भाषा शिकवण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आकलन, संवाद, वाचन तसेच लिखाण यांद्वारे मराठी भाषेतून योग्य रीतीने आणि परिणामकारक संवाद कसा साधावा याचे शिक्षण दिले जाते.

ह्या अभ्यासक्रमाच्या अध्यापन सामग्रीत प्रामुख्याने तीन पुस्तके आहेत १. डीव्हीडीसहित पाठ्यपुस्तक, २. सराव, चाचणी आणि उत्तरसंच असणारे अभ्यासपुस्तक आणि ३. मराठी - इंग्रजी आणि हिंदी, असा शब्दसंग्रह.

'माय मराठी पातळी ३' च्या ह्या खास पाठ्यपुस्तकात विषयानुरूप छायाचित्रे, रेखाचित्रे, मजकूर, कविता आणि गाणी, म्हणी आणि वाक्प्रचार, व्याकरण, साचेबद्ध सराव, 'करा आणि शिका' स्वाध्याय आहेत. तसेच खेळाद्वारे शिकवणे, समर्पक अर्कचित्रे, नवीन शब्दांवर दृष्टिक्षेप, सराव करण्यास उपयुक्त श्राव्य आणि दृक्श्राव्य चित्रफिती आहेत. सोबत विनामूल्य दिल्या गेलेल्या दृक्श्राव्य डीव्हीडीसह हे पाठ्यपुस्तक वापरायचे आहे. हा प्रकल्प पूर्णपणे शैक्षणिक तत्त्वावर राबवला जात आहे. परिपूर्णपणे भाषा शिकण्यास मदत व्हावी ह्या हेतूने ह्या डीव्हीडीमध्ये श्राव्य ध्वनिफिती तसेच निरनिराळ्या माध्यमांतून निवडलेल्या वैविध्यपूर्ण दृक्श्राव्य चित्रफिती समाविष्ट केल्या आहेत. शिक्षकांनी बहुपर्यायी प्रश्न आणि इतर प्रकारच्या प्रश्नावली वापरताना ह्या डीव्हीडीची मदत घेणे अपेक्षित आहे.

'माय मराठी पातळी ३'च्या अभ्यासपुस्तकात पाठ्यपुस्तकातील प्रत्येक धड्याखालील स्वाध्याय आहे. त्यासोबतच १. 'पातळी २'च्या उजळणीसाठी 'मागील भागात' या सरावाच्या धड्यानंतर एक विस्तृत चाचणी, २. प्रत्येक दोन धड्यांसाठी चाचणी आणि शेवटी ३. संपूर्ण 'पातळी ३'च्या अभ्यासक्रमाची एकत्रित चाचणी यांचा समावेश आहे.

शब्दसंग्रहात कठीण शब्दांची लिंगानुसार, तिन्ही वचनांनुसार आणि सामान्यरूपांनुसार विस्तृत माहिती समाविष्ट केलेली आहे. शिवाय इंग्रजी आणि हिंदी भाषेत त्या शब्दांच्या अर्थासह वाक्यांमध्ये उपयोग करून दाखवला गेला आहे.

'पातळी ३'चा संपूर्ण अभ्यासक्रम म्हणजे साधारणपणे १२० तासांची शिकवणी आहे. तथापि, ह्याचे अध्यापन करताना शिक्षकाला ह्यातील प्रत्येक धड्यासाठी साधारणपणे १२ तासांचा अवधी लागेल. ह्या सामग्रीत सराव आणि चाचणीसाठी पुरेशी सामग्री समाविष्ट केलेली असली, तरी प्रत्यक्ष शिकवताना संबंधित शिक्षकाला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर माहितीही द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठीही एक सूचना आहे की, योग्य तऱ्हेने मराठी बोलण्यासाठी त्यांनी एकवचन, अनेकवचन, सामान्यरूप तसेच लिंगानुसार नामांचा अभ्यास करण्याचा सराव करावा. सदर पुस्तके ही वर्गात शिक्षकांकडून समजून घेऊन शिकण्याच्या स्वरूपाची असली, तरी स्वयं-अध्ययन करणाऱ्यांना दिलेल्या सामग्रीतील विस्तृत शब्दसंग्रहाच्या आधारे ती समजून घेऊन शिकता येईल.

हा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी असा सल्ला आहे की, त्यांनी भाषाध्यापन-प्रशिक्षण घ्यावे, तसेच ह्या संदर्भात त्यांनी संपादक वा राज्य मराठी विकास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रकल्पातील इथवरची ही अध्यापन सामग्री तयार करण्यासाठी कष्ट घेऊन हे सारे पूर्णत्वास नेण्यास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

इंग्लिश आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपीय भाषा आहे. ह्या भाषेचे अध्ययन करून तिच्यावर सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व मिळवण्याकरता किमान ६ पातळ्यांची म्हणजेच अंदाजे ८०० तासांची आवश्यकता आहे. पुढील तीन पातळ्यांसाठी यथायोग्य सामग्री तयार करणे हे आमचे पुढील उद्दिष्ट आहे. या प्रकल्पांतर्गत स्वयं-अध्ययन करणाऱ्यांसाठी आम्ही संगणक आणि सहध्वनीद्वारे वापरली जाणारी मोबाईल ॲप्लिकेशन्सही बनवणार आहोत.

या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे आम्ही आभारी आहोत.

कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वासह कार्यशील अशा मुंबई विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे, तसेच हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

विभा सुराणा, आनन्द काटीकर<br>
संपादक<br>
२०२०

# Preface

My Marathi is the level 3 course book particularly meant for non-native teens and adults, for both Indian and foreign Marathi language learners. It is prepared using an integrated communicative, task-based approach. It is a modest attempt to apply latest language teaching tools to facilitate the learning of Marathi systematically and effectively. It teaches the learners how to communicate correctly and effectively in Marathi by imparting understanding, speaking, reading as well as writing skills.

This course material consists of three books, namely 1) a textbook with a free DVD, 2) a workbook with exercises, tests and answer keys and 3) a Marathi Glossary in English and Hindi.

This particular textbook My Marathi for Level 3 consists of units such as thematic images and illustrations, texts, poems and songs, idioms and proverbs, grammar, pattern drills (saraav), 'do and learn' exercises, learning games, cartoons, audios and audio-visual components with exercises, vocabulary overview (drishtikshep) per chapter, as well as learner self-evaluation in all chapters. The textbook is to be used along with the free audio-visual DVD attached to it, which is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of audiovisual clips from the media which have been collated in accordance with the topic of the chapter and language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The workbook of My Marathi for Level 3 consists of exercises for each chapter as well as the following tests 1) a comprehensive test for level 2 after mageel bhagat, 2) a test after every two chapters and 3) a comprehensive test for level 3 at the end.

The glossary or shabdasangraha gives a detailled list of new words with their gender in singular and plural forms as well as their oblique forms or samanyarupe. English and Hindi word meanings are given along with the usage of these words in sentences.

The entire Communicative Marathi Level 3 Course is designed for approximately 120 teaching hours. Thus, the teacher may take about 12 hours for each of the 10 chapters. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give not only regular dictations but also supplementary material as and when required. The learners are advised to learn the nouns along with their gender with singular and plural forms as well as the oblique forms in order to

learn to speak correct Marathi. Though the book is meant for classroom teaching, self-learners too can make use of it with the help of the comprehensive glossary. The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editors or Rajya Marathi Vikas Sanstha for the same. It has taken sustained intensive work to prepare this material and we are extremely thankful to the entire team for making it happen.

Like English and German, Marathi too is a rich and old Indo-European Language and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. approx. 800 hours for near native language proficiency. Preparing standardized material for further 3 levels for learning Marathi is a daunting task ahead of us and requires resources. Computer and Mobile applications (Apps) for self learners are also being prepared under this project. Such enterprises require expert inputs from diverse domains.

We are extremely thankful to the employees of Rajya Marathi Vikas Sanstha for their valuable cooperation.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

Vibha Surana, Anand Katikar
Editors
2020

# आभार | Acknowledgements

Abhijeet Ranadive

Aditya Badle

Amit Varandekar

Amruta Sudame

Anagha Mandavkar

Anuradha Mishra

Anil Sakpal

Ashish Sawant

Bharti Chatre

Disha Gudulkar

Disha Palkar

Gurudutt Kamath

Kadambari Bhandare

Kamala Ganesh

Madhura Gawande

Neha Thombare

Pradnya Dalvi

Prathmesh Jagtap

Prachi Sharma

Rajesh Wadekar

Ravindra Kulkarni

Shaleen Sharama

Shweta Redekar

Smita Shukla

Suhas Pednekar

Tanvi Paradkar

Vishal Bait

### Permission from copyright holders

Ashok Gole / Nilubhau Limaye Foundation

D. M. Mirasdar Pratishthan

Dr. Prakash Amte

Girish Kuber / Loksatta

Harshit Bongarde

Hemant Joglekar

Hridaynath Mangeshkar

Kiran V. Shantaram / Rajkamal Kalamandir

Mauj Prakashan

Naina Mehendale

Neha Ghatpande

New 18 Lokmat

Ramdas Bhatkal / Popular Prakashan

Ravindra Lakhe

Rohan Prakashan

Sachin Kundalkar

Shobha Bhagwat

Sumitra Madgulkar

Vijay Darda / Lokmat

Yashvantrao Mukt Vidyapith

### Excerpt / Text acknowledgement

Abhijit Gholap / Devisha Films

BBC News Marathi

Chandrashekhar Gokhale

Charuhas Pandit / Prabhakar Wadekar

Dr. Rajiv Sharangpani

Kavi Anand

Kedar Shinde / A.R.K. Productions

Kokan now

Mrunmayi Shivapurkar

Prasad Shirgaonkar

Purple Pebbles Pictures

Raanvata

Raja Badhe

Sachin Pilgaonkar / Sushriya private limited

S. D. Phadnis

Smita Talwalkar

Tomato FM

V. M. Kulkarni

Vijaya Rajadhyaksha

### Cover Page

Nagesh Sirsal

### ◆ विशेष तज्ज्ञ / External Experts

सुजाता महाजन / Sujata Mahajan, कलिका मेहता / Kalika Mehta

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | मागील भागात | मराठी भाषा आणि मराठी भाषेचा अभ्यास<br>सुट्टीमध्ये काय केले?<br>प्रसारमाध्यमे<br>आजार आणि उपाय ह्यावर संवाद | साधा वर्तमानकाळ, साधा भूतकाळ, साधा भविष्यकाळ<br>उभयान्वयी अव्यये<br>शब्दयोगी पदे<br>विकारी आणि अविकारी विशेषणे, क्रियाविशेषणे<br>प्रश्नशब्द : कसाय, कशीय, कशायत, कसं होतं इ.<br>'चा', 'ची', 'चे'<br>सामान्यरूपे<br>क्रियापद + 'ऊन' विभक्तिप्रत्यय | प्रसारमाध्यमांचे प्रकार<br>आजारांची नावे<br>प्रसिद्ध शहरांचे विशेष खाद्यपदार्थ | १३ |
| १ | व्यक्ती आणि वल्ली | व्यक्ती आणि वल्ली : स्वभाव, गुणवैशिष्ट्ये, सवयी<br>स्त्री-पुरुष : पूर्वग्रह, नात्यांमधील अडचणी, पुरुष आणि घरकाम, स्त्रिया आणि नोकरी | भाववाचक नामे<br>अपूर्ण वर्तमानकाळ, रीती वर्तमानकाळ<br>शब्दयोगी पदांप्रमाणेही वापरली जाणारी विशेषणे व क्रियाविशेषणे<br>असं - तसं, असंच - तसंच, अशी - तशी, असंतसं | भाववाचक नामे | ३६ |
| २ | कार्यक्षेत्र | मजूर, कामगार, रोजंदार ह्यांच्याविषयी वाचणे, बोलणे आणि लिहिणे<br>रेझ्युमे (परिचयपत्र) आणि अर्ज लिहिणे<br>कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्यांविषयी बोलणे | शब्दयोगी पदे : कडून, वरून, खालून, मधून<br>अपूर्ण व पूर्ण वर्तमानकाळ, अपूर्ण व पूर्ण भूतकाळ<br>धातुसाधिते किंवा कृदन्ते | कार्यक्षेत्रे व व्यवसायांसंबंधी शब्द<br>प्रशासकीय भाषा | ६६ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ३ | राहणीमान | माणसांचे राहणीमान, त्यांची जीवनशैली<br>स्मार्ट सिटी, शहरांचा अहवाल<br>शहर आणि गाव, दोन्हींमध्ये होणारे बदल<br>स्थलांतर व परकेपणा | रीती भूतकाळ<br>शब्दयोगी पदे : आधी, नंतर, वेळी, व्यतिरिक्त, खेरीज, शिवाय, वाचून | समृद्ध जीवनाविषयी शब्द<br>राहणीमानाशी संबंधित शब्द<br>शहरी जीवन गावातले आयुष्य | ९५ |
| ४ | नखशिखान्त | शरीराचे अवयव<br>जुळ्यांची गंमत, 'जुळ्याचं दुखणं'<br>शरीर : आजार आणि उपाय, भारतीय परंपरेतील उपचारपद्धती : आयुर्वेद आणि योग | अपूर्ण भविष्यकाळ<br>दोघी – दोन्ही<br>केवलप्रयोगी अव्यये<br>करता कामा नये, केले पाहिजे<br>शब्दयोगी पदे : पुरेसा, पुरता | युवा भाषा<br>शरीराच्या अवयवांच्या वैशिष्ट्यावरून रूढ झालेले वाक्प्रचार | १२२ |
| ५ | पर्यावरण | पर्यावरण, समस्या आणि उपाय ह्यांविषयी बोलणे<br>तापमान, हवामान ह्यांविषयी बोलणे | पूर्ण भविष्यकाळ<br>शब्दयोगी पदे : ऐवजी, पैकी<br>'तून' / 'आतून' ह्या प्रत्ययांचा वापर | पर्यावरण विषयाशी निगडित शब्द<br>पाण्याशी संबंधित क्रियापदे : सांडणे, शिंपडणे, लवंडणे इ॰<br>लहानसा, छानसा, छोटासा इ॰ | १५२ |
| ६ | जागतिकीकरण | जागतिकीकरण : फायदे, तोटे, बातम्या वाचणे, समजणे<br>वादविवाद करणे<br>बहुसांस्कृतिकता, वंशभेद, रंगभेद<br>निश्चय, संकल्प, योजना ह्यांबद्दल बोलणे<br>ऐतिहासिक घडामोडी आणि पैशाचे राज्य<br>जाहिराती समजणे | रीती भविष्यकाळ<br>शब्दयोगी पदे आणि क्रियाविशेषणे : आसपास, भोवती, पाशी, शेजारी, बाजूला, बाजूने, पाठीमागे | जागतिकीकरण<br>बहुसांस्कृतिकता<br>'की' आणि 'का' ह्या शब्दांचा वापर<br>गावोगावी, देशोदेशी, घरोघरी इ॰ | १८० |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ७ | विज्ञान, तंत्र, मंत्र | विज्ञान आणि तंत्रज्ञान<br>यंत्रे : उपयोग, समस्या, तक्रारी<br>मंत्र, विज्ञान आणि अंधश्रद्धा ह्यांविषयी बोलणे | शक्य क्रियापदे : उचलवते - उचलवत नाही, करवते - करवत नाही इ.<br>शब्दयोगी पदे : साठी / करिता | विज्ञान, तंत्र, मंत्र व अंधश्रद्धा यांविषयीचे शब्द.<br>लेखनाचे आणि कथनाचे प्रकार<br>संबोधन : श्रोतेहो, मित्रहो इ.<br>वक्तृत्व<br>असो, असू दे<br>नुकतेच, मघाशी, काल संध्याकाळी, आदल्या दिवशी, पूर्वी, अलीकडेच, यंदा इ. | २०६ |
| ८ | सणवार | विविध सण : नववर्ष, सणांची पक्वान्ने चित्रकथा | रीती काळ (उजळणी) धातुसाधित भाववाचक नामे<br>शब्दयोगी पदे : समक्ष, विरुद्ध, उलट, सह<br>स्थलवाचक क्रियाविशेषणे : आतून, बाहेरून, वरून इ.<br>आज्ञार्थी रूपे : मनावर घे, लाजू नकोस इ.<br>समूहवाचक नामे | पदार्थांची नावे व पाककृतीशी संबंधित शब्द<br>स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे<br>प्रश्नशब्द : कशाशी?<br>जोडीने येणारी नामे : चिडचिड, बडबड, हुरहुर इ. | २३५ |
| ९ | महाराष्ट्रातील प्रमुख शहरे | महाराष्ट्र राज्य व त्यातील प्रमुख शहरांचा अभ्यास करणे : मुंबई आणि पुणे | क्रियापद - नामाची षष्ठी<br>च, ही, सुद्धा, पण, नं, मात्र, फक्त, केवळ<br>अलीकडे, पलीकडे<br>जेवढे - तेवढे, जितके - तितके, एवढे / इतके | बोलीभाषा | २६६ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १० | सामाजिक समस्या आणि सामाजिक मूल्ये | सामाजिक समस्या समजणे, वंचितांचे प्रश्न समजणे<br>शासकीय व स्वयंसेवी संस्थांबद्दल माहिती समजणे<br>सामाजिक मूल्ये : हे केले पाहिजे किंवा ते करता कामा नये | बहुधा, बहुतेक, कदाचित, खात्रीने इ०<br>शब्दयोगी पदे : विषयी, संबंधी, बद्दल<br>संख्याविशेषणे : फार, पुष्कळ, थोडा, किंचित, निम्मा, दुप्पट, दुपदरी, चौपट इ० समजणे<br>प्रयोजक क्रियापदे : सोडणे - सोडवणे, वाढणे - वाढवणे इ० | वंचित, दुर्बल, अल्पसंख्याक लोकांच्या प्रश्नांशी निगडित शब्द<br>एकामागोमाग एक, एकाआड एक, एकापाठोपाठ एक इ०<br>एकाच क्रियापदाचे अनेक अर्थ : उदा० वाटणे, लागणे | २८९ |
| | व्याकरण आराखडा | | | | ३१२ |

# मागील भागात






## चला, उजळणी करू या...

- मराठी भाषा आणि मराठी भाषेचा अभ्यास
- साधा वर्तमानकाळ, साधा भूतकाळ, साधा भविष्यकाळ
- उभयान्वयी अव्यये, शब्दयोगी पदे
- विकारी आणि अविकारी विशेषणे, क्रियाविशेषणे
- प्रश्नशब्द : कसाय, कशीय, कशायत, कसं होतं इ.
- 'चा', 'ची', 'चे'
- सामान्यरूपे
- क्रियापद + 'ऊन'
- विभक्तिप्रत्यय

## १ मराठी भाषा आणि मराठीचा अभ्यास

**१. खालील प्रश्नांच्या मदतीने वरील चित्रांचे वर्णन करू या.**

- वरील चित्रांमध्ये विद्यार्थी अभ्यास कसा करत आहेत? तुम्ही मराठी भाषेचा अभ्यास कसा करता?
- गटांमध्ये अभ्यास करताना काय मजा येते?
- अभ्यास करताना किंवा वर्गात तुम्हाला कधी झोप येते का?
- वर्गात तुम्हाला कधी खूप हसू येते का?
- तुम्हाला गृहपाठ करायला आवडतो का?
- वर्गात बसण्याची कोणती पद्धत तुम्हाला जास्त आवडते? वर्ग तुमच्या मते कसा असला पाहिजे?




तुम्ही सुट्टीत काय काय केलंत?

मराठी सिनेमा पाहिला.

मराठी वृत्तपत्र वाचलं.

मराठी मासिकं वाचली.

मराठी नाटक पाहिलं.

मराठी गाणी ऐकली.

२. सुट्ट्यांचे दिवस

**नताशा :** हॅलो अनुष्का, आज आपला मराठीचा वर्ग सुरू होईल ना? किती वाजता आहे गं?

**अनुष्का :** साडेनऊला. आज आपल्याला पहिल्या तासात आपण सुट्टीत काय काय केलं, ह्याच्यावर बोलायचंय ना? झाला का तुझा सुट्टीचा गृहपाठ?

**नताशा :** हो, मी गृहपाठ तर केलाच, पण मराठीसाठी इतरही खूप गोष्टी केल्या.

**अनुष्का :** म्हणजे? तू केलंस तरी काय?

**नताशा :** मी धमाल मराठी गाणी ऐकली. मराठी खाद्यपदार्थांच्या पाककृती वाचल्या आणि ते पदार्थ केलेसुद्धा. आणि चक्क मराठी सिनेमेसुद्धा पाहिले. आणि तू सांग. तू काय काय केलंस?

**अनुष्का :** मी समुद्रात पोहले...



**क. आता खालील चित्रे पाहून अनुष्काने सुट्टीत आणखी काय काय केले ते पाहू या आणि संवाद पुढे लिहू या.**




मी ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

**ख. काय, नाही का जमत? मग, खाली दिलेल्या पर्यायांची मदत घेऊ या.**

(१. पुस्तक वाचणे, २. नाटक बघणे, ३. घोडेस्वारी करणे, ४. अभ्यास करणे,
५. गप्पा मारणे, ६. गाणे म्हणणे, ७. समुद्रात पोहणे, ८. नाचणे, ९. डोंगर चढणे,
१०. स्वयंपाक शिकणे)

**३. तुम्ही सुट्टीत काय काय केलंत? चला, १०-१२ वाक्ये लिहू या.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**४. काल आणि आज**

**उदाहरणाप्रमाणे साधा वर्तमानकाळ आणि साधा भूतकाळ वापरून वाक्ये बनवू या.**

**गिरीश :** हॅलो, मीनल! काय गं, मुंबईला आली आहेस ना? मग काय कार्यक्रम आहे तुझा?

**मीनल :** तुला तर माहीतच आहे. मुंबईला आले की मी मेट्रोनं (फिरणे) फिरते. मी मरीन ड्राईव्हवर (क) (फिरणे) ----------------, गरम गरम कणीस (ख) (खाणे) ----------, मस्त पावसाची गाणी (ग) (ऐकणे) --------------, उंचच उंच लाटा अंगावर (घ) (घेणे) ----------------, पाण्यात खेळणारी मुलं (च) (पाहणे) ------------------, स्वतःपण चिंब (छ) (भिजणे) ------------------.

**गिरीश :** काय सांगतेस! अगं, मीपण काल हेच सर्व (करणे) केलं. मी मरीन ड्राईव्हवर (ज) (फिरणे) ------------------, गरम गरम कणीस (झ) (खाणे) ----------------, पावसाची गाणी (ट) (ऐकणे) ------------------, उंचच उंच लाटा अंगावर (ठ) (घेणे) ----------------, पाण्यात खेळणारी मुलं (ड) (पाहणे) --------------, स्वतःपण चिंब (ढ) (भिजणे) ------------------.

**५. मराठीतला कोणता शब्द उच्चारणे तुम्हाला अवघड जाते? पुढील शब्द उच्चारून तर बघू या!**

क. ज्ञान - अज्ञान, ज्ञात - अज्ञात, आज्ञा - अवज्ञा

ख. चमचा, चमेली, चांदणी, चक्का, चकमक, चिरंजीव

ग. जीव, जहाज, जग, जागा, जात, जिताजागता माणूस

घ. झोप, झकास, झापड, झेंडा, झुकझुक, झबले, झगमगीत

## २ मायकल, मीरा आणि मीडिया




**मायकल** : मीरा, कालपासून तुझा काही पत्ता नाही. मी सारखा व्हॉट्सअ‍ॅप बघतोय. शेवटी फोन केला सरळ. व्हॉट्सअ‍ॅपवरपण फोन लागला नाही. उगाच किती पैसे खर्च झाले! जर्मनीहून फोन करणं किती महाग आहे! आणि तू फेसबुकवरपण नव्हतीस. मी मेसेज टाकला होता.



**मीरा** : अरे, काय करणार! दोन दिवस झाले आमचं इंटरनेट बंद आहे. मध्ये काही दिवस तर इथला मोबाईल टॉवर बंद होता. मोबाईलशिवाय आता काही जमतच नाही रे! शिवाय आमच्याकडे अधूनमधून वीजपण जाते. मग टीव्हीपण बघता येत नाही. म्हणजे जगाशी संपर्क तुटलाच! आई-बाबांचं बरंय. रोजचं वर्तमानपत्र वाचतात, रेडिओ ऐकतात आणि खूश असतात.

**मायकल** : वर्तमानपत्रं? किती जुनाट! इंटरनेटवर नाही का वाचत ते?

**मीरा** : जाऊ दे ना! पण तू का फोन करत होतास?

**मायकल** : अगं, मुंबईतल्या पुराची बातमी ऐकली. तुम्ही सगळे ठीक आहात ना?

**मीरा** : एकदम मजेत. पण आता इंटरनेट नीट सुरू झालं ना, की आपल्याला परत आपला जर्मन आणि मराठीचा सराव नेहमीप्रमाणे स्काईपवरून सुरू करता येईल. तोवर बाय!



१. **वरील संवादात कोणत्या प्रसारमाध्यमांची नावे आली आहेत? जास्तीत जास्त नावे लिहू या.**

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

२. **तुम्ही आज सकाळपासून त्यांपैकी कोणती माध्यमे वापरलीत?**

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

३. **पन्नास वर्षांपूर्वी ही माध्यमे नव्हती. तेव्हा लोक माहिती कशी मिळवत होते आणि एकमेकांशी कसा संपर्क साधत होते? तीन किंवा चार उदाहरणे देऊ या.**

उदा॰ ते एकमेकांना फोन करत होते.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------





### करा आणि शिका

४. **चला, आपण एक नाटुकले लिहू या आणि मग ते वर्गात सादर करू या.**

एकदा एक माणूस झोपेतून उठतो आणि पाहतो तर काय, त्याच्या रोजच्या वापरातली प्रसारमाध्यमे अचानक त्याला घेराव घालतात आणि त्याच्याशी बोलू लागतात आणि 'मीच कसा चांगला' हे त्याला पटवू पाहतात...

## ३ असणे - होणे, नसणे - न होणे

१. **वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूपे वापरून रिकाम्या जागा भरू या.**

**मनोज :** दिनेश, तुझं काम झालं की नाही?

**दिनेश :** नाही झालं. मी त्या कार्यालयात गेलो होतो, पण तो कर्मचारी तिथे (क) ---------- म्हणजे सकाळी मी फोन केला तेव्हा तो तिथे (ख) ----------------, पण मी तिथे पोचलो तेव्हा तो तिथे (ग) ----------------.

**मनोज :** म्हणजे, तो तिथे (घ) ---------------- तेव्हा तू तिथे नव्हतास आणि तू तिथे (च) ---------------- तेव्हा तो तिथे नव्हता, बरोबर?

**दिनेश :** अरे, किती गोंधळ घालतोयस! तो (छ) ---------------- की नव्हता, मी होतो की (ज) ---------------- हे महत्त्वाचं नाही. काम झालं नाही हे महत्त्वाचं आहे.

## ४ जेव्हा... तेव्हा...

**१. रिकाम्या जागा भरू या.**

(जो - तो, जरी - तरी, जेव्हा - तेव्हा, जसं - तसं, जितका - तितका, जिथे - तिथे, जिकडे - तिकडे, ज्याने - त्याने, ज्याच्याशी - त्याच्याशी, ज्याला - त्याला)

क. ------------ उठतो, ------------ मला सल्ला द्यायला लागतो.

ख. माणूस पैशामागे ------------ धावेल, पैसा ------------ च दूर पळेल.

ग. ------------ मुसळधार पाऊस पडेल, ------------ हे तळे भरेल.

घ. ------------ पाणी असेल, ------------ बाग फुलेल.

च. ------------ मला खूप चांगले मार्क मिळाले नसले ------------ मी परीक्षेत पास तर झालेय ना!

छ. ------------ मंजू जाईल, ------------ तिची मांजरपण जाईल.

ज. शिक्षक ------------ सांगतील, ------------ मी करीन.

झ. ------------ हा कचरा केलाय ------------ तो साफ करावा!

ट. ------------ माझं भांडण होतं ------------ मी परत मैत्री करत नाही.

ठ. ------------ हे काम करता येणार नाही ------------ मी कामावर ठेवणार नाही.

## ५ आजारी आबा

आपल्याला काही तरी झालंय असं आबांना आताशा सतत वाटतं. कधी म्हणतात की मला खूप थकवा वाटतोय, आणि सकाळीसकाळी नऊ वाजताच डोक्यावरून पांघरूण घेऊन झोपून



जातात. आपण काळजी करायला लागलो तर तितक्यात पटकन उठतात, "आत्ता जाऊन येतो" असं ओरडून सांगतात आणि गायब होतात, ते एकदम जेवायच्या वेळी उगवतात. मग दाबून जेवतात. "आता पोटाला तडस लागली. कशाला इतका साग्रसंगीत स्वयंपाक करायचा! साधा वरणभात करावा," असं म्हणून परत आरडाओरडा करतात आणि ओवा, हिंग अशा पोटदुखीवरच्या औषधांच्या बाटल्या उलट्यापालट्या करायला लागतात. संध्याकाळी मुलं

शाळेतून येऊन धिंगाणा घालायला लागली, की ह्यांना कलकलायला लागतं. मुलांना खेळायला बाहेर पिटाळलं, की "अगं, किती शांत शांत आहे घरात! मला चैन पडत नाही मग. ह्या डिप्रेशननं मरेनच मी फटकन", असं म्हणत घरभर येरझारा घालायला लागतात.



रात्री आबांच्या छातीत दुखायला लागतं आणि परत घरादाराची धावपळ सुरू होते. त्यांना सोडा प्यायला देऊन डॉक्टरांना बोलावलं जातं. डॉक्टर आल्यावर आम्ही अगदी हळूच त्यांच्या खोलीत डोकावतो, तेव्हा खरं तर आबा जागेच असतात. "अरे, आता मला शांत झोपूही देणार नाही का तुम्ही लोक? मी कधी वर जातोय ह्याचीच वाट पाहताय सगळे, पण मला काही धाड भरली नाहीये! मी निदान शंभर वर्षं तरी जगणारेय, बघाच सगळे!" असं म्हणून परत डोक्यावर चादर ओढून क्षणात घोरायला लागतात!

**१. दिवसभरात आबांना कोणकोणते आजार होतात?**

________________________________________________________________________

________________________________________________________________________

**२. आबांचे हे आजार खरे आहेत का? तुम्हाला काय वाटते?**

________________________________________________________________________

________________________________________________________________________

**३. तुमच्या माहितीत कोणी अशी वृद्ध व्यक्ती आहे का? तिचे काय प्रश्न आहेत?**

________________________________________________________________________

________________________________________________________________________

________________________________________________________________________

### आमचे आजोबा हरवले आहेत.



आमचे आजोबा हरवले आहेत. ज्याला दिसतील त्याने पुढील नंबरवर संपर्क करावा - १२३४५६७८.

**४. खालीलपैकी योग्य ती नामे आणि विशेषणे वापरून फोटोतील व्यक्तीचे वर्णन करू या.**

(उंची, रंग, जाडी, नाक, डोळे, केस, स्वभाव, पोशाख वगैरे)
(मध्यम, गोरा, बारीक, काळे, मोठे, निळा, जांभळा, कमी वगैरे)

________________________________________________________________________

________________________________________________________________________

________________________________________________________________________

## ६ उभयान्वयी अव्यये Conjunctions

**१. उभयान्वयी अव्ययांची व्याख्या पूर्ण करू या.**

(दोन, अविकारी, अधिक)

**दोन किंवा (क) ----------- शब्द, अथवा (ख) ----------- किंवा अधिक वाक्ये यांना जोडणाऱ्या (ग) ----------- शब्दांना उभयान्वयी अव्यये असे म्हणतात.**

**२. आता पुढील अव्यये वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

(आणि, व, शिवाय, पण (२), किंवा, म्हणून)

क. आईने मला मंडईतून फळे ------------- भाज्या आणायला सांगितले. मी फळे आणली -------------- भाज्या विसरलो.

ख. मंगेशची खेळात उत्तम प्रगती आहे --------------- अभ्यासात तो बराच मागे आहे.

ग. अलकाने महिलामंडळाच्या नाटकात काम केले, -------------- समूहगायनातपण ती होती.

घ. तुला गुलाबी -------------- निळा हे दोन्ही रंग चांगले दिसतात. तू आज गुलाबी साडी नेस -------------- निळा ड्रेस घाल.

च. मधू धावण्याच्या शर्यतीत पहिला आला -------------- हा चषक त्याला बक्षीस मिळाला.

**३. मी आणि माझी स्कूटर**

**योग्य ते शब्द वापरून पुढील वाक्ये पूर्ण करू या.**



(किंवा, तरी (३), शिवाय, तरी, आणि, जरी - तरी, की, तरी, नाहीतर, म्हणून)

**बंडू** : काय छान स्कूटर आहे माझी! मी किक् मारली आणि लगेच सुरू झाली.

**टिंगू** : छे रे! मी किक् मारली, (क) ------------------ स्कूटर सुरू झाली नाही.

**मंगू** : हो, मी किक् मारली, (ख) ------------------ स्टार्टर बटण दाबले, तरी स्कूटर सुरू झाली नाही.

**चंगू** : अरे, तू काहीही केलंस ना, (ग) ------------------ ही स्कूटर सुरू होणार नाही.

**टिंगू** : आता तू ही गाडी दुरुस्त (घ) ------------------ करून घे, (च) ------------- विकून (छ) ------------------ टाक.

**बंडू** : नाही. तू काहीही म्हटलंस (ज) ----------------- मी ही गाडी विकणार नाही.

**मंगू** : तू ही जुनी गाडी वापरतोस ना (झ) ----------------- तुला रोज उशीर होतो.

**बंडू** : ठीक आहे, मी नवी गाडी घेईन. पण (ट) ----------------- मी नवी गाडी घेतली, (ठ) ----------------- ही जुनी विकणार नाही.

**चंगू** : बरं! पण तू ही गाडी विकलीस (ड) ----------------- मगच मी तुझ्याशी बोलेन. विचार कर, आता तुझ्याजवळ मी असेन (ढ) ----------------- ही डब्बा गाडी!

## ७ साधा भविष्यकाळ **Simple Future Tense**

**१. कंसातील क्रियापदांची साध्या भविष्यकाळाची रूपे वापरू या.**

**नंदिता :** लवकरच मी गाडी चालवायला (शिकणे) शिकीन / शिकेन. मग मी गाडी चालवण्याची परीक्षा (क) (देणे) ---------------. मग मला परवाना (ख) (मिळणे) -------------. मग मी आईची गाडी घेऊन (ग) (फिरणे) ---------------. मित्रमैत्रिणींबरोबर मजा (घ) (करणे) -----------------. तुलापण (च) (नेणे) ----------------- फिरायला. येशील ना?

**सुहास :** हो, मी (छ) (बसणे) ----------------- ना तुझ्या गाडीत. पण तू गाडी हळू (ज) (चालवणे) --------------- ना? वेळेवर ब्रेक (झ) (लावणे) ---------------- ना? मला सुखरूप घरी (ट) (पोचवणे) ----------------- ना?

**नंदिता :** हो रे, काही काळजी करू नकोस. आपण फिरायला (ठ) (जाणे) ---------------, सिनेमा (ड) (बघणे) ----------------, रेस्टोरंटमध्ये (ढ) (खाणे) ---------------, (ण) (पिणे) ----------------, मज्जा करू.

**सुहास :** ठरलं तर मग. मी तुझ्याबरोबर (त) (येणे) ----------------, पिझ्झा (थ) (खाणे) ----------------, कॉफी (द) (पिणे) ----------------, सिनेमा (ध) (बघणे) ----------------. पण नंदिता, तिकीट तूच (न) (काढणे) ------------- ना, बिलसुद्धा तूच (प) (भरणे) ---------------- ना आणि मला घरीपण तूच (फ) (सोडणे) ---------------- ना?

२. कंसातील क्रियापदांची उदाहरणाप्रमाणे साध्या भविष्यकाळाची रूपे वापरू या.

**रोहन :** मला काही दिवसांसाठी घर भाड्यानं मिळेल का?

**राहुल :** का रे, तुझ्या घराचं काय झालं?

**रोहन :** मला प्रमोशन (मिळणे) मिळणार आहे. मी घरात खूप सुधारणा (क) (करणे) --------- ---------. रंग (ख) (लावणे) --------- --------, नवीन फर्निचर (ग) (घेणे) --------- ---------, पडदे (घ) (बदलणे) --------- --------, टीव्हीपण नवीन (च) (आणणे) --------- ------- आणि नंतर बायकोबरोबर परदेशीपण (छ) (जाणे) --------- --------.

**परकीय भाषा शिकणे**

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| मी | |
| उदा. मी येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकेन / शिकीन. | मी येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकेन / शिकीन. |
| आम्ही / आपण | आम्ही / आपण येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकू. |
| तू | तू येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकशील. |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकाल. |
| तो | तो येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकेल. |
| ती | ती येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकेल. |
| ते | ते येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकेल. |
| ते (अ. व. ) | ते येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकतील. |
| त्या | त्या येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकतील. |
| ती | ती येत्या दोन वर्षांत एक तरी परकीय भाषा शिकतील. |

## ८ शब्दयोगी पदे Postpositions

शब्दयोगी पदे वाक्यातील नामांना, सर्वनामांना किंवा कधी कधी क्रियापदांनाही जोडून येतात आणि त्यांचा त्याच वाक्यातील इतर शब्दांशी असणारा संबंध दाखवतात.
शब्दयोगी पद जोडताना ज्या शब्दाला ते जोडले जाते त्याचे सामान्यरूप होते.
उदा。 झाडावर पक्षी बसलेले आहेत.
झाड + वर = झाडावर.

**१. कंसातील शब्दयोगी पदे वापरून खालील वाक्ये पूर्ण करू या.**

(सुद्धा, आत, बरोबर, पर्यंत, बाहेर, पूर्वी, पुढे, समोर, पण, मुळे, कडे)



**आई** : शिवाली, तू सातच्या आत मला घरात दिसली पाहिजेस, (क) सातच्या ---------- एकही मिनिट गेलेलं मला चालणार नाही!

**शिवाली** : आई, हे काय नवीनच? असे नियम (ख) ह्या -------- (ग) आपल्या -------- कधीच नव्हते.

**आई** : माहितीये गं मला, पण मी तरी काय करू? आधी कसे दिवस होते आणि आता कसे दिवस आलेत. मुलं (घ) घरा -------- गेली, की ती परत (च) येई ------ पालकांच्या जिवात जीव नसतो. मुलं सारखी आपल्या (छ) नजरे -------- असावीत असं वाटतं.

**शिवाली** : हे बघ आई, (ज) सारिका -------- (झ) माझ्या -------- असणार आहे आज. (ट) त्या -------- तू मुळीच काळजी करू नकोस. आम्ही येतोच वेळेवर. (ठ) तरी -------- जर उशीर झालाच तर मी फोन करीन ना!

**२. कंसातील शब्दयोगी पदे वापरून खालील वाक्ये पूर्ण करू या.**

(कडे, वर, आडून, मध्ये, खाली, वर, खालून, समोर)



पावसाच्या सरी (क) जमिनी ---------- जोरात पडायला लागल्या आणि जमिनीतून मातीचा सुंदर वास येऊ लागला. थोड्याच वेळात जिथेतिथे पाण्याची डबकी साचली. ह्या डबक्यांच्या (ख) पाण्या ---------- नाचायला मुलांची फौज हजर झाली. (ग) घरा ---------- च्या वडाच्या (घ) झाडा ---------- उभे असलेले सोमणआजोबा उडणाऱ्या (च) छत्री ---------- हात बाहेर

काढून (छ) हाता ---------- पावसाचे थेंब झेलण्याचा प्रयत्न करत होते आणि (ज) खिडकी ________ सोमणआजी (झ) त्यांच्या ________ पाहत खुदुखुदु हसत होत्या.

## ९ प्रश्नशब्द **Interrogatives**

**१. अधोरेखित शब्दांवर कंसातील प्रश्नशब्द वापरून प्रश्न विचारू या.**

(कसंय, कसेयत, कसंय, कसाय, कशायत, कसं होतं, कसाय, कसं होतं, कसंय)




मी कालच 'लगान' सिनेमा पाहिला. सिनेमा <u>मस्त</u> आहे. 'शुभम्' नावाचं नवीन थिएटर झालं आहे ना, तिथे गेलो होतो आम्ही. थिएटर <u>आलिशान</u> आहे. नंतर आम्ही रामकृष्ण उपाहारगृहात जेवायला गेलो. उपाहारगृह <u>उत्तम</u> आहे. <u>चविष्ट</u> जेवण झाल्यावर अत्रे कुटुंबियांना भेटायला गेलो. अत्रे कुटुंबीय फारच <u>प्रेमळ</u> आहेत. त्यांच्याकडे एक <u>गावठी</u> कुत्रा आहे आणि कालच त्यांच्या मुलीनं एक <u>पांढरं</u> मांजर आणलंय, तर तेही बघायचं होतं. शिवाय त्यांच्या <u>म्हाताऱ्या</u> आजी गावाहून आल्या आहेत, त्यांनाही भेटायचं होतं. तिथे परत <u>थंडगार</u> आईस्क्रीमचा आग्रह झाला म्हणून ते खाल्लं आणि मगच घरी परत आलो.

उदा. मस्त : प्रश्न : लगान सिनेमा कसाय? उत्तर : लगान सिनेमा मस्त आहे.

क. आलिशान : ______________________________
______________________________

ख. उत्तम : ______________________________
______________________________

ग. चविष्ट : ______________________________
______________________________

घ. प्रेमळ : ______________________________
______________________________

च. गावठी : ______________________________
______________________________

छ. पांढरं : ______________________________
______________________________

ज. म्हाताऱ्या : ______________________________
______________________________

झ. थंडगार : ______________________________
______________________________

## १० 'चा', 'ची', 'चे' (Terminations of the genitive case)


**१. रिकाम्या जागी 'चा', 'ची', 'चे', किंवा 'च्या' वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

क. 

मिलिंद ----- लग्नाला आज तीस वर्षे पूर्ण झाली. त्या ------ भावंडांनी त्या ------ साठी एक समारंभ केला. त्या ------- मुलं, त्या ------ आई, त्या ----- वडील आणि त्या ------ सर्व मित्रमंडळींनी मिलिंद आणि त्या ------ बायकोला एक छान भेट दिली. त्यांनी त्या दोघांना युरोप दौऱ्या ------ तिकिटं दिली.

ख. 

बाई : मुलांनो, सुट्टी ------ गृहपाठ लिहून घेतलात ना? वेळ ------ वेळी गृहपाठ करा. दिवाळी ------ सुट्टीत मजा करा, सुट्टी ------ मजा घ्या, पण शिकवलेलं विसरू नका!

ग. 


मुले : बाई, सुट्टी ------ महिन्यात तरी अभ्यास नका देऊ ना! दिवाळी ------ दिवसांत आम्हाला फक्त खेळायचं असतं, फराळा ------ पदार्थांवर ताव मारायचा असतो, आम ------ नातेवाइकांना भेटायचं असतं.

घ. 

पहाटे ------ वेळी आकाशात किती सुंदर तारे दिसतात!

च. 

हे काम म्हणजे माझ्या डाव्या हाता ------ मळ आहे.

छ. 

त्या ------ पासून सावध राहा, तो या गल्ली ------ दादा आहे.

ज. 

जंगल ------ राजा कोण? सांगा बरं!

**२. महाराष्ट्र माझा**

**क. रिकाम्या जागी 'चा', 'ची', 'चे / चं' किंवा 'च्या' वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

माझ्या महाराष्ट्रात काय एकेक शहरं आहेत म्हणून सांगू! प्रत्येक शहराचं एक वेगळंच वैशिष्ट्य! मुंबईला (१) स्वप्नां ------ नगरी म्हणतात. (२) महाराष्ट्रा ------ राजधानी असणारं हे शहर (३) देशा ------ आर्थिक राजधानी म्हणूनही प्रसिद्ध आहे. इथे कोणी कधी उपाशी राहत नाही. ही नगरी म्हणजे (४) श्रीमंतां ------ स्वर्ग तर (५) गरीबां ------ अन्नदात्री. (६) मुंबई ------ वडापाव आणि (७) मुंबई ------ पावभाजी ह्यांनी मात्र गरीब असो वा श्रीमंत, (८) सर्वां ------ मने जिंकली आहेत.

पुण्याला (९) विद्ये ------ माहेरघर म्हणतात आणि (१०) महाराष्ट्रा ------ सांस्कृतिक राजधानी (११) असण्या ------ मानपण पुण्याचाच. (१२) पुण्या ------ खवय्यांनी (१३) चितळ्यां ------ (१४) बाकरवडी ------ आणि (१५) आंबाबर्फी ------ चव जगभरात पोचवलीय.





(१६) कोल्हापूर ------ चप्पल जितकी प्रसिध्द आहे, तितकाच तिथला दागिनाही, म्हणजे कोल्हापुरी साज. (१७) कोल्हापूर ------ (१८) देवी ------, (१९) अंबाबाई ------ दर्शनाला गर्दी करणारे भाविक नंतर (२०) मिसळपावा ------ ठेल्यासमोर रांगा लावतात.

मालवणला जाऊन तिथल्या (२१) सोलकढी ------ चव न घेणारा विरळाच.

(२२) शिर्डी ------ (२३) साईबाबां ------ दर्शन घेतल्यावर नाशिकला येऊन (२४) नाशिक ------ (२५) चिवड्या ------ चव तर घ्यायलाच हवी!

नागपूरविषयी बोलावं तेवढं थोडंच. नागपुरी (२६) संत्र्या ------ बर्फी खावी आणि सोबत (२७) हल्दीराम ------ अनेक खुमासदार पदार्थही चाखावेत.



सातारा किंवा (२८) सांगली ------ कंदी (२९) पेढ्यां ------ गोडी काही वेगळीच! ३०) सोलापूर ------ नाव घेतलं, की सर्वांना (३१) सोलापूर ------ चादरच आठवते, पण (३२) सोलापूर ------ (३३) शेंगदाण्यां ------ चटणी तितकीच प्रसिद्ध आहे.

तर मित्रांनो, जेव्हा महाराष्ट्रात याल तेव्हा ह्या सर्व (३४) गोष्टीं ------ आठवण ठेवा हं!

**ख. कोणत्या खाद्यविशेषांसाठी ही शहरे प्रसिद्ध आहेत?**

१. मुंबई : ------------------------------------------------------------
२. पुणे : ------------------------------------------------------------
३. कोल्हापूर : ------------------------------------------------------------
४. मालवण : ------------------------------------------------------------
५. नागपूर : ------------------------------------------------------------
६. नाशिक : ------------------------------------------------------------
७. सातारा : ------------------------------------------------------------
८. सांगली : ------------------------------------------------------------
९. सोलापूर : ------------------------------------------------------------

**ग. खाद्यपदार्थांखेरीज इतर कोणत्या गोष्टींसाठी पुढील शहरे प्रसिद्ध आहेत?**

(पाट्या, साईबाबा, चपला, चादरी, लोकल ट्रेन)

१. मुंबई : ------------------------------------------------------------
२. पुणे : ------------------------------------------------------------
३. कोल्हापूर : ------------------------------------------------------------
४. शिर्डी : ------------------------------------------------------------
५. सोलापूर : ------------------------------------------------------------

## ११ क्रियाविशेषण / विशेषण Adverbs / Adjectives

**कंसातील योग्य ते क्रियाविशेषण / विशेषण वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

(इकडेतिकडे, अरबटचरबट, जिथे - तिथे, मचामचा, बारीकसारीक, वेळीअवेळी, आजूबाजूला, गटागटा)

“मिहीर, आपण लोकांकडे जातोय, तिथे शहाण्यासारखं वाग.”



१. नेहमी --------- जाशील -------------- वेड्यासारखा वागून मला लाज आणतोस.
२. हे बघ, उगाच त्यांच्या घरात -------------- फिरत बसू नकोस.
३. -------------- खाण्यासाठी हट्ट करू नकोस.
४. -------------- खाऊन पोट नको बिघडवून घेऊस.

५. फार आरडाओरडा करू नकोस. -------------- इतर लोक राहतात हे लक्षात ठेव.

६. मिनू आणि सत्या तुझे चांगले मित्र आहेत . त्यांच्याशी -------------- कारणांवरून भांडू नकोस बरं!

७. हो, आणखी एक, -------------- खाणं, -------------- दूध पिणं, हे घरी ठीक आहे, तिथे नीट वाग.”

## १२ सामान्य रूपे **Oblique forms**

**१. कंसातील शब्दांची योग्य ती सामान्य रूपे करून वाक्ये पूर्ण करू या.**

क. (पुस्तक) --------------चं पाचवं पान उघडा आणि दुसरा परिच्छेद वाचा.


ख. मी आज सकाळी माझ्या (भाऊ) --------------कडे गेले होते.

ग. अरे, (ससा) --------------ला काय घाबरायचं! किती गोजिरवाणा असतो तो!

घ. तू (पाणी) --------------ची बाटली आणलीयस ना बरोबर?

च. ह्या (केळं) --------------चं साल इतकं काळं का?

छ. शाळेच्या (शिपाई) --------------------जवळ निरोप दिलाय मी.





ज. विद्यार्थ्यांनी (फळा) --------------ला हात लावू नये.

झ. माळी रोज (बाग) --------------ला पाणी घालतो.


ट. मला (लिंबू) --------------चं सरबत फार आवडतं.

ठ. स्टेशन कोणत्या (दिशा) --------------ला आहे?

## १३ क्रियापद + ‘ऊन’

**१. अधोरेखित क्रियापदांचे मूळ रूप लिहू या.**

पातेलेभर दूध <u>पिऊन</u> सुस्त पडलेली मांजर उंदराला <u>पाहून</u> ताडकन उठली आणि त्याच्या मागे धावली. मांजराला <u>चकवून</u> उंदीर धूम पळाला आणि बिळात <u>शिरून</u> बसला.



क. पिऊन : पिणे

ख. पाहून : ------------------------------

ग. चकवून : ------------------------------

घ. शिरून : ------------------------------

दिवसभर टीव्ही बघून आजोबांचे डोळे थकून गेले; म्हणून ते बागेत फिरायला गेले, तर चालून चालून त्यांचे पाय भरून आले.

क. थकून : ------------------------------

ख. चालून : ------------------------------

ग. भरून : ------------------------------



**२. कंसातील क्रियापदाचे 'ऊन' हा प्रत्यय लावून रूप तयार करू या.**



१. अभ्यास (क) (करणे) ------------ झाल्यावर मी मित्रांबरोबर बाहेर (ख) (फिरणे) -------- आलो. नंतर विजेचे बिल (ग) (भरणे) ------------ आलो आणि मग जिममध्ये गेलो. तिथे सायकल (घ) (चालवणे) ---------- आणि (च) (पोहणे) ------------ फार दमणूक झाली.

२. रोनित, एक घास बत्तीस वेळा (छ) (चावणे) --------- खा. नीट (ज) (जेवणे) -------- मगच पानावरून ऊठ. अर्ध्यावरून (झ) (उठणे) ---------- जाऊ नकोस, नाही तर थोड्याच वेळात भूक लागेल आणि मग (ट) (रडणे) ------------ गोंधळ घालशील.

## १४ विभक्तिप्रत्यय Suffixes

**१. योग्य विभक्तिप्रत्यय वापरून वाक्ये लिहू या.**

उदा. निखिल, तो, बहीण, नवरा, मित्र, कालच, मैत्री, करणे
निखिलने त्याच्या बहिणीच्या नवऱ्याच्या मित्राशी कालच मैत्री केली.

क. मीना, ती, आई, बटवा, थोडे, पैसे, घेणे

ख. मी, अक्षदा, ती, वाढदिवस, पुस्तक, भेट, देणे

ग. अजित, मीना, रोज, संध्याकाळ, समुद्र, फिरायला नेणे

घ. रवि, मी, घर, कपाट, कप्पा, गुपचूप, वही, लपवणे

च. पुणे, मुंबई, जाणे, वाट, लोणावळा, नाव, स्टेशन, लागणे

छ. आगगाडी, एक, डबा, एकवेळ, पन्नास, माणसे, बसणे



------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

---

---

---

---

---

२. विभक्तिप्रत्यय 'स'



"आबा, त्यांस सांग; म्हणावे, (क) **नोकरमाणसास** फुकट राबवून घेण्याची (ख) **आम्हांस** सवय नाही. शिवाप्पा राबतो, (ग) **त्यास** त्याचा हक्काचा दाम मिळालाच पाहिजे. बरे, देणारे आम्ही आणि झोंबतेय यांच्या (घ) **नाकास!** समोर या, म्हणावे. आडून (च) **कशास** बोलता? त्यातही, हे सगळे राधेजवळ बोलायचे? (छ) **तीस** काय कळते? जरा आपल्या वयाचा तरी काही विचार? आणि आबा, (ज) **तूस** हे सांगणे जमत नसेल, तर मी सांगते. नको ना? मग जा!"

३. **वरील परिच्छेदातील 'स' च्या जागी तुम्ही कोणता प्रत्यय लिहाल? हा परिच्छेद त्याप्रमाणे परत लिहू या. आवश्यक तिथे ऱ्हस्व-दीर्घाचे बदलही करू या.**

---

---

---

---

---

---

---

**सर्वनाम (प्रथमपुरुष, द्वितीयपुरुष) Pronouns (First Person, Second Person)**

| विभक्ती Case | प्रथमपुरुष First person | | | द्वितीयपुरुष Second person | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकवचन | अनेकवचन | | एकवचन | एकवचन / अनेकवचन | |
| प्रथमा Nom. | मी | आम्ही | आपण | तू | तुम्ही | आपण |
| द्वितीया Acc. | मला | आम्हाला, आम्हांस | आपल्याला, आपल्यास, आपणाला, आपणास | तुला | तुम्हाला, तुम्हांस | आपल्याला, आपल्यास, आपणाला, आपणास |
| तृतीया Instr. | मी, माझ्याने, माझ्याच्याने, माझ्याशी | आम्ही, आमच्याने, आमच्याच्याने, आमच्याशी | आपण, आपल्याने आपल्याच्याने, आपल्याशी | तू, तुझ्याने, तुझ्याच्याने, तुझ्याशी | तुम्ही, तुमच्याने, तुमच्याच्याने, तुमच्याशी | आपण, आपल्याने आपल्याच्याने, आपल्याशी |
| चतुर्थी Dat. | मला | आम्हाला, आम्हांस | आपल्याला, आपल्यास, आपणाला, आपणास | तुला | तुम्हाला, तुम्हांस | आपल्याला, आपल्यास, आपणाला, आपणास |
| पंचमी Abl. | माझ्याहून | आमच्याहून | आपल्याहून, आपणाहून | तुझ्याहून | तुमच्याहून | आपल्याहून, आपणाहून |
| षष्ठी Gen. | माझा, माझी, माझे, माझे, माझ्या, माझी | आमचा, आमची, आमचे, आमचे, आमच्या, आमची | आपला, आपली, आपले, आपले आपल्या, आपली | तुझा, तुझी, तुझे, तुझे, तुझ्या, तुझी | तुमचा, तुमची, तुमचे, तुमचे, तुमच्या, तुमची | आपला, आपली, आपले, आपले आपल्या, आपली |
| सप्तमी Loc. | माझ्यात (माझ्यामध्ये) | आमच्यात (आमच्यामध्ये) | आपल्यात, आपणात (आपल्यामध्ये, आपणामध्ये) | तुझ्यात (तुझ्यामध्ये) | तुमच्यात (तुमच्यामध्ये) | आपल्यात, आपणात (आपल्यामध्ये, आपणामध्ये) |

सर्वनाम (तृतीयपुरुष) **Pronouns (Third Person)**

| विभक्ती Case | तृतीयपुरुष Third person | | |
|---|---|---|---|
| | एकवचन (पु., नपुं.) | एकवचन (स्त्री.) | अनेकवचन (पु., स्त्री., नपुं.) |
| प्रथमा Nom. | तो / हा / जो | ती / ही / जी | ते / हे / जे<br>त्या / या / ज्या<br>ती / ही / जी |
| द्वितीया Acc. | त्याला / याला / ज्याला | तिला / हिला / जिला | त्यांना / यांना / ज्यांना |
| तृतीया Instr. | त्याने / याने / ज्याने<br>त्याच्याने / याच्याने / ज्याच्याने<br>त्याच्याच्याने / याच्याच्याने / ज्याच्याच्याने<br>त्याच्याशी / याच्याशी / ज्याच्याशी | तिने / हिने / जिने<br>तिच्याने / हिच्याने / जिच्याने / तिच्याच्याने / हिच्याच्याने / जिच्याच्याने<br>तिच्याशी / हिच्याशी / जिच्याशी | त्यांनी / यांनी / ज्यांनी<br>त्यांच्यानी / यांच्यानी / ज्यांच्यानी त्यांच्याच्यानी / यांच्याच्यानी / ज्यांच्याच्यानी<br>त्यांच्याशी / यांच्याशी / ज्यांच्याशी |
| चतुर्थी Dat. | त्याला / याला / ज्याला | तिला / हिला / जिला | त्यांना / यांना / ज्यांना |
| पंचमी Abl. | त्याहून / याहून / ज्याहून<br>त्याच्याहून / याच्याहून / ज्याच्याहून | तीहून / जीहून<br>तिच्याहून / हिच्याहून / जिच्याहून | त्यांहून / यांहून / ज्यांहून<br>त्यांच्याहून / यांच्याहून / ज्यांच्याहून |
| षष्ठी Gen. | त्याचा / याचा / ज्याचा<br>त्याची / याची / ज्याची<br>त्याचे / याचे / ज्याचे<br>त्याचे / याचे / ज्याचे<br>त्याच्या / याच्या / ज्याच्या त्याची / याची / ज्याची | तिचा / हिचा / जिचा<br>तिची / हिची / जिची<br>तिचे / हिचे / जिचे<br>तिचे / हिचे / जिचे<br>तिच्या / हिच्या / जिच्या तिची / हिची / जिची | त्यांचा / यांचा / ज्यांचा<br>त्यांची / यांची / ज्यांची<br>त्यांचे / यांचे / ज्यांचे<br>त्यांचे / यांचे / ज्यांचे<br>त्यांच्या / यांच्या / ज्यांच्या त्यांची / यांची / ज्यांची |
| सप्तमी Loc. | त्यात / यात / ज्यात<br>त्याच्यात / याच्यात / ज्याच्यात | तीत / हीत / जीत<br>तिच्यात / हिच्यात / जिच्यात | त्यांत / यांत / ज्यांत<br>त्यांच्यात / यांच्यात / ज्यांच्यात |

तो – पुरुषवाचक सर्वनाम (तृतीय पुरुष)
हा – दर्शक सर्वनाम
जो – संबंधी सर्वनाम

याला = ह्याला

## १५ साहचर्य संबंध (नाम + क्रियापद जोडी / इतर शब्द + क्रियापद जोडी) Collocations

- **प्रत्येक नामाला स्वत:चे हक्काचे असे कमीत कमी एक क्रियापद असते.**
  उदा॰ गोंधळ उडणे, शोध लावणे, शक्कल लढवणे इ॰

**खालील उदाहरणे पाहू या.**

१. "काय रे, मी सांगितलेले काम केलेस का?"

२. "माझी आजी फार कष्ट करते."

३. "मिळाला ना प्रवेश इंजिनिअरिंग कॉलेजला? मग कधी देणार पेढे?"

नामांव्यतिरिक्त इतर शब्दांबरोबरही क्रियापदांच्या जोड्या ठरलेल्या आहेत.
उदा॰ आश्चर्यचकित होणे, आनंदित होणे, प्रकाशित करणे, मनावर घेणे इ॰



## नाम व क्रियापद जोड्या Noun and verb combinations

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. गंमत करणे | क. दादा माझ्या खोड्या काढून माझी खूप गंमत करतो.<br>ख. जत्रेत आम्ही खूप गंमत केली. |
| २. टिंगल करणे | गबाळेपणावरून साहिल शमिकाची टिंगल करतो. |
| ३. आदर करणे | मीनल मोठ्या व्यक्तींचा नेहमी आदर करते. |
| ४. उशीर होणे | साहेबांना सभेला यायला अर्धा तास उशीर झाला. |
| ५. गोंधळ होणे | पावसाचे पाणी रुळांवर आल्यामुळे गाड्यांचा गोंधळ झाला. |
| ६. ओढाताण होणे | कमी पगारात खर्च भागवताना श्रीकांतची ओढाताण होते. |
| ७. दमछाक होणे | शाळा आणि क्लासच्या धावपळीत मुलांची दमछाक होते. |
| ८. रोग होणे | सतत बसून काम करण्यामुळे विविध रोग होतात. |
| ९. उत्साह वाटणे | पावसामुळे हवेत गारवा आला आणि मनाला उत्साह वाटला. |
| १०. लाज वाटणे | सगळ्यांसमोर बोलायची तिला नेहमीच लाज वाटते. |
| ११. काळजी वाटणे | परदेशी जाणाऱ्या विशालची आईला काळजी वाटत होती. |
| १२. कुंकू लावणे | जेनीने कपाळावर लाल कुंकू लावले तेव्हा ती जास्तच सुंदर दिसू लागली. |
| १३. रंग लावणे | घराला रंग लावला की घर फारच सुंदर दिसते. |
| १४. खोड्या काढणे | शलाकाचा दादा नेहमी तिच्या खोड्या काढतो; मग ती रडते. |
| १५. गडबड उडणे | पावसाला अचानक सुरुवात झाल्याने लोकांची गडबड उडाली. |
| १६. भेट देणे | क. समीरने अमेरिकेच्या ट्रीपचे तिकीट शाल्मलीला भेट दिले.<br>ख. शाल्मलीने अमेरिकेला भेट दिली. |
| १७. पाल्हाळ लावणे | मी समीरला म्हटलं, "उगाच पाल्हाळ लावू नकोस, मुद्द्याचं बोल." |

## इतर शब्द व क्रियापद जोड्या Other words and verb combinations

| इतर शब्द + क्रियापद<br>Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. पाठ करणे | नेहमी म्हटल्या की कविता पाठ होतात. |
| २. माफ करणे | साहिलच्या चुकीसाठी बाबांनी त्याला माफ केले. |
| ३. मनाला लावून घेणे | स्पर्धेतील अपयश अमोघने मनाला फारच लावून घेतले. |

# व्यक्ती आणि वल्ली

१








## चला, शिकू या...


- व्यक्ती आणि वल्ली : स्वभाव, गुणवैशिष्ट्ये, सवयी
- स्त्री-पुरुष : पूर्वग्रह, नात्यांमधील अडचणी, पुरुष आणि घरकाम, स्त्रिया आणि नोकरी
- भाववाचक नामे
- अपूर्ण वर्तमानकाळ, रीती वर्तमानकाळ
- शब्दयोगी पदांप्रमाणेही वापरली जाणारी विशेषणे व क्रियाविशेषणे : योग्य, लायक, सारखा इ.
- असं-तसं, असंच-तसंच, अशी-तशी, असंतसं


## १ व्यक्तिमत्त्वे

माणूस हा साधारणपणे समाजप्रिय प्राणी आहे. त्याला काही तरी म्हणायचे असते, त्याला प्रेम करायचे असते, रागवायचे आणि भांडायचे असते, मन मोकळे करायचे असते, नाते जोडायचे असते. त्यासाठी कुटुंब, मित्रमैत्रिणी, शेजारी, सहकारी असे कोणी ना कोणी आपल्या अवतीभोवती असावे असे त्याला वाटत असते.


पण तो एवढ्यावर समाधानी नसतो. दूर, उंच कुठे तरी असणाऱ्या काही विशेष माणसांशीही त्याला आपले नाते जोडायचे असते. त्यांच्याशी त्याचा प्रत्यक्ष संबंध येत नाही. त्यांच्यापैकी काही माणसे तर पूर्वी, वेगळ्याच काळात होऊन गेलेली असतात. तरीही, ज्या जगात, ज्या कालखंडात आपण जगत आहोत, त्याच जगात कुठे तरी ही माणसेही आहेत; आत्ता नसतील, तर पूर्वी कधी तरी होती; ज्या भूमीवर त्यांची पावले पडली, त्या पाऊलखुणांवर, कदाचित, आपण आपलेही पाऊल टेकवले असेल आणि जे विश्व त्यांच्या डोळ्यांनी पाहिले, तेच आपणही पाहत असू, ही भावना 'चांगला माणूस' म्हणून जगण्यासाठी त्याला बळ आणि आधार देत असते. एक प्रकारे त्या व्यक्ती त्याच्यासाठी 'आदर्श व्यक्ती' होतात.

**१. पुढे दिलेल्या छायाचित्रांमध्ये तुम्हालाही असे बळ देणारी काही माणसे आहेत का? चित्रांखाली त्यांची नावे लिहू या.**


क. --------------


ख. --------------


ग. --------------



घ. --------------


च. --------------


छ. --------------


ज. --------------


झ. --------------


ट. --------------

**२. चर्चा करू या.**

- त्यांच्याबद्दल तुम्हाला काय माहीत आहे? ती विशेष का वाटतात?
- जे परिचित नाहीत, त्यांच्याबद्दल वर्गात काय माहिती मिळाली?

**मी ह्यांना ओळखतो...**
**मी ह्यांचं गाणं ऐकलं आहे...**
**कलाक्षेत्रातील ह्यांची कामगिरी नेत्रदीपक आहे...**
**ह्यांच्या नावाने अनेक विश्वविक्रम आहेत...**
**ह्यांनी केलेल्या कार्यातून मला खूप प्रेरणा मिळते...**
**मी ह्यांच्याविषयी वाचलं आहे...**
**हा माझा आवडता खेळाडू आहे...**
**असा नट / नेता पुन्हा होणे नाही...**
**हे एक उत्तम कलाकार होते...**

**३. वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर तुमची ‘आदर्श व्यक्ती’ कोण होती ते लिहू या.**

| ५-६ वर्षे वयामध्ये | १२-१५ वर्षे वयामध्ये | १८-२० वर्षे वयामध्ये |
|---|---|---|
| | | |


- तुम्हाला त्यांच्यापैकी कोणासारखे होण्याची इच्छा होती? का?
- ती इच्छा पूर्ण करण्यासाठी तुम्ही कोणते प्रयत्न केले?
- घरच्यांची, मित्रमैत्रिणींची त्याला कोणती प्रतिक्रिया आली?
- आज त्या सगळ्याचा विचार करताना काय वाटते?



**त्या वयातील तो वेडेपणा होता.**
**प्रयत्न केले, पण ते वायाच गेले.**
**हवे होते ते नाही झाले, पण वेगळेच काही तरी छान सापडले.**
**आपण कसे आहोत, आपली ताकद कशामध्ये आहे हे लक्षात आले.**
**आयुष्यात आपल्याला काहीच जमणार नाही असे वाटून निराशा पदरी पडली.**

- काही आदर्श व्यक्तींबद्दल खूप आदर वाटूनही त्यांच्यासारखे व्हावेसे नाही वाटले, असे झाले का? कारण काय?
- तुमच्या आदर्शांची ओळख ज्यावरून समजेल असे चिन्ह तुम्हाला रेखाटता येईल का? ह्या रिकाम्या चौकटी त्यासाठीच आहेत.

उदा॰



चार्ली चॅप्लीन



मदर तेरेसा

------------ ------------ ------------

४. मागील पानावर दिलेल्या सराव क्र॰ १.१ मधील व्यक्तींपैकी हे कोणी म्हटले आहे? रिकाम्या जागेत लिहू या आणि ते कशावरून ओळखले तेही सांगू या.

* दुर्बल असतात ते कधीही क्षमा करत नाहीत. क्षमा करणे हा बलवानांचा गुण असतो.
* अगदी हळुवार रीतीने तुम्ही जग हलवू शकता.

------------------------------

* तुम्ही निर्माण केलेल्या समस्येला जो विचार कारणीभूत असतो, तसाच विचार करून तुम्ही ती समस्या सोडवू शकत नाही.
* मूर्खपणा आणि प्रतिभा ह्यांच्यात एकच फरक असतो, तो म्हणजे प्रतिभेला मर्यादा असते.

------------------------------

* मी लहान असताना एकलकोंडा होतो; खेळायला कोणी मित्र नव्हते; पण माझ्या सोबतीला हे भव्य दृक्-विश्व होते. बाहेरचे हे जग म्हणजे माझ्यासारखे एकटे मूल आहे अशी कल्पना मी करत असे. आकाशाच्या खिडकीपाशी बसून दूरच्या क्षितिजाकडे बघत बसणारे मूल.

------------------------------

**भाववाचक नामे Abstract nouns**

सौंदर्य, बुद्धिमत्ता, चांगुलपणा, कणखरपणा, कल्पकता ही सगळी **भाववाचक नामे** आहेत. भाववाचक नामे व्यक्तींचे गुण किंवा भाव (उदा॰ बुद्धिमत्ता) दाखवतात. तसेच 'वार्धक्य'सारखी नामे स्थिती दाखवतात, तर 'चोरी' किंवा 'नृत्य' ही नामे क्रिया दाखवतात.

**५. चला, आता भाववाचक नामाची व्याख्या पूर्ण करू या.**

ज्या नामाने प्राणी किंवा वस्तू ह्यांच्यामध्ये असलेले (क) ------------- किंवा (ख) ------------------ ह्यांचा बोध होतो त्याला भाववाचक नाम म्हणतात. तसेच पदार्थाच्या गुणाबरोबरच (ग) ------------- किंवा (घ) ------------- दाखवणाऱ्या नामांनाही भाववाचक नामे असेच म्हणतात.

**६. भाववाचक नामे कशी तयार करतात? उदाहरण पाहून बरोबर रूप तयार करू या.**

**क. नामांपासून तयार होणारी भाववाचक नामे. उदाहरणांप्रमाणे तक्ता पूर्ण करू या.**

| शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम |
|---|---|---|
| नवल | + आई | नवलाई |
| वकील | + ई | वकिली |
| पाटील | + की | पाटीलकी |
| भिक्षुक | | |
| गुलाम | + गिरी | गुलामगिरी / गुलामी |
| मनुष्य | + त्व | |
| शत्रू | | शत्रुत्व |
| देव | | |

**ख. क्रियापदांपासून तयार होणारी भाववाचक नामे**

| मूळ धातू | प्रत्यय | भाववाचक नाम |
|---|---|---|
| धू | + ई | धुलाई |
| शिव | + ई | शिलाई |

ग. विशेषणांपासून तयार होणारी भाववाचक नामे. उदाहरणांप्रमाणे तक्ता पूर्ण करू या.

| शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम |
|---|---|---|
| नवल | + आई | नवलाई |
| चपळ | | |
| दांडगा | | |
| श्रीमंत | + ई | श्रीमंती |
| गोड | | गोडी |
| लबाड | | |
| आपला | + की | आपुलकी |
| फसवा | + गिरी | फसवेगिरी |
| लुच्चा | | |
| शांत | + ता | शांती / शांतता |
| क्रूर | | |
| नम्र | | |
| प्रौढ | + त्व | |
| शहाणा | + पण / पणा | शहाणपण / शहाणपणा |
| ताजा | | ताजेपणा |
| मोठे | | |
| प्रामाणिक | | |
| तऱ्हेवाईक | | तऱ्हेवाईकपणा |
| सुंदर | + य | सौंदर्य |
| क्रूर | | क्रौर्य |
| शूर | | |
| गंभीर | | गांभीर्य |
| मधुर | | |
| गोड | + वा | गोडी / गोडवा |
| गार | | |
| ओले | | ओलावा |

घ. नामे म्हटली की त्यांना लिंग आलेच. खालील तक्त्यात काही नामे दिली आहेत, ती लक्षात ठेवू या.

| पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|
| प्रामाणिकपणा | चपळाई | प्रौढत्व |
| शूरपणा | दांडगाई | मित्रत्व |
| दयाळूपणा | धुलाई | शत्रुत्व |
| कष्टाळूपणा | गरिबी | देवपण |
| चमत्कारिकपणा | गोडी | मोठेपण |
| नि:स्वार्थीपणा | लबाडी | प्रामाणिकपण |
| ओलावा | वकिली | शौर्य |
| गारवा | आपुलकी | औदार्य |
| | भिक्षुकी | गांभीर्य |
| | फसवेगिरी | धैर्य |
| | लुच्चेगिरी | माधुर्य |
| | इमानदारी | तारुण्य |
| | कीर्ती | वात्सल्य |
| | नम्रता | साम्य |
| | समता | मार्दव |
| | कमतरता | लाघव |
| | सहनशीलता | पालकत्व |
| | | यौवन |

- **शब्दांची (नाम, विशेषण, क्रियाविशेषण) भाववाचक नामे करताना वेगवेगळे प्रत्यय लागू शकतात. प्रत्ययाप्रमाणे शब्दांचे लिंग ठरते.**

उदा. प्रामाणिक + पण = ते प्रामाणिकपण    प्रामाणिक + पणा = तो प्रामाणिकपणा
गोड + ई = ती गोडी    गोड + वा = तो गोडवा
गंभीर + य = ते गांभीर्य    गंभीर + ता = ती गंभीरता
सुंदर + य = ते सौंदर्य    सुंदर + ता = ती सुंदरता

- **सर्व क्रियापदे ही नामासारखीही वापरली जातात.**

उदा. ते खोदणे / खोदणं    ते धुणे / धुणं इ.

- **क्रियापदांना वेगळेवेगळे प्रत्यय लागून झालेल्या भाववाचक नामांची लिंगे वेगवेगळी असतात.**

उदा. बोल + ई = ती बोली

करा आणि शिका

**च. वरील भाववाचक नामांची लिंगे लक्षात ठेवण्यासाठी काही युक्त्या सुचतायत का? वरील तक्ता पुन्हा वाचू या आणि आपापली युक्ती ठरवू या.**

आता सर्व विद्यार्थ्यांनी गोल करून बसू या. वरील तक्त्यातील कोणतेही तीन शब्द त्यांच्या लिंगांसह लक्षात ठेवू या. आता पहिला विद्यार्थी दुसऱ्याला स्वतःचा एक शब्द सांगेल. दुसऱ्याने त्या शब्दाचे लिंग सांगायचे आहे. बरोबर असेल, तर तो पुढच्याला आपला शब्द सांगून लिंग विचारेल. चूक असेल, तर त्याची ही पाळी गेली. पुढच्या फेरीत त्याला परत एक संधी मिळेल. तेव्हाही तो चुकला तर तो बाद! खेळाच्या शेवटी विजेत्यांनी आणि नंतर इतरांनी लिंग लक्षात ठेवायला कोणती युक्ती वापरली ते सांगावे.

**७. खाली काही भाववाचक नामे दिलेली आहेत. त्यांतील योग्य अर्थाची नामे रिकाम्या जागेत भरून खालील वाक्ये पूर्ण करू या.**

(निरक्षरता, सत्तरी, माधुर्य, दारिद्र्य, अचंबा, वृद्धत्व, हाताळणी, पालकत्व, चोरी, बालपण, आळशीपणा, त्रास, फुकटेपणा, मातृत्व)

उदा. "सर, ह्या क्षेत्रातलं तुमचं कर्तृत्व कोण नाकारेल? पण संस्थेच्या नियमांचंही महत्त्व आहेच ना!"



क. वयाबरोबर बाईंचे गाणे बदलले होते. पूर्वीचे ------------- आता औषधालाही उरलेले नव्हते.

ख. ज्या वयात ------------- ह्या शब्दाचा अर्थही नीटसा कळत नाही, त्या वयात ह्या मुलींनी दोन दोन मुलांना जन्म दिलेला असतो. ------------- आणि ------------- हे त्यांचे मुख्य दुखणे आहे.

ग. वयाची ------------- ओलांडलेल्या दादा चौधरींच्या कुटुंबात त्यांची आजारी पत्नी, तीन नातवंडे, मेहुण्यांची अपंग मुलगी, एक म्हातारी चुलत बहीण आणि दोन मांजरी असा गोतावळा होता. इतक्या सगळ्यांचे ------------- ते ह्या वयात ज्या सहजतेने पेलतात ते पाहून ------------- वाटतो. काही माणसांना ------------- मानवते की काय?

घ. अशी कशी ही माणसे? सतत रडगाणे गाणारी, परिस्थिती बदलण्यासाठी धडपड करायचे विसरून गेलेली आणि त्यामुळे अंगात भरलेला -----------, त्यातून आलेला -----------, बाहेरची माणसे दिसली की हात पसरण्याची लागलेली सवय... हे सगळे फार केविलवाणे आहे.

च. "तुझ्या निबंधाचा विषय चांगला आहे, पण त्याची ------------- कुठेतरी चुकते आहे."

छ. "तुम्हाला खोटं वाटेल, मॅडम, पण माझं ------------- हे एक वाईट स्वप्न वाटतं मला. आईवडिलांना मी खूप ------------- दिला. म्हणजे कल्पना करा, घरातल्या दागिन्यांची मी ------------- केली, हे पोलिसांपर्यंत गेलं असतं, तर माझं काय झालं असतं?"

८. **शब्दकोडे सोडवू या.**

**उभे शब्द**

१. गोडवा; गोडपणा

२. म्हातारपण


३. छळ

४. दुसऱ्याची वस्तू गुपचूप पळवण्याची कृती

५. काम करण्याचा कंटाळा

६. लहानपण

७. कामगिरी




**आडवे शब्द**

१. आईपणा    ८. सत्तरावे वर्ष    ९. खूप आश्चर्य    १०. एखादी गोष्ट करून पाहण्याची पद्धत

११. मूल्य न देता काही तरी मिळवण्याची वृत्ती

## २ व्यक्ती आणि वल्ली

१. **आपण काही थोर व्यक्ती पाहिल्या; आता काही वल्ली पाहू या.**



तशी विचित्र, विक्षिप्त, जरा वेडसरच वाटणारी माणसे कुठल्याही गावात, देशात आणि काळात असतात. पण विक्षिप्त असूनसुद्धा शहाणी असणारीही काही असतात. फक्त, त्यांच्या शहाणपणाची जातकुळी इतर सर्वांपेक्षा निराळी असते. शोभेच्या फटाक्यांमध्ये बाण नावाचा एक प्रकार असतो. तो उभा धरून पेटवावा लागतो. मग त्याने सरळ रेषेत वर आकाशाच्या दिशेने झेप घ्यावी, अशी एक अपेक्षा असते. पण एखाद्या वेळी एखादा बाण अचानक उभ्याचा आडवा होतो, सापाच्या गतीने वळवळत भोवतालच्या बघ्यांच्या गर्दीत घुसतो आणि सगळ्यांची दाणादाण उडवून टाकतो. 'विक्षिप्त शहाणे' असे वागतात. आपल्या अशा तिरक्या चालीने लोकांची जी पळापळ आणि पंचाईत होते, ती पाहण्यात काहींना गंमत वाटते, तर काही जण स्वतःच्याच मस्तीत असतात, त्यामुळे आपल्या उद्योगांनी काय उलथापालथ केली ह्याचा त्यांना पत्ताही नसतो.

माझ्या आजोबांच्या मित्रांमध्ये असे काही विक्षिप्त शहाणे नमुने होते. त्यांपैकी एका मित्राला यंत्रांचे फार आकर्षण होते. एखादे धडधाकट यंत्र समोर आले, की त्याचे पोट उघडून आतील अवयव बघण्यासाठी त्यांची बोटे शिवशिवू लागत. त्यासाठी यंत्राच्या मालकाची परवानगी घेण्याचीही त्यांना गरज वाटत नसे. मग अर्थातच नाराजी, भांडण, वादावादी वगैरे आलेच. हे कशासाठी? तर तेव्हा, म्हणजे एकोणीसशे पंचवीस-तीसच्या काळात, त्यांना यंत्रमानव तयार करायचा होता. जगातला नाही, तरी निदान भारतातला पहिला यंत्रमानव. ते नाही जमले, तर निदान धान्य निवडून देणारे यंत्र, किंवा नारळाच्या झाडावर चढून नारळ उतरवून देणारे यंत्र, किंवा... असेच काहीबाही.

दुसरे एक होते, त्यांच्याकडे गावातल्या सगळ्या घरांची बित्तंबातमी असे. कोणाच्या घरात सुनांचा छळ होतो, कोण आपल्या म्हाताऱ्या आईबापांचा छळ करतो, आपल्या अपंग भावंडांचा संपत्तीतला वाटा कोणी हडप केला वगैरे वगैरे. सुरुवातीला त्या कुटुंबांशी चर्चा करण्याचा प्रयत्न त्यांनी करून पाहिला. बहुतेक घरांतून त्यांना हुसकावून लावले गेले.



मग ह्या मित्रमहोदयांनी वेगळीच शक्कल लढवली. अशा प्रकरणांची माहिती सर्वांना व्हावी म्हणून पत्रे लिहिण्याचा उद्योग आरंभला. सकाळी उठायचे आणि शेकडो पोस्टकार्डे हाताने लिहून पोस्टात टाकायची. शिवाय हे सारे स्वखर्चाने. स्वतःकडचे पैसे संपले की आमच्या आजोबांकडे मागायचे. उसने वगैरे नाही, असेच. ह्या 'शहाण्यां'पायी दोनतीनदा आजोबांना पोलिसचौकीचेही तोंड पाहावे लागले. शिवाय, त्यांचे वेळीअवेळी आमच्याकडे येणे, तावातावाने वाद घालणे, खाणेपिणे हे तर नेहमीचेच होते.

आजी वैतागायची आणि तरीही सगळे करत राहायचीच.

एकदा तिला मी विचारले : "हे गं काय आजी? आजोबांना कळत नाही का, घरातल्यांना किती त्रास होतो ते? तू सांग नं स्पष्ट की, ह्या चक्रमांचं मी आता काही करणार नाही!"

आजी क्षणभर गप्प झाली. मग हळूच हसून म्हणाली, "ते नाही बाबा जमायचं."

"का? जातायेता आजोबांवर डाफरत असतेस की! न जमायला काय झालं?"

"ते वेगळं रे; हे वेगळं. असं बघ विसू, ही सगळी चक्रम माणसं आहेत ना, ती त्रासदायक असली तरी आतून फार खरी आहेत. ती असतात म्हणून आपल्या आयुष्यात एक मोकळं, ताजं वारं खेळत राहतं. जिथे असे चक्रम नसतात तिथे जगण्याला जुनाट, कुबट, शिळा वास येतो. ते आपल्या विचारांना, सवयींना, परंपरांना एका जागी रुतू देत नाहीत. मनांवर बुरशी चढू देत नाहीत. आपल्याला वाहतं, जिवंत ठेवतात. सारखे प्रश्न विचारतात. हे लोक नसते तर आपण कुठं असतो? आम्ही बायका आज कुठं असतो? ह्यांच्यासारख्या विक्षिप्तांनी आमच्यासाठी जे सोसलं, भोगलं त्यापुढे त्यांचा त्रास म्हणजे काय रे! तुझ्या आजोबांचे मित्र किती मोठे आहेत किंवा किती लहान आहेत ह्याचा हिशेब मी ठेवत नाही. मला एवढंच कळतं, की अशी माणसं असणं हे आपल्या समाजाचं वैभव आहे."

**२. बोलू या अथवा लिहू या.**

क. विक्षिप्त शहाण्यांच्या वागण्याचे वर्णन करण्याकरता कशाचे उदाहरण दिले आहे? ते शोधून मोठ्याने वाचून दाखवू या.

ख. 'अशी माणसं असणं हे आपल्या समाजाचं वैभव आहे', हे आजीचे म्हणणे तुम्हाला पटते का?

**३. पुढे काही शब्दांचे अर्थ दिले आहेत. त्यावरून उताऱ्यातील ते शब्द शोधू या.**



क. प्रकार, रीत, तऱ्हा = -------------

ख. फजिती, गोंधळ, घबराट = -------------

ग. वेगळीच वाट; इतरांपेक्षा निराळीच तऱ्हा = -------------

घ. कल्पनेत नसणारा बदल; अस्ताव्यस्त स्थिती; क्रांती = -------------

च. काहीही बिघाड किंवा मोडतोड न झालेले; उत्तम स्थितीत असणारे = -------------

छ. बारीकसारीक माहिती = -------------

ज. भाग, विभागणी = -------------

झ. मोकळी हवा किंवा उन्ह न लागल्यामुळे येणारा वाईट वास = -------------

ट. जुना; तेज हरवलेला = -------------

ठ. दमट हवेत पदार्थावर वाढणारी पांढरट वनस्पती = -------------

**४. अशाच प्रकारे काही वाक्प्रचार आणि क्रियापदेही शोधू या.**

क. दुसऱ्याचा हक्क असलेली गोष्ट जबरदस्तीने किंवा लबाडीने ताब्यात घेणे.



ख. जबरदस्तीने बाहेर घालवणे; हाकलून देणे.

ग. एखादी गोष्ट करण्याची अतिशय तीव्र इच्छा होणे.

घ. इच्छा नसताना एखाद्या व्यक्तीला किंवा स्थळाला भेट द्यावी लागणे.

च. युक्ती शोधून काढणे; स्वतःची बुद्धी वापरून मार्ग शोधणे.

**५. एक चित्रफीत पाहू या.**

क. ८० वर्षांच्या नेनेआजींची काय खासियत आहे?

ख. त्या कोणते वैशिष्ट्यपूर्ण काम करत आहेत?

ग. नेनेआजी हे काम का आणि कशा प्रकारे करत आहेत?

घ. त्यांच्या कामाबद्दल तुम्हाला काय वाटतं?

च. नेनेआजींनी कोणता धाडसी प्रवास केला होता?

छ. तुमच्या आजूबाजूला नेनेआजींसारख्या इतर व्यक्ती तुम्हाला माहीत आहेत का?

## ३ स्त्री, पुरुष आणि घरकाम

**१. वाचू या.**

**का हसतेस?**



दिवसरात्र तू माझ्याजवळ असतेस,
सकाळी माझ्यासाठी न्याहारी बनवतेस,
मी ऑफिसला गेल्यावर
माझ्यासाठी डबा भरून पाठवतेस.

संध्याकाळी न चुकता
मी तुला फिरायला नेतो,
वाटेत कुणी भेटले तर
तुझी ओळख करून देतो,
'ही माझी पत्नी'
मग तू हसतेस.

का हसतेस?
खरं सांग, का हसतेस?

- हेमंत जोगळेकर

**क. लिहू या.**

१. तुम्हाला काय वाटते, ती का हसते?
२. हीच कविता तिच्या दृष्टिकोनातून कशी लिहाल?

**तेव्हा...**

मला बँकेत नोकरी लागली तेव्हापासून वेगवेगळ्या लोकांनी विविध कारणांवरून मला बरेच ऐकवले आहे. ती 'सुवचने' मी माझ्या आठवणीच्या कुपीत जपून ठेवली आहेत. त्यातील ही वेचक काही –

- "जॉर्ज बर्नार्ड शॉनं म्हटलंय ते माहीत आहे ना? तुला नसेलच माहीत; पण त्यानं म्हटलंय – तारुण्य ही फार विलोभनीय गोष्ट आहे. मुलांकरता ती वाया घालवणं हा गुन्हा आहे." – माधव, माझा नवरा. रोज ऑफिसला जाताना मुलांना शाळेत सोडशील का, असे मी त्याला विचारत होते, तेव्हा त्याने दिलेले हे उत्तर. आपले 'विलोभनीय तारुण्य' त्याने आयुष्यभर जपले.
- "काल तुमची शलाका आली होती. म्हटलं, आज कोजागिरी आहे; तुझ्या अश्विनीचं मीच तुला ओवाळते. तुझी आई नोकरी करते; तिच्या लक्षात तरी आहे की नाही, कोण जाणे!" – शेजारच्या जोगआजी. माझं ओवाळणं झाल्यानंतरच शलाका त्यांच्याकडे गेली होती, हे मी त्यांना नाही सांगितलं.



- "माधव, घरच्या मसाल्याची चव आता विसरलाच असशील, नाही? कधी वाटलं तर येत जा बाबा माझ्याकडे जेवायला. आमच्यात अजून घरचेच मसाले वापरतात." - सुधा, माझी थोरली नणंद. तिच्या घरच्या सर्वांची बँकेची कामे मीच करून देत होते, हे ती विसरली होती.
- "मी आई होईन तेव्हा तुझ्यासारखी नोकरी मुळीच करणार नाही. स्वत: माझ्या बाळासाठी छान छान कपडे शिवेन." - शलाका, माझी कन्या. आता ती प्राध्यापिका आहे. आपले बाळ माझ्याकडे ठेवून ती कॉलेजला जाते आणि निवृत्त झालेली मी तिचे ते 'छान छान' स्वप्न पूर्ण करत असते.
- "तुझ्या नोकरीपायी तू काहीच धड केलं नाहीस. घरासाठी नाही, आमच्यासाठी नाही आणि नातेवाइकांसाठीही नाही. आता तुझं करायला कुणी येईल ह्या भ्रमात राहू नकोस." - शरद, माझा मुलगा. असे त्याने आपल्या वडिलांना कधी ऐकवले नाही.

काहीही असो, मला तेव्हा घराबाहेर पडता आले ह्याचे समाधान थोडेथोडके नाही.

**शब्दार्थ :**

सुवचने = लक्षात ठेवावे असे चांगले बोलणे.

कुपी = अत्तरासारखा मूल्यवान पदार्थ ठेवण्याची काचेची छोटी बाटली.

वेचक = वेचून, निवडून काढलेले.

विलोभनीय = ज्याचा लोभ वाटावा असे, मोहक, लोभस.

अश्विनी = अश्विनी पौर्णिमेला 'कोजागिरी' म्हणतात. त्या दिवशी कुटुंबातील थोरल्या मुलीला ओवाळून भेटवस्तू देण्याची प्रथा आहे.

**ख. ह्या नुसत्याच आठवणी नाहीत. त्यांतून ह्या स्त्रीला आणखी काही म्हणायचे आहे. ते तुम्हाला ऐकू आले का? त्याबद्दल बोलू या.**

**आता...**

**२. संवाद ऐकू या.**

**क. संवाद ऐकून योग्य तो पर्याय निवडू या.**

१. रमा कशासाठी जयपूरला गेली आहे?

क) संशोधनासाठी

ख) सादरीकरणासाठी

ग) संशोधकांच्या भेटीसाठी



संवाद

२. रमा आणि सौरभला किती मुले आहेत?

क) एक

ख) दोन

ग) अजून एकही नाही

३. रमाला मिळालेल्या स्कॉलरशिपबद्दल सौरभचे काय म्हणणे आहे?

क) रमाने स्कॉलरशिप स्वीकारू नये असे सौरभला वाटते.

ख) सौरभ तिच्या या निर्णयात तिला पूर्ण साथ देतो व प्रोत्साहनही देतो.

ग) रमाने अजून एकदा विचार करून निर्णय घ्यावा असे त्याला वाटते.

**ख. वरील संवाद पुन्हा ऐकून ह्या संवादातील चित्र तुमच्या आसपास सहज दिसते, की आजही ते दूरचेच वाटत आहे, यावर चर्चा करू या.**

**३. केवळ स्वयंपाक करणे म्हणजे घरकाम नव्हे. स्वयंपाकापूर्वी आणि नंतर, उरलेल्या अख्ख्या दिवसभरात घरात किती प्रकारची कामे असतात? आपण त्या कामांची यादी करू या आणि नंतर विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या याद्यांची तुलना करू या.**

**४. खाली दिलेल्या विधानांबद्दल आपले मत काय आहे, ह्याबद्दल चर्चा करू या.**



क. बायका पुरुषांपेक्षा जास्त काम करतात.

ख. बायकांची बरीच कामं पुरुष जास्त चांगली करतात.

ग. बायकांनी नोकरी केलेली पुरुषांना अजिबात आवडत नाही.

घ. नोकरी करणाऱ्या बायका घराकडे दुर्लक्ष करतात.

च. 'घरकाम आणि मुले वाढवणे हे बायकांचेच काम असते' असा समज सर्व जगभर आहे.

## म्हणी आणि वाक्प्रचार

निंदकाचे घर असावे शेजारी



जिथे कमी तिथे आम्ही

हात ओला तर मित्र भला

म्हणी आणि वाक्प्रचार

## ४ 'तो' आणि 'ती'














**क. वरील चित्रे पाहू या आणि उदाहरणात दाखवल्याप्रमाणे कंसातील योग्य पर्याय निवडून 'तो' किंवा 'ती' काय करत आहे ते सांगू या.**

उदा. चित्र १. तो मुलाला सांभाळत आहे.

(भाजी चिरणे, घराची सफाई करणे, स्वयंपाक करणे, बाळाची काळजी घेणे, फर्निचर पुसणे, बाळाला दूध देणे, मुलाला सांभाळणे...)

चित्र २. -----------------------------------------------------------------------------

चित्र ३. -----------------------------------------------------------------------------

चित्र ४. -----------------------------------------------------------------------------

चित्र ५. -----------------------------------------------------------------------------

चित्र ६. -----------------------------------------------------------------------------

### अपूर्ण किंवा चालू वर्तमानकाळ **Present Continuous Tense**

वरील उदाहरणांमध्ये दाखवलेल्या काळाला अपूर्ण किवा चालू वर्तमानकाळ असे म्हणतात. जेव्हा एखादी क्रिया वर्तमानकाळात असून ती अपूर्ण किंवा चालू असते, तेव्हा त्या वर्तमानकाळाला 'अपूर्ण किंवा चालू वर्तमानकाळ' म्हणतात.

करणे : कर + त + आहे = मी करत आहे (अनौप॰ करतोय / करतेय)
उदा॰ स्वयंपाक करणे – तो स्वयंपाक **करत आहे.** पत्र लिहिणे – तो पत्र **लिहीत आहे.**



**ख. 'लिहिणे' ह्या क्रियापदाची 'अपूर्ण वर्तमानकाळातील' रूपे लिहू या आणि खालील तक्ता पूर्ण करू या.**

| सर्वनाम | लिखित रूप |
|---|---|
| मी | लिहीत आहे |
| आम्ही / आपण | लिहीत आहोत |
| तू | लिहीत आहेस |
| तुम्ही / आपण | |
| तो | |
| ती | लिहीत आहे |
| ते | |
| ते | लिहीत आहेत |
| त्या | |
| ती | लिहीत आहेत |



व्याकरण

**ग. पुढील उताऱ्यातील रिकाम्या जागा अपूर्ण वर्तमानकाळ वापरून भरू या.**

१

२

३


**एहसानला एक-दोन मिनिटांचा लघुपट करायचा आहे. त्यासाठी त्याने लिहिलेली ही पटकथा आहे –**

**दृश्य १** – संध्याकाळची वेळ आहे. स्वच्छ निळेशार आकाश आणि खाली शांत समुद्र (दिसणे) दिसत आहे. पक्ष्यांचा एक मोठा थवा आकाशात (क) (उडणे) ------------------- . समुद्रात उठणाऱ्या लाटा सावकाश किनाऱ्याकडे (ख) (येणे) --------------------- आणि वाळूमध्ये विरून (ग) (जाणे ) -----------------------. दूरवर लाल-नारिंगी सूर्यबिंब हळूहळू क्षितिजरेषेवर (घ) (टेकणे) ----------------------. दोन लहान मुले पाण्यामध्ये (च) (खेळणे) --------------------, एकमेकांवर पाणी (छ) (उडवणे) ------------------- आणि खेळता खेळता धपकन पाण्यात (ज) (पडणे) ----------------------. त्यांना त्याची गंमत (झ) (वाटणे) ----------------------- आणि ती मोठ्याने (ट) (हसणे) -----------------------.

**दृश्य २** – किनारा. उंच माड वाऱ्यावर (क) (डोलणे) ----------------------. झाडांखालीच भेळ, शेंगदाणे, सरबत वगैरे विकणारे विक्रेते गिऱ्हाइकांची वाट (ख) (बघणे) -----------------. एक मुलगी वाळूमधील शंख-शिंपले गोळा (ग) (करणे) ----------------------. काही तरुण जोडपी ओल्या वाळूमध्ये आपली पावले (घ) (उमटवणे) -----------------------.

**दृश्य ३.** – पुन्हा क्षितिज. सूर्य दिसेनासा झाल्यामुळे अंधार (क) (दाटणे) --------------------, गडद निळ्या-काळ्या आकाशात एक चांदणी (ख) (चमकणे) -----------------------. माणसांचे आवाज हळूहळू ऐकू येईनासे (ग) (होणे) -----------------------, फक्त झाडांची पाने (घ) (सळसळणे) ----------------------- आणि वाऱ्याची मंद गुणगुण ऐकू (च) (येणे) -----------------------.

## ५ आमच्या गच्चीवरून...

आमच्या गच्चीवरून हे दृश्य आम्हाला रोजच दिसत असते. आकाशात पक्ष्यांचा एक मोठा थवा उडत असतो. समुद्रात उठणाऱ्या लाटा सावकाश किनाऱ्याकडे येत असतात आणि वाळूमध्ये विरून जात असतात. दूरवर लाल-नारिंगी सूर्यबिंब हळूहळू क्षितिजरेषेवर टेकत असते. लहान मुले पाण्यामध्ये खेळत असतात, एकमेकांवर पाणी उडवत असतात आणि खेळता खेळता धपकन पाण्यात पडत असतात. त्यांना त्याची गंमत वाटत असते आणि ती मोठ्याने हसत असतात. त्याचवेळी आकाशात चांदण्या हळूहळू उगवत असतात.

**१. वरील उताऱ्यात आलेली क्रियापदांची रूपे आणि त्यांचा अर्थ पाहू या आणि खालील तक्ता पूर्ण करू या.**

| अपूर्ण वर्तमानकाळ Present Continuous Tense | |
|---|---|
| उदा. समुद्र दिसत आहे. | समुद्र दिसत असतो. |
| लाटा येत आहेत. | |
| सूर्यबिंब क्षितिजरेषेवर टेकत आहे. | |
| मुले पाण्यात खेळत आहेत. | |
| मुले एकमेकांवर पाणी उडवत आहेत. | |
| आकाशात चांदण्या उगवत आहेत. | |

**रीती वर्तमानकाळ Habitual Present Tense**

'समुद्र दिसत असतो.' या उदाहरणामध्ये दाखवलेल्या काळाला **'रीती वर्तमानकाळ'** असे म्हणतात. वर्तमानकाळात एखादी क्रिया सतत, नियमितपणे, वारंवार घडते हे सुचवणाऱ्या काळाला **'रीती वर्तमानकाळ'** असे म्हणतात.

उदा. मी रोज व्यायाम करत असतो. तो सारखा झोपत असतो.

| अपूर्ण / चालू वर्तमानकाळ | रीती वर्तमानकाळ | |
|---|---|---|
| मी पत्र लिहीत आहे. | मी रोज पत्र लिहीत असतो. |  |
| मी व्यायाम करत आहे. | मी नेहमी व्यायाम करत असतो. |  |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मी गाणे गात आहे. मी रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असतो / असते. | उदा॰ मी रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असतो / असते. |
| आम्ही / आपण | आम्ही / आपण रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असतो. |
| तू | तू रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असतोस / असतेस. |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असता. |
| तो | तो रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असतो. |
| ती | ती रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असते. |
| ते | ते रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असते. |
| ते (अ॰व॰) | ते रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असतात. |
| त्या (अ॰व॰) | त्या रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असतात. |
| ती (अ॰व॰) | ती रोज सकाळी अंघोळ करताना गाणे गात असतात. |

**२. चला, प्रत्येकाने एक एक उदाहरण देऊ या.**



मी सध्या वजन कमी करत आहे. (अपूर्ण / चालू वर्तमानकाळ)

उदा॰ वजन कमी करण्यासाठी मी रोज व्यायाम करत असतो.
(रीती वर्तमानकाळ)

क. मी सध्या मराठी शिकत आहे. मराठीच्या अभ्यासासाठी मी रोज...

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

ख. मी सध्या जोडीदार शोधत आहे. त्यासाठी मी...

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ६ 'तो' कसा असावा?



नंदिता खूप हुशार आहे, सुंदर आहे, खेळात प्रवीण आहे. तिच्या आईवडिलांना वाटतं, की तिच्यायोग्य मुलगा म्हणजे खूप हुशार मुलगा! तिच्या भावाला वाटतं, की तो तिच्यासारखा खेळात प्रवीण असावा, तर तिच्या मैत्रिणींना वाटतं, की तो तिच्यासारखा सुंदर असावा. स्वतः नंदिता म्हणते, की जो स्वभावाने चांगला असेल त्यालाच मी माझ्यालायक समजेन. तुम्हाला काय वाटतं?

**Adjectives used as Postpositions**

वरील उताऱ्यात 'योग्य, सारखा, लायक' ही **विशेषणे** नामांना जोडून आली आहेत म्हणून त्यांचा वापर **शब्दयोगी पदांसारखा** झाला आहे.

| | | शब्दयोगी पदासारखा वापर<br>Usage as Postposition |
|---|---|---|
| **योग्य** | योग्य वेळ आली, की मी लग्न करीन. | माझ्यायोग्य मुलगा मिळाला, की मी लग्न करीन. |
| **लायक** | ह्या कामासाठी तो अगदी लायक उमेदवार आहे. | माझ्यालायक नोकरी मिळाल्याशिवाय मी नोकरी करणार नाही. |
| **लायक** | मुलाखतीनंतर त्या पदासाठी ती लायक ठरली नाही. | ती नोकरी तिच्यालायक नव्हती. |
| **सारखा** | सारखा ताप येणे चांगले नाही. | तिचा स्पर्श फुलासारखा कोमल आहे. |

**१. कंसात दिलेल्या शब्दांपैकी योग्य तो शब्द योग्य प्रकारे वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

क. **लायक**

मतदारांनी त्याला ------------ उमेदवार समजून मते दिली, परंतु तो मात्र मंत्री म्हणून ------------ ठरला नाही. कारण त्या पदा------------ काम त्याने केले नाही.

ख. **योग्य**

बॉस म्हणाला, की त्याच्या------------ काम ------------ वेळ आली की देण्यात येईल.

ग. **सारखा**

------------ त्रास देणारी मुले शिक्षकांनी रागावताच शहाण्या------------ शांत बसली.

**२. 'योग्य' हे विशेषण वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

क. निराश होऊ नकोस. ------------ प्रयत्न केलेस, की यश मिळेलच.

ख. कष्ट केले, की माणूस आयुष्यात ------------ त्या जागी पोचतोच.

ग. ------------ मुलगा मिळाला, की मी लग्न करेनच.

घ. परदेशी जाण्यासाठी मी फक्त ------------ संधीची वाट पाहतोय.

च. ती नेहमी ------------ वेळी ------------ ठिकाणी असते. फार हुशार आहे ती.

## ७ 'असं-तसं' त्याचप्रमाणे 'तसं-असं'



मी : अशी मी इकडून येत होते, आणि तो असा तिकडून आला, आणि असा माझ्याकडे बघायला लागला! मी म्हटलं त्याला, "असं काय पाहतोयस माझ्याकडे? तशातली नाहीये मी", तर म्हणतो कसा, "मीपण काही असातसा नाहीये". मी म्हणाले, "नाही कसं? तसलाच वाटतोयस", तर असा काही टक लावून बघायला लागला, की मी घाबरलेच. आणि जरा भरभर पुढे निघाले, तर काय सांगू, अस्सा पाय घसरला ना! तसा तो धावतच आला आणि त्यानं सावरलं ना मला! आणि या बहाण्याने निघाला ना मला घरी पोचवायला! पण मीही काही अशीतशी नाही! म्हटलं, असा नाही ऐकायचा हा. मग आवाज चढवला, आणि असा फैलावर घेतला त्याला! बिचारा! असला घाबरला होता तो!

ती : बिचारा? अगं, आत्ताच तर सांगत होतीस ना, की तो कसा मागे लागला होता म्हणून?

मी : नाही गं, तसा चांगलाय तो. माझाच गैरसमज झाला होता. म्हणजे तशी मागे कुठेतरी आमची भेट झाली होती; मीच विसरले होते. तो तसं पहायला लागला, तशी मी वैतागले. तो उलगडा करणार, तेवढ्यात मी पडले आणि असा गोंधळ झाला. तर असं आहे हे सगळं.

ती : ओ हो, असं आहे तसंच तसंही आहे. कळतंय बरं आम्हाला!

> तर अशी आहे मराठीतल्या 'असं, असा, असे, अशी, तसं, तसा, तसे, तशी आणि तसेच'ची भानगड! ह्या शब्दांचा नक्की अर्थ सांगणं अवघडच, तो स्वतःच समजून घ्यायला हवा. तसं अवघड नाहीये खरं म्हणजे!

व्याकरण

**विशेषण / क्रियाविशेषण (Adjective / Adverbs) – असा, असला, तसा, तसला, जसा, कसा, कसला**

| सर्वनाम | असा | असला | तसा | तसला | जसा | कसा | कसला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | असा | असला | तसा | तसला | जसा | कसा | कसला |
| मी | अशी | असली | तशी | तसली | जशी | कशी | कसली |
| आम्ही / आपण | असे | असले | तसे | तसले | जसे | कसे | कसले |
| तू | असा | असला | तसा | तसला | जसा | कसा | कसला |
| तू | अशी | असली | तशी | तसली | जशी | कशी | कसली |
| तुम्ही / आपण | असे | असले | तसे | तसले | जसे | कसे | कसले |
| तो | असा | असला | तसा | तसला | जसा | कसा | कसला |
| ती | अशी | असली | तशी | तसली | जशी | कशी | कसली |
| ते | असे / असं | असले / असलं | तसे / तसं | तसले / तसलं | जसे / जसं | कसे / कसं | कसले / कसलं |
| ते | असे | असले | तसे | तसले | जसे | कसे | कसले |
| त्या | अशा | असल्या | तशा | तसल्या | जशा | कशा | कसल्या |
| ती | अशी | असली | तशी | तसली | जशी | कशी | कसली |

**१. पुढे दिलेले शब्द वापरून रिकाम्या जागा भरू या.**

(तशीच, असंच, तसं, तशी, असा, तसं, अशी, तसंच, तसला, तसली)

क. कुठे? मुंबई विद्यापीठात जायचंय तुम्हाला? ------------ सरळ जा आणि डावीकडे वळा.

ख. ------------ पाहायला गेलं, तर तुमचं म्हणणं बरोबर आहे.

ग. ------------ वेळ आली, तर मी माझ्या कुटुंबासाठी काहीही करीन.

घ. तो माणूस ------------ असेल, असं मला वाटलं नव्हतं.

च. ती वेळच ------------ होती. मला ------------ वागावं लागलं.

छ. ------------ समोर ये माझ्या, मला नीट बघू दे तुला.

ज. शर्माजींचा भूगोलाचा मोठा अभ्यास आहे. ———— ते इतिहासतज्ज्ञही आहेत.

झ. तो ------------ मुलगा असेल, पण मी ------------ मुलगी नाही.

व्याकरण

**२. दोन मैत्रिणी**

लीना : आज पहिल्यांदाच गेली होतीस ना टीनाच्या नव्या घरी? आवडलं का तुला तिचं घर?



मीना : हं.

लीना : अगं, 'हं' काय ? नीट बोल ना!

मीना : हं, बरंय.

लीना : म्हणजे?

मीना : तसं ठीकय गं, पण काही खास नाही.

लीना : म्हणजे?

मीना : अगं, असं कसं गं घर तिचं! किती आतल्या बाजूला आहे, आणि लहानही किती आहे!

लीना : असू दे हं, इतकं काही वाईट नाहीये. हं, लहान आहे, पण तसं बरंय.

मीना : तसं बरंय म्हणजे?

लीना : म्हणजे असं, की तिच्याजोगं आहे. आणि तसंच पाहिलं, तर तिचं पहिलं घरसुद्धा असंतसंच होतं की!

लीना : बरं, बरं, असू दे. चल लवकर आता. असंच बोलत राहिलो, तर बस चुकेल माझी.

**३. आता ह्याचप्रमाणे पुढील विषयांवर संवाद लिहू या आणि वर्गात सादर करू या.**

क. तुमच्या एका मित्राची गाडी कशी आहे?

ख. तुमच्या एका मैत्रिणीचा भ्रमणध्वनी (मोबाईल) कसा आहे?

ग. तुमच्या शेजाऱ्याची नवी स्कूटर कशी वाटली?

## ८ 'व्हेंटिलेटर' या सिनेमातील एक प्रसंग पाहू या.




१. हॉस्पिटलमध्ये एवढी मंडळी कशासाठी जमली आहेत?

२. हॉस्पिटलमधला हा प्रसंग बघून तुम्हाला काय वाटलं?

३. या प्रसंगातल्या निरनिराळ्या व्यक्तींचे स्वभावविशेष सांगता येतील का?

## ९ संभाषणकौशल्ये.

**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. हुशार - हुशारी, लबाड - लबाडी, मित्रा / मित्री - मित्रेपणा, आळशी - आळशीपणा, चपळ - चपळाई, दांडगा / दांडगी - दांडगाई)

पहिला विद्यार्थी : निलेश हुशार आहे.

दुसरा विद्यार्थी : काय म्हणतोस / म्हणतेस? निलेश हुशार आहे?

पहिला विद्यार्थी : अर्थात! तो फार हुशार आहे.

दुसरा विद्यार्थी : नाही हं, तो इतका काही हुशार नाहीये!

सर्व विद्यार्थी : नाही कसा? त्याची हुशारी सर्वांनाच माहीत आहे.



**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. प्रामाणिक - प्रामाणिकपणा, श्रीमंत - श्रीमंती, शूर - शौर्य, नम्र - नम्रता, कष्टाळू - कष्टाळूपणा, उदार - औदार्य)



पहिला विद्यार्थी : राधा प्रामाणिक नाहीये.

दुसरा विद्यार्थी : काय म्हणतोस / म्हणतेस? राधा प्रामाणिक नाहीये?

पहिला विद्यार्थी : नाही, ती मुळीच प्रामाणिक नाहीये.

दुसरा विद्यार्थी : काहीतरीच! ती खूप प्रामाणिक आहे.


सर्व विद्यार्थी : हो, हो. तिचा प्रामाणिकपणा सर्वांनाच माहीत आहे.

**संभाषण करू या.**

| | | |
|---|---|---|
| मनात ठसणे | मनात घर करून राहणे | भार देणे |
| मनाला लागणे | मनाला लावून घेणे | मनावर घेणे |
| भार उतरणे | भार कमी करणे | भार वाटणे |
| उजळून निघणे | ठसा उमटणे / उमटवणे | पावले उमटणे / उमटवणे |
| वैयक्तिक पातळीवर... | सामाजिक पातळीवर | राजकीय पातळीवर |

संभाषण

पुणेरी पाट्या





पुणेकर : काका, एक किलो रताळी द्या...
दुकानदार : पिशवी देऊ?
पुणेकर : नाही नाही... पेन ड्राईव्ह आणलाय. त्यात 'रताळी' नावाचा फोल्डर बनवा आणि त्यात...!

चिंटू



चिंटूच्या वरील चित्रपट्टीमध्ये संवाद किंवा स्वगत लिहू या.






### पहिले मराठी पाऊल

#### पहिले मराठी मुद्रण

इ. स. १६१६ मध्ये फादर स्टिफन्स यांच्या रोमन लिपीतून मुद्रित झालेल्या 'क्रिस्तपुराण' या पुस्तकाच्या रूपाने मराठी भाषेतील ग्रंथाच्या मुद्रणास सुरुवात झाली.

**देवनागरी वा बाळबोध लिपीतून मुद्रित झालेले पहिले मराठी पुस्तक -**




डॉ. विल्यम कॅरे ह्या ब्रिटिश मिशनरी गृहस्थांनी बंगालमधील सेरामपूर येथे १८०५ मध्ये 'मराठी भाषेचे व्याकरण' हे पुस्तक छापून प्रसिद्ध केले. हेच देवनागरी लिपीत छापलेले पहिले मराठी पुस्तक. ज्ञान असे आपल्या हातात आले आहे आणि कोणावर अवलंबून न राहता आपले आपण ते मिळवू शकतो, हा अनुभव इथले लोक प्रथमच घेऊ लागले.

**लेखनावर जगणारा पहिला मराठी लेखक -** कोणत्याही मराठी लेखकाचे लाडके पण अशक्य वाटणारे एक स्वप्न असते. ते म्हणजे, आपला कोणीही 'बॉस' नसावा; आपण फक्त लिहीत राहावे; आपले प्रत्येक अक्षर छापून प्रसिद्ध करण्यासाठी प्रकाशकांनी सकाळ-संध्याकाळ आपल्या घरी खेटे घालावेत; वाचकांच्या आपल्या पुस्तकांवर उड्या पडाव्यात आणि महिन्याच्या पहिल्या दिवशी एक मोठ्या रकमेचा धनादेश आपल्या घरी पोहोचावा.

तब्बल दोनशे वर्षांपूर्वी हा चमत्कार करून दाखवणाऱ्या एका मराठी लेखकाचा आजच्या अनेक लेखकांना हेवा वाटत असेल. गणेशशास्त्री लेले ( १८२५-१८९८ ) हे त्या भाग्यवंताचे नाव. त्यांचा जन्म नाशिकजवळील त्र्यंबकेश्वरचा. लहान वयातच त्यांच्या बुद्धिमत्तेची कीर्ती नाशिकचे तेव्हाचे शिक्षणाधिकारी मेजर थॉमस कॅन्डी ह्यांच्यापर्यंत पोहोचली. त्यांच्या आणि वडिलांच्या प्रोत्साहनामुळे गणेशशास्त्रींनी मुंबईला जाऊन इंग्रजी शिक्षण घेतले. पुढे अभिजात संस्कृत व इंग्रजी साहित्यकृतींचे अनुवाद केले आणि मराठीतही स्वतंत्र ग्रंथरचना केली. त्यांना त्यासाठी अनेक पुरस्कार मिळाले. त्यांनी 'तीर्थयात्राप्रबंध' हे प्रवासवर्णनही लिहिले; पण स्वतः प्रवास न करता इतरांच्या अनुभवांवर ते पुस्तक आधारित असल्याने 'पहिले मराठी प्रवासवर्णनकार' होण्याचा मान मात्र त्यांना मिळू शकला नाही.

**मराठी गद्यग्रंथांचे जनक -** तो काळ पेशवाईचा होता. इंग्रजांनी अद्याप शाळा सुरू केल्या नव्हत्या. अशा परिस्थितीत १८२७ साली 'बाळमित्र भाग १' हे मुलांना शिकवण्यासाठी उपयोगी असे पुस्तक प्रकाशित झाले. लेखक होते सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे (१७८८-१८३०). मराठी भाषेचे तज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध असणारे छत्रे 'देशी शाळांचे तपासनीस' ही मानाची नोकरी करत होते. त्यांनी इंग्रजी भाषाही शिकून घेतली होती. आपल्या कामाच्या अनुभवातून त्यांनी 'बाळमित्र १' हे पुस्तक लिहिले. एका फ्रेंच पुस्तकावर ते आधारित होते. त्यात गोष्टीरूप २९ धडे होते. गोष्टी संवादरूपात लिहिल्या होत्या. सरळ, सुबोध आणि रसाळ भाषेतील हे पुस्तक अतिशय लोकप्रिय झाले. व्याकरणतज्ज्ञ दादोबा तर्खडकर म्हणतात – 'मराठीत सरस रीतीने गद्य लिहिणारे छत्रेच पहिले. त्यांच्यामागून आम्ही सर्व लिहिणारे झालो.' म्हणून छत्रे ह्यांना मराठीचे आद्य गद्यग्रंथांचे जनक मानले जाते.

## दृष्टिक्षेप

**नामे**

| | | |
|---|---|---|
| तो व्यासंग, ते - | ती अबला, त्या - | ते सूर्यबिंब, ती सूर्यबिंबे / बं |
| तो उलगडा | ती कर्तबगारी, त्या कर्तबगाऱ्या | ते प्रतिबिंब, ती प्रतिबिंबे / बं |
| तो तज्ज्ञ, ते - | ती वाटणी, त्या वाटण्या | ते वर्चस्व |
| तो गुणविशेष, ते - | ती पाऊलखूण, त्या पाऊलखुणा | ते वलय, ती वलये / यं |
| तो स्वभावधर्म, ते - | ती ढब, त्या ढबी | ते वैशिष्ट्य, ती वैशिष्ट्ये / ष्ट्यं |
| तो मक्ता, ते मक्ते | ती धडधड | ते गुणवैशिष्ट्य, ती गुणवैशिष्ट्ये / ष्ट्यं |
| तो निष्कर्ष, ते - | ती प्रसिद्धी | ते व्यक्तिमत्त्व, ती व्यक्तिमत्त्वे / त्त्वं |
| तो पुरुषवर्ग | ती व्यक्ती, त्या - | ते वार्धक्य |
| तो स्त्रीवर्ग | ती बाह्यरेषा, त्या - | |
| तो पेहराव, ते - | ती शैली, त्या - | |
| तो चष्मा, ते चष्मे | ती फेरी, त्या फेऱ्या | |
| तो बोध | ती हौस, त्या हौशी | |
| तो गुणधर्म, ते - | ती प्रशंसा | |
| तो स्वभावधर्म, ते - | ती रीत, त्या रीती | |
| तो केरवारा, ते केरवारे | ती वहिवाट, त्या वहिवाटी | |
| तो किनारा, ते किनारे | ती भानगड, त्या भानगडी | |
| तो समुद्रकिनारा, ते समुद्रकिनारे | ती रेलचेल | |
| तो अस्त, ते - | ती वल्ली, त्या - | |
| तो सूर्यास्त, ते - | | |
| तो बहाणा, ते बहाणे | | |

**भाववाचक नामे**

| | | |
|---|---|---|
| तो तऱ्हेवाईकपणा | ती अधीरता | ते कर्तृत्व, ती कर्तृत्वे / त्वं |
| तो चांगुलपणा | ती शांतता | ते मनुष्यत्व |
| तो कणखरपणा | ती कल्पकता | ते प्रौढत्व |
| तो मोठेपणा | ती बुद्धिमत्ता | ते मोठेपण |
| तो शहाणपणा | ती नवलाई | ते शहाणपण |
| तो मूर्खपणा | ती पाहणी | ते सौंदर्य |
| तो गारवा | ती आपुलकी | ते शौर्य |
| तो गोडवा, ते गोडवे | ती श्रीमंती | ते शत्रुत्व |
| | ती लुच्चेगिरी | ते गांभीर्य |
| | | ते पांडित्य |
| | | ते वार्धक्य |

**क्रियापदे**

लाभणे  गाजणे  दडपणे  सावरणे  भादरणे  घसरणे
घासणे  चिरणे  चुकणे

**विशेषणे**

प्रसिद्ध  प्रशंसनीय  अफलातून  बिनधास्त  रंजक  कारणीभूत

**क्रियाविशेषणे**

मुकाट्याने  चटकन  भरभर

### नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. हेवा वाटणे | शहरवासीयांना आदिवासींच्या शांत आणि समाधानी जीवनशैलीचा हेवा वाटतो. |
| २. झेप घेणे | पंखांमध्ये शक्ती आली की पक्ष्यांची पिले आकाशात झेप घेतात. |
| ३. वाद घालणे | जेव्हा आमची मते वेगवेगळी असतात तेव्हा आम्ही एकमेकांशी वाद घालतो. |
| ४. खेटे घालणे | त्या ऑफिसात चार खेटे घातले तेव्हा आमचे काम झाले. |
| ५. बित्तंबातमी असणे / समजणे | पोलिसांना सगळ्या शहराची बित्तंबातमी असते. |
| ६. दाणादाण उडवणे | फूटबॉलच्या सामन्यामध्ये भारताने दुसऱ्या संघाची दाणादाण उडवली आणि सामना जिंकला. |
| ७. शक्कल लढवणे | गर्दीतून मार्ग काढण्यासाठी चालकाने शक्कल लढवून गाडी पुढे काढली. |
| ८. पंचाईत होणे | घराची किल्ली हरवल्यामुळे माझी पंचाईत झाली. |
| ९. दुर्लक्ष करणे | अभ्यासाच्या वेळी चित्र काढणाऱ्या शाल्मलीकडे शिक्षकांनी दुर्लक्ष केले. |

### इतर शब्द व क्रियापद जोड्या Other words and Verb combination

| इतर शब्द + क्रियापद<br>Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. लक्षात येणे | शाल्मलीचे अभ्यासात लक्ष नाही हे शिक्षकांच्या लक्षात आले. |
| २. हुसकावून लावणे / देणे | मैदानात घुसलेल्या भटक्या कुत्र्यांना रखवालदाराने हुसकावून लावले. |
| ३. मन मोकळे करणे | गायत्रीने आपल्या आर्थिक परिस्थितीबद्दल सांगून आपले मन मोकळे केले. |
| ४. लक्षात ठेवणे | चौकातले खेळण्यांचे दुकान छोट्या चिंगीने लक्षात ठेवले होते. |
| ५. तोंड पाहावे लागणे | माझ्या कामासाठी मला त्या आळशी माणसाचे तोंड पाहावे लागले. |
| ६. अवलंबून राहणे | आधुनिक जीवनशैलीत कामे करण्यासाठी तंत्रज्ञानावर अवलंबून राहावे लागते. |
| ७. प्रेमात पडणे | सिनेमात नायक-नायिका प्रेमात पडले की गोष्टीला वेग येतो. |
| ८. पदरी पडणे / येणे | मूल अपंग जन्मल्यावर आई म्हणाली, “जे पदरी पडलं / आलं आहे त्याचा आनंदाने स्वीकार करावा.” |
| ९. वाया जाणे | तारांकित हॉटेलांत रोज खूप अन्न वाया जाते. |
| १०. हडप करणे | बिल्डरने खोटी कागदपत्रे दाखवून लोकांचे पैसे हडप केले. |

### आता मला हे येतं...

**व्यक्ती आणि वल्ली : स्वभाव, गुणवैशिष्ट्ये, सवयी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्त्री-पुरुष : पूर्वग्रह, नात्यांमधील अडचणी, पुरुष आणि घरकाम, स्त्रिया आणि नोकरी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**भाववाचक नामे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**अपूर्ण वर्तमानकाळ, रीती वर्तमानकाळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शब्दयोगी पदांप्रमाणे वापरली जाणारी विशेषणे / क्रियाविशेषणे : योग्य, लायक, सारखा इ॰**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**'असं'-'तसं', 'असंच'-'तसंच', 'अशी'-'तशी', असंतसं**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# २

# कार्यक्षेत्र









## चला, शिकू या...

- मजूर, कामगार, रोजंदार ह्यांच्याविषयी वाचणे, बोलणे आणि लिहिणे
- रेझ्युमे (परिचयपत्र) आणि अर्ज
- कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्यांविषयी बोलणे
- शब्दयोगी पदे : कडून, वरून, खालून, मधून
- अपूर्ण व पूर्ण वर्तमानकाळ, अपूर्ण व पूर्ण भूतकाळ
- धातुसाधिते किंवा कृदन्ते

## १ चित्रवर्णन

**मागील पानावरच्या चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

- चित्रात कोण दिसत आहे?
- चित्रातील व्यक्ती काय करत आहे?
- चित्रातील व्यक्तीचा व्यवसाय कोणता असेल?
- चित्रातील व्यक्तीचे हावभाव कसे वाटतात?
- चित्रातील व्यक्ती हे काम कुठे करत आहे?
- चित्रातल्या व्यक्तीचे वय काय असेल?
- चित्रातील व्यक्ती स्वभावाने कशी असेल?

## २ शहरातील उद्योगविश्वाचे चित्र



आपल्या दैनंदिन आयुष्यात नोकरदार, कामगार, रोजंदार ह्यांचे सर्व प्रकार आपल्याला पाहायला मिळतात. मोठ्या शहरांमध्ये तर प्रत्येकाची मिळेल ते आणि जमेल ते काम करण्याची तयारी असते. मुंबई ह्या शहराचं केवळ एक दिवस निरीक्षण केलं तरी अनेक कामगार, रोजंदार, नोकरदार, व्यवस्थापक, दुकानदार आणि उद्योगधंद्यांचे असंख्य प्रकार पाहायला मिळतात. आपल्या घरी कामाला येणारी बाई, सोसायटीचा वॉचमन, रस्त्यावर गिऱ्हाइकाची वाट पाहत ताटकळत उभे असलेले रिक्षावाले, टॅक्सीवाले, आपण ज्या लोकलने प्रवास करतो त्या लोकलचा चालक, रस्त्यावर भाजी-फळे विकणारे, चहा नाश्तावाले, बूटपॉलिश करणारा मुलगा, न्हावी, दुकानदार, चांभार, सफाई कामगार, मजूर, मालवाहक, हातगाडीवर सामान वाहणारे, डोक्यावरून सामान वाहणारे माथाडी, डबेवाले असे असंख्य लोक पोटापाण्यासाठी अविरत धडपड करत असतात. इथल्या दगदगीच्या आयुष्यात आपल्याला ह्या सगळ्या कष्टकऱ्यांचा विसर पडतो. ह्यांपैकी कित्येक जण तर वेगवेगळ्या ठिकाणांहून मुंबईत नोकरीसाठी स्थलांतरित झालेले असतात. अशा ह्या कामगारांशिवाय हे शहर चालूच शकत नाही.

**१. वरील उताऱ्यात कुठल्या व्यवसायांची नावे आली आहेत ते लिहू या.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**लोक**

लोक = माणसांचा समुदाय

हे समूहवाचक नाम असल्याने ते नेहमीच अनेकवचनी असते. उदा॰ लोक येतात, लोक गर्दी करतात इ॰ पण अनेकदा अनौपचारिक भाषेत 'ती लोकं' असाही चुकीचा शब्दप्रयोग केला जातो. त्याचे कारण 'ते लोक' हे नपुंसकलिंगी एकवचन आहे, असे समजून त्याचे 'ती लोकं' असे अनेकवचन केले जाते. जसे 'ते झाड - ती झाडं', 'ते फळ - ती फळं' होते, तसे.

**२. तुम्हाला कोणता व्यवसाय करायला आवडेल? तुम्हाला कोणता व्यवसाय करायला मुळीच आवडणार नाही? का आवडेल आणि का आवडणार नाही हे सांगू या.**








मला हवालदाराचं काम करायला मुळीच आवडणार नाही, कारण त्यांचं काम खूप जिकिरीचं असतं. त्यांना चोर पकडावे लागतात, त्यांना...

मला हवालदाराचं काम करायला खूप आवडेल, कारण...



**३. संवाद ऐकू या.**

**क. संवादात खालीलपैकी कोणत्या कामांचा उल्लेख केला आहे?**

- [ ] भांडी घासणे
- [ ] स्वयंपाक करणे
- [ ] विजेचे बिल भरणे
- [ ] बँकेची कामे करणे
- [ ] ओटा पुसणे
- [ ] पाहुणचार करणे
- [ ] फरशी पुसणे
- [ ] मुलांना शाळेत सोडणे
- [ ] बाथरूम साफ ठेवणे
- [ ] गाडी साफ करणे
- [ ] कपडे धुणे
- [ ] कपड्यांना इस्त्री करणे
- [ ] अभ्यास घेणे
- [ ] टेबल, खुर्च्या साफ करणे

**ख. वरील संवाद पुन्हा ऐकून आपल्या स्वाध्याय क्रमांक '२' मधील वाक्यांवर चर्चा करू या आणि दोन-दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करून संवाद लिहू या.**

काकूंच्या पाठीच्या दुखण्यामुळे आप्पांनी 'स्वयंपाकासाठी बाई पाहिजे' अशी जाहिरात दिली. दुसऱ्याच दिवशी एक बाई त्यांचे घर शोधत आल्या.

"ह्याआधी कुठं काम करत होतात?" अप्पांनी विचारले .
"होते एक बंगलेवाले. दोघंच नवराबायको होते," बाई म्हणाल्या.
"हो? मग ते काम का सोडलंत?"
"आता काय सांगायचं तुम्हाला! त्या दोघांच्या भांडण्यापायी. इतकी भांडणं, इतकी भांडणं, की माझं कामात लक्षच लागायचं नाही."
"बाई गं! नवराबायकोनं इतकं भांडायचं म्हणजे..." काकू कळवळून म्हणाल्या.
"तर हो! माझं न् मालकांचं झालं की माझं न् मालकीणबाईंचं, की पुन्हा माझं न् मालकांचं, असं आलटूनपालटून चालूच राहायचं. कसं काम करणार, सांगा..."

## ३ रेझ्युमे (परिचयपत्र) आणि अर्ज

**१. खाली रेझ्युमेबद्दल माहिती दिली आहे. ही माहिती वाचून आपल्याला आवडलेले मुद्दे सांगू या आणि त्याबद्दल चर्चा करू या.**

नोकरीसाठी अर्ज करताना तुम्ही सादर केलेला रेझ्युमे - अर्थात परिचयपत्र - हा फार महत्त्वाचा ठरतो. म्हणून तो तयार करताना काही गोष्टींचे भान राखणे आवश्यक असते.




क. रेझ्युमे हा जणू आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आरसाच. उत्तम रेझ्युमे हा जगाला आपली ओळख करून देणारे माध्यम ठरू शकतो. त्यातून आपली क्षमता आणि बलस्थानांची ओळख होते.

ख. आपला रेझ्युमे नोकरी देणाऱ्यांच्या अपेक्षा आणि अटी पूर्ण करणारा असायला हवा.

ग. रेझ्युमे लिहिण्यामागचा हेतू लक्षात घेणे गरजेचे आहे. सरसकट सर्व अर्जांसाठी एकच रेझ्युमे असणे तितकेसे योग्य ठरणार नाही. आपण कोणत्या पदासाठी, कोणत्या कार्यालयीन विभागासाठी अर्ज करत आहोत, नोकरी देणारी कंपनी / आस्थापना कोणत्या प्रकारची आहे (सरकारी / निमसरकारी / खासगी / महामंडळे), आवश्यक शिक्षण, अपेक्षित अनुभवक्षेत्र आणि अनुभवाचा कालावधी, अर्हतेनुसार प्रत्येक वेळी आवश्यक फेरफार करून रेझ्युमे तयार करणे परिणामकारक ठरते.

मला पहिला मुद्दा जास्त आवडला. खरंच, रेझ्युमे म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आरसाच...

मला शेवटचा मुद्दा अगदी महत्त्वाचा वाटतो. नोकरीसाठीची आपली अर्हता आपल्याला माहीत असली पाहिजे...

मला अजून एक सुचवावेसे वाटते...

**२. अर्ज**

**क. नोकरीसाठी रेझ्युमे जितका महत्त्वाचा, तितकाच महत्त्वाचा असतो नोकरीसाठीचा अर्ज. आपल्या मते, उत्तम अर्जामध्ये कुठले मुद्दे आले पाहिजेत ते लिहू या.**

माझ्या मते अर्ज करताना ह्या बाबी ध्यानात घेतल्या पाहिजेत...

अर्जामध्ये ह्या बाबी अनावश्यक आहेत...

अर्जामध्ये असे लिहू नये...

अर्जामध्ये ह्याचा उल्लेख नक्की करावा...

**ख. आपण सांगितलेल्या मुद्द्यांची खालील मुद्द्यांशी तुलना करू या.**
**चांगली नोकरी मिळवण्यासाठी अर्ज करताना पुढील मुद्द्यांची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.**




**प्रति** : आपण नोकरीसाठी अर्ज कोणत्या संस्थेत किंवा कंपनीत करत आहोत, हे नीट समजून घेणे गरजेचे आहे. तेथील प्रमुख व्यक्तीचे नाव, पद, कंपनी हे अर्जाच्या डाव्या बाजूला सुरुवातीला असायला हवे. तसेच उजव्या कोपऱ्यात अर्ज करत असलेल्या दिवसाचा दिनांक लिहिणे आवश्यक आहे.

**विषय** : या मुद्द्यामध्ये प्रामुख्याने आपण कोणत्या पदासाठी अर्ज करत आहोत, त्याविषयी माहिती द्यावी.
उदा. व्यवस्थापकपदासाठी अर्ज, उपसंपादकपदासाठी अर्ज इ.

**वरिष्ठांविषयी आदर** : आपण ज्या व्यक्तीला उद्देशून नोकरीसाठी अर्ज करत आहोत, त्या व्यक्तीला संबोधताना 'आदरणीय महोदय, सप्रेम नमस्कार', असे आवर्जून लिहावे.

**स्वत:विषयी माहिती** : ह्यात आपले स्वत:चे पूर्ण नाव लिहावे. त्यानंतर आपली शैक्षणिक पात्रता सविस्तर लिहावी. त्यानंतर सध्या आपण कुठे काम करत आहोत ह्याविषयी माहिती द्यावी. तेथे केलेल्या कामाच्या अनुभवाचा उल्लेख नक्की करावा. त्यानंतर आपली आवड / छंद याविषयीसुद्धा माहिती द्यावी.

**विनंती** : आपल्याला नोकरीची गरज असल्याने शेवटी नोकरीच्या मागणीसाठी आदरपूर्वक विनंती करावी. तसेच सोबत स्वत:ची व्यक्तिगत माहिती जोडत आहे, असा उल्लेख करावा.

**शेवट** : शेवटी डाव्या बाजूला 'कळावे' आणि त्यानंतर नव्या ओळीत 'आपला विश्वासू' असे लिहावे व त्याखाली स्वाक्षरी करावी.

**ग. आता ह्या मुद्द्यांच्या आधारे आपण खालीलपैकी एका संस्थेत नोकरीसाठी अर्ज लिहू या.**

**भारत संचार निगम लिमिटेड मध्ये 'कनिष्ठ लेखाधिकारी' पदांच्या जागा**

**भारत संचार निगम लिमिटेड यांच्या आस्थापनेमधील 'कनिष्ठ लेखाधिकारी' पदांच्या जागा भरण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत असून, अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ ऑक्टोबर, २०१७ आहे.**

**सेलिब्रेशन ह्या इव्हेंट व्यवस्थापन कंपनीमध्ये इव्हेंट व्यवस्थापकाच्या जागा**

**कुशल, सर्जनशील आणि कार्यक्षम उमेदवारांनी अर्ज करावा. अनुभवाची गरज नाही.**
**वयोमर्यादा : १८ ते २५ वर्षे**

**ई-मॅट ह्या बहुराष्ट्रीय आय. टी. कंपनीमध्ये व्यवस्थापकाच्या पदाची जागा**

**ई-मॅट ह्या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये व्यवस्थापकाची जागा भरणे आहे. किमान पाच वर्षांचा अनुभव असलेल्या आणि प्रवासाची तयारी असलेल्या उमेदवारांनी त्वरित अर्ज करावा.**
**वयोमर्यादा : ३० वर्षे**

## ४ कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्या

**१. खालील चित्रे पाहू या आणि त्यांचे वर्णन करू या.**







### करा आणि शिका

**२. विद्यार्थ्यांचे गट करून कामाच्या ठिकाणी कुठल्या समस्या येऊ शकतात ह्याची यादी तयार करू या आणि ह्या समस्यांवर उपाय सुचवू या. प्रत्येक गटाचा एक विद्यार्थी समोर येईल आणि एक समस्या मांडेल. दुसऱ्या गटाचा एक विद्यार्थी त्या समस्येवरील उपाय सुचवेल.**

**३. कामाच्या ठिकाणी होणारा त्रास**

हल्ली माणसाचे आयुष्य इतके गतिमान झाले आहे, की बऱ्याच जणांना कामातल्या 'तोचतोपणा'चा कंटाळा येतो. कामामध्ये काही नावीन्य उरले नाही, की नोकरी सोडावीशी वाटते. बॉस तुसडा वाटला, की तडकाफडकी राजीनामा द्यावासा वाटतो. सहकाऱ्यांबरोबर भांडण झाले, की मानसिक त्रास होतो. काम अति आव्हानात्मक असले, की डोक्याला ताण येतो आणि स्वतःची प्रगती होत नाहीये असे जाणवले, की नैराश्य येते.

पण नोकरी सोडणे काही प्रत्येकासाठी सोपे नसते. नोकरीशिवाय जगणे आर्थिकदृष्ट्या कठीण असते. शिवाय नोकरी बदलली तरी नव्या कामाच्या ठिकाणी त्याच समस्या पुन्हा येणार नाहीत ह्याची खात्री देता येत नाही. हल्ली नोकरी म्हणजेसुद्धा टांगती तलवार. नोकरी सोडणाऱ्यांची धरसोड वृत्तीही दिसून येतेच. कामाच्या ठिकाणी येणारा कंटाळा टाळण्यासाठी आणि कामात पुन्हा रुची वाटावी म्हणून तज्ज्ञांनी काही कानमंत्र दिले आहेत.

- स्वतःला ओळखा आणि स्वतःबद्दल अभिमान बाळगा.
- थकवा आणि चिंता टाळण्यासाठी काही चांगल्या सवयी आत्मसात करा.
- नवीन गोष्टी शिकण्याची आव्हाने स्वीकारा.
- लोकांच्या टीकेकडे दुर्लक्ष करा.
- संवादाचे कौशल्य आत्मसात करा.
- सहकार्य मिळवण्यासाठी आधी स्वतः सहकार्य करायला शिका.
- कोणावर टीका करायची असलीच तर त्याला न दुखवता टीका करा.

क. वरील उताऱ्यात कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्या सांगितल्या आहेत, त्यांची यादी करू या आणि शिवाय इतर समस्या लिहू या.

उदा. कंटाळा येणे,

ख. तज्ज्ञांनी सांगितलेले कानमंत्र नेमक्या कोणत्या समस्यांवरील उपाय सांगतात? तीन-तीन विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येकी एका विषयावर लिहू या.

फेसबुक　　मुखपृष्ठ　　बाहेर पडा

कामगार उवाच



नमस्कार. माझं नाव मी काही अपरिहार्य कारणांमुळे सांगू शकत नाही; परंतु मला एका गोष्टीचा खूप त्रास होत असल्यानं मी इथे माझं म्हणणं मांडत आहे. मी काही वर्षांपूर्वी एका खेडेगावातून शहरात आलो आणि एका नामवंत कंपनीमध्ये नोकरी करू लागलो. मी माझ्या कामामध्ये खूप हुशार आहे. माझा बॉससुद्धा माझ्या कामावर खूश असतो. कदाचित ह्याच कारणामुळे माझ्या सहकाऱ्यांना माझा मत्सर वाटत असावा. मला चांगलं इंग्रजी बोलता येत नाही, म्हणून ते मला इंग्रजीमधून चिडवतात. हा प्रकार गेलं वर्षभर चालू आहे. मला माझ्या बॉसला हे सांगायची हिंमत होत नाही. कारण माझे सहकारी रागावून मला जास्त त्रास देतील. माझ्या घरची परिस्थिती वाईट आहे, पण तरीही नोकरी सोडावी असं सतत वाटत राहतं. मी ह्या सगळ्या विचारांमुळे खूप त्रस्त झालो आहे. काय करावं, काही सुचत नाही. मानसिक त्रासामुळे माझं कामावरचं लक्षसुद्धा उडालं आहे. काय करावं? कोणी सांगू शकेल का?



नमस्कार. माझं नाव अविनाश मांडके. मी तुमचा त्रास समजू शकतो. तुम्ही कुठंही जा, अशी माणसं तुम्हाला भेटतीलच. म्हणून नोकरी सोडणं हा विचार तुमच्या मनातसुद्धा येऊ देऊ नका. माझ्या मते तुम्ही तुमच्या सहकाऱ्यांच्या वागण्याकडे दुर्लक्ष करावे. बोलणाऱ्याचं तोंड धरता येत नाही. तुम्ही काहीही प्रतिक्रिया देत नाही हे पाहून त्यांची त्यांनाच लाज वाटेल आणि ते तुम्हाला त्रास द्यायचं थांबवतील.

फेसबुक मुखपृष्ठ बाहेर पडा

कामगार उवाच



अविनाश मांडके, तुम्ही असा कसा सल्ला देताय त्यांना? 'बोलणाऱ्याचं तोंड धरता येत नाही' ही म्हण सांगून तुम्ही त्यांना चक्क गप्प बसायला लावताय! हे बघा, अन्याय करणारा जितका वाईट, तितकाच अन्याय सहन करणारासुद्धा वाईट. मी म्हणेन, त्यांनी त्यांच्या बॉसला जाऊन सगळं सविस्तर सांगावं, लेखी तक्रार द्यावी.



नमस्कार. बाप रे! फारच अवघड परिस्थिती आहे राव तुमची! पण एक सांगू का? तुम्हाला स्वतःलाच तुमच्या ह्या परिस्थितीवर मात करावी लागेल. तुमचे सहकर्मचारी तुम्हाला त्रास देतात, तर तुम्हीसुद्धा त्यांना त्रास द्या ना! एवढं काय आहे त्यात? मी तुमच्या जागी असतो ना, तर एकेकाला धोपटून काढलं असतं.

ग. आता आपणही आपली प्रतिक्रिया देऊ या आणि वर्गातील इतरांसोबत या विषयावर चर्चा करू या.

फेसबुक मुखपृष्ठ लॉग आउट

तुमचे नाव*

ई-मेल*

प्रतिक्रिया*

1000 अक्षरांची मर्यादा, **1000** अक्षरे शिल्लक

सामाईक



आमच्या गावाकडच्या घरी आम्ही एक जोडपे कामाला ठेवले होते. शबाना अतिशय कष्टाळू होती. चार घरी कामे करून आणि आमचे घर सांभाळून ती मिळवत असलेल्या पैशांवर त्यांचा संसार चालला होता. कासिम – तिचा नवरा – हसतमुख, गमत्या, अतिशय प्रेमळ आणि आनंदी माणूस होता. शबानावर त्याचा भारी जीव होता. पण कामधंदा त्याला कधी जमला नाही म्हणजे नाहीच. मी एकदा शबानाला विचारले,"तू कशी गं राहतेस अशा माणसाबरोबर? कमाल आहे तुझी!" त्यावर ती शांतपणे म्हणाली, "काय आहे, ताई, मी जगण्यासाठी काम करते आणि माझ्या नवऱ्यामुळे मला कशासाठी जगायचं ते कळतं."

## ५ चहा सांडला...

मनोज : काय रे, सागर, काय झालं? असा चेहरा पाडून का बसलायस?

सागर : अरे, काय सांगू! एक मोठी चूक झालीय माझ्याकडून.



मनोज : का? काय झालं?

सागर : अरे, काल बॉसनं एक महत्त्वाची फाईल दिली होती. तो म्हणाला, ह्या फाईलचा नीट अभ्यास करा. बॉसकडून ती फाईल मी घेऊन आलो आणि लगेच कामाला लागलो.

मनोज : कोणती फाईल?

सागर : अरे, क्लायंटची माहिती होती तिच्यात. त्या फाईलमधून क्लायंटच्या आपल्याकडून काय अपेक्षा आहेत, ह्याची टिपणं काढायला सांगितलं होतं.

मनोज : मग?

सागर : अरे, गेले दोन दिवस मी ती फाईल वाचत होतो, त्यात दिलेल्या माहितीवरून मी माझी टिपणं लिहीत होतो. मी संपूर्ण फाईल वाचली होती. माझं कामही पूर्ण केलं होतं. आज सकाळीच मी जेव्हा घरी चहा पीत होतो, आणि माझी टिपणं पुन्हा एकदा नजरेखालून घालत होतो, तेव्हा नेमका माझ्या टिपणांवर चहा सांडला. शिवाय आज बॉस माझ्यावर आधीच खूप चिडला असणार.

मनोज : कशावरून तू असं म्हणतोयस?

सागर : कारण मला आज कामाला यायलासुद्धा उशीर झाला. आणि बॉस मला सकाळी शोधत होता, असं मला त्याची सेक्रेटरी म्हणाली. त्यावरून मी अंदाज केला.

मनोज : बाप रे! आता?

सागर : माहीत नाही.

मनोज : काही काळजी करू नकोस. सरळ बॉसकडे जा आणि सांग त्याला. अरे माणसाच्या हातून चुका होतातच. एवढं काय त्यात? याआधी तुझ्या हातून कधीच कुठली चूक झाली नाहीये. पहिली चूक तर सगळ्यांनाच माफ असते, नाही का?

सागर : हो. बरोबर आहे. मी बोलतो बॉसशी. तुझ्याशी बोलून बरं वाटतंय आता मला.

## शब्दयोगी पदे Postpositions

**१. वरील संवादामध्ये काही शब्दयोगी पदे आली आहेत. त्यांचा योग्य वापर करून खालील वाक्ये पूर्ण करू या.**



क. झाडा---------- नारळ गाडीच्या काचेवर पडला आणि काचेला तडा गेला.

ख. आपल्या---------- एक तरी चांगलं काम व्हावं, असं प्रत्येकाला वाटत असतं.

ग. पुला----------- पुराचं पाणी धो धो वाहत होतं.

घ. तुझ्या----------- निरोप आल्यावरच मी कामाला सुरुवात करेन.

च. भर सभे----------- ते घाईघाईने उठून गेले.

**२. वरून, खालून, कडून आणि मधून ही शब्दयोगी पदे वापरून एखाद्या कामगाराविषयी एक गोष्ट किंवा कविता लिहू या आणि ती वर्गात वाचून दाखवू या.**

**३. आता पुढील वाक्ये पाहू या आणि कोष्टक पूर्ण करू या.**



अरे, गेले दोन दिवस मी ती फाईल वाचत होतो, त्यात दिलेल्या माहितीवरून मी माझी टिपणं लिहीत होतो. मी संपूर्ण फाईल पाहिली होती, आणि माझं कामही पूर्ण केलं होतं. आज सकाळीच मी जेव्हा घरी चहा पीत होतो आणि माझी टिपणं पुन्हा एकदा नजरेखालून घालत होतो, तेव्हा नेमका माझ्या टिपणांवर चहा सांडला.

| सर्वनाम | अपूर्ण वर्तमानकाळ **Present Continuous Tense** | पूर्ण वर्तमानकाळ **Present Perfect Tense** | अपूर्ण भूतकाळ **Past Continuous Tense** | पूर्ण भूतकाळ **Past Perfect Tense** |
|---|---|---|---|---|
| मी | वाचत आहे | वाचले / वाचलं आहे | वाचत होतो | वाचले होते / वाचलं होतं |
| मी | | | लिहीत होतो | |
| मी | | | | पाहिली होती |
| मी | | | | केले होते / केलं होतं |
| मी | | | पीत होतो | |

**४. वरील क्रियापदांचे वर्गीकरण करून रिकाम्या जागेत लिहू या आणि नंतर दिलेला नियमही पूर्ण करू या.**



उदा॰ वाचत आहे, लिहीत आहे, पाहत आहे, करत आहे, पीत आहे

ही सगळी क्रियापदे वर्तमानकाळातील चालू किंवा अपूर्ण असलेली क्रिया दाखवतात, म्हणून त्यांना आपण अपूर्ण वर्तमानकाळ म्हणतो.

क. तसेच, वाचलं आहे, -----------------------------------------

----------------------- ही सगळी क्रियापदे वर्तमानकाळातील पूर्ण झालेली क्रिया दाखवतात, म्हणून त्यांना आपण ----------------------- म्हणतो.

ख. त्याचप्रमाणे, वाचत होता ---------------------------------------------------------

ही सगळी क्रियापदे भूतकाळातील चालू किंवा अपूर्ण असलेली क्रिया दाखवतात, म्हणून त्यांना आपण ----------------------- म्हणतो.

ग. तसेच, वाचलं होतं ---------------------------------------------------------------

ही सगळी क्रियापदे भूतकाळातील पूर्ण झालेली क्रिया दाखवतात, म्हणून त्यांना आपण ----------------------- म्हणतो.

**अकर्मक क्रियापद Intransitive Verb**

| अपूर्ण वर्तमानकाळ Present Continuous Tense | पूर्ण वर्तमानकाळ Present Perfect Tense | अपूर्ण भूतकाळ Past Continuous Tense | पूर्ण भूतकाळ Past Perfect Tense |
|---|---|---|---|
| मी जात आहे | मी गेलो / गेले आहे | मी जात होतो / होते | मी गेलो होतो / गेले होते |
| आम्ही / आपण जात आहोत | आम्ही / आपण गेलो आहोत | आम्ही / आपण जात होतो | आम्ही / आपण गेलो होतो |
| तू जात आहेस | तू गेला / गेली आहेस | तू जात होतास / होतीस | तू गेला होतास / गेली होतीस |
| तुम्ही / आपण जात आहात | तुम्ही / आपण गेले / गेल्या आहात | तुम्ही / आपण जात होता | तुम्ही / आपण गेले होता / गेल्या होतात |
| तो / ती / ते जात आहे | तो गेला आहे | तो जात होता | तो गेला होता |
| | ती गेली आहे | ती जात होती | ती गेली होती |
| | ते गेले / गेलं आहे | ते जात होते / होतं | ते गेले होते / गेलं होतं |
| ते / त्या / ती जात आहेत | ते गेले आहेत | ते जात होते | ते गेले होते |
| | त्या गेल्या आहेत | त्या जात होत्या | त्या गेल्या होत्या |
| | ती गेली आहेत | ती जात होती | ती गेली होती |

व्याकरण



**सकर्मक क्रियापद Transitive Verb**

| अपूर्ण वर्तमानकाळ Present Continuous Tense | पूर्ण वर्तमानकाळ Present Perfect Tense | अपूर्ण भूतकाळ Past Continuous Tense | पूर्ण भूतकाळ Past Perfect Tense |
|---|---|---|---|
| मी वाचत आहे | मी वाचले / वाचलं आहे | मी वाचत होतो / होते | मी वाचले होते / वाचलं होतं |
| आम्ही / आपण वाचत आहोत | आम्ही / आपण वाचले / वाचलं आहे | आम्ही / आपण वाचत होतो | आम्ही / आपण वाचले होते / वाचलं होतं |
| तू वाचत आहेस | तू वाचले / वाचलं आहेस | तू वाचत होतास / होतीस | तू वाचले होतेस / वाचलं होतंस |
| तुम्ही / आपण वाचत आहात | तुम्ही / आपण वाचले / वाचलं आहे | तुम्ही / आपण वाचत होता | तुम्ही / आपण वाचले होते / वाचलं होतं |
| तो वाचत आहे | त्याने वाचले / त्यानं वाचलं आहे | तो वाचत होता | त्याने वाचले होते / त्यानं वाचलं होतं |
| ती वाचत आहे | तिने वाचले / तिनं वाचलं आहे | ती वाचत होती | तिने वाचले होते / तिनं वाचलं होतं |
| ते वाचत आहे | त्याने वाचले / त्यानं वाचलं आहे | ते वाचत होते / होतं | त्याने वाचले होते / त्यानं वाचलं होतं |
| ते वाचत आहेत | त्यांनी वाचले / वाचलं आहे | ते वाचत होते | त्यांनी वाचले होते / वाचलं होतं |
| त्या वाचत आहेत | त्यांनी वाचले /वाचलं आहे | त्या वाचत होत्या | त्यांनी वाचले होते / वाचलं होतं |
| ती वाचत आहेत | त्यांनी वाचले / वाचलं आहे | ती वाचत होती | त्यांनी वाचले होते / वाचलं होतं |

टीप : पूर्ण वर्तमानकाळ व पूर्ण भूतकाळात क्रियापद कर्माप्रमाणे चालवले जाते.

**पूर्ण वर्तमानकाळ** **Present Perfect Tense**

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण, तुम्ही / आपण / | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला आहे<br>धडे वाचले आहेत | कादंबरी वाचली आहे<br>कादंबऱ्या वाचल्या आहेत | पुस्तक वाचले / वाचलं आहे<br>पुस्तके / पुस्तकं वाचली आहेत |
| तू | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला आहेस<br>धडे वाचले आहेस | कादंबरी वाचली आहेस<br>कादंबऱ्या वाचल्या आहेस | पुस्तक वाचले / वाचलं आहेस<br>पुस्तके / पुस्तकं वाचली आहेस |
| त्याने / त्यांनी, तिने / त्यांनी, त्याने / त्यांनी | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला आहे<br>धडे वाचले आहेत | कादंबरी वाचली आहे<br>कादंबऱ्या वाचल्या आहेत | पुस्तक वाचले / वाचलं आहे<br>पुस्तके / पुस्तकं वाचली आहेत |

**पूर्ण भूतकाळ** **Past Perfect Tense**

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण, तुम्ही / आपण / | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला होता<br>धडे वाचले होते | कादंबरी वाचली होती<br>कादंबऱ्या वाचल्या होत्या | पुस्तक वाचले होते / वाचलं होतं<br>पुस्तके / पुस्तकं वाचली होती |
| तू | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला होतास<br>धडे वाचले होतेस | कादंबरी वाचली होतीस<br>कादंबऱ्या वाचल्या होत्यास | पुस्तक वाचले होतेस / वाचलं होतंस<br>पुस्तके / पुस्तकं वाचली होतीस |
| त्याने / त्यांनी, तिने / त्यांनी, त्याने / त्यांनी | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला होता<br>धडे वाचले होता | कादंबरी वाचली होती<br>कादंबऱ्या वाचल्या होत्यात | पुस्तक वाचले होते / वाचलं होतं<br>पुस्तके / पुस्तकं वाचली होती |

नकारार्थी रूपे **Negation**

| अपूर्ण वर्तमानकाळ Present Continuous Tense | पूर्ण वर्तमानकाळ Present Perfect Tense | अपूर्ण भूतकाळ Past Continuous Tense | पूर्ण भूतकाळ Past Perfect Tense |
|---|---|---|---|
| मी वाचत नाही आहे / नाहीये | मी वाचले नाही आहे / वाचलं नाहीये | मी वाचत नव्हतो / नव्हते | मी वाचले नव्हते / वाचलं नव्हतं |
| आम्ही / आपण वाचत नाही आहोत / नाहीओत | आम्ही / आपण वाचले नाही आहे / वाचलं नाहीये | आम्ही / आपण वाचत नव्हतो | आम्ही / आपण वाचले नव्हते / वाचलं नव्हतं |
| तू वाचत नाही आहेस / नाहीयेस | तू वाचले नाही आहेस / वाचलं नाहीयेस | तू वाचत नव्हतास / नव्हतीस | तू वाचले नव्हतेस / वाचलं नव्हतंस |
| तुम्ही / आपण वाचत नाही आहात / नाहीओत | तुम्ही / आपण वाचले नाही आहे / वाचलं नाहीये | तुम्ही / आपण वाचत नव्हता | तुम्ही / आपण वाचले नव्हते / वाचलं नव्हतं |
| तो वाचत नाही आहे / नाहीये | त्याने वाचले नाही आहे / त्यानं वाचलं नाहीये | तो वाचत नव्हता | त्याने वाचले नव्हते / त्यानं वाचलं नव्हतं |
| ती वाचत नाही आहे / नाहीये | तिने वाचले नाही आहे / तिनं वाचलं नाहीये | ती वाचत नव्हती | तिने वाचले नव्हते / तिनं वाचलं नव्हतं |
| ते वाचत नाही आहे / नाहीये | त्याने वाचले नाही आहे / त्यानं वाचलं नाहीये | ते वाचत नव्हते / नव्हतं | त्याने वाचले नव्हते / त्यानं वाचलं नव्हतं |
| ते वाचत नाही आहेत / नाहीयेत | त्यांनी वाचले नाही आहे / वाचलं नाहीये | ते वाचत नव्हते | त्यांनी वाचले नव्हते / वाचलं नव्हतं |
| त्या वाचत नाही आहेत / नाहीयेत | त्यांनी वाचले नाही आहे / वाचलं नाहीये | त्या वाचत नव्हत्या | त्यांनी वाचले नव्हते / वाचलं नव्हतं |
| ती वाचत नाही आहेत / नाहीयेत | त्यांनी वाचले नाही आहे / वाचलं नाहीये | ती वाचत नव्हती | त्यांनी वाचले नव्हते / वाचलं नव्हतं |

व्याकरण

## म्हणी आणि वाक्प्रचार

मारणाऱ्याचा हात धरता येतो पण बोलणाऱ्याचे तोंड धरता येत नाही

असेल दाम तर होईल काम

आधी करावे मग सांगावे

आळश्याला दुप्पट काम

आधीच हौस त्यात पाऊस

म्हणी आणि वाक्प्रचार

**खडूस बॉस : एका कंपनीतला खडूस बॉस त्याच्या कर्मचाऱ्यांवर सतत चिडलेला असतो. कर्मचारी बिचारे सारखे घाबरलेले असतात.**

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ प्रिंटरमध्ये कागद टाकायला सांगणे : प्रिंटरमध्ये कालच कागद टाकायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी प्रिंटरमध्ये कागद टाकतच होतो, पण कागदच संपले. | प्रिंटरमध्ये कालच कागद टाकायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी प्रिंटरमध्ये कागद टाकतच होतो, पण कागदच संपले. |
| अर्ज घेऊन यायला सांगणे | तुम्हाला अर्ज घेऊन यायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी अर्ज घेऊन येतच होतो, पण वेळच संपली. |
| ई-मेल करायला सांगणे | तुम्हाला ई-मेल करायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी ई-मेल करतच होतो, पण कॉम्प्युटर बंद पडला. |
| फाईल वाचायला सांगणे | तुम्हाला फाईल वाचायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी फाईल वाचतच होतो, पण दिवे गेले. |
| पत्र टाकायला सांगणे | तुम्हाला पत्र टाकायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी पत्र टाकायला चाललोच होतो, पण सायकलमधली हवा गेली. |
| वेळेत यायला सांगणे | तुम्हाला वेळेत यायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी वेळेत येतच होतो, पण बस आलीच नाही. |
| ग्राहकाला फोन करायला सांगणे | तुम्हाला ग्राहकाला फोन करायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, फोन करतच होतो, पण फोन लागला नाही. |
| नवीन खुर्च्या मागवायला सांगणे | तुम्हाला नवीन खुर्च्या मागवायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी खुर्च्या मागवतच होतो, पण दुकान बंद होतं. |
| नवीन कॉम्प्युटर विकत घ्यायला सांगणे | तुम्हाला नवीन कॉम्प्युटर विकत घ्यायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी कॉम्प्युटर विकत घ्यायला चाललोच होतो, पण तेवढ्यात पाऊस पडायला लागला. |
| निविदा पाठवणे | तुम्हाला निविदा पाठवायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी निविदा पाठवतच होतो, पण आजच मुदत संपली. |
| चेक्स बँकेमध्ये भरायला सांगणे | तुम्हाला चेक्स बँकेमध्ये भरायला सांगितलं होतं ना?<br>हो सर, मी बँकेमध्ये चेक्स भरायला चाललोच होतो, पण बँकेला सुट्टी होती. |









५. क. पुढील ध्वनिफीत ऐकून वरील चित्रांसाठी योग्य परिच्छेद निवडू या आणि चित्रांमध्ये दिलेल्या चौकोनांत योग्य परिच्छेदाचा क्रमांक लिहू या.

ख. आता वरील व्यक्तींचे बोलणे पुन्हा ऐकू या आणि दिलेल्या शब्दांच्या आधारे पुढील चौकटींत नोंदी करू या.

| | मैत्रा | राजीव | मनोज | प्राची |
|---|---|---|---|---|
| व्यवसाय | | | | |
| आवड | | | | शिकवण्याची आवड |
| शिक्षण | | | | |
| कामाविषयी समाधान | | | | |

**ग. आपण केलेल्या नोंदींविषयी वर्गात चर्चा करू या आणि खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहू या.**

**१. वरील वाक्यांमधील व्यक्तींनी आपला व्यवसाय कसा निवडला?**

(मैत्रा) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(मनोज) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(राजीव) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(प्राची) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**२. वरील व्यक्तींनी आपल्या आवडीचा व्यवसाय करण्यासाठी काय केले?**

(मैत्रा) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(मनोज) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(राजीव) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(प्राची) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**३. वरील व्यक्ती आपापल्या व्यवसायाबद्दल आनंदी आहेत का? त्यांच्या या आनंदाचे कारण काय आहे?**

(मैत्रा) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(मनोज) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(राजीव) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(प्राची) : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

६. **उदाहरणाप्रमाणे वाक्यांमधील क्रियापदाची रूपे बदलून पुन्हा लिहू या आणि बदललेल्या रूपांमुळे अर्थ बदलतोय का, ह्याचा अभ्यास करू या.**

क. मी ज्या कार्यक्षेत्रात काम करते ते आधी पुरुषप्रधान होते. पण आज जग बदलले आहे.

उदा. मी ज्या कार्यक्षेत्रात काम करते ते आधी पुरुषप्रधान होते. पण आज जग बदललेले आहे.

ख. मी चक्क मुख्य शेफ झाले आहे.

ग. भारतात रुग्णालयांची संख्या वाढली आहे.

घ. मी एका खूप छोट्या ठिकाणाहून मोठ्या शहरात आलो आहे. घरची परिस्थिती जेमतेम असल्यामुळे बी.ए. नंतर माझे फारसे शिक्षण झाले नव्हते.

च. मित्रांच्या सांगण्यावरून मी एका कॉल सेंटरमध्ये नोकरीसाठी अर्ज पाठवला होता.



----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

मग? अर्थ बदलला की नाही? ---------- .

**थोडक्यात :**

| तो | ती | ते | ते | त्या | ती |
|---|---|---|---|---|---|
| दरवाजा | गाडी | पुस्तक | दरवाजे | गाड्या | पुस्तके |
| उघडला आहे | चालवली आहे | वाचले आहे | उघडले आहेत | चालवल्या आहेत | वाचली आहेत |
| उघडलेला आहे | चालवलेली आहे | वाचलेले आहे | उघडलेले आहेत | चालवलेल्या आहेत | वाचलेली आहेत |

करा आणि शिका



**७. चित्रफीत पाहू या. दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करून आंतरजालावरून मुंबईच्या गिरणी कामगारांच्या ऐतिहासिक संपाबद्दल माहिती मिळवू या व ती वर्गासमोर सादर करू या.**

**८. चर्चा करू या.**

शिक्षक / शिक्षिका प्रत्येक विद्यार्थ्याला / विद्यार्थिनीला एक कार्ड देईल. त्या कार्डावर 'सहमती दर्शवणे', 'विरोध दर्शवणे', 'वेगळे मत मांडणे' असे लिहिलेले असेल. शिक्षक / शिक्षिका खालील विधाने करेल. मिळालेल्या कार्डानुसार प्रतिक्रिया देऊ या आणि चर्चा करू या.

क. आयुष्यात नोकरी करण्याला पर्याय नाही.

ख. प्रत्येकाला त्याच्या शिक्षणाप्रमाणे पगार मिळाला पाहिजे, कामानुसार नाही.

ग. समाजातले प्रत्येकाचे समाजातले स्थान त्याचे काम ठरवते.

घ. काही व्यावसायिक खूप बेपर्वा असतात.

च. कामगारांचा आदर केला पाहिजे.

छ. कामगारांच्या समस्या गंभीर आहेत.

ज. कोणतेही काम चांगले किंवा वाईट नसते.

झ. कामगारांनी संघटित झाले पाहिजे.

करा आणि शिका

**९. विद्यार्थ्यांचे गट बनवू या आणि डबेवाल्यांच्या भूमिकेत जाऊन आपण एक कार्यप्रणाली आखू या. व्यवस्थापनासाठी मुद्दे तयार करू या.**



उदा. पूर्वतयारी : आपल्याकडे कामगार किती आहेत?
त्यांतील व्यवस्थापक कोण, खजिनदार कोण, निरीक्षक कोण आणि डबेवाले कोण?
किती डबे आपण पोचवू शकतो?
आपण कुठल्या भागांमधून डबे उचलू शकतो आणि कुठल्या भागांमध्ये डबे पोचवू शकतो?...

**व्यवस्थापन :**

आपण तयार केलेला आराखडा वर्गासमोर चित्रांचा, फळ्याचा आणि इतर माध्यमांचा वापर करून प्रभावीपणे मांडू या.



१०. चित्रफीत पाहू या आणि मुंबईच्या डबेवाल्यांचा इतिहास व त्यांची कार्यप्रणाली लिहू या.

## ६ जेवणाचा डबा



विवेक त्याच्या कंपनीत सगळ्यांचा लाडका झाला आहे. ह्याचे कारण त्याचे गोड बोलणे नसून त्याचा चविष्ट डबा आहे. विवेक रोज कामाला येताना डबा घेऊन येतो. तो एकटाच राहतो, म्हणून तो स्वतःच रोज सकाळी लवकर उठून स्वयंपाक करतो. वर्तमानपत्र वाचून झाले, की तो आधी चहा करतो, नाश्ता बनवतो. आणि मग खात खात एकीकडे भाजी करतो. खाऊन झाले, की पीठ मळतो, पीठ मळून झाले, की पोळ्या करतो. मग कोशिंबीर करतो. असा डबा घेऊन तो कामाला येतो. त्याच्या हाताला चांगलीच चव असल्याने जेवणाच्या वेळी त्याचे सहकर्मचारी त्याच्या जेवणावर ताव मारतात.

**१. वरील परिच्छेदामधील अधोरेखित शब्दांचा अभ्यास करू या. वरील वाक्यांमध्ये धातूला प्रत्यय लागून क्रियापदाची विविध रूपे बनली आहेत.**
**जसे : बोल-णे, ये-ताना, उठ-ऊन,वाच-ऊन, खा-त, खा-ऊन, मळ-ऊन, घे-ऊन**

### धातुसाधिते किंवा कृदन्ते  Participles

धातूला 'णे, ताना, ऊन, त, ला' असे विविध प्रत्यय लागून तयार होणाऱ्या शब्दांना **धातुसाधिते** किंवा **कृदन्ते** असे म्हणतात. वाक्यामध्ये ती 'नाम', 'विशेषण' किंवा 'क्रियाविशेषण' ह्याचे कार्य करतात .

- 'त' हा प्रत्यय लागला, की क्रियापदाचे जे रूप होते त्याचा वापर कधी कधी दोनदाही केला जातो
  उदा० खात खात, गात गात इ०
- इतरही काही रूपे दोनदा वापरता येतात.
  उदा० खाऊन खाऊन, आल्या आल्या, उठल्या उठल्या इ०
- 'ता' हा प्रत्यय लागून होणारे क्रियाविशेषण मात्र दोनदा वापरले जाते
  उदा० खाता खाता, गाता गाता इ०

| प्रकार | उदाहरण | धातू | प्रत्यय | कार्य |
|---|---|---|---|---|
| -णे कृदन्त | त्याचे बोलणे मला फार आवडते. | बोल | णे | नाम |
| -त कृदन्त | तो खात खात एकीकडे भाजी करतो. | खा | त | क्रियाविशेषण |
| -ता कृदन्त | येता येता तिने फळे विकत घेतली. | ये | ता | क्रियाविशेषण |
| | तो पहाटे पाच वाजता उठतो | वाज | ता | क्रियाविशेषण |
| | गाता गळा आहे, थंड पिऊ नकोस. | गा | ता | विशेषण (विकारी) |
| -ताना कृदन्त | कामाला येताना तो डबा आणतो. | ये | ताना | क्रियाविशेषण |
| -ऊ कृदन्त | अमनला खाऊ आवडला. | खा | ऊ | नाम |
| -ऊन कृदन्त | वर्तमानपत्र वाचून झालं. | वाच | ऊन | क्रियाविशेषण |

**२. बसवलेलं नाटक - बसणारे प्रेक्षक**



प्रसिद्ध लेखक वसंत सबनीस पु॰ ल॰ देशपांडे ह्यांची मुलाखत घेत होते. त्यांनी पु॰ लं॰ना विचारले - "तुम्ही प्रत्यक्षात लिहिलेलं नाटक रंगभूमीवर उभं करता. असं असताना आम्ही ते 'बसवलं' असं का म्हणता?"

**पु॰ ल॰**: "त्याचं असं आहे, लिहिलेलं नाटक नीट बसवलं नाही, तर प्रेक्षक उभे राहून चालायला लागतात आणि नीट बसवलं तर नाटक उभं राहून चालतं आणि प्रेक्षक शेवटपर्यंत बसून राहतात. त्यातून मला प्रेक्षकांसाठी नाटक लिहायची खोड आहे. त्यामुळे चालणारं नाटक आणि बसणारे प्रेक्षक असं गणित जमवायचं असेल, तर त्या नाटकाला आधी नीट बसवावं लागतं. बाकी मराठीतलं 'बसणे' हे क्रियापद जरा अवखळच आहे. धंदा चालेनासा झाला, तरी 'धंदा बसला' असं आपण म्हणतो, आणि चालला तर जमदेखील 'बसतोच'. धंदा जमला तर धंदा 'बसला' असं म्हणत नाही. पण प्रेम जमलं तर प्रेम 'बसलं' असं म्हणतो, आणि नाटक चाललं की चांगलं 'बसलं' आहे म्हणतो आणि नाही चाललं तरी नाटक 'बसलं' म्हणतो. मला वाटतं 'बसण्या'विषयी इतकं 'बस्' झालं!"

**क. वरील उताऱ्यातील क्रियापदांपासून तयार झालेल्या विशेषणांची खालीलप्रमाणे यादी तयार करू या.**

उदा॰ लिहिलेले नाटक, ...

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

- धातू + ता प्रत्यय = वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषण
- धातू + णारा प्रत्यय = भविष्यकालवाचक धातुसाधित विशेषण
- धातू + लेला प्रत्यय = भूतकालवाचक धातुसाधित विशेषण

उदा. उगव + ता = उगवता सूर्य

उदा. खा + णारा = खाणारी

उदा. वाच + लेला = वाचलेले

**पण**

कर (के) + लेला = केलेले काम

टीप :

कधी कधी धातूला केवळ '-ला / -ली / -ले / -ल्या' हे प्रत्यय लावूनही भूतकालवाचक धातुसाधित विशेषण तयार होतो.

उदा. झाक + ली = झाकली मूठ

**ख. उदाहरणांप्रमाणे विशेषणे तयार करू या.**

उदा. झाडे लावणे – माणूस :
झाडे लावणारा माणूस
माणसाने लावलेली झाडे

१. उत्तम गाणी म्हणणे – गायिका
२. गंभीर सिनेमे बनवणे – दिग्दर्शक
३. प्रेमाच्या कविता लिहिणे – कवी
४. सगळे विषय शिकवणे – शिक्षक
५. ऐतिहासिक कादंबरी लिहिणे – लेखक
६. उत्तम अभिनय करणे – अभिनेत्री
७. खूप पुस्तके वाचणे – विद्यार्थिनी
८. वाईट शिव्या देणे – बॉस



## ७ संभाषणकौशल्ये.

**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. वाचता वाचता झोपणे - झोपता झोपता वाचणे, टीव्ही बघता बघता अभ्यास करणे - अभ्यास करता करता टीव्ही पाहणे, बोलता बोलता खाणे, सेल्फी काढता काढता हसणे, लिहिता लिहिता मोठ्याने वाचणे - मोठ्याने वाचता वाचता लिहिणे, नाचत नाचत गाणे, हसत हसत सेल्फी काढणे - गात गात नाचणे - खात खात बोलणे)



पहिला विद्यार्थी : मी वाचता वाचता झोपतो / झोपते.

सर्व विद्यार्थी : खरंच? तू वाचता वाचता झोपतोस / झोपतेस?

दुसरा विद्यार्थी : हो, तो / ती वाचता वाचता झोपतो / झोपते आणि मी झोपता झोपता वाचतो / वाचते.

सर्व विद्यार्थी : काय सांगतोस / सांगतेस? तू झोपता झोपता वाचतोस / वाचतेस?

पहिला विद्यार्थी : हो, तो / ती झोपता झोपता वाचतो / वाचते आणि मी वाचता वाचता झोपतो / झोपते.

सर्व विद्यार्थी : गंमतच आहे! आम्हीपण झोपता झोपता वाचू आणि वाचता वाचता झोपू.



संभाषण

**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. वाचून होणे - लिहून होणे, खाऊन होणे - (तो) अभ्यास करून होणे, (तो) केर काढून होणे - (ती) अंघोळ करून होणे, (तो) व्यायाम करून होणे - (ते) दूध पिऊन होणे)

पहिला विद्यार्थी : माझं वाचून झालं.

सर्व विद्यार्थी : बाप रे! तुझं वाचून झालं?

दुसरा विद्यार्थी : हो, त्याचं / तिचं वाचून झालं आणि माझं लिहून झालं.



सर्व विद्यार्थी : काय सांगतोस / सांगतेस? तुझं लिहून झालं?



पहिला विद्यार्थी : हो, त्याचं / तिचं लिहून झालं आणि माझं वाचून झालं.

सर्व विद्यार्थी : कमाल आहे! आम्ही अजून वाचतोय.

**संभाषण करू या.**

| | |
|---|---|
| कुठलंही काम चांगलं किंवा वाईट नसतं | टांगती तलवार |
| पोटापाण्यासाठी राब राब राबणे | ताव मारणे |
| तयारी असणे | रुची वाटणे |
| कष्टाची तयारी असणे | धरसोड वृत्ती |
| कामासाठी तत्पर असणे | नजरेखालून घालणे |
| चहाड्या करणे | तडा जाणे |
| राग अनावर होणे | मात करणे |
| स्वतःच्या पायावर उभे राहणे | |

चिंटू






### पहिले मराठी पाऊल

### पहिली भारतीय महिला वकील

कॉर्नेलिया सोराबजी (१८६६ -१९५४) ह्यांचा जन्म देवळाली ह्या गावी झाला, तेव्हा मुंबई विद्यापीठाची स्थापना होऊन एक दशकही झाले नव्हते. समाजाच्या एका वेगळ्या स्तरावर आणि वेगळ्या वातावरणात त्या वाढल्या. त्यांच्या आई फ्रान्सिना फोर्ड ह्या एका ब्रिटिश दाम्पत्याच्या दत्तक कन्या होत्या. पुण्यात मुलींसाठी अनेक शाळा सुरू करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. कॉर्नेलियांवर त्यांचा खूप प्रभाव होता. रेव्हरंड सोराबजी करसेटजी हे त्यांचे वडीलही आधुनिक आणि प्रगत विचारांचे होते. अशा आईवडिलांच्या संस्कारात कॉर्नेलिया वाढल्या.
त्यांचे कर्तृत्व -



- पुण्यातून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या त्या पहिल्या महिला होत्या आणि डेक्कन कॉलेजात बी॰ए॰ च्या वर्गातील तीनशे मुलांमधील त्या एकमेव विद्यार्थिनी होत्या.
- मुंबई विद्यापीठाच्या त्या पहिल्या महिला पदवीधर होत्या.
- ब्रिटनला जाऊन तेथील विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या.
- ऑक्स्फर्ड विश्वविद्यालयात प्रवेश मिळविणाऱ्या त्या जगातील पहिल्या महिला होत्या.
- कायद्याचे शिक्षण पूर्ण केलेल्या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या.
- भारतात आणि ब्रिटनमध्ये वकिलीचा व्यवसाय करणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या.

उच्च शिक्षण पूर्ण करून त्या १८९४ साली भारतात परतल्या; परंतु स्त्रियांना वकिलीची सनद मिळू शकत नव्हती. तसा कायदा पारित व्हायला १९२३ साल उजाडावे लागले. तोपर्यंत कॉर्नेलिया अर्थातच स्वस्थ बसल्या नाहीत. स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांसाठी आणि विधवांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून त्या काम करत राहिल्या. हिंदू बालविवाह प्रथा थांबवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अनेकदा त्यांनी पंडिता रमाबाईंबरोबरही काम केले. प्रामुख्याने गुजरात, बिहार, बंगाल, ओदिशा ही मुख्य कार्यक्षेत्रे होती. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यात त्यांच्या दोन आत्मचरित्रांचा समावेश आहे.

भारताची सेवा केल्याबद्दल त्यांना ‘कैसर-ए -हिंद’ सुवर्णपदक देऊन गौरवले गेले. लंडनमधील ‘लिंकनस् इन्’ मध्ये त्यांचा अर्धपुतळा आपल्याला पाहायला मिळतो. २०१७ साली त्यांची एकशे एक्कावन्नावी जयंती गूगल डूडलने साजरी केली.

१९२९ साली निवृत्त झाल्यावर कोर्नेलिया सोराबजी लंडनमध्ये स्थायिक झाल्या आणि तिथेच १९५४ मध्ये त्यांचे निधन झाले.

## दृष्टिक्षेप

### नामे

| | | |
|---|---|---|
| तो मजूर, ते - | ती दगदग, त्या दगदगी | ते बलस्थान, ती बलस्थाने / नं |
| तो रोजंदार, ते - | ती नोकरी, त्या नोकऱ्या | ते संबोधन, ती संबोधने / नं |
| तो कामगार, ते - | ती अर्हता, त्या - | ते धोरण, ती धोरणे / णं |
| तो उद्योगधंदा, ते उद्योगधंदे | ती पात्रता, त्या - | ते योगदान, ती योगदाने / नं |
| तो व्यावसायिक, ते - | ती कार्यप्रणाली | ते टिपण, ती टिपणे / णं |
| तो अर्ज, ते - | ती कार्यसंस्कृती, त्या - | ते प्रयोजन, ती प्रयोजने / नं |
| तो रेझ्युमे, ते - | ती कार्यपद्धती, त्या - | ते विचारमंथन, ती विचारमंथने / नं |
| तो व्यवस्थापक, ते - | ती शाश्वती | ते दुर्लक्ष |
| तो भूलतज्ज्ञ, ते - | ती आचारसंहिता, त्या - | ते कार्यक्षेत्र, ती कार्यक्षेत्रे / त्रं |
| तो आयुर्विमा, ते आयुर्विमे | ती मजुरी | ते निरीक्षण, ती निरीक्षणे / णं |
| तो अभ्यासक्रम, ते - | ती भूल, त्या भुली | ते गिऱ्हाईक, ती गिऱ्हाइके / कं |
| तो कार्यानुभव, ते - | ती तुलना, त्या - | ते स्थलांतर, ती स्थलांतरे / रं |
| तो खजिनदार, ते - | ती सत्ता, त्या - | ते परिवर्तन, ती परिवर्तने / नं |
| तो कानमंत्र, ते - | ती समस्या, त्या - | ते परिचयपत्र, ती परिचयपत्रे / त्रं |
| तो मत्सर | ती निविदा, त्या - | ते भूलशास्त्र |
| तो सोक्षमोक्ष | | ते वैद्यकशास्त्र |
| तो पगार, ते - | | |
| तो मालवाहक, ते - | | |
| तो ग्राहक, ते - | | |
| तो हमाल, ते - | | |
| तो कालावधी, ते - | | |
| ती आस्थापना, त्या - | | |
| तो राजीनामा, ते राजीनामे | | |
| तो विचारमंच, ते - | | |
| तो उल्लेख, ते - | | |
| तो उमेदवार, ते - | | |

### विशेषणे

| | | | |
|---|---|---|---|
| तत्पर | अविरत | खरकटे | बहुराष्ट्रीय |
| पदव्युत्तर | संघटित | अवखळ | सर्जनशील |
| कार्यक्षम | तुसडा | आव्हानात्मक | अपरिहार्य |

### क्रियाविशेषणे

| | | |
|---|---|---|
| अविरत | उद्देशून | तडकाफडकी |

### नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. विसर पडणे | व्यासपीठावर गेल्यावर प्राध्यापक कलमकरांना त्यांच्या मुद्द्यांचा विसर पडला. |
| २. धडपड करणे | छोटा साहिल आता उभा राहण्यासाठी धडपड करतो आहे.. |
| ३. प्रश्न सुटणे | घरकाम आम्हीच करायचे ठरवल्यामुळे सगळे प्रश्न सुटले. |
| ४. भान राखणे / ठेवणे | मोठ्या आवाजाने इतरांना त्रास होतो ह्याचे भान राखले पाहिजे. |
| ५. रुची वाटणे | ज्या कामात रुची वाटते त्या कामाचा कधी कंटाळा येत नाही. |
| ६. लक्ष उडणे | आपली मुलगी घरी एकटी आहे हे कळल्यावर सुमित्राचे कामातले लक्ष उडाले. |
| ७. टिपणे काढणे | मुलाखतीच्या विषयाची मी टिपणे काढेन. |
| ८. टीका करणे | त्या सिनेमावर लोकांनी खूप टीका केली. |
| ९. ताव मारणे | गरमागरम जिलब्यांवर ताव मारल्यामुळे नंतर झोप आली. |
| १०. अंदाज लावणे | मी अंदाज लावला, की रोहन घरात नाही म्हणजे मित्राकडेच गेला असणार. |
| ११. धंदा बसणे | मंदीमुळे मालाचा खप कमी होऊन मगनलालचा धंदा बसला. |
| १२. नाटक चालणे | चालू घडामोडींसंबंधी विषय आणि उत्तम कलाकार ह्यांमुळे नाटक चांगले चालले. |

इतर शब्द व क्रियापद जोड्या    **Other words and Verb combinations**

| इतर शब्द + क्रियापद<br>**Other words + Verb** | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. ताटकळत असणे / राहणे / बसणे | रिक्षाची वाट बघत ताटकळत राहण्यापेक्षा मला चालत जायला आवडतं. |
| २. आत्मसात करणे | नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे ज्येष्ठ नागरिकांना कठीण जाते. |
| ३. धोपटून काढणे | पोलिसांच्या ताब्यात देण्याआधी लोकांनी चोराला धोपटून काढले. |
| ४. तत्पर असणे | कालिंदी नर्स कामात अगदी तत्पर आहेत. |
| ५. चेहरा पाडून बसणे | आज आलोकचा गृहपाठ झाला नव्हता त्यामुळे तो वर्गात चेहरा पाडून बसला होता. |
| ६. नजरेखालून घालणे | “साहेब, सगळा तपशील लिहिला आहे, एकदा नजरेखालून घाला.” |

आता मला हे येतं...

**मजूर, कामगार, रोजंदार ह्यांच्याविषयी वाचणे, बोलणे आणि लिहिणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**रेझ्युमे (परिचयपत्र) आणि अर्ज लिहिणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्यांविषयी बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शब्दयोगी पदे : कडून, वरून, खालून, मधून**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**अपूर्ण व पूर्ण वर्तमानकाळ, अपूर्ण व पूर्ण भूतकाळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**धातुसाधिते किंवा कृदन्ते**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ३

# राहणीमान







## चला, शिकू या...

- माणसांचे राहणीमान, त्यांची जीवनशैली
- स्मार्ट सिटी, शहरांचा अहवाल
- शहर आणि गाव, दोन्हींमध्ये होणारे बदल
- रीती भूतकाळ
- स्थलांतर व परकेपणा
- शब्दयोगी पदे : आधी, नंतर, वेळी, व्यतिरिक्त, खेरीज, शिवाय, वाचून

## १ समृद्ध जीवन

**१. मागील पानावरच्या चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

- माणसाच्या राहणीमानातली कोणती वैशिष्ट्ये चित्रांमध्ये दिसत आहेत?
- माणसाच्या मूलभूत आणि इतर गरजा कोणत्या?
- जीवनात माणसाला काय हवे असते?
- माणसाच्या सुखाच्या, शांतीच्या कल्पना काय असतात?

**२. हिमालयातील गढवाल भागातल्या राहणीमानाची गंमत...**



चक्राताच्या मुक्कामात एका सकाळी फेरफटका मारायला मी बाहेर पडले. ओढ्याच्या काठानं चालत असताना पाण्याच्या प्रवाहावर चालणारी पिठाची चक्की दिसली. एक म्हातारा चक्कीच्या झोपडीबाहेर उन्हात निवांत बसला होता. गेल्या गेल्या त्यानं मला एक मूठभर बारीक धान्य खायला दिलं. मस्त खुसखुशीत दाणे खायला मजा आली आणि संवादाला सुरुवात झाली. तो म्हातारा एकटाच राहत होता. एकटेच का राहता असं विचारल्यावर म्हणाला, की बायकांशी नाही पटत. त्याला दोन बायका होत्या. एक वरच्या बाजूला उंच डोंगरावरच्या घरात आणि दुसरी छानीमध्ये म्हणजे खाली नदीकाठच्या घरात. दोन्हीकडे वेगळी शेती. दोघी बायका आपापली शेती सांभाळतात. हा म्हातारा इथं, ओढ्याकाठी एकटाच. तो चक्कीवर धान्यं दळून देतो. त्याचाही जमिनीचा लहानसा तुकडा आहे. मला खायला दिलेलं 'बनजिरा' हे धान्य तो पिकवतो. तिघंही जे काही पिकवतात त्यातला वाटा ते एकमेकांना पोचवतात. काय छान आयुष्य आहे ना! निसर्गाशी जुळवून घेतलेलं आणि त्याच वेळी स्वत:ला आवडेल तसं. पूर्ण स्वावलंबी आणि खूप वेगळ्या गोष्टींनी समृद्ध!

**क. चक्राताच्या ह्या म्हाताऱ्याच्या राहणीमानाची वैशिष्ट्ये कोणती ते सांगू या.**

उदा. म्हातारा चक्कीच्या झोपडीबाहेर निवांत बसतो...



**ख. अशा तऱ्हेची तुमच्यापेक्षा वेगळी जीवनशैली किंवा वेगळे राहणीमान तुम्ही अनुभवले आहे का? त्याबद्दल चर्चा करू या.**

**३. तुमच्या मते समृद्ध जीवनासाठी कशाची गरज असते? त्यासंदर्भात खाली दिलेल्या शब्दांमधून आपल्याला महत्त्वाचे वाटणारे पाच शब्द निवडू या आणि त्यांच्या आधारे मत मांडू या.**

मित्र चांगली नोकरी ऐहिक सुख आत्मिक सुखशांती आरोग्य विरंगुळा
संस्कृती स्वावलंबन आधुनिकता प्रवास साहित्य निसर्ग सुखसुविधा प्रेम
पुरोगामी विचारसरणी ध्यान धर्मपालन सुखसोयी परंपरा उच्च विचारसरणी
साधी राहणी पैसा टीव्ही आहार पोशाख चांगले संस्कार लोकशाही स्वच्छता
मनोरंजन स्मार्टफोन वाहन कुटुंब मायक्रोवेव्ह फ्लॅट साक्षरता संगणक
माणसांमधील परस्परसंबंध सहिष्णुता आंतरजाल पब/कॅफे/रेस्टॉरंट कलागुण
मानवी हक्क जपणारी न्यायव्यवस्था कलासंस्कृती

माझ्या मते आयुष्यात स्वावलंबन खूप महत्त्वाचं असतं...
मला वाटतं, सुखसुविधा माणसाचं आयुष्य सोपं करतात...
मी स्मार्टफोनशिवाय नाही जगू शकत...
प्रेमामुळे जगण्याची उमेद वाढते...

**४. आंब्याची सावली...**

**पुढील गोष्ट ऐकून त्याखालील प्रश्न सोडवू या.**



**क. पुढीलपैकी योग्य तो पर्याय निवडू या.**

१. क. तो माणूस शेतात पहुडला होता.
   ख. तो माणूस झाडाखाली पहुडला होता.

२. क. गाडीवाल्याने त्या माणसाला काम करण्याचा सल्ला दिला.
   ख. गाडीवाल्याने त्या माणसाला खाण्यापिण्याचा सल्ला दिला.

३. क. गावाकडचा माणूस उपाशी होता.
   ख. गावाकडचा माणूस उपाशी नव्हता.

४. क. गावाकडच्या माणसाला खूप उकडत होतं.
   ख. गाडीवाल्या माणसाला खूप उकडत होतं.



५. क. गावाकडचा माणूस समाधानी वाटतो.
   ख. गाडीवाला माणूस समाधानी वाटतो.

**ख. योग्य तो पर्याय निवडून रिकाम्या जागा भरू या.**



१. आंब्याच्या सावलीत तो छान ---------------- होता.

क. पडला ख. पहुडला

२. गाडीतून सुटाबुटातला एक शहरी माणूस ----------------.

क. उतरला ख. उत्तरला

३. मस्त खातोय की ---------------- भाकर.

क. पिठलं ख. झुणका

४. गाडीवाला काही ---------------- सोडायला तयार नव्हता.

क. इच्छा ख. पिच्छा

५. पैसे ---------------- तर तू आरामात राहशील.

क. असतील ख. नसतील

## २ शहर आणि गाव



**१. तुम्हाला गावात राहणे आवडते की शहरात? की दोन्हीकडे? तुमच्या आवडीमागील कारणे तुम्हाला खाली दिलेल्या विधानांमध्ये सापडू शकतील. आपल्या आवडीनुसार त्यांची निवड करून त्यांचे क्रमांक रकान्यामध्ये भरू या.**

क. मला प्रत्येक ऋतूचं येणं आणि जाणं, त्याच्याबरोबर येणारे सण-उत्सव हे सारं जगायचं असतं.

ख. उच्च शिक्षणाच्या संधी जिथे मिळतात तिथे राहायला आवडतं.

ग. अनोळखी गर्दीची मला भीती वाटते.

घ. जगण्याचा वेग मला हवाहवासा वाटतो.

च. निरनिराळ्या आवाजांची सोबत असली की मला सुरक्षित वाटतं, कारण मला शांततेची भीतीच वाटते.



छ. मला निरनिराळ्या देशांतील विविध खाद्यपदार्थ खूप आवडतात.

ज. कोणीही माझ्या खाजगी आयुष्यात लुडबूड केलेली मला चालत नाही.

झ. उंच इमारती दिसल्या की माझा जीव घाबरतो.

ट. कुठंही गेलं तरी ओळखीची माणसं भेटतात; आपल्यावर ती सगळी लक्ष ठेवतात असं वाटतं आणि त्याचा मला त्रास होतो.



ठ. शांत आणि निवांत आयुष्य जगायला मला आवडतं.

ड. मला नदीमध्ये पोहायला आवडतं.

ढ. सुट्टीचा दिवस मॉलमध्ये घालवायला मला आवडतं.

ण. मला मातीचा, शेणाने सारवलेल्या जमिनीचा सुगंध आणि पायांना होणारा स्पर्श आवडतो. गरिबी, झोपडपट्ट्या, वस्त्या नको वाटतात.

त. शास्त्रीय संगीत महोत्सव, जागतिक चित्रपट किंवा नाटकांचा महोत्सव, चित्रप्रदर्शनं अशासारखे सांस्कृतिक कार्यक्रम ही माझी गरज आहे. तेच माझे सण असतात.

थ. अंगणात झोपाळा आणि घरामागे गोठा असलेल्या बैठ्या कौलारू घरात राहण्याची माझी खूप इच्छा आहे.

द. मला वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या माणसांबरोबर वैचारिक देवाणघेवाण करण्याची आवड आहे.



ध. मला निरनिराळ्या प्रकारचे डिझाईनर कपडे आवडतात.

न. आपल्या अवतीभवती साधी, मातीशी आणि माणसांशी जिव्हाळ्याचं नातं जोडणारी माणसं असावीत असं मला फार वाटतं.

प. घरात माणसांची दाटी असेल तर माझा जीव गुदमरतो.

| मला गावात राहायला आवडेल कारण... | मला शहरात राहायला आवडेल कारण... | मला दोन्हीकडे राहायला आवडेल कारण... |
|---|---|---|
| उदा॰ क. मला प्रत्येक ऋतूचं येणं आणि जाणं, त्याच्याबरोबर येणारे सण-उत्सव हे सारं जगायचं असतं... | | |

**२. गावात राहायला आवडणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक गट करू या. शहरात राहायला आवडणाऱ्या विद्यार्थ्यांचा दुसरा गट करू या. दोन्ही गट आपापल्या मुद्द्यांचे समर्थन करतील.**

### ३. स्मार्ट सिटी, स्मार्ट आयुष्य



सध्या भारतात 'स्मार्ट सिटी' हा परवलीचा शब्द झाला आहे. भारत सरकारने शहरांच्या विकासासाठी एक प्रकल्प सुरू केला आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी लोक अधिक शिकलेले, बहुभाषिक व बहुसांस्कृतिक, सामाजिक दृष्टीने अधिक पुरोगामी, स्वतंत्र, सजग असतात. शहरातील हवा लोकांना 'स्मार्ट' करते, असे म्हणतात. आधुनिक शहरातील आगगाडी, बस, ट्राम, मोटारी, मेट्रो वगैरे वाहतुकीची साधने, तसेच नळाचे पाणी, वीज, टेलिफोन व संगणक ह्यामुळे लोक 'स्मार्ट' होतात. त्यांची भाषाही समृद्ध होते, वर्तनही सुधारते. त्यांना वेळ बहुमूल्य वाटतो आणि ते कामधंदा, कला-संस्कृती, उच्च शिक्षण ह्या गोष्टींकडे अधिक लक्ष देतात. स्त्रियांना खेड्यांच्या तुलनेने शहरांत अधिक चांगली वागणूक मिळते. शहरीकरणाचे अभ्यासक तर असे मानतात, की मानवी जीवनात शहरीकरणामुळे उत्क्रांती होते. शहरी माणूस अधिक सहिष्णू होतो, अधिक समजूतदार होतो.

'स्मार्ट शहर' ह्या संकल्पनेनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक महत्त्वाच्या सुविधा पुरवल्या जातात. संगणक वापरून रेल्वेच्या आरक्षणाची सुविधा हे त्यातले एक महत्त्वाचे उदाहरण. आज आपल्या देशातल्या शहरांतही बसचे आरक्षण संगणकावरून करता येते. आजकाल पैसे काढण्यासाठी बँकेत जावे लागत नाही आणि खरेदीसाठी पैसे न नेता क्रेडिट किंवा डेबिट कार्ड वापरता येते. सर्व नागरिकांना व्यवहारात आवश्यक असणाऱ्या अशा अनेक सुविधा स्मार्ट झाल्या आहेत. अनेक शहरांतील महापालिकांनी रस्ते सफाई-यंत्र वापरायला सुरुवात केली आहे. स्मार्ट शहरांच्या नियोजनात प्रत्येक घराची नळजोडणी, प्रत्येक कचराकुंडी, कचरा वाहून नेणारा ट्रक 'स्मार्ट' करण्याच्या तंत्राचा समावेश आहे. प्रत्येक घराच्या पाण्याच्या मीटरवर, गटारांच्या झाकणांवर 'डोळे' म्हणजेच इलेक्ट्रॉनिक सेन्सर बसवले जातील. प्रत्येक रस्त्यावर कॅमेरे बसवले जातील. त्यांनी टिपलेली दृश्ये बघण्यासाठी नियंत्रण-कक्षात स्क्रीन आणि विशेष संगणकप्रणालीही असेल. अपघात करणारे, कायदे मोडणारे वाहन आणि त्या वाहनाचा चालक कोण आहे, हे ह्या यंत्रणेमुळे लगेच समजेल आणि त्यांना ताबडतोब दंडही आकारता येईल.



'स्मार्ट सेवा कार्ड' ही विकसित शहरांतील मोठीच सोय असते. बस, मेट्रो, ट्रेन, सार्वजनिक स्वच्छतागृहे अशा कोणत्याही सेवेसाठी एकच कार्ड वापरता येते. स्मार्ट शहरांच्या संकल्पनेत अशा असंख्य नावीन्यपूर्ण कल्पना समाविष्ट आहेत आणि त्यांचा झपाट्याने विस्तार होत आहे. रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती, शहरातील गटारे, तिथली सांडपाणी व्यवस्था अशा नागरिकांच्या आरोग्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या सेवा 'स्मार्ट' होत आहेत.

**क. खाली दिलेली विधाने वरील लेखात कदाचित वेगळ्या शब्दांत आली असतील. ती शोधू या आणि अधोरेखित करू या.**

१. शहरांचा विकास कसा व्हावा ह्या प्रश्नाचे 'स्मार्ट सिटी ही कल्पना' हेच एक उत्तर आहे.

२. वीज, टेलिफोन व संगणक ह्यांचा लोक 'स्मार्ट' होण्याशी काही संबंध नसतो.




३. अनेक सेवा मिळवण्यासाठी एकच 'स्मार्ट सेवा कार्ड' उपयोगात आणता येते.

४. वाहतूक नियमांच्या अंमलबजावणीसाठी संगणकाच्या मदतीने एक खास यंत्रणा उभी केलेली असते.

**ख. वरील लेखात आलेल्या काही शब्दांच्या जोड्या त्यांच्या योग्य अर्थांशी लावू या.**

| | |
|---|---|
| १. 'स्मार्ट सिटी' | क. तंत्रज्ञानाचा योग्य वापर |
| २. आधुनिकीकरण | ख. अनेक भाषा आणि संस्कृतींची देवाण-घेवाण करणारे लोक |
| ३. बहुसांस्कृतिक लोक | ग. शहरी जीवनशैली |
| ४. शहरातील हवा | घ. शहराचे कार्यक्षम व्यवस्थापन |

**ग. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहू या.**



१. 'स्मार्ट सिटी' म्हणजे काय?

२. 'स्मार्ट सिटी'च्या आखणीतील महत्त्वाची तत्त्वे कोणती?

**घ. वरील लेखात दिलेली काही विधाने आपल्याला पटतात की पटत नाहीत ते सविस्तर समजावून सांगू या.**

१. सध्या भारतात 'स्मार्ट सिटी' हा परवलीचा शब्द झाला आहे.

२. शहरातील हवा लोकांना 'स्मार्ट' करते.

३. मानवी जीवनात शहरीकरणामुळे उत्क्रांती होते. शहरी माणूस अधिक सहिष्णू होतो, अधिक समजूतदार होतो.

४. स्त्रियांना खेड्यांच्या तुलनेने शहरात अधिक चांगली वागणूक मिळते.

## करा आणि शिका

**च. विद्यार्थ्यांचे दोन गट करू या. आंतरजालाच्या मदतीने पहिला गट 'स्मार्ट सिटी' ह्या संकल्पनेचे फायदे जमा करेल आणि दुसरा गट तोटे जमा करेल. त्या मुद्द्यांच्या आधारे चर्चा करू या.**



## ३ संस्कृती : ‘ती’ आणि ‘ही’



अगदी थोडी वर्षे मागे गेलो तर आपल्याला आठवेल, मुंबईत किंवा उपनगरांमध्ये अनेक मध्यमवर्गीय कुटुंबे चाळींमध्ये राहत असत. चाळीची अगदी साधीसोपी व्याख्या करायची असेल, तर ‘जिथे छोट्या छोट्या खोल्यांमध्ये अनेक कुटुंबे अगदी मिळून मिसळून एकत्र राहतात, ती लांबलचक इमारत म्हणजे चाळ...’ अशी करता येईल. त्या अनेक कुटुंबांचे मिळून एकच मोठे कुटुंब व्हायचे. कोणाचेही सुख-दु:ख, अडचणी, अगदी पाहुणेसुद्धा आपोआप अख्ख्या चाळीचे होऊन जायचे. अधूनमधून भांडणे, वाद, उखाळ्यापाखाळ्या काढणे हेसुद्धा चालायचे; पण त्याशिवाय एकत्र राहण्यात काय मजा? आज भांडणारे उद्या वेळ आली तर एकमेकांच्या मदतीलाही धावायचे. चाळीत राहण्याची मजा काही औरच होती. इथे जो एकोपा पाहायला मिळत असे, माणसांमधल्या आपुलकीच्या नात्याची जी ऊब अनुभवाला येत असे, ती फ्लॅट संस्कृतीत कधीही पाहायला मिळत नाही.

सध्या मोठमोठे बिल्डर चाळी तोडून त्या जागी मोठमोठे मॉल किंवा उंचच उंच आलिशान टॉवर बांधताना दिसत आहेत. मुंबईत आता हळूहळू ‘चाळ संस्कृती’ची जागा ‘फ्लॅट संस्कृती’ घेत आहे. परिणामी मुंबईतून हळूहळू चाळीच नामशेष होतील. चालायचेच! परिवर्तन हा जगाचा स्थायिभावच आहे.

**१. वरील उताऱ्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

क. मुंबईतील चाळींमध्ये समाजातील कोणत्या वर्गातील लोक राहात असत?

ख. अशा चाळींमधील रहिवाशांचे परस्परांशी नाते कशा प्रकारचे असायचे?

ग. चाळींमध्ये वेगवेगळ्या स्वभावांची कुटुंबे एकत्र राहताना मजा कशाकशामुळे येत असे?

### रीती भूतकाळ **Habitual Past Tense**

वरील वाक्यांतील ‘राहत असत’, ‘चालायचे’, ‘धावायचे’, ‘मिळत असे’ व ‘येत असे’ ही क्रियापदांची रूपे ‘राहण्याची’, ‘चालण्याची’, ‘धावण्याची’, ‘मिळण्याची’ व ‘येण्याची’ रीत किंवा वहिवाट दाखवतात.

म्हणजेच, एखादी क्रिया भूतकाळात सतत, नियमितपणे, नेहमी करण्याची कर्त्याची रीत असेल, तर ते सूचित करणारा काळ **रीती भूतकाळ** असतो.

**'खाणे' ह्या क्रियापदाची रीती काळातील रूपे पुढीलप्रमाणे होतील :**


* मधू लाडू खात असतो. (रीती वर्तमानकाळ)
* मधू लाडू खात असे / खायचा / खाई. (रीती भूतकाळ)

**आता 'राहणे' ह्या क्रियापदाची रीती भूतकाळात सर्वनामांनुसार बदलणारी रूपे पाहू या.**

| | | | |
|---|---|---|---|
| **मी** | राहत असे | राहायचो / राहायचे | राही, जाई, बसे... |
| **आम्ही / आपण** | राहत असू | राहायचो | राहू, जाऊ, बसू... |
| **तू** | राहत असस (पु- आणि स्त्री-) / असायचास (पु-) / असायचीस (स्त्री-) | राहायचास / राहायचीस | -, जास, बसस... |
| **तुम्ही / आपण** | राहत असा / असायचा(त) / असायच्या(त) | राहायचा(त) / राहायच्या(त) | राहा, जा, बसा... |
| **तो** | राहत असे | राहायचा | राही, जाई, बसे... |
| **ती** | | राहायची | |
| **ते** | | राहायचे / राहायचं | |
| **ते (अ॰व॰)** | राहत असत | राहायचे | राहत, जात, बसत... |
| **त्या (अ॰व॰)** | | राहायच्या | |
| **ती (अ॰व॰)** | | राहायची | |

**टीप :**

'राहायचो' हे रूप जास्त वापरात आहे.
"तू असस" आणि 'तुम्ही असा' ही रूपे आजकाल फारशी वापरली जात नाहीत.





| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ (मी ) लहानपणी मी सुट्टीत गावी जात असे. लहानपणी मी सुट्टीत गावी जायचो / जायचे. | लहानपणी मी सुट्टीत गावी जात असे. लहानपणी मी सुट्टीत गावी जायचो / जायचे. |
| **आम्ही / आपण** | लहानपणी आम्ही / आपण सुट्टीत गावी जात असू.<br>लहानपणी आम्ही / आपण सुट्टीत गावी जायचो. |
| **तू** | लहानपणी तू सुट्टीत गावी जात असस.<br>लहानपणी तू सुट्टीत गावी जायचास / जायचीस. |
| **तुम्ही / आपण** | लहानपणी तुम्ही / आपण सुट्टीत गावी जात असायचा(त) / असायच्या(त).<br>लहानपणी तुम्ही / आपण सुट्टीत गावी जायचा(त) / जायच्या(त). |
| **तो** | लहानपणी तो सुट्टीत गावी जात असे.<br>लहानपणी तो सुट्टीत गावी जायचा. / जाई. |
| **ती** | लहानपणी ती सुट्टीत गावी जात असे.<br>लहानपणी ती सुट्टीत गावी जायची. / जाई. |
| **ते** | लहानपणी ते सुट्टीत गावी जात असे.<br>लहानपणी ते सुट्टीत गावी जायचे / जायचं. / जाई. |
| **ते (अ॰व॰)** | लहानपणी ते सुट्टीत गावी जात असत.<br>लहानपणी ते सुट्टीत गावी जायचे. / जात. |
| **त्या (अ॰व॰)** | लहानपणी त्या सुट्टीत गावी जात असत.<br>लहानपणी त्या सुट्टीत गावी जायच्या. / जात. |
| **ती (अ॰व॰)** | लहानपणी ती सुट्टीत गावी जात असत.<br>लहानपणी ती सुट्टीत गावी जायची. / जात. |

क्रियापद : राहणे : रीती भूतकाळ (नकारार्थी रूपे) **Habitual Past Tense (Negation)**

| | | |
|---|---|---|
| **मी** | राहत नसे | राहायचो नाही / राहायचे नाही |
| **आम्ही / आपण** | राहत नसू | राहायचो नाही |
| **तू** | राहत नसस<br>राहत नसायचास / नसायचीस | राहायचा नाहीस / राहायची नाहीस |
| **तुम्ही / आपण** | राहत नसायचा(त) /<br>राहत नसायच्या(त) | राहायचा नाही(त) / राहायच्या नाही(त) |
| **तो** | राहत नसे | राहायचा नाही |
| **ती** | | राहायची नाही |
| **ते** | | राहायचे / राहायचं नाही |
| **ते** | राहत नसत | राहायचे नाही(त) |
| **त्या** | | राहायच्या नाही(त) |
| **ती** | | राहायची नाही(त) |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. (लहानपणी – मी – सुट्टीत – कुठेही न जाणे) लहानपणी मी सुट्टीत कुठेही जात नसे. लहानपणी मी सुट्टीत कुठेही जायचो / जायचे नाही. | लहानपणी मी सुट्टीत कुठेही जात नसे. लहानपणी मी सुट्टीत कुठेही जायचो / जायचे नाही. |
| **आम्ही / आपण** | लहानपणी आम्ही / आपण सुट्टीत कुठेही जात नसू. लहानपणी आम्ही / आपण सुट्टीत कुठेही जायचो नाही. |
| **तू** | लहानपणी तू सुट्टीत कुठेही जात नसस. लहानपणी तू सुट्टीत कुठेही जायचा / जायची नाहीस. |
| **तुम्ही / आपण** | लहानपणी तुम्ही / आपण सुट्टीत कुठेही जात नसायचा(त) / नसायच्या(त).<br>लहानपणी तुम्ही / आपण सुट्टीत कुठेही जायचा / जायच्या नाही(त). |
| **तो** | लहानपणी तो सुट्टीत कुठेही जात नसे.<br>लहानपणी तो सुट्टीत कुठेही जायचा नाही. |
| **ती** | लहानपणी ती सुट्टीत कुठेही जात नसे.<br>लहानपणी ती सुट्टीत कुठेही जायची नाही. |
| **ते** | लहानपणी ते सुट्टीत कुठेही जात नसे.<br>लहानपणी ते सुट्टीत कुठेही जायचे / जायचं नाही. |
| **ते (अ.व.)** | लहानपणी ते सुट्टीत कुठेही जात नसत.<br>लहानपणी ते सुट्टीत कुठेही जायचे नाही(त). |

व्याकरण

सराव

२. आता रीती भूतकाळ वापरून रिकाम्या जागा भरू या आणि दामूअण्णांचे स्वगत पूर्ण करू या.



मुंबईच्या चाळी तसे एके काळचे पुण्याचे वाडे. तऱ्हेतऱ्हेचे पण जुने वाडे. काही थोडे जुन्या वैभवाच्या खुणा अंगाखांद्यावर वागवणारे, बाकीचे जुन्यापेक्षाही जुनाट झालेले. पुण्यात काही चाळीही होत्या. त्या वाड्यांपेक्षा जरा तरुण (वाटणे) वाटत असत / वाटायच्या. जुन्या पुण्यातल्या वाड्यांमध्ये राहणाऱ्या आमच्यासारख्यांसाठी 'चाळ' म्हणजे शिष्ट लोकांची वस्ती होती. चाळकरीही आमच्याकडे नाक वर करूनच (क) (बघणे) ------------- ; पण दोन्हींच्या अवतारात फारसा फरक (ख) (नसणे) -------------. चाळी थोड्या कमी अंधाऱ्या (ग) (असणे) -------------, तर वाडे आतून ठार अंधारे (घ) (असणे) -------------. पण बाहेर उन्हाळा कितीही पेटलेला असला, तरी वाड्यात शिरले की फ्रीजमध्ये शिरल्यासारखे (च) (वाटणे) -------------. वाडे उभे असेपर्यंत आम्हाला पंखा माहीतच नव्हता.

वाड्यात आणि चाळीतही एका कुटुंबासाठी एक किंवा दोन लहान खोल्या (असणे) असत. एक बाहेरची खोली आणि एक स्वयंपाकघर. स्वयंपाकघराच्या एका कोपऱ्यात नळ (छ) (असणे) -------------. वरच्या मजल्याचे नळ घरांची फक्त शोभा (ज) (वाढवणे) -------------, कारण पाणी वर कधी चढतच (झ) (नसणे) -------------. तळमजल्यावरच्या सार्वजनिक नळाचे पाणी कळश्या भरून आणावे (ट) (लागणे) -------------. म्हणून थोडे जरी पाणी आम्ही वाया घालवले तरी आईचे रट्टे खावे (ठ) (लागणे) -------------.

चाळींच्या फरश्या बसवलेल्या जमिनी विरुद्ध आमच्या कोबा घातलेल्या जमिनी, असाही एक अस्मितेचा मुद्दा होता. वाड्यातल्या वरच्या घरांमध्ये आम्ही धुडगूस घातला, की खालच्या घरांमध्ये छतांतून माती (ड) (पडणे) -------------. मग आईचा अन् खालच्या शेजाऱ्यांचा, असा दुहेरी मार मिळायचा. त्यात 'आमची मुलं-तुमची मुलं' असा भेदभाव (ढ) (नसणे) -------------. सर्व मोठी माणसे मिळून हाताला लागेल त्या मुलाला (ण) (बदडणे) ----------.

पुण्याचे वाडे किंवा चाळी मुंबईसारख्या बहुरंगी, बहुभाषी नसल्या, आणि आज ज्याला 'मुंबईचे स्पिरिट' किंवा एकोपा वगैरे म्हणतात, ते पुणेकरांच्या बाबतीत डोळ्यांत भरत नसले, तरी ते असते; फक्त त्याचे वळण पुणेरी असते इतकेच.



३. विद्यार्थ्यांचे गट करू या आणि चाळीतील व वाड्यातील आयुष्याची तुलना करून चर्चा करू या.

| | वाडा | चाळ |
|---|---|---|
| लोकांचा स्वभाव | | |
| इमारतीची रचना | | |

४. उताऱ्यातील ह्या वाक्यांचा अर्थ तुमच्या मते काय आहे?

क. जुन्या पुण्यातल्या वाड्यांमध्ये राहणाऱ्या आमच्यासारख्यांसाठी 'चाळ' म्हणजे शिष्ट लोकांची वस्ती होती.

ख. वाडे उभे असेपर्यंत आम्हाला पंखा माहीतच नव्हता.

## ४ स्थलांतर

१. चित्रवर्णन करू या.

३


२


१


माणसाला स्थलांतर करण्याची गरज का वाटली असेल हे समजून घेणे फारसे अवघड नाही. अन्नाच्या शोधात तो नेहमीच भटकत होता. पुढे तो शेती करू लागला आणि एका जागी वस्ती करून राहू लागला. तरीदेखील वेळोवेळी त्याला स्थलांतर करावेच लागत होते. नैसर्गिक संकटांमुळे दुसरीकडे आसरा शोधण्यासाठी; माणसानेच निर्माण केलेल्या युद्धासारख्या संकटातून जीव वाचवण्यासाठी; जगण्याच्या अधिक चांगल्या संधी शोधण्यासाठी त्याला आपले वस्तीचे ठिकाण सोडून जावेच लागत होते. आजही ह्याच कारणांकरता माणसे स्थलांतर करत असतात; कधी स्वतःच्या इच्छेने तर कधी नाइलाजामुळे. एकदा असे स्थलांतर केल्यानंतर आपल्या मूळ ठिकाणी परत जाण्याची संधी सर्वांनाच मिळते असे नाही. तिथल्या आठवणी मनाशी जपत 'राहिले रे दूर घर माझे' म्हणून झुरत झुरत त्याला नव्या प्रदेशाशी जुळवून घ्यावे लागते.

प्रवास करण्याचे तसे नसते. लोक प्रवास आवडीने करतात. ज्यांना तशी आवड नसते, त्यांनाही आपण हवे तेव्हा घरी परत येऊ अशी खात्री असते. त्यामुळे प्रवास म्हणजे संकट असे वाटत नाही. वेगळे प्रदेश, वेगळा निसर्ग, निराळे समाज आणि त्यांच्या जीवनशैली पाहण्याची उत्सुकता बहुतेक लोकांना असते. 'प्रवास केल्याने माणसाला शहाणपण येते' असे पूर्वीपासून म्हणतात. त्यामुळे नव्या गोष्टी शिकता येतात. नवे विचार समजल्याने आपल्या मनावर साचलेली धूळ झटकता येते. स्वतःकडे, आपल्या समाजाकडे नव्या नजरेने पाहता येते. आपले गुणदोष जास्त स्पष्ट दिसू लागतात. अर्थात, हे सगळे इच्छा असेल तरच होऊ शकते. प्रवासाची संधी मिळूनही तिथेसुद्धा 'अगदी घरच्यासारखे जेवण' शोधणाऱ्यांचे काहीच होऊ शकत नाही.



## करा आणि शिका

**२. दोन जणांचे गट करून आपल्या शहरातील स्थलांतरित लोकांची मुलाखत घेऊ या आणि ती वर्गासमोर दृक्श्राव्य माध्यमातून सादर करू या.**

**मुलाखतीसाठी काही प्रश्न :**



- तुम्ही स्थलांतर कधी आणि का केले?
- तुमचे मूळ ठिकाण कोणते?
- तुमच्या मूळ गावातले / शहरातले राहणीमान कसे आहे?
- आत्ताच्या नवीन ठिकाणचे राहणीमान तुम्हाला कसे वाटते?
- तुमच्या आधीच्या आणि आत्ताच्या ठिकाणांमध्ये कोणते फरक जाणवतात?
- तुमच्या गावाची / शहराची आठवण येते का? तुमच्या गावातल्या / शहरातल्या कुठल्या गोष्टी तुम्हाला इथे मिळत नाहीत? आत्ताच्या ठिकाणी परकेपणाची जाणीव होते का?
- ...

**३. 'आपलं घर ते आपलं घर'**



**प्रश्नकर्ता :** विशाल, ह्या मुलाखतीसाठी वेळ काढल्याबद्दल धन्यवाद. मला सांग, तू कधी, कुठे आणि का स्थलांतर केलंस?

**विशाल :** मी मूळचा औरंगाबादचा. मी २००० साली संस्कृत भाषेमध्ये माझं पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं, तेव्हा मला जर्मनीतील बर्लिन ह्या शहरातल्या विद्यापीठात पीएच. डी. करण्यासाठी तीन वर्षांची शिष्यवृत्ती मिळाली. जर्मनीला येण्याआधी मी जर्मन भाषा शिकलो होतो आणि त्यामुळेच मी जर्मनीला जाण्याचा निर्णय घेतला. आधी थोडा घाबरलो होतो. नवीन देशात, नव्या संस्कृतीत आपला कसा निभाव लागेल ह्याबद्दल थोडा साशंक होतो. परंतु मला मिळालेली शिष्यवृत्ती माझ्या करिअरसाठी फार फायद्याची होती.

खरं सांगू? जर्मन लोक खूप फटकळ आणि खडूस असतात असं मी ऐकलं होतं. मी जर्मनीला पोचल्यानंतर मला काहीच सुधरत नव्हतं. जर्मन येत असतानासुद्धा मी विमानतळावरच्या पाट्या वाचू शकत नव्हतो, इतका मी गोंधळलो होतो. मला विमानतळाजवळच असलेल्या रेल्वे स्टेशनला जायचं होतं.




शेवटी मी एका जर्मन माणसाला अस्खलित जर्मनमध्ये रस्ता विचारला, तेव्हा रागानं त्यानं मला उत्तर दिलं. "इतकं चांगलं जर्मन बोलता येतंय, तर मग पाटी वाचता येत नाही का?" आधी मला रडूच आलं; पण थोडा वेळ विचार केल्यानंतर वाटलं, त्यानं तर माझी प्रशंसाच केली होती की! माझ्यात पुन्हा उत्साह संचारला आणि मी पाट्या वाचत स्टेशनपाशी गेलो.

तिथे एक आफ्रिकन मुलगा माझ्यासारखाच गोंधळलेला दिसला. तोही स्टेशन शोधत होता. मी मोठ्या आत्मविश्वासानं त्याला मदत केली. ह्या एका अनुभवानं मला एक फार महत्त्वाची गोष्ट शिकवली. परक्या देशात राहताना आत्मविश्वास असला, की त्याबद्दलचा परकेपणा आपोआप संपेल. पुढे मला याची प्रचीतीही आली. मला तिथे खूप चांगले मित्र मिळाले, खूप चांगल्या लोकांशी ओळख झाली. मला तिथे घरच्यासारखं वाटू लागलं. जर्मनी आता माझं दुसरं घर झालं आहे.

**प्रश्नकर्ता :** छान. जर्मनीत राहत असताना तिथल्या लोकांबद्दल तुला काय जाणवलं?

**विशाल :** खूप चांगल्या गोष्टी जाणवल्या. जर्मनी खूप प्रगत देश आहे. तिथल्या लोकशाहीचा पाया भक्कम आहे. जर्मन माणसाला वेळेचं फार महत्त्व असतं. लोक एकमेकांचा खूप आदर करतात, खूप स्वावलंबी असतात. तिथे प्रत्येकाचं स्वातंत्र्य जपलं जातं.

**प्रश्नकर्ता :** आता तुला बर्लिन जास्त आवडतं की औरंगाबाद?



**विशाल :** अवघड प्रश्न आहे. हे बघ, बर्लिनला जायच्याआधी मला फक्त औरंगाबाद आवडायचं. पण आता जर्मनीमध्ये इतका काळ घालवल्यानंतर मला जर्मनीसुद्धा आवडायला लागलं आहे. मला तिथली काम करण्याची पद्धत आवडते, त्याव्यतिरिक्त मला तिथली संस्कृतीसुद्धा आवडायला लागली आहे.

**प्रश्नकर्ता :** जर्मनीतल्या कुठल्या गोष्टी तू सर्वात जास्त मिस करतोस?

**विशाल :** अर्थात माझे मित्र. त्यांच्याशिवाय पुन्हा औरंगाबादमध्ये नोकरी करणं थोडं अवघड वाटतंय. जर्मनीत आम्ही एकत्र अभ्यास करायचो. अभ्यासाच्या वेळी फक्त अभ्यास आणि त्याच्यानंतर मात्र नुसती मज्जा! संध्याकाळी आम्ही रोज एकत्र स्वयंपाक करायचो. एकमेकांवाचून करमायचं नाही, अरे.

**प्रश्नकर्ता :** तुला जर्मनी एवढं आवडतं, तर मग तू परत का आलास? मी असतो तर तिथेच राहिलो असतो.

**विशाल :** तसं नाहीये रे! मला जितकं जर्मनी आवडतं, तितकाच भारत आवडतो. जर्मनीत शिक्षण घेऊन मला पुन्हा मायदेशात यायचं होतं, इथे काम करायचं होतं. माझ्या फांद्या कितीही पसरल्या असल्या, तरी माझी मुळं इथल्या मातीत खोलवर रुजली आहेत. त्याखेरीज, आपलं घर ते आपलं घर, नाही का?

**प्रश्नकर्ता :** हो, खरंय. वा! तुझे विचार ऐकून छान वाटलं. विशाल, मुलाखतीसाठी धन्यवाद. तुझ्या पुढच्या वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

**विशाल :** धन्यवाद.

**क. वरील संवादात आलेल्या जांभळ्या रंगातील शब्दांचा अभ्यास करू या.**


- येण्याआधी
- पोचल्यानंतर
- त्याच्यानंतर

**कालवाचक शब्दयोगी पदे    Temporal Postpositions**

वरील उदाहरणांतील 'आधी', 'नंतर' ही 'शब्दयोगी पदे' आहेत. ही शब्दयोगी पदे काळ दर्शवतात, म्हणून त्यांना **'कालवाचक शब्दयोगी पदे'** म्हणतात.

**४. रिकाम्या जागी योग्य शब्दयोगी पद भरून जोशीकाकूंची चहाची गंमत लिहू या.**

(आधी, नंतर, नंतर, नंतर)



जोशीकाकू रोज पहाटे लवकर उठतात. उठल्यानंतर त्या त्यांच्या मांजरांना आधी दूध देतात. मग त्या स्वत:साठी चहा करतात. त्यांची चहा करण्याची पद्धत थोडी निराळी आहे. त्या आधी पाणी गरम करतात, (क) त्या ------------- त्यात साखर, आलं आणि वेलचीपूड घालतात. पाणी उकळले, की गॅस बंद करतात. मग त्यात चहा घालतात, आणि भांड्यावर झाकण ठेवतात. पाच मिनिटे चहा तसाच ठेवतात, मग त्यात दूध घालतात, आणि एका मोठ्या कपात चहा गाळून घेतात. चहा (ख) पिण्या ------------- त्या रेडिओ लावतात आणि आरामखुर्चीवर बसून निवांतपणे चहा पितात. चहा पिताना त्या दुसरा कुठलाही विचार करत नाहीत. चहा पिणे हे त्यांच्यासाठी जणू एक ध्यानच आहे. म्हणून चहाच्या वेळी त्यांना कोणीही घरी आलेले चालत नाही. त्या आपला फोनसुद्धा चहाच्या वेळी बंद ठेवतात. चहा पिऊन (ग) झाल्या ------------- त्या फोन पुन्हा सुरू करतात.



**५. क्रमांक ३ मधील विशालची मुलाखत पुन्हा वाचू या आणि हिरव्या रंगातील शब्दांचा अभ्यास करू या.**

- त्याव्यतिरिक्त
- त्यांच्याशिवाय
- एकमेकांवाचून
- त्याखेरीज

### शब्दयोगी पदे Postpositions

वरील उदाहरणांतील ‘व्यतिरिक्त’, ‘शिवाय’, ‘वाचून’ आणि ‘खेरीज’ ही **‘शब्दयोगी पदे’** आहेत.

- ‘व्यतिरिक्त’ = ‘खेरीज’ : संबंधित व्यक्तीला, वस्तूला अथवा कृतीला धरून / मोजून

  उदा॰ मला युरोपातल्या देशांपैकी जर्मनी हा देश आवडतो.
  त्याच्याव्यतिरिक्त / त्याच्याखेरीज मला स्पेनही आवडतो.

- ‘शिवाय’, ‘वाचून’ : संबंधित व्यक्तीला, वस्तूला अथवा कृतीला वगळून

  उदा॰ मला युरोपातल्या देशांपैकी जर्मनी हा देश आवडतो.
  त्याच्याशिवाय दुसरा कुठलाही देश आवडत नाही.
  माझी बायको माहेरी गेली आहे. तिच्यावाचून मला करमत नाही.

- ‘नाही तर’, ‘अन्यथा’ ह्या अर्थानेही ‘शिवाय’ ह्या शब्दयोगी पदाचा वापर होतो.

  उदा॰ “तू अगोदर रडणं थांबव आणि काय झालं ते नीट सांग. त्याशिवाय मला ते कळणार कसं?”

- ‘त्याचप्रमाणे’, ‘त्याचबरोबर’ ह्या अर्थानेही उभयान्वयी अव्यय म्हणून ‘शिवाय’ ह्या शब्दाचा वापर केला जातो.

  उदा॰ सोहेलने गणितात डॉक्टरेट मिळवली आहे. शिवाय, त्याला संगीत आणि साहित्य ह्या विषयांमध्येही रस आहे.

व्याकरण

**६. रिकाम्या जागी योग्य शब्दयोगी पदे भरू या.**




क. मनोज थोरातसाठी त्याचा स्मार्टफोन हा जीव की प्राण आहे. त्याच्या स्मार्टफोन---------- तो जगूच शकत नाही.

ख. सविता प्रभुणे ही पेशाने वकील आहे. त्या------------ ती चित्रपटांमध्येही काम करते.

ग. सागर नेहमी त्याच्या आईसोबत असतो. आई कधी घरात नसली, की त्याचं तिच्या------------ निभत नाही.

७. **रिकाम्या जागी योग्य शब्दयोगी पदे भरून खालील उतारा पूर्ण करू या.**

**'मिनिमलिझम' : एक वेगळी जीवनशैली**




कधी काळी 'अन्न, वस्त्र, निवारा' ह्या माणसाच्या तीनच मूलभूत गरजा होत्या. आता मात्र त्या यादीत बरीच भर पडलेली आहे. उदाहरणार्थ, आज असे दिसते की माणूस (क) टीव्ही ------------- किंवा मोबाईल (ख) फोन ------------- जगू शकणार नाही. शहरांमधील बरेच लोक खरेदीच्या मायाजालात गुरफटत चालले आहेत. आपण गरजेपेक्षा जास्त, अनावश्यक वस्तू नुसत्या साठवत चाललो आहोत. अशा वेळी जोशुआ बेकर नावाच्या व्यक्तीचा 'द मिनिमलिस्ट ब्लॉग' फार उपयोगी पडू शकतो. ह्या ब्लॉगमध्ये बेकर 'मिनिमलिस्ट' जीवनशैलीचा प्रचार करतात. 'मिनिमलिस्ट' जीवनशैली म्हणजे फकिरासारखे, सगळ्या गोष्टींचा त्याग करून जगणे नव्हे. आपण हजार वस्तू खरेदी करतो, परंतु जगण्यासाठी त्यातल्या फक्त शंभर गोष्टी गरजेच्या असतात. आपल्या ह्या वायफळ खर्चाबाबत सजग व्हायचे असेल, तर आपण स्वत:लाच विचारले पाहिजे, 'माझ्या मुख्य गरजा कोणत्या आहेत? (ग) त्या ------------- मी काय काय साठवून ठेवले आहे?' मग त्या अतिरिक्त वस्तूंची यादी करून पुन्हा विचार केला पाहिजे, 'मी ह्या (घ) गोष्टीं ------------- जगू शकतो का? (च) ह्यांच्या ------------- माझे काही अडते का?' स्वतःशी प्रामाणिक राहून उत्तर शोधले, तर जगणे बरेच सोपे आणि स्वस्त होऊ शकते.

### करा आणि शिका

८. **एक विद्यार्थी / विद्यार्थिनी वर्गासमोर उभा / उभी राहील, आणि म्हणेल 'मी आहे स्मार्टफोन'. दुसरा विद्यार्थी / दुसरी विद्यार्थिनी त्याच्या शेजारी उभा / उभी राहील आणि म्हणेल 'मी आहे सिम कार्ड. माझ्याशिवाय हा स्मार्टफोन काही कामाचा नाही.' तिसरा विद्यार्थी / तिसरी विद्यार्थिनी पहिल्या दोघांच्या / दोघींच्या शेजारी उभा / उभी राहील आणि म्हणेल 'ठीक आहे, मी स्मार्टफोन घेतो / घेते, त्याव्यतिरिक्त हे सिम कार्डसुद्धा घेतो / घेते.'**

प्रत्येक गट तीन विद्यार्थ्यांचा असेल. शिक्षक / शिक्षिका प्रत्येक गटाला एक शब्द देईल, दिलेल्या शब्दाच्या मदतीने प्रत्येक गटाने बाकीच्या दोन वस्तू सांगून वाक्ये तयार करावीत.

**शब्द :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बूट | गाडी | गादी | संगणक | कपडे |
| घर | टेबल | सोफा | घड्याळ | वॉशिंग मशीन |
| चष्मा | कुर्ता | साडी | रेझर | |

९. **खालीलपैकी एक प्रसंग निवडू या आणि त्यावर एका वर्गमित्रासोबत 'रीती भूतकाळ' आणि 'शिवाय' वापरून एक संवाद सादर करू या.**

तुमच्या आजीकडे खूप मोकळा वेळ आहे, मात्र तो ती देवाधर्माचे करण्यात घालवते. पूर्वी तिने खूप सामाजिक कार्य केले होते ह्याची तिला आठवण करून द्या.

तुमची सतरा वर्षांची मुलगी प्रत्येक सुट्टीच्या दिवशी डिस्कोला जाते. ही तिची आयुष्य जगण्याची तऱ्हा आहे. तुम्ही त्या वयात काय करत होता ते सांगा.

तुमच्या मित्राने तरुण वयात ठरवले होते की वयाच्या पन्नाशीपर्यंत भरपूर काम करून पैसे कमवायचे. त्यानंतर आराम करायचा आणि मिळवलेल्या पैशांचा आनंद घ्यायचा. तुम्ही त्याला त्याचा अनुभव विचारा.

## ५ ग्रामीण भारत बदलतोय...



महाराष्ट्र आणि उर्वरित भारतातील पाच हजार खेडी यांचे सर्वेक्षण केल्यावर ग्रामीण भारतात जागतिकीकरणामुळे होत असलेल्या बदलांविषयी खूपच आशावादी चित्र दिसत आहे. भारतात १९९१ साली आर्थिक उदारीकरण सुरू झाले. त्यामुळे ग्रामीण भागात काही सकारात्मक बदल होत आहेत.

ग्रामीण भागात वीस वर्षांपूर्वी माध्यमिक शिक्षण सात-आठ किलोमीटरच्या अंतरावर होते, तर उच्च शिक्षण पंधरा-सोळा किलोमीटर अंतरावर होते. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आता ग्रामीण भागात हाकेच्या अंतरावर उपलब्ध झालेले आहे. आज ग्रामीण भागातील साधारण पंधरा कोटी मुले प्राथमिक शिक्षण घेत आहेत. त्यांपैकी साधारण दहा कोटी विद्यार्थ्यांना दुपारच्या जेवणाचा लाभ मिळत आहे. त्यामुळे शिकणाऱ्या मुलांची संख्या वाढली आहे. शिवाय, मुलींना दहावीपर्यंत शिक्षण मोफत दिले जात असल्यामुळे शिकणाऱ्या मुलींची संख्याही वाढली आहे. थोडक्यात, ग्रामीण भागात आता शिक्षणाविषयीची जागरूकता झपाट्याने वाढली आहे.



संपर्क आणि दळणवळणाची साधने यामुळे ग्रामीण भागाचा चेहरा बदलला आहे. आज दूरचित्रवाणी नव्वद टक्क्यांहून अधिक गावांपर्यंत पोहोचली आहे. सर्वात मोठी क्रांती घडते आहे ती डीटीएचमुळे. त्याअंतर्गत साधारणपणे दर महिन्याला पाच लाखांपेक्षा जास्त टीव्ही संच जोडले गेले आहेत. परिणामी ग्रामीण भागातील घरे जगाशी जोडली गेली आहेत. मोबाईलचा सर्वात चांगला आणि उत्तम वापर कुठे होत असेल तर तो ग्रामीण भागात होत आहे. कारण ती त्यांच्या चैनीची नाही, तर आत्यंतिक उपयोगाची वस्तू आहे. जिल्ह्याच्या धान्यबाजारातले भाव जाणून घेण्यासाठी गावातून माणूस पाठवावा लागत असे. आता



मोबाईलमुळे अशा गोष्टी सहज-सोप्या झाल्या आहेत. ग्रामसडक योजना, आवास योजना ह्या सरकारी योजनांमुळे 'गाव तेथे रस्ता' आणि 'रस्ता तेथे बस' ह्या गोष्टी बऱ्याच अंशी प्रत्यक्षात आल्याने ग्रामीण भागाचा तालुक्याशी, जिल्ह्याशी आणि मोठ्या शहरांशी संपर्क मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. संत्री, मोसंबी, केळी, गहू, कांदा अशी कितीतरी उत्पादने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेतकरी मुंबई, पुणे, नागपूर अशा मोठ्या बाजारपेठांमध्ये पाठवू लागले आहेत.

आज केंद्र व राज्य शासन आपल्या अंदाजपत्रकातील मोठा हिस्सा ग्रामीण भागावर खर्च करत आहे. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत आहे. ह्यामुळे भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती, त्यांचे राहणीमान आणि जीवनशैली ह्यांत मोठा बदल होतो आहे. ग्रामीण भागातल्या स्त्रियाही आता राजकारणात सक्रिय होऊ लागल्या आहेत. ग्रामपंचायतीमधील निर्णयप्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढला आहे. ह्या सगळ्या बदलांमुळे देशातील खेडी कात टाकत आहेत ह्यात वादच नाही.

**१. खालील शब्दांच्या योग्य अर्थांशी जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| क. सर्वेक्षण | १. अगदी जवळ |
| ख. जागतिकीकरण | २. एकदम चांगला बदल करणे (शरीरावरील बाह्य त्वचा टाकून देणे) |
| ग. आर्थिक उदारीकरण | ३. संपूर्ण जगाची एका मोठ्या बाजारपेठेत रूपांतरित होण्याची प्रक्रिया |
| घ. हाकेच्या अंतरावर | ४. सर्वांगीण पाहणी |
| च. दळणवळण | ५. व्यवहार जास्त मोकळे करणे |
| छ. कात टाकणे | ६. वाहतुकीच्या सोयी |

**२. वरील लेखामध्ये काही संख्यांची नोंद आहे. त्यांचे संदर्भ समजावून सांगू या.**

क. १५०००००००  :  उदा॰ पंधरा कोटी मुले ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण घेत आहेत.

ख. १०००००००००  :

ग. ९०  :

घ. ७-८  :

च. ५०००००  :

छ. १५-१६  :

३. गावातल्या राहणीमानाबद्दल आपले निरीक्षण काय आहे? वरील लेखात आलेली ही विधाने तुम्हाला पटतात का? कारणे देऊ या.

| विधाने | |
|---|---|
| क. ग्रामीण भारतात जागतिकीकरणामुळे होत असलेल्या बदलांविषयी खूपच आशावादी चित्र दिसत आहे. | |
| ख. थोडक्यात, ग्रामीण भागात आता शिक्षणाविषयी जागरूकता झपाट्याने वाढली आहे. | |
| ग. भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती, त्यांचे राहणीमान आणि जीवनशैली ह्यांत मोठा बदल होतो आहे. | |
| घ. मोबाईलचा सर्वात चांगला आणि उत्तम वापर कुठे होत असेल तर तो ग्रामीण भागात होत आहे. | |

## करा आणि शिका

४. कर्नाटकात एक गाव आहे. नाव त्याचे हेग्गुडू. ह्या गावातले लोक एक मोठा उपक्रम राबवतात, त्यामुळे गावातला प्रत्येक माणूस, अगदी पानपट्टीवाला, न्हावी किंवा पंक्चरवालासुद्धा, एका खास विषयावर आनंदाने बोलतो. तो विषय कोणता?



विद्यार्थ्यांचे गट करू या आणि आंतरजालावर ह्या गावाबद्दल माहिती शोधू या व ती वर्गात सादर करू या.

## म्हणी आणि वाक्प्रचार

जीव की प्राण असणे

अंधेर नगरी चौपट राजा

चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्यांचा मसाला

कात टाकणे

अक्कलखाती जमा

**संभाषण करू या.**

जीव गुदमरणे   पाय जमिनीवर असणे   राहणीमान उंचावणे   कलागुणांना वाव देणे
साधी राहणी, उच्च विचारसरणी   राग / भावना / दु:ख / संताप अनावर होणे   चटक लागणे
जीवनशैलीमध्ये परिवर्तन आणणे   एखाद्या गोष्टीचा पाठपुरावा करणे   परवलीचा शब्द
वैविध्य जपणे   उखाळ्यापाखाळ्या काढणे   काही न सुधरणे


**५. कंसातील पर्याय वापरून खालीलप्रमाणे वाक्य तयार करू या.**


उदा. मॉलमध्ये इतकी गर्दी होती, की माझा जीव गुदमरला. (मॉल-गर्दी, लिफ्ट-माणसे, शहर-अशुद्ध हवा, चौक-वाहतूककोंडी, दिवाळी-प्रदूषण)

उदा. तो कितीही श्रीमंत असला, तरी त्याचे पाय जमिनीवर आहेत. (श्रीमंत-जमिनीवर पाय असणे, शिकलेला-नम्र असणे, सुंदर-गर्व नसणे, प्रसिद्ध कलाकार-माणसांमध्ये मिसळणे)

(वरीलप्रमाणे शिक्षकाने / शिक्षिकेने विद्यार्थ्यांकडून सराव करून घ्यावा.)

**चिंटू**



६. **जर्मन कवी रायनर कुन्त्सं ह्यांचा ‘चहा’ ह्या विषयावरचा एक हायकू वाचू या.**

**एक कप जाईच्या पानांच्या चहाचे आमंत्रण**

या, आत या, बाहेरच ठेवा
तुमचं दुःख, इथे
काही नाही बोललात तरी चालेल.

क. वरील हायकूचा काय अर्थ असेल ह्यावर वर्गात चर्चा करू या.

ख. रिकाम्या जागा भरून आपणही हायकू लिहू या.

**एक कप जाईच्या पानांच्या चहाचे आमंत्रण**

या, आत या, बाहेरच ठेवा
---------------------------------, इथे
--------------------------------- तरी चालेल.

## ६ संभाषणकौशल्ये.

१. **उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा॰ वाचून / शिवाय / खेरीज - उदा॰ मोबाईल / कॉम्प्युटर, फेसबुक / व्हॉट्सॲप टीव्ही / आंतरजाल, मित्र / पुस्तक, पाणीपुरी / व्यायाम, प्राणी / माणसं, गाडी / सायकल)

पहिला विद्यार्थी : मी मोबाईलशिवाय राहू शकत नाही.



दुसरा विद्यार्थी : माझं बाबा चालतं मोबाईलशिवाय.

सर्व विद्यार्थी : खरंच? आम्ही तर मोबाईलशिवाय अजिबात राहू शकत नाही!

पहिला विद्यार्थी : आणि तू? तू राहू शकतोस / शकतेस कॉम्प्युटरशिवाय?

दुसरा विद्यार्थी : हट्, मी नाही राहू शकत कॉम्प्युटरशिवाय.

सर्व विद्यार्थी : आम्हाला चालतं बाबा कॉम्प्युटर नसला तरी!

**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. वर्गात दंगा करणे, चाळीत छान गाणे, नाटकात काम करणे, सकाळी पळायला जाणे, दुपारचे झोपणे, उगीच हसणे)





पहिला विद्यार्थी : पूर्वी वर्गात दंगा कोण करायचं?
दुसरा विद्यार्थी : मी करायचो / करायचे आणि तीही करायची.
सर्व विद्यार्थी : काय सांगतोस / सांगतेस? तू करायचास / करायचीस आणि तीही करायची?
दुसरा विद्यार्थी : हो, हो! मी करायचो / करायचे, ती करायची आणि तोही करायचा.
सर्व विद्यार्थी : वा छान! म्हणजे आपण सगळेच दंगा करायचो.

### पहिले मराठी पाऊल

### पहिली भारतीय सर्कस




स्वातंत्र्यपूर्वकाळातील रामदुर्ग (सध्या कर्नाटक राज्यातील) येथील संस्थानात श्रीमंत भावे यांच्याकडे 'जेवण करून तीन रुपये' या वृत्तीवर 'विष्णुपंत मोरोपंत छत्रे' हे 'चाबूकस्वारा'ची नोकरी करीत होते. ह्यांना लहानपणापासूनच पशुपक्ष्यांशी खेळण्याचे वेड होते. तसेच गायनाचीही आवड होती. वयाच्या साधारण १९-२० व्या वर्षी चाबूकस्वाराच्या नोकरीतून पळ काढून त्यांनी ग्वाल्हेर गाठले. तिथे त्यांनी प्रामुख्याने ग्वाल्हेर घराण्याचे गवय्ये हद्दुखां याच्याकडे 'गायकी', तर अश्वतज्ज्ञ बाबासाहेब आपटे यांच्याकडे 'अश्वविद्या' शिकून घेतली.

इ. स. १८८२ च्या सुमारास कुरुंदवाडकर संस्थानिकांच्याबरोबर मुंबईभेटीत त्यांचे भवितव्य उजळले. कुरुंदवाडकर, जव्हारकर या संस्थानिकांसोबत आपले मित्र परशुराम टिल्लू यांच्यासह ते इटालियन कसरतपटूंची 'रॉयल इटालियन सर्कस' पाहायला गेले. कदाचित 'अशा आश्चर्यकारक कसरती इतर कोणीच करू शकणार नाही' असे त्या ठिकाणी सर्कसकर्त्यांपैकी कोणीतरी उपस्थित प्रेक्षकांसमोर म्हटले असावे. त्यामुळे साहजिकच सोबत आलेले संस्थानिक आणि मित्रमंडळी अपेक्षेने विष्णूपंताकडे पाहू लागले. यावर विष्णुपंत ते आव्हान स्वीकारत म्हणाले, "... जर मनुष्यबळ आणि जनावरे ह्यांचा पुरवठा केलात, तर आठ-दहा महिन्यांत, आपण सर्वांस असाच खेळ करून दाखवू!" त्याप्रमाणे पुढील ९ ते १० महिन्यांच्या काळात कुरुंदवाडकर, विंचूरकर, जव्हारकर ह्या संस्थानिकांच्या मदतीने विष्णुपंतांनी आपली 'ग्रॅण्ड इंडियन सर्कस' उभारली (इ. स. १८८३). तासगाव, सांगली, पुणे, मुंबई अशा ठिकठिकाणी आपली सर्कस दाखवत ती अख्ख्या देशभर फिरवली.

पुढे विष्णुपंतांनी आपली ग्रॅण्ड इंडियन सर्कस आपल्या धाकट्या भावाच्या म्हणजे काशिनाथपंत छत्रे ह्यांच्या स्वाधीन केली. अशा रीतीने त्यांनी साधारणपणे इ. स. १८९३-९४च्या सुमारास कामकाजाच्या सर्व व्यापातून निवृत्ती स्वीकारली असावी असे दिसते. कालांतराने कंपनी भावाच्या स्वाधीन करून विष्णुपंत छत्रे निवृत्त झाले आणि १९०६ साली त्यांचे निधन झाले. गायक व्हायला निघालेल्या विष्णुपंतांच्या आयुष्याने एकदम वेगळे वळण घेऊन वेगळीच भटकी जीवनशैली स्वीकारली. देशभर आणि जगभर विष्णुपंत फिरत राहिले. परदेशी प्रवास निषिद्ध मानणाऱ्या त्या काळच्या समाजात त्यांचे असे जगणे, ही अचंबित करणारी गोष्ट वाटते.

## दृष्टिक्षेप

### नामे

| | | |
|---|---|---|
| तो विरंगुळा, ते विरंगुळे | ती सुखशांती | ते राहणीमान |
| तो परस्परसंबंध, ते - | ती जीवनशैली | ते स्वावलंबन |
| तो हक्क, ते - | ती साक्षरता | ते नियोजन, ती नियोजने / नं |
| तो दंड, ते - | ती सहिष्णुता | ते नियंत्रण, ती नियंत्रणे / णं |
| तो शेजारपाजार, ते - | ती लोकशाही | ते सान्निध्य |
| तो दृष्टिपथ | ती उमेद, त्या उमेदी | ते दळणवळण |
| तो एकोपा | ती संकल्पना, त्या - | |
| तो भाव, ते -<br>तो बंधुभाव<br>तो भक्तिभाव, ते -<br>तो भेदभाव, ते - | ती उत्क्रांती | |
| तो परकेपणा | ती दुर्गंधी | |
| तो फकीर, ते - | ती लुडबुड, त्या लुडबुडी | |
| | ती प्रचीती | |
| | ती झुळूक, त्या झुळका | |
| | ती दाटी | |

### क्रियापदे

पसरणे फोफावणे पहुडणे आळसावणे डुलणे लोळणे

## विशेषणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूक्ष्म | आत्मिक | समृद्ध | फटकळ | पुरोगामी |
| अख्खे | सजग | निवांत | मूलभूत | लांबलचक |
| संथ | प्रगल्भ | स्वतंत्र | वेगवान | एकतर्फी |
| शिष्ट | भूमिहीन | वायफळ | | |

## क्रियाविशेषणे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| झपाट्याने | तुलनेने | गुपचूप | आवर्जून | तुच्छतेने | एकतर्फी |

## नाम व क्रियापद जोड्या Noun and verb combinations

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. वागणूक मिळणे | आमच्या आश्रमात सगळ्यांना समान वागणूक मिळते. |
| २. सुविधा पुरवणे | सार्वजनिक व्यवस्था नागरिकांना रस्ते, पाणी, वीज, शाळा, बाजार या मूलभूत सुविधा पुरवते. |
| ३. विस्तार होणे | उद्योगधंदे, व्यापार आणि शैक्षणिक सुविधा ह्यांमुळे गावाचा विस्तार होतो आणि त्याचे एक मोठे शहर बनते. |
| ४. व्याख्या करणे | 'पर्यावरण म्हणजे नैसर्गिक संसाधनांची संतुलित स्थिती' अशी पर्यावरणाची एक व्याख्या केलेली आहे. |
| ५. उखाळ्यापाखाळ्या काढणे | फावल्या वेळात इतरांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणं हा अनेकांचा छंद असतो. |
| ६. जीव घाबरणे | पाण्यात उडी मारल्यावर सईचा जीव घाबरला. |
| ७. जीव गुदमरणे | लिफ़्टमध्ये गर्दी झाल्यामुळे छोट्या सईचा जीव गुदमरला. |
| ८. लुडबुड करणे | आईच्या प्रत्येक कामात नील लुडबुड करत असतो. |
| ९. तंबू ठोकणे | काका शाल्मलीच्या लग्नाला म्हणून आले आणि आमच्याकडेच तंबू ठोकून राहिले. स्वत:च्या घरी जायचे नावही काढेनात. |
| १०. चटक लागणे | एकदा का डोंगरदऱ्यांतून भटकंतीची चटक लागली, की पाय घरी थांबूच देत नाहीत. |
| ११. पिच्छा सोडणे / पुरवणे | क. जत्रेतल्या विक्रेत्याकडून एक छोटं खेळणं विकत घेईपर्यंत त्याने माझा पिच्छा पुरवला.<br>ख. जत्रेतल्या विक्रेत्याकडून एक छोटं खेळणं विकत घेतलं तेव्हा त्याने माझा पिच्छा सोडला. |

इतर शब्द व क्रियापद जोड्या **Other words and verb combinations**

| इतर शब्द + क्रियापद<br>Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. गुरफटत जाणे | सहज वाचायला घेतलेल्या पुस्तकात मी गुरफटत गेले. |
| २. कामी येणे | ही शाल थंडीत तुझ्या कामी येईल. |
| ३. पाय जमिनीवर असणे | एवढे मोठे यश मिळवूनही यशचे पाय जमिनीवरच होते. |
| ४. राग अनावर होणे | तो गुंड त्या मुलीची छेड काढतोय हे पाहिल्यावर रणजितचा राग अनावर झाला. |
| ५. समाविष्ट होणे | ह्या वर्षी पुण्याच्या भोवतालची सत्तावीस गावे पुण्याच्या हद्दीत समाविष्ट होतील. |

आता मला हे येतं...

**माणसांचे राहणीमान, त्यांची जीवनशैली**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्मार्ट सिटी, शहरांचा अहवाल**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शहर आणि गाव, दोन्हींमध्ये होणारे बदल**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**रीती भूतकाळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्थलांतर व परकेपणा**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शब्दयोगी पदे : आधी, नंतर, वेळी, व्यतिरिक्त, खेरीज, शिवाय, वाचून**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# नखशिखान्त ४











## चला, शिकू या...

- शरीराचे अवयव
- अपूर्ण भविष्यकाळ
- दोघी - दोन्ही
- जुळ्यांची गंमत, 'जुळ्याचं दुखणं'
- केवलप्रयोगी अव्यये
- शरीर : आजार आणि उपाय, भारतीय परंपरेतील उपचारपद्धती : आयुर्वेद आणि योग
- करता कामा नये, केले पाहिजे
- युवा भाषा
- शब्दयोगी पदे : पुरेसा, पुरता

## १ चित्रवर्णन

**१. पहिल्या पानावरील चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

- चित्रांमध्ये निरोगी जीवनशैलीसाठी आवश्यक अशा कोणत्या गोष्टी दिसत आहेत?
- चित्रामध्ये कोणता आजार दाखवला आहे? त्या आजाराची कारणे काय असू शकतात?
- चित्रांमध्ये कोणती औषधे दाखवली आहेत? तुम्ही अशी औषधे वापरता का?
- आजारांवर सांगितलेल्या घरगुती उपायांबद्दल तुम्हाला काय वाटते?
- तुम्ही कधी जुळी माणसे पाहिली आहेत का? पहिली असल्यास जुळ्या माणसांबद्दलचा आपला अनुभव सांगू या.

## २ शरीराचे अवयव

**१. खाली काही वस्तूंची चित्रे आणि अवयवांची यादी दिली आहे. कोणत्या वस्तू कोणत्या अवयवांसाठी वापरतात ते ओळखू या.**








| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ गळा | नाक २ | ३ कान | कपाळ ४ | ५ हात | मनगट ६ | ७ बोट |














उदा॰ क. – ६

२. खालील चित्रांमधील अवयव ओळखू या.

| | | | |
|---|---|---|---|
|  क | १ कपाळ | २ भुवई | ख  |
|  ग | ३ मिशी | ४ नाकपुडी | घ  |
|  च | ५ कानाची पाळी | ६ बुबूळ | छ  |
|  ज | ७ पोटरी | ८ टाच | झ  |
|  ट | ९ हनुवटी | १० पाठ | ठ  |
|  ड | ११ बेंबी | १२ चवडा | ढ  |
|  त | १३ नख | १४ गळा | थ  |

उदा. क. – १४

## ३ सुंदर 'ती' होणार!



खूप दिवसांपासून सौंदर्यतज्ज्ञ मिहिका ह्यांचं व्याख्यान ऐकायला आम्ही उत्सुक होतो. आज ते व्याख्यान ऐकण्याचा योग आला. त्या म्हणाल्या, "संपूर्ण शरीराच्या आरोग्याचा आपण प्रामुख्यानं विचार करतो. कारण शरीर निरोगी असेल, तर त्याची झळाळी आपल्या चेहऱ्यावरही दिसते. तुमची नखं वाईट आहेत का? तुमच्या डोळ्यांखाली काळी वर्तुळं आहेत का? तुमचे केस विरळ व्हायला लागले आहेत का? तुमच्या चेहऱ्यावर तारुण्यपीटिका आहेत का? अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमचा आहार! तुम्ही योग्य आणि संतुलित आहार घ्या म्हणजे तुमचं शरीर निरोगी राहील. त्यानंतर पुढील उपाय करा आणि बघा, तुमचं सौंदर्य कसं झळाळतं ते!"

त्यांनी केलेल्या सूचना ऐकून माझ्या मैत्रिणी भारावून गेल्या. घरी जाताना माझ्या मनात विचार आला, की घरी जाऊन ह्या माझ्या मैत्रिणी आत्ता काय करत असतील? गौरी आणि देविका, दोघी नखं स्वच्छ ठेवण्यासाठी गरम पाण्यानं हात धूत असतील. नंदना डोळ्यांखालची काळी वर्तुळं घालवण्यासाठी चंदन आणि जायफळाचा लेप डोळ्यांभोवती लावत असेल. अवंतिका नखांची स्वच्छता करणं आणि लेप लावणं ह्या दोन्ही गोष्टी करत असेल. संजना आणि सजदा ह्या दोघी झेंडूची फुलं बारीक करून त्यांचा रस काढत असतील आणि नारळाच्या तेलात टाकून तो उकळत असतील. तेल थंड झाल्यावर त्या दोघी ते तेल केसांना लावतील. मी मात्र त्या वेळी झोप काढत असेन.

**अपूर्ण भविष्यकाळ (लिहिणे)**

**Future Continuous Tense**

| धातूचे अपूर्ण क्रियादर्शक रूप | 'अस' ह्या धातूचे भविष्यकाळातील रूप |
|---|---|
| लिहीत | असेन |

| | |
|---|---|
| **अपूर्ण वर्तमानकाळ**<br>**Present Continuous Tense** | मी पत्र लिहीत आहे. |
| **अपूर्ण भूतकाळ**<br>**Past Continuous Tense** | मी पत्र लिहीत होतो. |
| **अपूर्ण भविष्यकाळ**<br>**Future Continuous Tense** | मी पत्र लिहीत असेन. |



१. आता अपूर्ण भूतकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ आणि अपूर्ण भविष्यकाळ ह्यांचा हा तक्ता होकारार्थी आणि नकारार्थी रूपे घालून पूर्ण करू या.

| सर्वनाम Pronoun | धातू Root | अपूर्ण वर्तमानकाळ Present Continuous Tense | अपूर्ण भूतकाळ Past Continuous Tense | अपूर्ण भविष्यकाळ Future Continuous Tense |
|---|---|---|---|---|
| मी | वाच | वाचत आहे<br>वाचत नाही आहे / नाहीये | वाचत होतो / होते<br>वाचत नव्हतो / नव्हते | वाचत असेन<br>वाचत नसेन |
| आम्ही / आपण | ओरड | | ओरडत होतो | ओरडत असू<br>ओरडत नसू |
| तू | खा | | | खात असशील<br>खात नसशील |
| तुम्ही / आपण | झोप | झोपत नाही आहात | | झोपत असाल<br>झोपत नसाल |
| तो | खेळ | | खेळत नव्हता | खेळत असेल<br>खेळत नसेल |
| ती | उठ | ती उठत नाही आहे / नाहीये | | उठत असेल<br>उठत नसेल |
| ते | लाज | | लाजत नव्हते | लाजत असेल<br>लाजत नसेल |
| ते | हस | | | हसत असतील<br>हसत नसतील |
| त्या | रड | | रडत होत्या | रडत असतील<br>रडत नसतील |
| ती | बघ | | | बघत असतील<br>बघत नसतील |




व्याकरण

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मी व्यायाम करत आहे.<br>मी उद्याही व्यायाम करत असेन. | मी उद्याही व्यायाम करत असेन. |
| आम्ही / आपण | आम्ही / आपण उद्याही व्यायाम करत असू. |
| तू | तू उद्याही व्यायाम करत असशील. |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण उद्याही व्यायाम करत असाल. |
| तो | तो उद्याही व्यायाम करत असेल. |
| ती | ती उद्याही व्यायाम करत असेल. |
| ते | ते उद्याही व्यायाम करत असेल. |
| ते (अ॰व॰) | ते उद्याही व्यायाम करत असतील. |
| त्या (अ॰व॰) | त्या उद्याही व्यायाम करत असतील. |
| ती (अ॰व॰) | ती उद्याही व्यायाम करत असतील. |



**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये पूर्ण करू या.**

**रवीची रोजनिशी**



**ऑगस्ट!** आता पावसाळा संपत आला. भारतात सणावारांचे दिवस सुरू होतील. इथं परदेशात बसून मी फक्त कल्पनाच करू शकतो. काय चाललं असेल तिथं? आता ऑगस्टमध्ये गणपती येतील. म्हणजे तिथे सजावटीची गडबड चालू होईल. काही मुलं वर्गणी (जमवणे) जमवत असतील, काही बाजारात (क) (जाणे) ------------ ------------, काही मखर बनवण्याची तयारी (ख) (करणे) ------------ ------------. मोठी माणसं गणपतीची मूर्ती आणायला (ग) (जाणे) ------------ ------------. बायका रोजच्या नैवेद्याला काय ठेवायचं, ह्याची यादी (घ) (करणे) ------------ ------------. **सप्टेंबर!** आला आला, माझ्या आवडीचा नवरात्रीचा सण आला. म्हणजे तिकडे सोसायटीच्या आवारात मांडव (च) (पडणे) ------------ ------------. सर्वांची टिपऱ्यांची खरेदी (छ) (होणे) ------------ ------------. मुली चणिया-चोळी तर मुलगे स्वतःच्या आवडीचे कपडे (ज) (विकत घेणे) ------------ ------------ आणि बायका दसऱ्याच्या महाभोजनाचं कंत्राट कुणाला द्यावं ह्याची चर्चा (झ) (करणे) ------------ ------------.

**३. हवामान काल - आज - उद्या : होकारार्थी आणि नकारार्थी रूपे वापरू या.**



क. काल चांदण्या (चमकणे) ----------------. आज चांदण्या चमकत आहेत. उद्या चांदण्या ----------------.

ख. काल पाऊस (न पडणे) ----------------. आज पाऊस ----------------. उद्या पाऊस पडत नसेल.

ग. काल वारा (वाहणे) ----------------. आज वारा ----------------. उद्या वारा ----------------

घ. काल वीज (न चमकणे) ----------------. आज वीज ----------------. उद्या वीज ----------------.

च. काल ढग (गडगडणे) ----------------. आज ढग ----------------. उद्या ढग ----------------.



"काका, इतकं वय झालं तरी तुमची प्रकृती ठणठणीत आहे. कसं काय जमवलंत तुम्ही हे?"

"आनंदानं जगून! अरे, जगण्यातला आनंद घेता आला की आणखी जगावंसं वाटतंच माणसाला. मग प्रकृती आपोआप साथ देते. रडत रडत दिवस ढकलणाऱ्यांचं कामच नव्हे ते. आमचा, बरं का, एक मित्र आहे. त्याला शंभर वर्षं जगायचं आहे. त्यापूर्वीच मरेन की काय, ह्या भीतीनं त्याचं तोंड सदैव वाकडं झालेलं असतं. तो गेला एक दिवस डॉक्टरकडे, सल्ला विचारायला. डॉक्टर म्हणाले – 'दारू, सिगारेट आणि असेच नाद असतील तर ते उद्यापासून सोडा.' मित्रानं विचारलं, 'मग मी जगेन शंभर वर्षं?' डॉक्टर म्हणाले – 'नाही. पण जेवढं जगाल तेवढं शंभर वर्षांइतकं लांबच लांब वाटेल.' तेव्हा, मुद्दा लक्षात आला ना? ..."



**पुणेरी चिमटा**

मुंबईकर- पुण्यात फार उकडतं बुवा! काय करता तुम्ही लोक या दिवसांत?

पुणेकर- आम्ही कूलरसमोर बसतो.

मुंबईकर- आणि तरीही उकडत असेल तर?

पुणेकर- मग आम्ही कूलर सुरू करतो.

## ४ दोघी - दोन्ही, दोघे - दोन्ही, दोघं - दोन्ही (both and both of)

| | | | |
|---|---|---|---|
| एक | • तो एकटा सिनेमाला गेला. • तू एकटा चल माझ्याबरोबर. | • ती एकटी सिनेमाला गेली. • तू एकटी चल माझ्याबरोबर. | • ते (बाळ) एकटे / एकटं खेळत होते / होतं. |
| | | | |
| दोन | • ते दोघे सिनेमाला गेले. • तुम्ही दोघे चला माझ्याबरोबर. • सचिन आणि महेश पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. तिथे दोघे एकत्रच राहतात. | • त्या दोघी सिनेमाला गेल्या. • तुम्ही दोघी चला माझ्याबरोबर. • मानसी आणि आरती पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला गेल्या. तिथे दोघी एकत्रच राहतात. | • ते (बाळ) दुसऱ्या बाळासोबत खेळत होते / होतं. ती दोघे / दोघं भांडतही होती. |

| | | | |
|---|---|---|---|
| एक | त्या वर्गात एक हुशार मुलगा होता. | त्या वर्गात एक हुशार मुलगी होती. | त्या घरात एक बाळ तेवढे / तेवढं शांत होते / होतं. |
| दोन | ते दोन्ही मुलगे हुशार होते. | त्या दोन्ही मुली हुशार होत्या. | ती दोन्ही बाळे / बाळं / माणसे / माणसं शांत होती. |

### दोघे की दोन्ही?

| | | | |
|---|---|---|---|
| दोन | त्या वर्गातले दोन्ही मुलगे हुशार होते. | त्यांच्या दोन्ही मुली हुशार होत्या. | त्या घरातील दोन्ही मुले / मुलं शांत होती. |
| | ~~ते दोन्ही हुशार होते.~~ ते दोघे हुशार होते. | ~~त्या दोन्ही हुशार होत्या.~~ त्या दोघी हुशार होत्या. | ~~ती दोन्ही शांत होती.~~ ती दोघे / दोघं शांत होती. |

**१. कंसातील योग्य तो पर्याय वापरून रिकाम्या जागा भरू या.**

(दोघे, दोघी, दोन्ही, एकटा, एकटी)

क. ती ---------------- शहरे खूपच गजबजलेली आहेत.

ख. त्या ----------------च रात्री उशिरा फिरायला गेल्या होत्या.

ग. तो ---------------- दहा लोकांशी सामना कसा करणार?

घ. लोकलने ----------------ने रात्री प्रवास करणे ही गोष्ट मुंबईमध्ये आता अगदी नेहमीची झाली आहे.



च. ते ---------------- कधीच भांडत नाहीत.

छ. एवढ्या मोठ्या घरात ती ---------------- राहते.

ज. ते ---------------- एकत्र अभ्यास करतात.

झ. त्यांचा ---------------- विषयांचा अभ्यास झाला आहे.

**२. ऐकू या. जुळ्यांची गंमत, 'जुळ्याचं दुखणं'!**



**क. खालीलपैकी कोणती वाक्ये ध्वनिफितीत ऐकली? चौकटीत √ ची खूण करू या.**

१) जुळी मुले असणे ही फार दुर्मीळ गोष्ट आहे. ☐

२) रॉजर फेडररला पहिल्यांदा जुळे झाल्याची मोठी बातमी झाली होती. ☐

३) कोडीन्ही गावात बरीच जुळी मुले आहेत. ☐

४) कोडीन्ही गावात केवळ जुळी मुलेच जन्माला येतात. ☐

५) कोडीन्ही गावातील चमत्काराचे गूढ वैज्ञानिकांना उकलले आहे. ☐

**ख. वाचू या.**

**जुळ्यांच्या अशाही गमती.**

एकसारखी जुळी दिसली, की त्यांना काही प्रश्नांना सामोरे जावे लागतेच. "अरे वा!" किंवा "अय्या! तुम्ही जुळे आहात?" ह्या प्रश्नावर मोठ्ठे झालेले डोळे, तेवढाच मोठ्ठा वासलेला तोंडाचा 'आ' आणि कोणी अजब प्राणी बघायला मिळाल्याचा चेहऱ्यावर कुतूहलमिश्रित भाव, हेही आलेच! "तुमची लग्नं झालीत? मग तुमच्या बायका कशा ओळखतात तुम्हाला?" हा हमखास विचारला जाणारा प्रश्न. एकदा तर एका महाभागानं – "अंगावर तीळ आहे वगैरे ठीक आहे हो; पण समजा रात्री वीज गेली, तर कसं ओळखता?" असंही विचारलं.

**'जुळ्यांचे दुखणे'**

'जुळ्यांचे दुखणे' हा एक वाक्प्रचारच मराठीमध्ये आहे. जुळ्या भावंडांचे दिसण्यापासून, सवयी, विचार, आवडीनिवडी, आजार हे सगळे सारखे असते आणि एकाच वेळी होते, ह्या समजुतीतून हा वाक्प्रचार आला असावा. खूप सहवासात असणाऱ्यांच्या आवडीनिवडीही एकसारख्याच होतात, किंवा कधी कधी एक छुपी स्पर्धा भावंडांमध्ये किंवा मित्रांमध्ये असते. मग त्यातल्या एकाला जी गोष्ट हवी, तीच लगेच दुसऱ्यालाही हवी असते. तो इंजिनियर होणार का? मग मीपण इंजिनियरच होणार. तिला अमुक आवडतं, तर मलाही तेच आवडतं. ही बाब सगळ्यांच्या लक्षात येते, आणि आजूबाजूचे लोक म्हणतात, त्यांचं म्हणजे जुळ्यांचं दुखणं आहे.

**ग. तुमच्या माहितीत कोणी जुळी भावंडे आहेत का? त्यांना आलेले काही अनुभव माहीत असतील तर ते सांगू या. जुळ्यांबद्दलचे विनोद सांगू या.**

उदा॰ माझ्या माहितीतली एक मुलगी तिचा चालकपरवाना हरवल्यावर नवा काढेपर्यंत स्वतःच्या जुळ्या बहिणीचाच परवाना वापरत होती.



मीना आणि टीना ह्या जुळ्या बहिणी. शाळेत त्यांना 'माझे बाबा' ह्या विषयावर निबंध लिहायचा होता. निबंध वाचून शिक्षिका त्यांना म्हणाल्या, "काय गं, तुम्ही जुळ्या बहिणी आहात ना? मग निबंधात दोघींनी वडिलांचं नाव वेगवेगळं कसं लिहीलंयत?" त्यावर दोघी म्हणाल्या, "काय करणार बाई! नाही तर कॉपी केली असं तुम्ही आम्हाला म्हणाला असतात ना!"

## ५ "अरेरे!..."

**१. खालील उतारा वाचू या आणि त्यात आलेल्या निरनिराळ्या भावना व्यक्त करणारे शब्द लिहू या.**



एवढी वर्षे त्याने अतिशय कष्ट घेऊन त्या गावाचा कायापालट केला. पण एक लहान मूल कुपोषणाने मरण पावले आणि सर्व बाजूंनी त्याच्यावर टीका होऊ लागली. तो उदास झाला. मनाशीच म्हणाला, "अरेरे! ज्या लोकांच्या भल्यासाठी मी एवढा झटलो, ते असे कसे बिथरले?" त्या मुलाला पालकांनी वेळेवर दवाखान्यात आणले नाही, आणि मग काहीच उपचार होऊ शकले नाहीत. दुर्दैव त्या मुलांचे आणि पालकांचे; दुसरे काय म्हणणार? पण म्हणून आपण आजपर्यंत केलेल्या सगळ्या धडपडीची किंमत शून्य ठरते? छे छे! त्यात ही पार्श्वभूमी माहीत नसलेले पत्रकार आणि प्रत्येक गोष्टीचे भांडवल करून धंदा करणारे टीव्ही चॅनेल. त्याला घृणा आली. "इश्शी! कसले हे पत्रकार!"

उदा॰ उदास, ____________________


### केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये Interjections

आनंद, आश्चर्य, कौतुक, दुःख, खेद, तिरस्कार अशा भावना कधी कधी आपल्या मनात दाटून येतात. त्या भावना वाक्यातून व्यक्त करण्याआधी आपण काही उत्स्फूर्त उद्गार काढतो. अशा उद्गारांना **केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये** असे म्हणतात.

उदा॰ बाप रे! केवढा मोठा हा पर्वत! (आश्चर्य)

शाब्बास! छान काम केलंस! (कौतुक)

**२. पुढील वाक्यांतील केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये अधोरेखित करू या.**



क. अबब! इथे तर फारच गर्दी जमलीय!

ख. बाप रे! किती ही थंडी!

ग. मला नाही आवडला हा सिनेमा! श्शी!

घ. अरेरे! हा भात तर करपला!

| आनंद | शोक / वेदना | आश्चर्य | कौतुक | संमती | विरोध | तिरस्कार | संबोधन | भीती | लज्जा | फजिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | ऊं | ओहो | शाब्बास | हां | छे | हुं: | अगं | बाप रे | अय्या | |
| वा वा | आऽऽ | अबब | वाहवा | ठीक | छट् | थू: | अरे | देवा | इश्श | हुर्रे |
| आहा | अरेरे | बाप रे | छान | बरं | हॅट् | श्शी | अहो | | अगंबाई | |
| ओहो | अयाई | अहाहा | मस्त | अच्छा | अं हं | हुडुत | ए | | | |
| अहाहा | हाय | अगग्गं | यंव | जी | छे छे | हुड | | | | |
| | हाय हाय | अरेच्या | खाशी | | उहूं | फुस् | रे | | | |
| | अगाई / आई गं | | फक्कड | | | हट् | | | | |
| | | | झकास | | | छा: | | | | |

**टीप :**

- केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये सामान्यतः वाक्याच्या आरंभी येतात!
- केवलप्रयोगी अव्ययापुढे नेहमी उद्गारवाचक चिन्ह (!) हवे.

**३. पुढील वाक्ये ऐकू या व वाक्यांच्या सुरुवातीला योग्य ते केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यय घालू या.**

क. ------------------! किती उंच इमारत आहे ही!

ख. ------------------! माझा फोन इथे कोणी ठेवला?

ग. ------------------! त्या एके काळच्या सुंदर घराची आता काय अवस्था झालीये!

व्याकरण

घ. ------------------! बघवत नाहीये मला तुझ्याकडे!

च. ------------------! पुढे काही बोलूच नकोस तू!

छ. ------------------! आता गप्प बसशील का?

ज. ------------------! फारच दुखतोय गं माझा पाय!

झ. ------------------! किती सुंदर देखावा आहे!

ट. ------------------! किती लागलंय तुला!



ठ. ------------------! बघ, फाटलं ना ते पत्र. तरी मी सांगत होते, ओढू नकोस!

**४. वरील वाक्ये पुन्हा ऐकून त्यांचा सराव करू या.**

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. किती घाणेरडा आहे हा परिसर!<br>श्शी! किती घाणेरडा आहे हा परिसर! | श्शी! किती घाण आहे हा परिसर! |
| किती सुंदर आहे हे चित्र! | वा! किती सुंदर आहे हे चित्र! |
| तो बघ, केवढा मोठा वाघ आहे! | बाप रे! तो बघ, केवढा मोठा वाघ! |
| ऐकलंस का मी काय म्हणतोय! | अगं! ऐकलंस का मी काय म्हणतोय! |
| खूप दुखतोय गं माझा पाय! | अयाई! खूप दुखतोय गं माझा पाय! |
| असं वागलेलं मला अजिबात चालणार नाही! | छे छे! असं वागलेलं मला अजिबात चालणार नाही! |
| आता अजिबात आवाज नकोय! | चूप! आता अजिबात आवाज नकोय! |
| छान हवा पडलीय! | आहा! छान हवा पडलीय! |
| माझ्या चपला कुठे गेल्या? | अरे! माझ्या चपला कुठे गेल्या? |
| चांगले गुण मिळवलेस हं! | शाब्बास! चांगले गुण मिळवलेस हं! |

**५. खालच्या काही घटना पाहू या. आई काय म्हणेल? तुम्ही कोणते केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यय वापरून वाक्य बनवाल?**

उदा. महेशचा नवा कोरा मोबाईल पुन्हा हरवलाय. आईला खूपच आश्चर्य वाटतंय. "परत हरवला? अरे! असा कसा परत हरवला?"

क. चिंगीने नवा कप फोडला. आई खूप रागावली आहे. कप-बशीचा नवा जोड होता. परत दुसरा मिळेल?

------------------------------------------------------------------------

ख. चिंटूने जेवण सांडून शर्ट खराब केला. कसे निघणार हे डाग?

------------------------------------------------------------------------

सराव

ग. बाबांनी सर्वांना घेऊन परदेशवारी करायचं ठरवलं आहे.

---

घ. ताईला पदोन्नती आणि पगारवाढ मिळाली!

---

च. आईची मैत्रीण रस्त्यात घसरून पडली. खूप लागलं तर नसेल?


---

## ६ शरीर, आजार आणि उपाय

**१. खालील चित्रांच्या योग्य वर्णनांशी जोड्या लावू या**


क


ख


ग


घ


च


छ


ज


झ


ट


ठ

१. शिशिरने सकाळी कपाटावर ठेवलेली मोठी ट्रंक उचलली. त्यामुळे त्याच्या कमरेत चांगलीच **लचक भरली**.

२. सीमा नेहमी झोपताना उंच उशी घेते. त्यामुळे तिची **मान** सारखी **अवघडते**.

३. राधिकाचा मागच्या आठवड्यात बॉलीवूड नृत्याचा कार्यक्रम होता. एका गाण्यासाठी तिने उंच टाचांच्या चपला घातल्यामुळे ती स्टेजवरच पडली आणि तिचा **पाय मुरगळला**.

४. काल एका तरुणीने भरधाव वेगाने दुचाकी चालवली आणि तिची दुचाकी बसला जाऊन धडकली. फार काही झाले नाही, फक्त तिच्या **हाताला खरचटले**.

५. राणीने काल दिवसभर सायकल चालवली. परंतु शहरातील वाहतूक खूप वाढली असल्यामुळे तिच्या नाकात खूप धूळ गेली. आता तिला सारख्या **शिंका येतायत**.

६. थंडीत **अंग** खूप **खाजते**.

७. संतोषची गाडी परवा रस्त्यातच बंद पडली. बराच वेळ त्याला गाडी ढकलावी लागली. त्यामुळे त्याच्या **पाठीत उसण भरली**.

८. मयूरने व्यायाम सोडल्यापासून तो पुन्हा लठ्ठ झालाय. हल्ली त्याचा **गुडघा**ही खूप **दुखतो**.

९. अरबटचरबट खाल्ल्यामुळे धनश्रीला अपचनाचा त्रास होतोय आणि पोटात कळ येतेय.

१०. प्राचीचे बाळ फारच गोंडस आहे. परंतु त्याचे **नाक** सतत **वाहत असते**. नाकातून सारखा **शेंबूड गळत असतो**.

उदा॰ क – ४ ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**२. डॉक्टरांकडे रुग्णांची खूप गर्दी झाली आहे. ते एकेकाची तक्रार ऐकून अक्षरश: एका वाक्यात उपचार सांगतायत. ते सांगत असलेले उपाय कोणकोणत्या दुखण्यांसाठी आहेत? योग्य जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| क. उसण भरलीये? | १. मग व्यायाम सुरू करा. |
| ख. धूळ आणि धुराचा त्रास झालाय? | २. पाचक औषधे घ्या. |
| ग. वजन वाढलंय? | ३. तेल लावून ते जिरवा. |
| घ. अंग आखडलंय? | ४. जखम स्वच्छ करून जंतुनाशक औषध लावा. |
| च. अपचन झालंय? | ५. मग शेक घ्या. |
| छ. सांधे दुखू लागलेत? | ६. मग वाफारा घ्या. चांगल्या पोषक आहाराने तुमची प्रतिकारशक्ती वाढवा. |
| ज. जखम झालीय? | ७. मग ताणाचे व्यायाम म्हणजेच योगासने करा. |



संध्याकाळची वेळ असल्यामुळे दवाखान्यात रुग्णांची गर्दी होती. सगळ्या खुर्च्या आणि सगळे बाक भरले होते.

काही जण जिथे मोकळी जागा होती तिथे उभेच होते. सारेच डॉक्टरांच्या बोलावण्याची वाट पाहत होते. थोडा वेळ किरकोळ बोलणे, परस्परांच्या प्रकृतीची चौकशी करणे वगैरे झाले. मग पसरली शांतता आणि सुरू राहिले केवळ वाट पाहणे... वाट पाहणे... वाट पाहणे...

अचानक एक आजोबा आपल्या काठीचा आधार घेत उठले आणि लटपटत दरवाजाकडे निघाले. जाता जाता पुटपुटले, "घरी जावं आणि नैसर्गिक रीत्या मरावं हे बरं..."

### ३. भारतीय परंपरेतील उपचारपद्धती



माझी ब्याऐंशी वर्षांची आजी पुण्यात कोणाच्याही मदतीशिवाय एकटीच राहते. नुकतीच तिच्याबरोबर एका ज्येष्ठ नागरिक संस्थेत जाण्याची संधी मिळाली. तिथे एक बाई झुंबा नाचाचे प्रकार दाखवायला आल्या होत्या. त्यांनी काही स्टेप्स दाखवल्या आणि बायकांना विचारले, "कोण येतंय माझ्याबरोबर नाचायला?" झटकन काही बायका उठून पुढे आल्या, त्यातच माझी आजीही होती. मी थक्क होऊन पाहतच राहिले. मी नंतर आजीला म्हटलं, "आजी, आई आत्ताच गुडघेदुखीनं वैतागलीय आणि माझ्यामागंही थोडंथोडं पाठीचं दुखणं लागलंय. तू मात्र ह्या वयात झुंबा करतेयस?"

आजी म्हणाली, "अगं, मला काय धाड भरलीय? नखात रोग नाही माझ्या. खेड्यात वाढलेय मी. आयुष्यभर आमच्या पिढीनं जात्यावर दळणं, विहिरीवर पाणी भरणं, वाकून केरसुणीनं केर काढणं ही सर्व कामं केली. घरच्या शेतात पिकलेलं सेंद्रिय अन्न खाल्लं. वेगळ्या व्यायामांची आणि तुमच्या पिढीसारखी आहारतज्ज्ञांचे सल्ले घेण्याची वेळ, कदाचित म्हणूनच, आली नाही आमच्यावर. हाडपेर अगदी मजबूत आहे आमच्या पिढीतल्या बहुतेकांचं."

"पण तरीही आजारी पडलंच कुणी, तर काय करायचात तुम्ही?"

"योग्य प्रकारचा आणि योग्य प्रमाणात आहार घ्यायचो. भरपूर काम आणि नियमित व्यायाम हे सूत्र आपल्या पूर्वजांनी आयुर्वेदात सांगूनच ठेवलंय. आजकाल तुम्हा लोकांना सगळं झटपट हवं असतं; त्यात नियमित काही करणं, खाण्यापिण्याच्या वेळा संभाळणं, काय आणि किती खायचं त्याचं भान ठेवणं वगैरे बसतच नाही. कसंही, कुठेही, केव्हाही ... कसली शिस्तच नाही! मग बसता, हाय न् हुय करून कण्हत!"

आजी बोलत राहिली आणि मी मान खाली घालून मुकाट ऐकत राहिले.

**क. खालील वाक्ये चूक की बरोबर ते लिहू या.**

१. खेड्यात राहणाऱ्या लोकांची नखे चांगली असतात. ------------------

२. आजीने लहानपणी नियमित योगाभ्यास केला होता. ------------------

३. आजीच्या संस्थेतील सर्व बायका नियमित झुंबा करतात. ------------------

४. बदललेल्या जीवनशैलीमुळे लहान वयातच अनेक व्याधी जडू शकतात. ------------------

५. शारीरिक कष्ट करणाऱ्यांचा नकळत योग्य तो व्यायाम होतो. ------------------

६. नियमितपणे योगाभ्यास करणाऱ्यांना चांगले आरोग्य लाभते. ------------------



माणसाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य त्याच्या आहारावर अवलंबून आहे, कारण आहारामुळेच माणसाची जडणघडण होत असते. आहारात सर्व रसांचा म्हणजे कडू, तुरट, गोड, खारट, मधुर अशा सर्व चवींचा समावेश असावा असे आयुर्वेद सांगतो. प्रकृतीला उत्तम असणारे पदार्थही कसे आणि किती प्रमाणात खावेत यावरही संशोधन आयुर्वेदात झालेले दिसते. ऋतूंनुसारही आहारात बदल करावा लागतो.

आपण कुठल्या प्रकारचे काम करतो, जीवनशैली कशी आहे या गोष्टीही आहार कसा असावा हे ठरवण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात.

भूक लागल्यावरच खाणे, भुकेपेक्षा थोडे कमी खाणे म्हणजेच पदार्थांवर ताव न मारता ऐंशी टक्के भूक भागेल एवढेच एकावेळी खाणे, आणि प्रत्येकवेळी ताजे अन्न खाणे या आहाराच्या सवयी महत्त्वाच्या आहेत.

**ख. चूक की बरोबर ते लिहू या.**

१. सर्व ऋतूंमध्ये सारखाच आहार घ्यावा. ----------------

२. भूक लागली नसेल तरी जेवणाची वेळ झाली म्हणून जेवावे. ----------------

३. माणसाचे आरोग्य त्याच्या आहारावर अवलंबून असते. ----------------

४. आहार कसा असावा हे ठरवण्यासाठी आपले काम आणि आपली जीवनशैली ह्या गोष्टींचा विचार करावा लागतो. ----------------


५. हिवाळ्यामध्ये आपली पचनशक्ती उत्तम असते. ----------------


**ग. आपल्या आहाराच्या सवयी आणि ह्या उताऱ्यात सांगितलेल्या आहाराच्या योग्य सवयी, ह्यांची तुलना करू या आणि आपल्या सवयींमध्ये कोणता बदल करायला पाहिजे, ते चार ओळींमध्ये लिहू या.**

## करा आणि शिका

**घ. दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करू या आणि खालीलपैकी एक चित्र निवडून, त्यावर संवाद सादर करू या.**






## ७ मन दुःखी तर तन दुःखी



'निरोगी शरीर हाच खरा दागिना' किंवा 'लुळ्या-पांगळ्या श्रीमंतीपेक्षा हट्टीकट्टी गरिबी बरी' असे सुविचार लहानपणी पाठ केले होते. वय वाढत गेले तसे तसे आरोग्याचे खरेखुरे महत्त्व कळू लागले. नंतर मानसशास्त्र सांगू लागले, की पोटदुखीचं कारण बऱ्याचदा पोटात नाही, तर मनात असतं. मानसोपचारतज्ज्ञ सांगू लागले, की तुम्ही तणावाखाली काम करता कामा नये. रोज नियमित व्यायाम केला पाहिजे. घरच्या जबाबदाऱ्यांचे ओझे, कामातला ताणतणाव ह्यांचा एकत्रित ताण घेता कामा नये. शरीरासाठी गोळ्या आणि औषधे घेऊन मनाकडे दुर्लक्ष करता कामा नये. निरोगी आणि शांत मन म्हणजेच आरोग्यपूर्ण शरीर हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

**१. खालील तक्त्यात दिलेल्या उदाहरणाप्रमाणे इतर प्रसंगांवरचे सल्ले लिहू या.**

| प्रसंग | काय केले पाहिजे, आणि काय करता कामा नये. |
|---|---|
| उदा. ऑफिसमध्ये बॉस सारखा ओरडत असतो, त्यामुळे रोज माझं डोकं दुखतं. | बॉस जरी ओरडला, तरी तू शांत राहिलं पाहिजेस, तू त्याचा ताण घेता कामा नयेस. |
| क. आपली नोकरी टिकावी म्हणून ती देवाला नवस बोलते. | |
| ख. समीर कधीकधी भरपूर व्यायाम करतो, नाही तर अजिबातच करत नाही. | |
| ग. ते आजोबा रहदारीतून वाट काढत रोज बागेत जातात. | |
| घ. त्या बायका हॉस्पिटलच्या दारात मोठ्याने बोलत उभ्या राहतात. | |
| च. ती माणसे स्वच्छता पाळत नाहीत, परिसर अस्वच्छ ठेवतात. | |
| छ. मुले झेब्रा पट्ट्यांवरून रस्ता ओलांडत नाहीत. | |
| ज. चहावाला चहा देताना रोज टेबलावर चहा सांडतो. | |
| झ. प्राची जातायेता सारखं खात असते. | |
| ट. मला दिवसभरात पाणी प्यायचं लक्षातच राहत नाही. | |

२. मानसिक आरोग्य ह्या विषयावरील एक चित्रफीत पाहू या.

**क. चुकीचे पर्याय खोडू या.**



१. मनाचे अवयव म्हणजे (विचार / हात / भावना / वर्तन).

२. मनाची जागा ( पोटामध्ये / हृदयात / मेंदूत) आहे.


३. डायबेटीस, हृदयविकार ह्यांसारख्या व्याधींचे मूळ कारण (मनाचा आजार / चांगला आहार / नियमित व्यायामाचा अभाव) हे असू शकते.

४. मानसिक ताणाचे शरीरावर दिसणारे परिणाम म्हणजे (डोळ्यांत पाणी येणे / हसायला येणे / छातीत धडधडणे / तोंडाला कोरड पडणे).

**ख. शरीराचे आरोग्य आणि मनाचे आरोग्य यात काय संबंध आहे ते लिहू या.**

## ८ भाषा तरुणाईची!

**१. संवाद ऐकू या व काही कळते का पाहू या.**




**२. तरुणाईच्या भाषेतील शब्दांच्या त्यांच्या योग्य अर्थाशी जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| क) लोचा झाला | १) मला खूप राग आलाय. |
| ख) जबरी | २) एखाद्या न आवडलेल्या गोष्टीवर देण्यात येणारी प्रतिक्रिया. |
| ग) आता माझी सटकली | ३) गडबड झाली. |
| घ) फाडणे | ४) एखादी गोष्ट आवडली तर देण्यात येणारी प्रतिक्रिया. |
| च) बकवास | ५) बोलणे |

**३. ह्यांतील कोणते शब्द आवडले ते सांगू या.**

४. **दोन-दोनच्या जोड्या करून हे तरुण मंडळींचे नवे शब्द वापरून संवाद करू या.**

**विषय :** आत्ताच पाहिलेला सिनेमा कसा वाटला? त्यातील नायक, नायिका, खलनायक, कथा, चित्रीकरणाची जागा वगैरे.

उदा. आज मी एक जबरी सिनेमा पाहिला...

५. **आता ह्याच भाषेत वर्गातील मित्राला किंवा मैत्रिणीला व्हॉट्सॲपवर एक संदेश पाठवू या.**



करा आणि शिका

६. **वादविवाद**

**विद्यार्थ्यांचे दोन गट करू या आणि वर्गात एकमेकांबरोबर खालील विधानांच्या मदतीने वादविवाद करू या.**

- ह्या नवीन भाषेमुळे मूळ भाषेचा ऱ्हास होतोय.
- ह्या भाषेमुळे तरुणांची सोय होते.
- ह्या भाषेमुळे पालक व इतरांची पंचाईत होते.

## ९ टॉकटाईम



अजय : अभय, तुझा टॉकटाईम संपत आलाय का रे?

अभय : नाही, एवढा मला पुरेसा आहे.

अजय : अरे, मलापण लागेल ना!

अभय : मग घे की तू स्वतःच, स्वतःपुरता!

अजय : पण तूच टॉपअप कर ना, आपल्या दोघांपुरता.

अभय : नाही. ह्यापुढे मी फक्त स्वतःपुरतं बघणार आहे. बाबा मला फक्त माझ्यापुरते पैसे पाठवतात.

अजय : अरे, पुरेसे पैसे आणि पुरेसा वेळ कुणाकडेच नसतो. असं स्वतःपुरतं पाहून चालत नाही आयुष्यात.

अभय : माझं तेच म्हणणं आहे. तूपण ह्यापुढे जरा इतरांचा विचार करत जा.

अजय : ठीक आहे मग. पुरेशी चर्चा करून झाली असली आणि पुरेसा उपदेश करून झाला असला, तर तुझा मोबाईल दे जरा. थोडा वेळच बोलतो. तुझ्यापुरता टॉकटाईम ठेवतो.

अभय : तूपण खूप हट्टी आहेस. तू काही ऐकणार नाहीस!

पुरेसा / पुरता – विशेषण / शब्दयोगी पद
adequate, enough, satisfactory – Adjective / Postposition

लक्षात ठेवा :

| तो पैसा | ती चर्चा | ते शिक्षण | ते कपडे | त्या भाज्या | ती पुस्तके |
|---|---|---|---|---|---|
| पुरेसा | पुरेशी | पुरेसे | पुरेसे | पुरेशा | पुरेशी |
| पुरता | पुरती | पुरते | पुरते | पुरत्या | पुरती |

(माझ्यापुरतं, पुरेसा (२), सामन्यापुरता, दिवसापुरता, पुरती)



निरुपमा : सोनिया, पुरेसा सराव झाला असेल तर जरा विश्रांती घेऊ या का?

सोनिया : सराव कधीच (क) ---------------- होत नाही गं! मॅचेस तोंडावर आल्या आहेत. (ख) ------------ सांगायचं, तर मला माझी तयारी झालीय असंच वाटतंय. पण कोच कधीच समाधानी नसतात ना!

निरुपमा : खरंय. मलाही वाटतंय, की उद्याच्या (ग) ---------------- सराव झाला आहे.

सोनिया : ठीकंय. (घ) ---------------- दमणूक झालीय आज. आजच्या (च) ---------------- आपण सराव थांबवू या. उद्या परत भेटू कोर्टवर, सकाळी सहा वाजता.

२. अमीनची शादी

**रिकाम्या जागी योग्य तो शब्द भरून वाक्ये पूर्ण करू या.**

(पुरती, छतापुरता, पुरेसा (४), तुझ्यापुरती, जेवणापुरता, आत्तापुरतं, तुझ्यापुरता, पोटापुरता, तुझ्यापुरत्या)



“पुरेसा पैसा जमा झाला, की मी ही नोकरी सोडणार आहे,” अमीननं जाहीर केलं. अम्मी खूपच घाबरल्या. “अरे, (क) ---------------- म्हणजे किती? अजून सगळा संसार व्हायचाय तुझा!”

“अम्मी, (ख) ---------------- म्हणजे (ग) ----------------,

दोन वेळच्या (घ) ----------------, डोक्यावरच्या (च) ----------------. शादी तर मी करणारच नाहीये. मला एकट्याला काय हवं? हो, तुझी मात्र छान व्यवस्था करून ठेवीन मी, जायच्या आधी". अम्मी आता रडायच्याच बाकी होत्या. "कुठे जाणारेस तू मला एकटीला सोडून?"

"हे बघ अम्मी, तुला अमीना आवडत नाही, मला दुसरी कोणी पटत नाही. आता मी ठरवलंय, (छ) ---------------- पैसा तुझ्याकडे देणार आणि ही नोकरी सोडून मी लांब कुठेतरी जाणार. मी तुला विचार करायला (ज) ---------------- वेळ दिला होता, पण तू ऐकतच नाहीस. (झ) ---------------- जागा तर आहे; आता सोय करायची (ट) ---------------- पैशांची. ते झालं की मी मोकळा."

"अमीन, मी तुला (ठ) ---------------- ओळखून आहे. मला तुझ्या शादीसाठी राजी करण्याचा तुझा हा नवा तरीका आहे. मी (ड) ---------------- तुला इतकंच सांगते, की जरा थांब. पुढच्या आठवड्यात मी तुला उत्तर देते."

### म्हणी आणि वाक्प्रचार


बळी तो कान पिळी

बुडत्याचा पाय खोलात

आधी पोटोबा मग विठोबा

या कानाचं त्या कानाला न कळणे

हातच्या कांकणाला आरसा कशाला?



## १० शरीराचे अवयव आणि वाक्प्रचार

**१. खालील चित्रे पाहू या आणि वाक्प्रचार ओळखू या.**

(स्वतःच्या पायावर उभे राहणे, नखाची सर नसणे, नाक मुरडणे, हात दाखवणे, बोटावर नाचवणे, काणा डोळा करणे, जिभेला हाड नसणे, तोंडात बोट घालणे, भुवया उंचावणे, कान फुंकणे, गळ्यापर्यंत येणे)

उदा. 

तोंडात बोट घालणे

अर्थ : आश्चर्यचकित होणे

क. 

-----------------------------------------

अर्थ : दुर्लक्ष करणे

ख. 

-----------------------------------------

अर्थ : नापसंती दर्शवणे

ग. 

-----------------------------------------

अर्थ : तुलना न होणे; कणमात्र सारखेपणा नसणे

घ. 

-----------------------------------------

अर्थ : स्वावलंबी होणे

च. 

------------------------------------------

अर्थ : हुकूमशाहीने वागणे

छ. 

------------------------------------------

अर्थ : बोलण्यावर नियंत्रण नसणे

ज. 


------------------------------------------

अर्थ : एखाद्याबद्दल दुसऱ्याच्या मनात वाईट गोष्टी भरवणे

झ. 

------------------------------------------

अर्थ : अनपेक्षितपणे घडलेल्या गोष्टीबद्दल आश्चर्य व्यक्त करणे

ट. 

------------------------------------------

अर्थ : सहनशक्ती संपणे / तातडीने निर्णय घेण्याची वेळ येणे

ठ. 

------------------------------------------

अर्थ : फसवणे

**२. खालील वाक्ये वाचू या. त्यांतील अधोरेखित वाक्यांच्या जागी योग्य वाक्प्रचार लिहू या.**

(स्वतःच्या पायावर उभे राहणे, नखाची सर नसणे, नाक मुरडणे, हात दाखवणे, बोटावर नाचवणे, काणाडोळा करणे, जिभेला हाड नसणे, तोंडात बोट घालणे, भुवया उंचावणे, गळ्यापर्यंत येणे)

उदा. सभेत तज्ज्ञांनी काही प्रश्न विचारले. उत्तर देण्यासाठी छोट्या गावातून आलेली एक सर्वसामान्य गृहिणी उभी राहिली, हे पाहून सर्वांना काहीसे आश्चर्य वाटले. / सर्वांच्या भुवया उंचावल्या.

क. "अगं आई, एव्हरेस्ट चढताना मी मेलो तर माझं देहदान कर."

आई म्हणाली, "वाट्टेल ते बोलतोस, तुला लाज नाही वाटत?" /

---------------------------------------------- ?

ख. तिच्यासाठी चांगले कपडे आणले, खाऊ आणला, खेळणी आणली

तरी तिला काही आनंद झाला नाही. / ---------------------------------------------.

तिला फक्त फिरायलाच जायचे होते.

ग. तो अभिनेता देखणा आहे हे ठीक; पण अभिनयाच्या बाबतीत त्याची दिलीपकुमारशी काही

तुलना होऊ शकत नाही. ----------------------------------------------.

घ. दोरावरून सरसर चढून ती वर गेली आणि अत्यंत सफाईने तिने नृत्य केले. हे पाहून सर्व

प्रेक्षक थक्क झाले. / ----------------------------------------------.

च. एका छोट्याशा गावात तो जन्मला. दुष्काळ पडला म्हणून शहरात आला आणि थोड्याच

दिवसांत कोणाच्याही आधाराशिवाय तो जगू लागला. / -----------------------------

----------------.

छ. विद्यार्थ्याने योग्य उत्तर दिले, त्यामुळे शिक्षकाने त्याच्या भाषेच्या चुकांकडे दुर्लक्ष केलं. /

----------------------------------------------.

ज. खराब रस्त्यांबद्दल जनतेच्या तक्रारी, विरोधी पक्षांची राजीनाम्याची मागणी आणि

मुख्यमंत्र्यांनी आडवळणाने सुरू केलेली चौकशी, इतकी वेळ आल्यावर मात्र / -----------

----------------------------------- मात्र मंत्रिमहोदयांनी तातडीने कामाचे आदेश दिले.

झ. ती हुशार आहे, मोठ्या पदावर काम करते, पण अधिकाराच्या जोरावर ऑफिसमधील

सगळ्यांकडून ती आपल्याला हवे तेच करून घेते. / --------------------------------

---------------.

ट. गणेशोत्सवाची वर्गणी त्या कार्यकर्त्याकडे जमा केली होती, पण त्यानं चांगलंच फसवलं. /

----------------------------------------------. तो सगळे पैसे घेऊन पळून गेला.

## ११ संभाषणकौशल्ये.

**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. सकाळी तीन लिटर पाणी पिणे, दोन तास व्यायाम करणे, एक तास पळायला जाणे, वर्षातून वीस दिवस उपवास करणे, शंभर पायऱ्या चढणे, पन्नास सूर्यनमस्कार घालणे)



पहिला विद्यार्थी : प्रकृती चांगली राहण्यासाठी मी रोज सकाळी तीन लिटर पाणी पितो.

दुसरा विद्यार्थी : काय? तीन लिटर? शक्यच नाही!

सर्व विद्यार्थी : छे छे! आमचा नाही विश्वास बसत.

पहिला विद्यार्थी : नाही, म्हणजे दोन लिटर तरी पितोच.

दुसरा विद्यार्थी : काय? दोन लिटर? शक्यच नाही!

सर्व विद्यार्थी : छे छे! आमचा नाही विश्वास बसत.

पहिला विद्यार्थी : अरे, मग एक ग्लास तरी पितोच पितो!

सर्व विद्यार्थी : हं, एक ग्लास असेल!



संभाषण

**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. देशभर प्रवास करणे – नोकरी शोधणे, चित्रपटात काम करणे – नाटकात काम करणे, विमान चालवणे – सायकल चालवणे, पुस्तक लिहिणे – हिशोब लिहिणे, परदेशात शिकणे – नोकरी करणे)



पहिला विद्यार्थी : पुढच्या वर्षी मी देशभर प्रवास करत असेन.

दुसरा विद्यार्थी : वा छान! पुढच्या वर्षी मी नोकरी शोधत असेन.

सर्व विद्यार्थी : बाप रे! नोकरीच शोधत असशील? अरेरे!


दुसरा विद्यार्थी : अच्छा? मग तुम्ही काय करत असाल?

सर्व विद्यार्थी : आम्ही ना! आम्ही मंगळावर फिरत असू.



## चिंटू




## पुणेरी पाटी

**एका दवाखान्याबाहेरील पाटी**

सांगितलेल्या सर्व तपासण्या लवकरात लवकर करून घ्याव्यात. तुमच्या सवडीने तपासण्या केल्यात, तर आमच्या सवडीनं बरं केलं जाईल.

### पहिले मराठी पाऊल

## भारताला वैद्यकीय सेवा देणारी पहिली महिला

काही तत्त्वे आणि ध्येये मनात बाळगून वेगळी वाट धरणाऱ्या व्यक्तींचे आयुष्य जगावेगळे आणि नाट्यपूर्ण असते. समाजाच्या प्रगतीसाठी बहुधा ते आवश्यकच असते. ह्या व्यक्तींनी अग्निपरीक्षा द्यायची आणि मग पुढच्या पिढ्यांनी ह्या परीक्षेची फळे चाखायची, अशी समाजरीतच झाली आहे.

डॉ. आनंदीबाई जोशी ह्या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर झाल्या खऱ्या; पण त्यासाठी त्यांनी व्यक्तिगत पातळीवर दिलेल्या परीक्षेने रुग्णसेवेची संधी मिळण्यापूर्वीच त्यांचा बळी घेतला. डॉ. रखमाबाई जनार्दन सावे (राऊत) (१८६४-१९५५) ह्यांनाही वेगळ्या प्रकारची अग्निपरीक्षा द्यावी लागली. त्या ती उत्तीर्ण झाल्या; वैद्यकीय शिक्षणातील परीक्षाही त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडली आणि आपल्या ज्ञानाचा समाजाला फायदा करून दिला. त्या अर्थाने डॉक्टर म्हणून साठ वर्षांची दीर्घ आणि लखलखीत कारकीर्द करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरतात.



एका सुशिक्षित, सुसंस्कृत आणि आधुनिक विचारांच्या कुटुंबात रखमाबाईंचा जन्म झाला. थोड्याच काळानंतर त्यांच्या वडिलांचे निधन झाले. डॉ. सखाराम अर्जुन राऊत ह्या वनस्पतिशास्त्र आणि शल्यचिकित्सा शिकवणाऱ्या प्राध्यापकांनी समाजाचा विरोध पत्करून रखमाबाईंच्या आईशी विवाह केला; छोट्या रखमाच्या शिक्षणाकडेही लक्ष दिले. रीतीनुसार तिचे नवव्या वर्षी लग्न करून दिले, परंतु वीस वर्षांची होईपर्यंत रखमा माहेरीच राहिली. सासरी जाण्याची वेळ आली तेव्हा मात्र, 'मी अज्ञान असताना लावून दिलेले हे लग्न मला अमान्य आहे', असे म्हणून तिने जाण्याचे नाकारले आणि तिथूनच तिच्या अग्निपरीक्षेला सुरुवात झाली. कोर्टकचेरी, खटले, तुरुंगवास, समाजाचा प्रखर विरोध, ह्या सगळ्यांतून जाऊनही रखमाबाई आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या.

विशेष म्हणजे त्यांचे वडील खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले. काही प्रतिष्ठित आणि पुरोगामी भारतीय तसेच इंग्रज व्यक्तींनी प्रोत्साहन दिल्यामुळे त्या वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जाऊ शकल्या. तिथे त्यांनी मुख्यतः स्त्रीरोगचिकित्सेचा अभ्यास केला.

भारतात परतल्यावर डॉ. रखमाबाईंनी सहा महिने मुंबईत आणि नंतरची साठ वर्षे सुरत येथे एका हॉस्पिटलमध्ये 'मेडिकल ऑफिसर' म्हणून काम केले. आरोग्यसेवेबरोबरच त्यांनी स्त्रीशिक्षण, बालशिक्षण, कायद्याबद्दल जाणीव जागृती अशा प्रकारचे सामाजिक कार्यही अगदी अखेरपर्यंत केले. आपल्या आजोबांच्या मालकीचे मंदिर त्यांनी अस्पृश्यांकरता खुले केले. अशा ह्या तेजस्वी आणि कणखर स्त्रीने १९५५ साली अखेरचा श्वास घेतला.

## दृष्टिक्षेप

### नामे

| | | |
|---|---|---|
| तो चवडा, ते चवडे | ती भुवई, त्या भुवया | ते बुबूळ, ती बुबुळे / ळं |
| तो गळा, ते गळे | ती मिशी, त्या मिश्या | ते नख, ती नखे / खं |
| तो कंटाळा | ती नाकपुडी, त्या नाकपुड्या | ते हाडपेर, ती हाडपेरे / रं |
| तो त्रास, ते - | ती (कानाची) पाळी, त्या पाळ्या | ते आश्चर्य, ती आश्चर्ये / र्यं |
| तो तटस्थपणा | ती पोटरी, त्या पोटऱ्या | ते मलम, ती मलमे / मं |
| तो अचंबा | ती टाच, त्या टाचा | ते दुर्दैव, |
| | ती हनुवटी, त्या हनुवट्या | ते जाते / तं, ती जाती |
| | ती पाठ, त्या पाठी | ते जुळे / ळं, ती जुळी |
| | ती बेंबी, त्या बेंब्या | |
| | ती मान, त्या माना | |
| | ती कंबर, त्या कंबरा | |
| | ती खंत, त्या खंती | |
| | ती घृणा | |
| | ती पदोन्नती, - | |
| | ती सुदृढता, - | |
| | ती उपचारपद्धती, त्या - | |
| | ती झळाळी | |
| | ती केरसुणी, त्या केरसुण्या | |

### क्रियापदे

खरचटणे शिंकणे खाजणे दुखणे ठोठावणे झटणे उकलणे बिथरणे

### विशेषणे / क्रियाविशेषणे

दुर्मीळ ओणवे सेंद्रिय ख्यातनाम अकाली

### नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination

| नाम + क्रियापद Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. झोप काढणे / घेणे | दुपारी दोन तास मी छान झोप काढली आणि ताजातवाना झालो. |
| २. उपास करणे | शलाका आज काही खाणार नाही कारण दर गुरुवारी ती उपास करते. |
| ३. साथ देणे | कितीही संकटं आली तरी मी तुला साथ देईनच. |
| ४. कोडे उकलणे | जागतिक हवामान बदलाचे कोडे उकलणे शास्त्रज्ञांनाही अशक्य वाटू लागले आहे. |
| ५. कष्ट घेणे | मराठी बोलण्यासाठी विद्यार्थ्यांनी रोज दोन तास सराव करण्याचे कष्ट घेतले. |
| ६. घृणा येणे / वाटणे | व्यसनी व्यक्तीची सगळ्यांनाच घृणा वाटते. |
| ७. उद्गार काढणे | सानिकाने मिळवलेल्या यशामुळे शिक्षकांनी तिच्याविषयी कौतुकाचे उद्गार काढले. |
| ८. नाक वाहणे | सर्दी झाल्यामुळे रसिकाचे नाक सारखे वाहत होते. |
| ९. लचक भरणे | भराभरा वाकून कामे केल्यामुळे रसिकाच्या कमरेत लचक भरली. |
| १०. कळ येणे / उठणे / मारणे | बाहेरचे अबरचबर खाल्ले की पोट बिघडून पोटात कळ येते. |
| ११. व्याधी जडणे | मन शांत नसेल तर झोप न येण्याची व्याधी जडते. |
| १२. आरोग्य लाभणे | आमच्या बाबांना इतके चांगले आरोग्य लाभले आहे, की वयाच्या नव्वदीतही त्यांना कोणतीही व्याधी नाही. |
| १३. उपदेश करणे | नील म्हणाला, “बाबा, मला सारखा उपदेश करू नका हो!” |
| १४. धाड भरणे | संदेश रोहनला म्हणाला, “तुला काय धाड भरली आहे! तू अजून खूप जगणार आहेस.” |

### इतर शब्द व क्रियापद जोड्या Other words and Verb combinations

| इतर शब्द + क्रियापद Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. उत्सुक असणे | आज सगळं गाव आमिर खानला भेटायला उत्सुक आहे. |
| २. भारावून जाणे | इंडोतिबेट सीमेवर बर्फात राहणाऱ्या जवानांना भेटलो आणि आम्ही भारावून गेलो. |
| ३. संपत येणे | दिव्यातलं तेल संपत आलं त्यामुळे दिव्याची ज्योत फडफडू लागली. |
| ४. दाटून येणे | खूप वर्षांनी मुलीला भेटल्यावर आईचा गळा दाटून आला. |
| ५. गप्प बसणे | आई अनुजाला रागवली तरी एक शब्दही न बोलता अनुजा गप्प बसली. |
| ६. मागे लागणे | लग्नासाठी आई अनुजाच्या सारखी मागे लागते. |

## आता मला हे येतं...

**शरीराचे अवयव**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**अपूर्ण भविष्यकाळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**दोघी – दोन्ही**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**जुळ्यांची गंमत, 'जुळ्याचं दुखणं'**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**केवलप्रयोगी अव्यये**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शरीर : आजार आणि उपाय, भारतीय परंपरेतील उपचारपद्धती : आयुर्वेद आणि योग**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**करता कामा नये, केले पाहिजे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**युवा भाषा**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शब्दयोगी पदे : पुरेसा, पुरता**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# पर्यावरण ५







## चला, शिकू या...

- पर्यावरण, समस्या आणि उपाय ह्यांविषयी बोलणे
- पूर्ण भविष्यकाळ
- तापमान, हवामान ह्यांविषयी बोलणे
- शब्दयोगी पदे : ऐवजी, पैकी
- पाण्याशी संबंधित क्रियापदे : सांडणे, शिंपडणे, लवंडणे इ.
- 'तून' / 'आतून' ह्या प्रत्ययांचा वापर
- लहानसा, छानसा, छोटासा इ.

## १ पर्यावरण

**१. मागील पानावरील चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

- चित्रांमध्ये पर्यावरणाचे कोणते पैलू दिसत आहेत?
- चित्रांमध्ये पर्यावरणाची आजची काय परिस्थिती दिसत आहे? ह्या परिस्थितीला तुमच्या मते कोणती कारणे जबाबदार आहेत?
- माणसाची प्रगती आणि पर्यावरणाचा ऱ्हास ह्यांच्यातला संबंध काय?

**२. रवींद्रनाथ टागोर ह्यांची एक कविता पुढे दिली आहे. ती ऐकून रिकाम्या जागा भरू या.**

आम्ही ------------- बघू, आम्ही ------------- बघू
आम्ही ------------- बघू, आम्ही ------------- बघू
आम्ही आकाश बघू ...

हे -------------, हे -------------, हे -------------,
------------- ज्यांनी दिले, आम्ही त्याला स्मरू, आम्ही आकाश बघू ...

तो ------------- अन् देतच राहतो -------------
तो अमुचा ------------- आम्ही आकाश बघू ...

हे नाही ते नाही, ------------- नाही
दुःखावरही आम्ही ------------- च करू , आम्ही आकाश बघू ...

- रवींद्रनाथ टागोर

क. तुम्ही ऐकलेल्या गाण्यामध्ये निसर्गातल्या कोणत्या गोष्टींचा उल्लेख झाला आहे?

ख. ह्या गोष्टी कोण निर्माण करतो? त्या देणाऱ्याला ह्या गाण्यामध्ये काय म्हटले आहे?

ग. 'ज्यांनी दिले, आम्ही त्याला स्मरू' ह्या ओळीचा तुमच्या मते काय अर्थ आहे?



३. **पर्यावरण ह्या विषयाशी संबंधित शब्दांची यादी तयार करू या.**




४. **खालील शब्दांचे अर्थ शब्दकोशात शोधू या आणि त्यांची दिलेल्या विषयांनुसार खालील तक्त्यात वर्गवारी करू या.**

झाडे, नदी, लोकसंख्या वाढ, समुद्र, प्रदूषण, पाने, ज्वालामुखी, फांद्या, पक्षी, पशू, आर्द्रता, पाणी, धुके, धूर, वाहतूक, पेट्रोल, ऊर्जा, सेंद्रिय शेती, जागतिक तापमानवाढ, कीटक, जंतू, वनस्पती, कचरा, ओलावा, इमारती, भूकंप, कारखाने, माती, प्राणवायू, दुष्काळ, पाऊस, वाघ, उष्मा, हवा, दव, गवत, हिरवळ, पृथ्वी, ध्वनिप्रदूषण, अणुऊर्जा, प्लास्टिक, गाय, डोंगर, जंगल, शहरीकरण, औद्योगिकीकरण, वृक्षतोड, प्राणी, स्वच्छता, ऋतुचक्र, अण्वस्त्र चाचणी, नैसर्गिक साधनसंपत्ती, हवामान, इंधन, कृतघ्नपणा, जैवविविधता

| निसर्ग | पर्यावरणाचा ऱ्हास |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

## करा आणि शिका

**५. निसर्गचित्र काढू या.**



क. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे दोन गट करू या. एक गट दुसऱ्या गटाला निसर्गचित्र काढण्यासाठी सूचना करेल आणि दुसरा गट फळ्यावर किंवा एका कागदावर निसर्गचित्र काढेल. पहिला गट हे काढलेले चित्र आपल्या सूचनांशी जुळणारे आहे का ते पाहील. आता खालील मुद्द्यांच्या मदतीने चर्चा करू या.

निसर्गाचे सौंदर्य     प्रकृती आणि संस्कृती     निसर्ग आणि आरोग्य

निसर्गाचे आपल्या जीवनातील स्थान

निसर्गातले माणसाचे स्थान     निसर्ग आपल्याला काय काय देतो?

मला शहराच्या गजबजाटापासून दूर, एखाद्या शांत, स्वच्छ आणि हिरव्यागार परिसरात राहायला आवडते.

निसर्गातील संसाधने उपलब्ध असणे, हेच माझ्यासाठी निसर्गाचे सौंदर्य!

निसर्ग आपल्याला शुद्ध हवा, पाणी आणि पाऊस देतो, प्राणवायू देतो. ह्या सगळ्या फुकट मिळणाऱ्या सेवा सतत मिळत राहाव्यात, असे मला वाटते.

शेवटी मीही निसर्गाचाच एक भाग आहे. आज मी निसर्ग नष्ट केला, तर उद्या मीही नष्ट होईन.

**ख. आता दुसरा गट पहिल्या गटाला 'निसर्गाचा ऱ्हास' ह्या विषयासंबंधी सूचना करेल आणि पहिला गट आधीच्या चित्रामध्ये त्यानुसार बदल करेल. नंतर दोन्ही गट त्या चित्रावर खालीलपैकी दोन मुद्दे वापरून चर्चा करतील.**

मानवजातीची प्रगती म्हणजे काय आणि तिचा निसर्गाच्या विनाशाशी काय संबंध आहे?

पर्यावरणाचा ऱ्हास होतोय.     माणसाची प्रकृती पृथ्वीच्या प्रकृतीवर अवलंबून आहे.

आपण पुढच्या पिढीला प्रदूषण, जंगलतोड हा वारसा देणार आहोत का?

मंगळावर आणि चंद्रावर जाऊन राहायची वेळ आलीये आता.

\- - - - - - - - - - - - - -

भुईवर आली सर
सर श्रावणाची,
भुईतून आली वर,
रुजव वाळ्याची

भुईवर आली खार
खार धिटाईची,
भुईतून कणसांत
चव मिठाईची.

भुईवर आली उन्हें
उन्हें पावसाची,
पायीं तुझ्यामाझ्या भुई
चिक्कणमातीची.

\- आरती प्रभू

\- - - - - - - - - - - - - -

आता ह्या एकाकी उन्मळून पडलेल्या
झाडाचं
काय करायचं?

आधी झाडावर असलेली काही फुलं
परडीत गोळा करून
देवघरात ठेवून द्यावीत.

पानांचे हिरवेगार शब्द
बाजूच्या मातीत खोलवर पुरून ठेवावेत

आणि खुणेसाठी
वर एखादा दगड ठेवून द्यावा.

आता उरलंय ते खोड आणि फांद्या.
खोडाचा एखादा झोपाळा करून घ्यावा,
आपल्या बागेत बरा वाटेल;

आणि फांद्यांचे जाड जाड रूळ
स्वतःच्याच तळहातावर
सटासट ओढण्यासाठी ...

\- रवींद्र लाखे



क. वरील कवितांना शीर्षक देऊ या.

ख. वरील कवितांमध्ये झाडांचे कोणकोणते भाग सांगितले आहेत? (उदा. पान...)

ग. झाडांचे कोणते गुण कवितांमध्ये मांडले आहेत?

घ. आपल्याला कोणती कविता आवडली? का?

### करा आणि शिका

**च. चार ते पाच विद्यार्थ्यांचा गट करू या आणि कोणतीही एक कविता पाठ करून नाट्यरूपात सादर करू या.**

करा आणि शिका

**७. खालील बातम्या वाचू या आणि त्यांना योग्य शीर्षके देऊ या.**

**(क)** ------------------



शहरातील पर्यावरणाबाबतच्या समस्यांचा शोध घ्यावा, त्यावर उपाययोजना करण्यासाठी नागरिक, प्रशासन, स्वयंसेवी संस्था ह्यांनी एकत्र यावे आणि एक सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, असे मत कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केले. पुण्यात साखर संकुल, शिवाजीनगर येथे पर्यावरणावर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील पर्यावरणाची स्थिती अतिशय गंभीर व चिंताजनक आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण व विकास ह्यांच्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जलप्रदूषण, वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण वाढले आहे. त्याचा दुष्परिणाम भावी पिढीवर होणार आहे. त्यामुळे पर्यावरणाचे बिघडलेले संतुलन पूर्ववत करण्यासाठी आता जनतेमधून पर्यावरण जनजागृतीची व्यापक चळवळ उभी राहिली पाहिजे. पाण्याची बचत न केल्यास रेशनवर पाणी विकत घेण्याची वेळ येईल, अशी भीती पर्यावरणतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

**(ख)** ------------------




शहरातील तयार होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावणे, हे एक मोठे आव्हान आहे. एका जपानी स्वयंसेवी संस्थेने औरंगाबाद महापालिकेला ह्यासंबंधी मार्गदर्शन केले. कुजणारा व न कुजणारा कचरा असे कचऱ्याचे दोन प्रकार आहेत. न कुजणाऱ्या कचऱ्यावर योग्य ती प्रक्रिया करून तो पुनर्वापरात येऊ शकतो. तसेच कुजणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून ऊर्जानिर्मिती करणे शक्य आहे, अशी माहिती जपानी पर्यावरणतज्ज्ञांनी दिली. ओल्या आणि सुक्या कचऱ्याचे घरातच वर्गीकरण करून तो वेगवेगळ्या कचराकुंड्यांत टाकण्याची शिस्त प्रत्येकाला लावली पाहिजे, असे पालिका आयुक्तांनी सुचवले. ओल्या कचऱ्यामध्ये खराब फळे, भाज्या, उरलेले अन्न, अंड्यांची टरफले, नारळ, शहाळी, हाडे अशा विघटन होणाऱ्या गोष्टींचा समावेश होतो, तर सुक्या कचऱ्यामध्ये प्लास्टिकच्या पिशव्या, रबर, थर्मोकोल, काचेच्या वस्तू, बॅटरी सेल, धातू, खिळे अशा गोष्टींचा समावेश होतो. ओला व सुका कचरा वेगवेगळा करून द्यावा, अशा नोटिसा पालिका क्षेत्रातील सोसायट्या, हॉटेले, व्यापारी संस्था ह्या सर्वांनाच पाठवण्यात आलेल्या आहेत. ज्या सोसायट्या वर्गीकरण करून कचरा देत नाहीत, त्यांचा कचरा उचलला जाणार नाही, असेही सांगण्यात आले आहे.

**(ग)** ------------------



आंतरराष्ट्रीय हवामानदिनाच्या निमित्ताने तज्ज्ञांनी काही निरीक्षणे नोंदवली. आजकाल वातावरणात सतत बदल होत असतात. पावसाळ्यातसुद्धा उकाडा जाणवतो. थंडीच्या दिवसांत क्वचितच कडाक्याची थंडी असते. निसर्गनियमांचे काटेकोर पालन केले तरच पर्यावरण वाचवता येणे शक्य आहे. संवर्धन आणि संहार ह्यांपैकी कशाला आपण प्राधान्य देतो, ह्यावरच पर्यावरणाचे संरक्षण अवलंबून आहे. जगाची वाटणी श्रीमंत देश आणि अविकसित गरीब देश अशा दोन गटांत करण्यात येते. विकसित देश नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर दरडोई खूपच जास्त करतात, परंतु तेथील लोकसंख्या मर्यादित आहे. ह्याउलट, अविकसित देशांत गरिबी व मोठी लोकसंख्या, ह्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर कमी असूनही पर्यावरणाचा ऱ्हास जास्त होत आहे. पर्यावरणाचे रक्षण की गरिबीचे निर्मूलन ह्या पेचात हे देश सापडले आहेत. कारण बेरोजगारीवर मात करण्यासाठी औद्योगिकीकरण आणि वाढत्या लोकसंख्येसाठी जंगलतोड करणे भाग आहे, असे बहुतेक सर्व तज्ज्ञांचे मत होते.

**८. उताऱ्यामधील काही वाक्यांची रचना बदलून ती पुढे दिली आहेत. कंसातील योग्य पर्याय निवडू या आणि रिकाम्या जागा भरू या.**

क. शहरातील पर्यावरणास हानिकारक ठरणारे प्रश्न व समस्यांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी नागरिक, प्रशासन, स्वयंसेवी संस्था ह्यांनी एकत्र येऊन एक सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, असे मत कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केले.

(पाहिजे, केला, त्यांनी, शोधून, पाहिजे, मते, आले)

कायदेतज्ज्ञांच्या मते नागरिक, प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्र (१) ------------

(२) ------------ आणि पर्यावरणास हानिकारक ठरणारे प्रश्न (३) ------------ त्यावर

उपाययोजना करण्यासाठी (४) ------------ एक आराखडा तयार (५) ------------

(६) ------------.

ख. ज्या सोसायट्या वर्गीकरण करून कचरा देत नाहीत, त्यांचा कचरा उचलण्यात येणार नाही, असेही सांगण्यात आले.

(नाही तर, जाणार, सोसायट्यांनी, द्यावा)

(१) ------------ वर्गीकरण करूनच कचरा (२) ------------, (३) ------------ त्यांचा

कचरा उचलला (४) ------------ नाही, असेही सांगण्यात आले.

**९. वरील तीन बातम्या पुन्हा वाचू या आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

क. पर्यावरणाच्या चिंताजनक स्थितीसाठी जबाबदार असलेली तीन कारणे कोणती?

ख. प्रदूषणाचे तीन प्रकार कोणते?

ग. जपानी पर्यावरणतज्ज्ञांनी कचऱ्यासंबंधी कोणती माहिती दिली?

घ. अविकसित देशांना पर्यावरणाचे रक्षण करणे का अवघड जाते? तुम्हाला ते पटते का?

**१०. दोन दोन विद्यार्थ्यांचे गट करू या आणि पर्यावरण संरक्षणासाठी घोषवाक्य तयार करू या.**

उदा. पर्यावरणाचे करा जतन, ...

पर्यावरणाचे करा जतन, ह्यातच सर्वांचे संरक्षण.

क. वृक्ष बोले माणसाला...

ख. प्राणी हे माणसाचेच मित्र...

ग. जेथे पक्षी उदंड, ...

घ. झाडे लावा, ...

च. निसर्ग नका हरवू, ...

छ. निसर्गाचा नाश म्हणजे...

ज. परिसर स्वच्छ ठेवाल, ...

झ. निसर्ग, प्राणी, पक्षी आहेत सर्वांचे, ...






## २ पर्यावरण समस्या आणि उपाय

**१. सापशिडी खेळू या.**

हा खेळ दोन किंवा जास्त विद्यार्थी एकत्र खेळू शकतात. त्यासाठी फासे आणि प्रत्येक खेळाडूसाठी पटावर खेळण्यासाठी एखादे नाणे लागेल. प्रत्येक खेळाडू फासे टाकेल. फासे टाकल्यावर जी संख्या मिळेल तेवढी घरे नाणे पुढे सरकवावे.

**बक्षीस** - तुम्ही शिडीच्या खालच्या टोकावर आलात तर चढून वरच्या टोकावर जाल.

**शिक्षा** - सापाच्या तोंडाशी आलात तर घसरून शेपटीच्या टोकाला पोहचाल




तुम्ही केलेल्या चांगल्या कामासाठी बक्षीस आणि चुकांसाठी शिक्षा अशी मिळेल :
(४) भाजीसाठी दुकानदाराने प्लास्टिकची पिशवी दिली, पण तुम्ही ती न घेता पुन्हा घरी जाऊन कापडी पिशवी आणलीत. (९) घरातला नळ गळतोय. तुम्ही ताबडतोब प्लंबरला बोलावलंत. (१७) तुम्ही एकाच बादलीमध्ये ओला आणि कोरडा कचरा टाकता. (२०) तुमच्या घराजवळच फास्टफूडची टपरी आणि एक बेकरी आहे. पण तुम्ही घरीच काहीतरी करून खाल्लंत. (२८) तुमच्या घरापासून ऑफिस १० कि.मी. वर, मुलाची शाळा ८०० मीटरवर, जिम ५०० मीटरवर, किराणामालाचं दुकान २०० मीटरवर आणि पुस्तकाचं दुकान १ कि.मी. वर आहे. तुम्ही ऑफिसव्यतिरिक्त इतर सर्व ठिकाणी चालत जाता. (४०) घरातून निघताना तुम्ही नेहमी पंखे, नळ, दिवे बंद केले आहेत ह्याची खात्री करता. (५१) तुम्ही गाडीतून जाताना रिकामी झालेली खाद्यपदार्थांची खोकी नेहमी घरी नेऊन कचऱ्याच्या बादलीत टाकता.

(५४) तुमच्या वाटेवरचं एक झाड तोडण्यासाठी माणसं आलेली तुम्ही बघता आणि तसेच पुढे जाता. (६२) नाटक चालू असताना तुमचा मोबाईल वाजतो, तुम्ही तो उचलता आणि मोठ्या आवाजात बोलता. (६३) रेल्वे प्रवासात तुम्ही तुमचा कचरा सीटखाली पिशवीत साठवून उतरल्यावर जवळच्या कचरापेटीत टाकता. (६४) एटीएममधून पैसे काढताना तुम्ही त्याची पावतीही घेता. (७१) सुंदर, रंगीत लग्नपत्रिका, आमंत्रणपत्रिका जमल्यावर त्यांचे तुम्ही पुस्तकात खूण म्हणून ठेवण्यासाठी, पाकिटे तयार करण्यासाठी किंवा चहाचे कप ठेवण्यासाठीचे चौकोनी तुकडे तयार करता. (८७) तुम्ही पाण्याची प्लास्टिकची बाटली रिकामी झाली, की ती नेहमी रस्त्याच्या कडेला फेकून देता. (९३) तुम्हाला सुट्टीच्या दिवशी एकट्यानं लांबवर फिरायला जायचं आहे. उत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असूनही तुम्ही स्वतःच्या चारचाकीनं जाता. (९५) तुम्हाला झाडं लावण्याच्या उपक्रमात सहभागी व्हायचं होतं, पण वेळ झाला नाही म्हणून तुम्ही गेला नाहीत. (९९) तुम्ही सहलीला जाताना खाण्यासाठी प्लेट्स नेल्या होत्या. पण वापरल्या नंतर कचरापेटी सापडली नाही म्हणून तुम्ही त्या तिथेच एका कोपऱ्यात टाकून दिल्या.

**क. वरील खेळात सांगितलेल्या पर्यावरणासाठी उपयुक्त आणि हानिकारक अशा कोणत्याही पाच कृती सांगू या.**

**ख. ह्या कृती पर्यावरणासाठी का उपयुक्त किंवा का हानिकारक आहेत, त्यावर चर्चा करू या.**

उदा. प्लास्टिकची पिशवी वापरणे पर्यावरणासाठी अत्यंत हानिकारक आहे, कारण प्लास्टिकमुळे जमीन नापीक होते, हवा दूषित होते आणि गटारेही तुंबतात...

**२. खालीलप्रमाणे वाक्ये लिहू या.**

उदा. गाडीच्या धुरामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी मी गाडीची वेळेवर सर्विसिंग करतो.



क. (गाडी – धुरामुळे होणारे प्रदूषण – कमी करणे) (गाडीची वेळेवर सर्विसिंग करणे)

ख. (नाटक चालू असताना – मोबाईलचा आवाज – न होणे ) (नाट्यगृहात मोबाईल बंद ठेवणे)

ग. (जुन्या वृत्तपत्रांचा पुनर्वापर करणे) (त्यांच्या पिशव्या तयार करणे)

घ. (वापरलेल्या पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटलीचा पुनर्वापर करणे) (तिचा झाडे लावण्यासाठी कुंडी म्हणून वापर करणे)

च. (पाणी – वाचवणे) (पावसाचे पाणी साठवणे)

छ. (गीझरचा गैरवापर – टाळणे) (सौरऊर्जेवर चालणारा गीझर वापरणे)

ज. (ध्वनिप्रदूषण आटोक्यात आणणे) (लोकांना ध्वनिप्रदूषणाचे तोटे समजावून सांगणे)




### म्हणी आणि वाक्प्रचार

- ऊन आणि सावलीसारखे एकत्र राहणे
- दुरून डोंगर साजरे
- थेंबे थेंबे तळे साचे
- कावळा बसायला आणि फांदी तुटायला एकच गाठ
- दृष्टिआड सृष्टी
- इकडे आड, तिकडे विहीर
- दुष्काळात तेरावा महिना
- एखाद्याला पाण्यात पाहणे

## ३ एक रेड इंडियन वचन

### १. पर्यावरणाची हानी आणि माणसाचे भविष्य

तंत्रज्ञानाच्या हव्यासापोटी सर्व प्रकारचे प्रदूषण होत आहे. वेळीच पावले उचलली नाहीत, तर पुढे मोठ्या संकटांना सामोरे जावे लागेल.




**जलप्रदूषण** : कारखाने, घरातील सांडपाणी, शेतीसाठी वापरली जाणारी रासायनिक खते ही आपल्याला उपलब्ध असणारे पाणी प्रदूषित करत आहेत. ह्याला वेळीच आवर घातला नाही, तर आजपासून पन्नास वर्षांत पिण्याचे शुद्ध पाणी मिळणे अशक्य झाले / झालेले असेल.





**वायुप्रदूषण** : कारखान्यांची धुराडी, मोटारगाड्यांची इंजिने, जाळलेला जैविक कचरा ह्या सर्व गोष्टी वातावरण मोठ्या प्रमाणात प्रदूषित करत आहेत. हे थांबवले नाही, तर काही वर्षांत वातावरणातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण मर्यादेबाहेर वाढले / वाढलेले असेल.

२. **मनुष्याने वेळीच खबरदारी घेतली नाही तर भविष्यात त्याच्यावर कोणती संकटे येऊ शकतील? उदाहरणाप्रमाणे वाक्ये लिहू या.**

उदा. भविष्यात पिण्याचे शुद्ध पाणी मिळणे अशक्य झालेले असेल.

क. ----------------------------------------------------------------------------------

ख. ----------------------------------------------------------------------------------

ग. ----------------------------------------------------------------------------------

घ. ----------------------------------------------------------------------------------

च. ----------------------------------------------------------------------------------

३. **ह्या सर्व घटना कोणत्या काळात पूर्ण होत आहेत? बरोबर उत्तर अधोरेखित करू या.**

क. भूतकाळ    ख. भविष्यकाळ    ग. वर्तमानकाळ

**पूर्ण वर्तमानकाळ, पूर्ण भूतकाळ, पूर्ण भविष्यकाळ**

**पूर्ण भविष्यकाळ    Future Perfect Tense**

'आजपासून पन्नास वर्षांत पिण्याचे शुद्ध पाणी मिळणे अशक्य झाले / झालेले असेल', ह्या वाक्यातील होण्याची क्रिया भविष्यकाळात पूर्ण झालेली असेल, असे ह्या संयुक्त क्रियापदावरून समजते.

**पुढील वाक्ये पाहू या.**

| श्रीने लाडू खाल्ला / खाल्लेला आहे. | श्रीने लाडू खाल्ला / खाल्लेला होता. | श्रीने लाडू खाल्ला / खाल्लेला असेल. |
|---|---|---|
| खाण्याची क्रिया वर्तमानकाळात पूर्ण झाली आहे, म्हणून हा **पूर्ण वर्तमानकाळ** आहे. | खाण्याची क्रिया भूतकाळात पूर्ण झाली, म्हणून हा **पूर्ण भूतकाळ** आहे. | खाण्याची क्रिया भविष्यकाळात पूर्ण झालेली असेल, म्हणून हा **पूर्ण** ---------- आहे. |

**पूर्ण भविष्यकाळ : कर्ता आणि कर्म**

**अ :** काय रे, उद्या ह्या वेळेला तू कुठे असशील? जेवत असशील का? मला तुझ्याशी महत्त्वाचं बोलायचं आहे.

**ब :** नाही रे! हल्ली मी लवकर जेवतो. उद्या ह्या वेळेला मी जेवलो / जेवलेलो असेन. तू कर फोन मला.

**अ :** काय रे, उद्या ह्या वेळेला तू कुठे असशील? काम करत असशील का? मला तुझ्याशी महत्त्वाचं बोलायचे आहे.

**ब :** नाही रे! हल्ली मी लवकर काम संपवतो. उद्या ह्या वेळेला मी माझं काम पूर्ण केलं / केलेलं असेल. तू कर फोन मला.



| **पूर्ण भविष्यकाळ (अकर्मक)**<br>**Future Perfect Tense (Intransitive)** | **पूर्ण भविष्यकाळ (सकर्मक)**<br>**Future Perfect Tense (Transitive)** |
|---|---|
| तो जेवला असेल | त्याने सिनेमा पाहिला असेल |
| तो झोपला असेल | त्याने कविता वाचली असेल |
| तो उठला असेल | त्याने जेवण केले असेल |



**४. आता वरील तक्त्यामध्ये लक्षात आलेला नियम वापरून खालील तक्ता पूर्ण करू या.**

| **पूर्ण भविष्यकाळ (अकर्मक)** | **पूर्ण भविष्यकाळ (सकर्मक)** |
|---|---|
| नाचून नाचून मी (पु.) खूप (दमणे) दमलो / दमलेलो असेन. | माझा नाच खूप लोकांनी (पाहणे) --------------- असेल. |
| उद्या सकाळी १० वाजता मी (पु.) त्या गावात (पोहचणे) -------------- ------------ . | शाळेसमोर विद्यार्थ्यांनी मोठी रांग (लावणे) --------------- --------------- . |
| ती रागावून बाहेर (पडणे) ------------ ---------------. | मुलांनी नवं पुस्तक (वाचणे) ------------ ---------------. |

क्रियापदांची रूपे

| | | |
|---|---|---|
| • अकर्मक क्रियापद<br>Intransitive Verb | पूर्ण भविष्यकाळ<br>Future Perfect Tense | कर्त्याप्रमाणे<br>Conjugation according to the Subject |
| उदा. मी जेवलो असेन. | ती जेवली असेल. | त्या जेवल्या असतील. |
| • सकर्मक क्रियापद<br>Transitive Verb | पूर्ण भविष्यकाळ<br>Future Perfect Tense | कर्माप्रमाणे<br>Conjugation according to the Object |
| उदा. मी लेख वाचला असेल. | मी कविता वाचली असेल. | मी पत्र वाचले असेल. |

**५. पूर्ण भविष्यकाळ : (अकर्मक क्रियापद 'जाणे')**

| | |
|---|---|
| मी | गेलो / गेलेलो असेन<br>गेले / गेलेली असेन |
| आम्ही / आपण | गेलो / गेलेलो ------------ |
| तू | गेला / गेलेला असशील |
| तू | गेली / गेलेली ------------ |
| तुम्ही / आपण | गेला / गेलेला असाल |
| तो | गेला / गेलेला असेल |
| ती | गेली / गेलेली ------------ |
| ते | गेले / गेलं – गेलेले / गेलेलं असेल |
| ते | गेले / गेलेले असतील |
| त्या | गेल्या / गेलेल्या असतील |
| ती | गेली / गेलेली ------------ |




**पूर्ण भविष्यकाळ : (सकर्मक क्रियापद 'वाचणे')**
**Future Perfect Tense: (Transitive Verb: 'to read')**

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण, तुम्ही / आपण / | ए.व.<br>अ.व. | लेख वाचला असेल<br>लेख वाचले असतील | कविता वाचली असेल.<br>कविता वाचल्या असतील. | पत्र वाचले असेल.<br>पत्रे वाचली असतील. |
| तू | ए.व.<br>अ.व. | लेख वाचला असशील<br>लेख वाचले असशील | कविता वाचली असशील<br>कविता वाचल्या असशील | पत्र वाचले असशील<br>पत्रे वाचली असशील |
| त्याने / त्यांनी, तिने / त्यांनी, त्याने / त्यांनी | ए.व.<br>अ.व. | लेख वाचला असेल<br>लेख वाचले असतील | कविता वाचली असेल.<br>कविता वाचल्या असतील. | पत्र वाचले असेल.<br>पत्रे वाचली असतील. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ (मी) – झाडांना पाणी घालणे.<br>मी झाडांना पाणी घातले असेल. | (मी) – झाडांना पाणी घालणे.<br>मी झाडांना पाणी घातले असेल. |
| आम्ही / आपण | आम्ही / आपण झाडांना पाणी घातले असेल. |
| तू | तू झाडांना पाणी घातले असशील. |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण झाडांना पाणी घातले असेल. |
| तो | त्याने झाडांना पाणी घातले असेल. |
| ती | तिने झाडांना पाणी घातले असेल. |
| ते | त्याने झाडांना पाणी घातले असेल. |
| ते | त्यांनी झाडांना पाणी घातले असेल. |
| त्या | त्यांनी झाडांना पाणी घातले असेल. |
| ती | त्यांनी झाडांना पाणी घातले असेल. |

सराव

**६. अ. संवाद ऐकून रिकाम्या जागा भरू या.**



शर्वरी : काय रे आनंद, कसं चाललंय तुझं पर्यावरण संवर्धनाचं काम?

आनंद : मस्त चाललंय. पुढच्या काही वर्षांत आमचं बरंच काम झालेलं असेल.

शर्वरी : अरे वा! मला सांग ना, तुम्ही नेमकं काय काय (क) ------------------------------------ ते?

आनंद : म्हणजे बघ, आम्ही नागरिक, प्रशासन आणि इतर स्वयंसेवी संस्था, असे सगळे एकत्र येऊन एक सर्वसमावेशक आराखडा तयार करतोय. महिन्याभरात आमचा तो आराखडा तयार (ख) ------------------------------------. शिवाय, आम्ही ठिकठिकाणी जाऊन लोकांना पर्यावरणाचं महत्त्व समजावून सांगतो आहोतच. पुढील काही वर्षांत जनतेमधून पर्यावरण जनजागृतीची एक व्यापक चळवळ उभी (ग) ------------------------------------. जलप्रदूषण, वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण आम्ही आटोक्यात (घ) ------------------------------------. आम्ही शाळांमधल्या मुलामुलींना झाडं लावण्यासाठी प्रोत्साहन देतोय. येत्या काही वर्षांत त्यांनी शहरभर लाखो झाडं (च) ------------------------------------.

शर्वरी : छान. तुमचं करावं तेवढं कौतुक कमीच आहे. मीपण वेळ काढून तुला मदत करायची असं ठरवलंय.

**आ. आता संवाद पुन्हा ऐकू या व शर्वरीची वाक्ये आपण बोलू या.**

**७. काही वर्षांनी काय झालेले असेल? रिकाम्या जागा भरू या.**



मानवाकडून होत असलेल्या निसर्गाच्या शोषणाने आता हद्द ओलांडली आहे. हे असेच चालू राहिले, तर भविष्यात पृथ्वीच्या बऱ्याच भागाचे (वाळवंट होणे) वाळवंट झालेले असेल. जमिनीचा कस (क) (पूर्णपणे जाणे) --------------------------------. पिण्याच्या पाण्यासाठी माणसाला वणवण करावी लागेल. अनेक विचित्र आजारांनी मानवजात (ख) (ग्रस्त होणे) --------------------------------. हवेतील प्राणवायूच्या कमतरतेमुळे अनेकांना श्वसनाचे आजार (ग) (जडलेले असणे) --------------------------------. बऱ्याच प्राणिजाती पृथ्वीवरून (घ) (नामशेष होणे) --------------------------------. समुद्राच्या पाण्याची पातळी बरीच (च) (वाढणे) -------------------------------- आणि किनाऱ्यांचा बराच भाग पाण्याखाली (छ) (जाणे) --------------------------------. मानवाला ह्यांसारख्या आपदांना वारंवार तोंड द्यावे लागेल.

## ४ तापमान, हवामान

**१. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांमध्ये हवामान कसे आहे ते सांगू या.**



नागपूर – सूर्यप्रकाश,
२९ अंश २६.८.२०१८ दिवस



पुणे – ढगाळ,
२८ अंश २६.८.२०१८ दिवस



मुंबई – पावसाळी,
२१ अंश २६.८.२०१८ रात्र

(तळपत, घट, सरासरी, पारा, अंदाजानुसार, ढगाळ, चिन्ह, तुरळक)

गेले चार दिवस राज्यात पावसाचे (क) -------------------------------- दिसत होते. वेधशाळेच्या (ख) -------------------------------- उद्यापासून मुंबईत पावसाची शक्यता आहे. त्यामुळे दिवसाच्या तापमानात (ग) -------------------------------- दिसून येईल. दिवसाचे (घ) -------------------------------- तापमान २१ अंश असेल असा अंदाज आहे. पुण्यातही पावसाच्या काही (च) -------------------------------- सरींची शक्यता

आहे. पुढील काही दिवस पुण्याचे हवामान (छ) ---------------------------- राहील. सरासरी तापमान एकोणीस अंशांपर्यंत घसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे उकाड्यापासून पुणेकरांची आणि मुंबईकरांची सुटका होईल असे दिसते. मुंबई-पुण्याच्या उलट नागपुरात मात्र सूर्य दिवसभर (ज) --------------- राहील. तापमानाचा (झ) --------------- २९ अंशांवर चढेल. नागपूरकरांची उकाड्यापासून इतक्यात सुटका नाही असे वाटते.


## करा आणि शिका

**२. पर्यावरण, हवामान आणि तापमान ह्या विषयांशी संबंधित शब्दांचा वापर वाक्प्रचारांमध्येही होतो. खाली काही वाक्प्रचार दिले आहेत. तीन तीन विद्यार्थ्यांचे गट करू या, कोणताही एक वाक्प्रचार निवडून त्यावर एक प्रसंग लिहू या आणि वर्गासमोर सादर करू या.**

पारा चढणे　　वारा फिरणे　　वीज कोसळणे　　पाणी पडणे　　वादळ उठणे

**३. क. खालील चित्रपटगीतातील रिकाम्या जागा भरू या.**

(पानांमधली, इमारतींच्या, आकाशाची, गर्दीत, लोकलचं, वाऱ्याची, भवती, पंख्याचं, क्षितिजाची, पक्ष्यांची, वाटेवरती, नळाचं)



हे जीवन सुंदर आहे, हे जीवन सुंदर आहे
नितळ निळाई ---------- अन् ---------- लाली
दवात भिजल्या ---------- किरणांची रांगोळी
“अहो, आता विसरा हे सगळं
इथं ---------- जंगलातला वनवास
त्यातून दिसणारं टीचभर आकाश
आणि ---------- घुसमटलेले रस्त्यांचे श्वास”
कोठेही जा अवती ---------- निसर्ग एकच आहे
हे जीवन सुंदर आहे
--------- सळसळ हिरवी अन् किलबिल ----------
झुळझुळ पाणी वेळूमधुनी, उरे शीळ ----------
“इथं गाणं ----------, पाणी तुंबलेल्या ----------
आणि वारं डोक्यावर गरगरणाऱ्या ----------”
इथेतिथे संगीत अनामिक एकच घुमते आहे
हे जीवन सुंदर आहे

- सुधीर मोघे

करा आणि शिका

**ख. आता ह्या गाण्याची चित्रफीत पाहू या आणि आपली उत्तरे तपासू या.**

## ५ ऐवजी, पैकी...

“अरे, तुमच्यापैकी कोणालाच पर्यावरणाची काळजी नाही का? तुम्ही शाळेत शिकणारी मुले आहात. तुमच्या जागी जर कोणी अशिक्षित, अडाणी माणसांनी ह्यापैकी काही गोष्टी केल्या असत्या, तर मी समजू शकलो असतो”, चितळे मास्तर अगदी तळमळीने बोलत होते. कारण होते मुलांनी कचरा टाकून घाण केलेले शाळेचे आवार, आणि तेही मास्तरांचे पर्यावरणावरील व्याख्यान ऐकून काही तासच झाले असताना. सर्व मुले मुकाट्याने खाली मान घालून ऐकत होती. मोहन आणि अजय हे वर्गातील सर्वात खोडकर विद्यार्थी. ते दोघे मात्र मास्तरांचे बोलणे ऐकण्याऐवजी खिडकीतून बाहेर बघत होते. अभ्यासाऐवजी पुस्तकात गोष्टींची पुस्तके लपवून वाचणे, मधल्या सुट्टीत मैदानात खेळण्याऐवजी कोणाचं दप्तर लपवणे, कोणाचा डबाच खाऊन टाकणे, असल्या गोष्टी करण्यात त्यांना जास्त रस असे. त्यामुळे हा कचरा कोणी केला असेल, हे चितळेमास्तर समजून होते, पण मुले लहान आहेत, कधी ना कधी त्यांना अक्कल येईल, असा विचार करून ते नेहमीच गप्प राहणे पसंत करत.

**१. वरील उताऱ्यात ‘ऐवजी’ आणि ‘पैकी’ ही दोन नवी शब्दयोगी पदे आपण पाहिली. हा उतारा परत नीट वाचू या. नंतर खालील दोन वाक्ये वाचू या आणि ही पदे कोणत्या अर्थाने वापरतात ह्याचा विचार करू या.**

केळं आणि आंबा ह्यांपैकी मी आंबा खाईन. मी केळ्याऐवजी आंबा खाईन.

| | | |
|---|---|---|
| शब्दयोगी पदे | – | **Postpositions** |
| ऐवजी | – | **instead of** |
| पैकी | – | **among / out of** |



**२. खाली दिलेल्या शब्दयोगी पदांपैकी चुकीची शब्दयोगी पदे खोडू या.**

क. दोन किंवा अधिक गोष्टींतून एकाची किंवा काहींची निवड करायची असेल, तर तुम्ही कोणते अव्यय वापराल? **ऐवजी / पैकी**

ख. एक गोष्ट सोडून तुम्ही दुसरी गोष्ट निवडणार असाल तर कोणते अव्यय वापराल? **ऐवजी / पैकी**

**३. पुढील वाक्यांत खालीलपैकी योग्य ते शब्दयोगी पद भरू या.**

(ऐवजी, पैकी)

नवीन वर्षात मी असं ठरवलंय...

क. मी ह्यापुढे प्लास्टिक पिशव्यां--------------- कापडी पिशव्या वापरेन.

ख. रासायनिक खते आणि सेंद्रिय खते यां--------------- मी सेंद्रिय खतेच वापरेन.

व्याकरण

ग. मी ह्यापुढे कृत्रिम पेयां--------------- फळांचे रस, नारळपाणी अशी पेये घेईन.

घ. अरबटचरबट खाण्या--------------- मी पौष्टिक आहार घेईन.

च. ओला कचरा जाळण्या--------------- मी त्याचे खत बनवेन.

छ. सौरऊर्जा आणि अणुऊर्जा ह्यां--------------- मी सौरऊर्जाच वापरेन.

ज. उत्सव साजरे करताना फटाके वाजवण्या--------------- ते पैसे मी चांगल्या कामासाठी वापरेन.

झ. जवळच्या अंतरावर चालत जाणे आणि गाडीने जाणे ह्यां--------------- मी चालत जाण्याचा पर्याय निवडेन.

## ६ नदीचा उगम



सगळी धरती उन्हानं तापून गेलेली असते, कोरडी पडलेली असते, तहानलेली असते. ती वाट पाहत असते केवळ पावसाची. हवा वाहत नसते, सगळं वातावरण स्तब्ध झालेलं असतं. अचानक एक झुळूक येते, पाठोपाठ पावसाचा शिडकावा घेऊन. पहिले पावसाचे थेंब तर माती पिऊनच घेते. मग नंतरची सर जरा धिटाईने येते. घाईघाईने जोरात सडा शिंपावा तशी. ह्यावेळी मात्र पानांवरून टपटप थेंब मातीत गळतात. थेंबाथेंबांची भेट होते. मातीत थेंबांच्या रेघा उमटतात. त्यानंतरची पावसाची सर येते ती मात्र सगळा आसमंत पूर्ण भिजवते. थेंबांच्या रेघा पुढे पुढे वाहू लागतात. एक रेघ दुसरीला मिळते आणि मोठी होऊन वळणावळणानं उतार बघून वाहत राहते. सरी येत राहतात तेव्हा पाणी मातीत मुरत जातं, तसंच ते जमिनीवरूनही वाहत राहतं. बारीक रेघा मिळून झुळुझुळु वाहणारा ओहोळ तयार होतो. असे झुळझुळणारे ओहोळही एखाद्या घळीत एकत्र मिळतात आणि खळखळ वाहणारा ओढा बनतात. जमिनीत मुरलेलं पाणी झिरपत झिरपत जमिनीखालच्या पाणीसाठ्यात जाऊन मिळतं आणि त्याची पातळी वाढवतं. मग तिथूनही ते वाहत वाहत एखाद्या खडकाच्या कपारीतून हळूच बाहेर डोकावतं; एखाद्या झऱ्याच्या रूपात. बारीकशी धारच असते त्याची; पण पाणी कसं थंडगार आणि अगदी शुद्ध. झाडांच्या मुळांमधून, जमिनीखालच्या खनिजांमधून झिरपून आल्यामुळे अतिशय पोषक. पाणी प्यावं तर तेच.

असे झरे ओढ्यांना मिळतात, असे अनेक ओढे खडकांवरून उड्या मारत एकत्र येतात आणि तयार होते खळाळत वाहणारी नदी. नदीचा प्रवाह असाच फुगत जातो, वेगानं वाहू लागतो. त्या प्रवाहाला वळण घेण्याचंही भान राहत नाही, आणि मग तो एखाद्या कड्यावरून खाली झेपावतो. धबधबा धबाधबा कोसळत राहतो. खाली कोसळणारं पाणी खडकाळ जमीन कोरत कोरत पुढे रोरावत जात असतं. शेतात पेरण्या झाल्या आणि जमिनीतून रोपं वर डोकावू लागली, की पावसाचा जोर थोडा कमी होतो. मधूनच ऊन पडतं, तर मधूनच शिंपडल्यासारख्या पावसाच्या सरी, किंवा रिमझिम. सृष्टी अगदी तृप्त होते. जुलै-ऑगस्ट महिन्यात पावसाला पुन्हा जोर येतो. जाड थेंबांचा आणि मोठ्यामोठ्या धारांचा मुसळधार पाऊस धो धो कोसळतो. ढगांचे बुधले जणू कुणीतरी लवंडून टाकावेत तसा पाऊस सांडत असतो. नदी किनारे सोडून बेभान धावू लागते. वाटेत येणारे दगड, गोटे, झाडंझुडपं आपल्या प्रवाहात खेचून घेत वाहणारी नदी, समुद्र जवळ येऊ लागतो तशी संथ होत जाते. बरोबर आणलेला सगळा गाळ किनाऱ्यांवर पसरत जाते. अनेक वाटांनी पाणी चुबुकचुबुक करत वाहत राहतं आणि अखेर समुद्राला मिळतं.

१. **वरील उताऱ्यात एका नैसर्गिक प्रक्रियेचं वर्णन आहे. उताऱ्यातील हिरव्या रंगातील शब्द लक्षपूर्वक वाचून त्यांचे वर्गीकरण पाहू या.**

| नाम | क्रियापद | विशेषण | क्रियाविशेषण |
|---|---|---|---|
| तो शिडकावा | शिंपणे | मुसळधार | टपटप |
| ती धार | भिजवणे | | झिरपत झिरपत |
| तो प्रवाह | मुरणे | | झुळुझुळु |
| तो बुधला | झिरपणे | | खळखळ |
| ती रिमझिम | वाहणे | | खळाळत |
| तो गाळ | खळाळणे | | रोरावत |
| तो धबधबा | झेपावणे | | धबाधबा |
| | शिंपडणे | | धो धो |
| | लवंडणे | | बेभान |
| | सांडणे | | संथ |
| | | | चुबुकचुबुक |

२. **क. वरील उताऱ्यात पाण्याच्या प्रवाहाच्या प्रकारांची नावेही आली आहेत. कोणती ते लिहू या.**

उदा॰ झरा,...

**ख.कुठला प्रवाह कसा वाहतो ते रिकाम्या जागांमध्ये लिहू या.**

उदा॰ झरा झुळुझुळु वाहतो.

१. ओहोळ ---------------------- वाहतो.

२. ओढा ---------------------- वाहतो.

३. पावसाचं पाणी जमिनीत ---------------------- जातं.

४. नदी ---------------------- वाहते.

५. धबधबा ---------------------- कोसळतो.



व्याकरण

## ७ वाटसरू

**१. खालील उतारा वाचू या. लाल रंगातील शब्द अभ्यासू या.**



घरातून बाहेर पडून तो चालू लागला. किती तरी वेळ तो चालतच होता. खाचखळग्यांतूनही त्याची पावलं झपाझप अंतर कापत होती. ज्या कामाला तो निघाला होता, ते त्याच्या हातून होईल की नाही अशी शंका मनातून डोकावत होती, पण तो निर्धाराने चालला होता. त्याला येताना बघून पलीकडच्या शेतातून एक माणूस आला आणि त्याचा घामाघूम झालेला चेहरा बघून त्याला आपल्या झोपडीत घेऊन गेला. कोपऱ्यातल्या मडक्यातून लोटाभर पाणी त्याला प्यायला दिलं. बसायला सांगितलं. झोपडीमधल्या चुलीतून ज्वाळा येत होत्या. चुलीवरच्या पातेल्यातून खमंग वास दरवळत होता. पोटातून भुकेने हाक दिली. केसातून ठिबकणारे घामाचे थेंब त्याने पुसले आणि झोपडीत नजर टाकली. उन्हातून आल्यामुळे डोळ्यांपुढे आधी अंधारच होता, पण आता जरा दिसू लागले होते. चुलीजवळच्या अंधारातून त्याला हालचाल दिसू लागली आणि बांगड्यांचा आवाजही ऐकू आला. नाही म्हटलं तरी त्याच्या मनात विचार चमकून गेला, की आपली जेवणाची सोय इथे होऊ शकेल. इतक्यात तो शेतकरी दारातून आत आला आणि म्हणाला, "अरे वाटसरा, बस की आरामात! आता जेवून उन्हं उतरल्यावरच जा की!" क्षणभर त्याची चलबिचल झाली. मग निर्धाराने तो उठला आणि झोपडीतून बाहेर पडून, वाट पकडून पुन्हा चालू लागला.

लाल रंगातील शब्द कसे तयार झाले ते पाहू या.

पोटातून = पोट + आत + ऊन

दारातून = दार + आत + ऊन

(ऊन is a termination of the ablative case)



**क. खाली दिलेल्या वाक्यांमध्ये कंसातील शब्दाचे योग्य सामान्यरूप करून विभक्तिप्रत्यय लावू या आणि वाक्ये पूर्ण करू या.**

उदा॰ (चिखल) चिखलातून उगवणाऱ्या कमळाप्रमाणे अतिशय हलाखीच्या (परिस्थिती) परिस्थितीतून तिने आपले जीवन फुलवले.

१. पूर्वी जिथे (नदी) -------------------- होडी वल्हवता यायची, तिथे आता नदीचे पात्र कोरडे पडले आहे.

२. दोन्ही बाजूंना असलेल्या झाडांमुळे (रस्ता) -------------------- जाताना ऊन लागत नव्हते.

३. शुद्ध (हवा) -------------------- मिळणारा प्राणवायू आरोग्यासाठी गरजेचा असतो.

४. (गाडी) -------------------- जाताना माझ्या लक्षात आलं, की वाहनांच्या एवढ्या (गर्दी) -------------------- जातानाही माणसांच्या चालण्याचा वेग कमी होत नव्हता.

५. (धरण) ------------------ पाणी न सोडल्यामुळे खालच्या गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली.

६. (कारखाना) ------------------- सोडलेल्या दूषित पाण्यामुळे नदीतील मासे मेले आणि त्या (मासेविक्री) -------------------- मिळणाऱ्या पैशांवर ज्यांची उपजीविका चालते, त्यांच्यावर उपाशी राहायची वेळ आली.

७. गरज नसलेल्या वस्तूंच्या (खरेदी) -------------------- चंगळवादाला चालना मिळते.

८. (निसर्ग) -------------------- आपल्याला हवा, पाणी, अन्न या गोष्टी फुकट मिळत असतात हे आपण विसरता कामा नये.

## ८ छोटासा, छानसा, इवलासा, लहानसा, सुंदरसा...

एक छोटीशी बी मातीत रुजते. तिचं इवलंसं रोपटं होतं. माती त्याचं छानसं पोषण करते. पाऊस त्याचं शिंपण करतो. मग काही वर्षांनी त्याचं मोठंसं झाड होतं. झाडाचा विशालसा वृक्ष होतो. वृक्षावर येणारा सुंदरसा मोहोर आणि त्याची फळं पशुपक्ष्यांना आकर्षित करतात. इवलीशी पाखरं त्याच्या दणकट फांद्यांवर लहानशी घरटी बांधतात. एक वृक्ष म्हणजे एक सुंदरशी परिसंस्थाच असते.



**१. उताऱ्यातील शब्दांच्या जागी ही नेहमीची विशेषणे लिहून बघू या. काय फरक वाटतो ते सांगू या.**

**विशेषणे Adjectives**

वरील गोष्टीत जांभळ्या रंगातील शब्द वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ती विकारी विशेषणे आहेत. लहान, छोटा, मोठा, इवला, हलका, सुंदर, छान ही विशेषणे तुम्हाला माहीत आहेतच. लहान – लहानसा, छान – छानसा

* लहानसा, छानसा असे शब्द वापरले की, ज्या वस्तुमात्रांसाठी ही विशेषणे वापरली आहेत, त्यांच्याबद्दल जास्त आपलेपणा व्यक्त होतो आणि भाषेचा गोडवा वाढतो.

२. खालील तक्त्यात उताऱ्यातील विशेषणांची रूपे लिंग व वचनानुसार लिहू या.

| विशेषण | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|---|
| उदा. छोटा | ए.व. : छोटासा<br>अ.व. : छोटेसे<br>सा.रू. : छोट्याशा | ए.व. : छोटीशी<br>अ.व. : छोट्याशा<br>सा.रू. : छोट्याशा | ए.व. : छोटेसे / छोटंसं<br>अ.व. : छोटीशी<br>सा.रू. : छोट्याशा |
| मोठा | | | |
| लहान | | | |
| हलका | | | |
| सुंदर | | | |
| थोडा | | | |
| इवला | | | |
| छान | | | |
| नाजूक | | | |

३. **खालील शब्दांना वरील विशेषणांपैकी योग्य ते विशेषण लावून ते शब्दासहित पुन्हा लिहू या.**

उदा॰ चित्र : सुंदरसे / सुंदरसं चित्र

कविता, बाळ, फूल, मुलगी, आवाज, बक्षीस, पुस्तक, प्राणी, सकाळ, गाडी

**संभाषण करू या.**

ऱ्हास होणे   आकाशात विजा चमकणे   ढगांचा गडगडाट होणे

वारा सुटणे   धुके पडणे   मुसळधार पाऊस पडणे   ग्रस्त होणे

बोचरी थंडी पडणे   प्रदूषणामुळे सुंदर निसर्गाचा ऱ्हास होणे

पेचात पडणे / सापडणे / टाकणे / पकडणे   नामशेष होणे

निरभ्र आकाश दिसणे   रखरखीत ऊन पडणे   नष्ट होणे

## ९ संभाषणकौशल्ये.

१. **उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा॰ अंघोळीसाठी एकच बादली पाणी वापरणे – अंघोळच न करणे, शक्य तेव्हा पायी जाणे – कधीच कुठे न जाणे, रोज झाडांना पाणी घालणे – झाडे न लावणे, कचऱ्याचं विघटन करणे – कचरा न करणे, टेकड्यांवरचा कचरा उचलणे – टेकड्यांवर न जाणे)




पहिला विद्यार्थी : तू पर्यावरणासाठी काय करतोस?

दुसरा विद्यार्थी : मी अंघोळीसाठी एकच बादली पाणी वापरतो / वापरते.

सर्व विद्यार्थी : तू अंघोळीसाठी एकच बादली पाणी वापरतोस? / वापरतेस? शाब्बास!

दुसरा विद्यार्थी : आणि तू पर्यावरणासाठी काय करतोस / करतेस?

पहिला विद्यार्थी : मी अंघोळच करत नाही.

सर्व विद्यार्थी : काय? तू अंघोळच करत नाहीस? कमालच आहे!

**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. कुठे? – फिरणे – पूर्ण देश, पूर्ण जग) (कोणत्या? – भाषा शिकणे - देशातल्या अनेक भाषा, अनेक परकीय भाषा) (काय? – मिळवणे – खूप पैसे, खूप प्रसिद्धी) (काय? – कमावणे – चांगलं शरीर, भरपूर संपत्ती) (कुठे कुठे? – झाडं लावणे – शहरभर झाडं लावणे – देशभर झाडं लावणे)



पहिला विद्यार्थी : तू दहा वर्षांत काय पाहिलं असशील?

दुसरा विद्यार्थी : मी दहा वर्षांत पूर्ण देश पाहिला असेल.

सर्व विद्यार्थी : ओहो! मस्तच!


दुसरा विद्यार्थी : आणि तू दहा वर्षांत काय पाहिलं असशील?

पहिला विद्यार्थी : मी पूर्ण जग पाहिलं असेल.

सर्व विद्यार्थी : अरे वा! झकास!

**चिंटू**



पहिले मराठी पाऊल

**अंटार्क्टिकावर गेलेली पहिली भारतीय महिला शास्त्रज्ञ**



पुणे विद्यापीठातून बी.एस्सी. चा अभ्यास करत असतानाच डॉ. अदिती पंत (१९४३ ) ह्यांचे 'सागरविज्ञान' ह्या विषयाबद्दलचे कुतूहल जागे झाले. उच्च शिक्षणाकरता अमेरिकेतील शिष्यवृत्ती मिळाल्यावर त्यांनी त्याच विषयात हवाई विद्यापीठातून एम.एस. ही पदवी मिळवली. लंडन विद्यापीठातून 'समुद्रातील जलशेवाळाचे इंद्रियविज्ञान' ह्या विषयात डॉक्टरेट मिळवली. भारतात परतल्यावर डॉ. पंत गोव्यातील राष्ट्रीय सागरविज्ञान संस्थेत संशोधनासाठी दाखल झाल्या. भारताच्या संपूर्ण पश्चिम किनारपट्टीचा त्यांनी अभ्यास केला. तिसऱ्या आणि पाचव्या अंटार्क्टिका मोहिमेत सहभागी होणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ होत्या.

भारत सरकारने 'अंटार्क्टिका पुरस्कार' देऊन त्यांचा सन्मान केला.

डॉ. अदिती पंत म्हणतात, "अंटार्क्टिका मोहिमेवर जायला मिळावे हे प्रत्येक सागरवैज्ञानिकाचे स्वप्न असते, पण मला त्यासाठी बरेच लढावे लागले होते. इतक्या दीर्घ मोहिमेवर स्त्रीला पाठवण्याबद्दल मोहिमेचे जनक डॉ. एस. झेड. कासिक थोडे काळजीत पडले होते. मी लगेच तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधींना पत्र लिहिले आणि त्यात म्हटले,'माझ्यापाशी पुरेसे सागरविज्ञानाचे ज्ञान आहे. कामाची योग्य ती रूपरेषा ठरवण्याची आणि ते प्रत्यक्षात आणण्याची क्षमता माझ्याकडे आहे. अशा महत्त्वाच्या मोहिमेत सहभागी होण्यापासून महिलांना अडवणे हा अन्याय आहे, असे आपलेही मत नाही काय?'

त्यांनी मान्यता दिली असणार, कारण तिसऱ्या अंटार्क्टिका मोहिमेत माझा आणि डॉ. सुदीप्ता सेनगुप्तांचा समावेश झाला."

आज अशा मोहिमांमध्ये महिलांचा समावेश होण्याला कोणी हरकत घेत नाही, हे डॉ. अदिती पंत यांनी केलेल्या प्रगतीचेच फळ नव्हे का?



## दृष्टिक्षेप

### नामे

| | | |
|---|---|---|
| तो पैलू, ते - | ती उपमा, त्या - | ते पर्यावरण, ती पर्यावरणे / णं |
| तो ऱ्हास | ती फांदी, त्या फांद्या | ते धुके / कं |
| तो ज्वालामुखी, ते - | ती आर्द्रता | ते दव, |
| तो कीटक, ते - | ती ऊर्जा, त्या - ती अणुऊर्जा | ते गवत |
| तो जंतू, ते - | ती शेती | ते प्रदूषण, ती प्रदूषणे / णं<br>ते जलप्रदूषण<br>ते वायुप्रदूषण<br>ते ध्वनिप्रदूषण |
| तो कचरा | ती वनस्पती, त्या - | ते ऋतुचक्र, ती ऋतुचक्रे / क्रं |
| तो भूकंप, ते - | ती माती | ते अण्वस्त्र, ती अण्वस्त्रे / स्त्रं |
| तो प्राणवायू | ती हिरवळ, त्या हिरवळी | ते इंधन, ती इंधने / नं |
| तो दुष्काळ, ते - | ती पृथ्वी | ते संसाधन, ती संसाधने / नं |
| तो उष्मा | ती वृक्षतोड | ते संतुलन, ती संतुलने / नं |
| तो डोंगर, ते - | ती (नैसर्गिक) साधनसंपत्ती | ते विघटन, ती विघटने / नं |
| तो कृतघ्नपणा | ती जैवविविधता, - | ते संवर्धन, ती संवर्धने / नं |
| तो गजबजाट | ती परडी, त्या परड्या | ते धुराडे / डं, ती धुराडी |
| तो विनाश, ते - | ती विल्हेवाट | ते हवामान, ती हवामाने / नं |
| तो वारसा, ते वारसे | ती बादली, त्या बादल्या | ते तापमान, ती तापमाने / नं |
| तो रूळ, ते - | ती खबरदारी | ते धरण, ती धरणे / णं |
| तो झोपाळा, ते झोपाळे | ती जनजागृती | ते सांडपाणी |
| तो संहार, ते - | ती वणवण | |
| तो पेच, ते - | ती आपदा, त्या आपदा | |
| तो कस | ती गार, त्या गारा | |
| तो हिमवर्षाव, ते - | ती सरासरी | |
| तो गोलार्ध, ते - | ती चालना | |
| तो चिखल | | |
| तो चंगळवाद | | |

**नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination**

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. उपमा देणे | लहान मूल फुलासारखेच नाजूक, कोमल असते म्हणून त्याला फुलाची उपमा देतात. |
| २. ऱ्हास होणे | प्रदूषणामुळे पाण्याच्या स्रोतांचा ऱ्हास होत आहे. |
| ३. विल्हेवाट लावणे | कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याची विल्हेवाट लावली पाहिजे. |
| ४. शिस्त लावणे | इतरांच्या आधी स्वत:ला शिस्त लावणे महत्त्वाचे आहे. |
| ५. समावेश होणे / करणे | पाठामध्ये इतर सरावांबरोबरच नाम- क्रियापदांच्या सरावांचाही समावेश केला आहे. |
| ६. गैरवापर करणे | पिण्याचे पाणी हातपाय धुण्यासाठी वापरून लोक पाण्याचा गैरवापर करतात. |
| ७. आवर घालणे | वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना आवर घातला तर अपघात होणार नाहीत. |
| ८. आजार जडणे | कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्यांना क्षयाचा आजार जडण्याची शक्यता असते. |
| ९. नजर टाकणे | सभागृहात आल्यावर मुख्यमंत्र्यांनी सगळीकडे एक नजर टाकली. |
| १०. तलखी होणे | नागपुरात रस्त्याने जाताना कडक उन्हाने जिवाची तलखी होते. |
| ११. चालना मिळणे / देणे | प्रौढ शिक्षणाच्या रेंगाळलेल्या कामाला सरांच्या भाषणामुळे चालना मिळाली. |
| १२. अंदाज वर्तवणे | आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने वेधशाळा हवामानाचा अचूक अंदाज वर्तवते. |

**इतर शब्द व क्रियापद जोड्या Other words and Verb combinations**

| इतर शब्द + क्रियापद<br>Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. पेचात सापडणे | अनू आणि निरूच्या भांडणात कोणाची बाजू घ्यावी या पेचात मी सापडले. |
| २. सहभागी होणे | झाडे लावण्याच्या कामात सगळे सहभागी झाले. |
| ३. सामोरे जाणे | गंभीर आजाराला रसिका धैर्याने सामोरी गेली. |
| ४. आटोक्यात आणणे | घरातला पसारा केतकीने आटोक्यात आणला, आता फक्त कपडे आवरायचे बाकी होते. |
| ५. ग्रस्त होणे | दुष्काळाने ग्रस्त झालेल्या गावांमध्ये शेते जळून गेली होती. |
| ६. नामशेष होणे | दुष्काळामुळे लोक गावे सोडून गेले, की तेथील संस्कृतीच्या खुणाही नामशेष होतात. |
| ७. विचार चमकून जाणे | मुलांची सुंदर चित्रे स्पर्धेला पाठवावीत असा विचार शिक्षकांच्या मनात चमकून गेला. |
| ८. तोंड द्यावे लागणे | लोकांना पूर्वी आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागायचे तर आता मानसिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. |

क्रियापदे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्मरणे | झडणे | उन्मळणे | कुजणे | वर्तवणे | तळपणे |
| घुसमटणे | तुंबणे | घुमणे | | | |

विशेषणे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सेंद्रिय | दरडोई | व्यापक | शास्त्रशुद्ध | काटेकोर | सर्वसमावेशक |
| विकसित | अविकसित | निरभ्र | ढगाळ | तुरळक | रासायनिक |
| दाट | नितळ | टीचभर | हानिकारक | अभ्राच्छादित | |

आता मला हे येतं...

**पर्यावरण : समस्या आणि उपाय ह्यांविषयी बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**पूर्ण भविष्यकाळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**तापमान, हवामान ह्यांविषयी बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शब्दयोगी पदे : ऐवजी, पैकी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**पाण्याशी संबधित क्रियापदे : सांडणे, शिंपडणे, लवंडणे इ॰**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**'तून' / 'आतून' ह्या प्रत्ययांचा वापर**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**छोटासा, इवलासा, लहानसा...**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ६ जागतिकीकरण












## चला, शिकू या...

- जागतिकीकरण : फायदे, तोटे
- बातम्या वाचणे, समजणे
- रीती भविष्यकाळ
- वादविवाद करणे
- बहुसांस्कृतिकता, वंशभेद, रंगभेद
- निश्चय, संकल्प, योजना ह्यांबद्दल
- ऐतिहासिक घडामोडी आणि पैशाचे राज्य
- शब्दयोगी पदे आणि क्रियाविशेषणे : आसपास, भोवती, पाशी, शेजारी, बाजूला, बाजूने, पाठीमागे
- की आणि का ह्या शब्दांचा वापर
- गावोगावी, देशोदेशी, घरोघरी इ.

## १ जागतिकीकरण

**१. मागील पानावरील चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

- चित्रांमध्ये आजच्या जगाची कोणती वैशिष्ट्ये दिसत आहेत?
- जागतिकीकरणाचे कोणते फायदे व तोटे चित्रांमध्ये दिसत आहेत?
- आजच्या जागतिकीकरणाच्या युगात मनुष्याचे स्थान काय आहे?
- जागतिकीकरणाचे भविष्यात काय चित्र दिसेल? आपली पुढची पिढी कशी असेल असे तुम्हाला वाटते?

### करा आणि शिका

**क. एका गोलात बसू या. आपली एखादी वस्तू निवडू या, उदा. मोबाईल, बॅग, पेन, वही, पुस्तक, सौंदर्यसाधने इ. आता ह्या वस्तूचे निरनिराळे सुटे भाग पाहू या, त्यावर दिलेली माहिती वाचू या. आपण निवडलेली वस्तू आणि तिचे सुटे भाग कोणकोणत्या शहरांत आणि देशांमध्ये उत्पादित केले गेले आहेत ते सांगू या.**




**ख. खाली दिलेल्या प्रश्नांच्या मदतीने चर्चा करू या.**

१. एखाद्या वस्तूच्या उत्पादनाचा असा प्रवास का घडतो?

२. एखाद्या वस्तूचे संपूर्ण उत्पादन एकाच ठिकाणी होणे स्वस्त असते की महाग?

३. एखाद्या विदेशी वस्तूच्या उत्पादन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी देशामध्ये कोणती धोरणे असावी लागतात?

४. आपल्या देशात अशी कोणती उत्पादने आहेत, जी पूर्णपणे फक्त आपल्या देशातच बनतात?

वस्तूंच्या सुट्या भागांचे उत्पादन वेगवेगळ्या देशांमध्ये करता येते, कारण...

स्वदेशी उत्पादन केल्याने देशाला खूप फायदा / तोटा होऊ शकतो, कारण...

वस्तूंच्या सुट्या भागांचे इतर ठिकाणी उत्पादन करणे स्वस्त पडते, कारण...

वस्तूंच्या उत्पादन प्रक्रियेत आपल्या देशाने सहभागी होण्यासाठी देशाची अर्थव्यवस्था उदार असावी लागते.

आज एखादी वस्तू संपूर्णपणे एकाच ठिकाणी बनवता येत नाही / बनवता येते, कारण...

**२. जागतिकीकरणाची प्रक्रिया**



आज ज्याला 'जागतिकीकरण' म्हणतात ते ह्या संज्ञेचा जन्म होण्यापूर्वी अनेक शतकांपासून होत होतेच. दळणवळण होत होते, संदेशांची देवाणघेवाण होत होती, जगभर व्यापार चालू होता, उत्पादने जगाच्या दुसऱ्या टोकापर्यंत पोहचत होती. मात्र ह्याची गती अतिशय संथ होती. त्यात सहभागी होण्याची संधी फार थोड्या लोकांना मिळत होती. सर्वसामान्य माणसाचे जग त्याच्या गावापुरतेच मर्यादित होते. परिसरात पिकेल ते अन्न आणि निर्माण होणाऱ्या वस्तू ह्यांचा वापर, व्यापार आणि देवाणघेवाण हा साराच जीवनव्यवहार तेवढ्याच वर्तुळात घडत होता.

गेल्या दोन-अडीच शतकांपासून हे चित्र बदलू लागले. सगळ्याच जीवनव्यवहाराचा वेग वाढत गेला आणि गेल्या तीसेक वर्षांमध्ये घेरी यावी इतका तो वाढला आहे. अगदी सर्वसामान्य माणसालाही काही तासांत जगाच्या दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचता येत आहे. संदेश आणि माहिती तर क्षणार्धात पोहोचते आहे. तंत्रज्ञानाने सगळे जग आपल्या घरांत आणून ठेवले आहे. जगात कुठेही घडणाऱ्या घटना – खेळाच्या सामन्यांपासून युद्धापर्यंत – त्याच क्षणी आपण जिथे असू तिथून पाहता येत आहेत. तंत्रज्ञानाची प्रगती आणि जगाच्या राजकीय व्यवस्थांमध्ये झालेली उलथापालथ ही त्यामागील प्रमुख कारणे आहेत. राजकीय बदलांमुळे विस्कटलेली अनेक देशांची अर्थव्यवस्था सावरण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाची मदत होऊ शकेल असा विचार तेव्हा पुढे आला. भारतात तोपर्यंत आयात-निर्यात, देशाबाहेरील व्यापार, त्यासाठी लागणारे परवाने वगैरे सगळ्याच गोष्टींवर सरकारचे पूर्ण नियंत्रण होते. ऐंशीच्या दशकापासूनच ते सैल होऊ लागले. भारतात गुंतवणूक करण्याची, आपली उत्पादने विकण्याची किंवा इथेच उत्पादन करून घेण्याची मुभा परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांना मिळाली. त्यामुळे लोकसंख्या कमी असलेल्या



श्रीमंत देशांना गरीब देशांमधून कामगार आयात करण्याची, त्यांना कायद्यानुसार पगार व इतर सोयीसुविधा देण्याची आणि हे करताना निर्माण होणाऱ्या प्रश्नांना तोंड देण्याची गरजच उरली नाही. तयार उत्पादनेच मिळाल्यामुळे त्यांचा उत्पादनखर्च कमी झाला. त्यांनी मोठे भांडवल गुंतवल्यामुळे गरीब देशांची अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत झाली आणि विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या.

अर्थात, उत्पादन वाढावे म्हणून, जर ह्या गरीब देशांनी कायदे मोडून कामगारांना कमी पगारात जास्त काम करण्याची सक्ती केली, बालकामगारांचे शोषण केले, पर्यावरणाचे नुकसान केले, तर त्याची जबाबदारी श्रीमंत देशांकडे येत नव्हती. उलट, प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या ह्या देशांची प्रचंड बाजारपेठ ती उत्पादने विकण्यासाठी त्यांना उपलब्ध झाली होती. भारत सरकारनेही आपली 'कल्याणकारी' भूमिका बाजूला ठेवली; उद्योग-व्यापाराचे खाजगीकरण करायला सुरुवात केली आणि स्वतःला त्या मधून सोडवून घेतले. इथल्या उद्योगांना इतर देशी-विदेशी कंपन्यांशी स्पर्धा करावी लागेल; त्यामुळे उत्पादनाचा दर्जा सुधारेल आणि भ्रष्टाचारही कमी होईल, असा सरकारचा हिशेब होता.

असा आहे जागतिकीकरण ह्या संकल्पनेचा चेहरा. संपूर्ण जग म्हणजे एक भलीमोठी बाजारपेठ झाली आहे आणि तिच्या प्रभावातून कोणतीही व्यक्ती किंवा समाज आता निसटून जाऊ शकत नाही. ही बाजारपेठ कोणीही कसे जगावे, कसा विचार करावा, कोणती भाषा बोलावी, काय पाहावे किंवा काय शिकावे, काय खावे आणि काय पिकवावे, अशा असंख्य गोष्टी ठरवत असते. आज माणसे स्वतःच्या नकळत बहुसांस्कृतिक झाली आहेत. भारताच्या संदर्भात सांगायचे तर पूर्वी मुले लाडू-चिवड्यासाठी हट्ट करत होती, आता पिझ्झा आणि पास्त्यासाठी हटून बसतात. लग्नसमारंभात वधू शिवून घेतलेले तयार नऊवारी लुगडे 'घालून' बोहल्यावर उभी राहते आणि संध्याकाळी स्वागतसमारंभात इव्हिनिंग गाऊन घालून मिरवते. लग्नाच्या जेवणात मेक्सिकन, थायी, चिनी पदार्थ आवश्यक झाले आहेत. शहराच्या जुन्या भागातील वाडे किंवा चाळी पाडून उभ्या राहिलेल्या टॉवरला फ्रेंच किंवा इटालियन नाव मिळते आहे. वरवर पाहता लोक विविध संस्कृती स्वीकारत असल्याचे हे चिन्ह आहे असे वाटते, परंतु त्यात समजून घेण्याचा, जगाबद्दलचा दृष्टिकोन अधिक व्यापक आणि संवेदनशील होण्याचा भाग किती आहे आणि निव्वळ मजेचा भाग किती आहे ते तपासून बघावे लागेल असे वाटते. व्यक्ती आणि समाज ह्यांच्यातील नाते पातळ होत चालले आहे का? जग असे जवळ येत असतानाच जगभरच्या समाजांमध्ये असहिष्णुता वाढताना का दिसत आहे? एकीकडे जागतिकीकरणाचे फायदे तर हवे आहेतच, पण त्याच वेळी बदलाच्या ह्या प्रक्रियेमध्ये आपली ओळखच पुसून गेल्याची भावना माणसाला अस्वस्थ करत आहे, त्याचा हा परिणाम आहे का? विचारी माणसाला चिंता वाटावी असे हे प्रश्न आहेत.

**क. कंसात दिलेले शब्द वापरून खालील वाक्ये पूर्ण करू या.**

(असंवेदनशील, वेगवान, अमर्याद, मुभा, वंचित)

१. आमच्या लहानपणी फक्त रविवारी सकाळी अर्धा तास जास्त झोपण्याची मुभा आम्हाला होती.

२. "चंदा, तुमच्या गप्पा संपेपर्यंत स्कूटर बंद का करत नाहीस? पृथ्वीच्या पोटातला पेट्रोलचा साठा ---------------- नाहीये."

३. बॅडमिंटन आता इतके ---------------- झाले आहे, की बघणाऱ्यालाही धाप लागते.

४. अधिकार हातात असणाऱ्या व्यक्ती ---------------- असल्या, की अनेकदा प्रश्न सुटण्याऐवजी जास्तच गुंत्याचे होतात.

५. आपल्या ज्ञानाचा फायदा देशातील ---------------- समाजघटकांना करून देण्याची प्रतिज्ञाच डॉक्टरांनी केली.

**ख. लेखातील काही विधाने पुढे दिली आहेत. त्यांतून कोणतीही तीन विधाने निवडून प्रत्येकी चार-पाच वाक्यांची टिपणे लिहू या.**




१. पूर्वी जागतिकीकरणाची गती अतिशय संथ होती.
२. तंत्रज्ञानाने सगळे जग आपल्या घरांतच आणून ठेवले आहे.
३. भारत सरकारने आपली 'कल्याणकारी' भूमिका बाजूला ठेवली.
४. आज माणसे नकळत बहुसांस्कृतिक झाली आहेत.
५. बदलाच्या ह्या प्रक्रियेमध्ये आपली ओळखच पुसून गेल्याची भावना माणसाला अस्वस्थ करत आहे.

**ग. खालील तक्ता भरू या.**

| | |
|---|---|
| १. जागतिकीकरणाची व्याख्या | |
| २. जागतिकीकरण ह्या विषयाशी संबंधित इतर शब्द | उदा॰ खाजगीकरण, |
| ३. जागतिकीकरणाचे फायदे | |
| ४. जागतिकीकरणाचे तोटे | |

**३. छोटीशी रूपककथा**




"अरेरे!" उंदीर म्हणाला, "जग दिवसेंदिवस किती लहान होत चाललंय! आधी ते इतकं मोठं होतं, की मला भीती वाटायची. मी पुढे पळत राहिलो. दूरवर डावीकडे अन् उजवीकडे, एकदाच्या दोन भिंती दिसल्या. मला किती आनंद झाला! पण ह्या लांब लांब भिंती इतक्या झपाट्याने एकमेकींजवळ येताहेत, की मी केव्हाच शेवटच्या खोलीत येऊन उभा आहे. आणि त्या तिथे, समोरच्या कोपऱ्यात असलेल्या एका सापळ्यात मी चाललोय."

"तू फक्त तुझा मार्ग बदल," मांजर म्हणाली, आणि तिनं उंदराला फस्त केलं.

- फ्रांत्स काफ्का (जर्मन साहित्यकार)

क. दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करू या आणि मांजर नेमकी कुठे उभी आहे हे चित्र काढून दाखवू या. वर्गातील सर्व जोड्यांची चित्रे पाहू या आणि त्यांवर चर्चा करू या.

ख. काफ्काच्या ह्या कथेत उंदराच्या आत्तापर्यंतच्या प्रवासाचे निरनिराळे टप्पे दिसतात. खाली दिलेले ते टप्पे योग्य क्रमात लिहू या.



---------- उंदीर शेवटच्या खोलीत येऊन उभा आहे.

---------- एकदाच्या त्याला दूरवर डावीकडे आणि उजवीकडे दोन भिंती दिसल्या.

---------- उंदीर पुढे पळत राहिला.

---------- उंदराच्या लक्षात आले, की जग खूप लहान होत चालले आहे.

---------- समोर एक सापळा आहे, आणि त्या सापळ्याच्या आत तो उंदीर चालला आहे.

उदा. १. आधी जग खूप मोठे होते.

---------- मांजर म्हणाली "तू फक्त तुझा मार्ग बदल." आणि तिने त्याला फस्त केलं.



---------- उंदराला आनंद झाला.

---------- उंदराला भीती वाटत होती.

---------- पण त्या लांब भिंती झपाट्याने एकमेकींजवळ येत आहेत.

ग. काफ्काच्या ह्या रूपककथेचे अनेक अर्थ होतात. काहींना ह्या कथेत 'जागतिकीकरणाचे तोटे' हा विषयसुद्धा मांडला आहे असे वाटते. असा अर्थ दर्शवणारी वाक्ये अधोरेखित करू या आणि त्यावर चर्चा करू या.

घ. चार ते पाच विद्यार्थ्यांचे गट करू या आणि काफ्काची ही कथा नाट्यरूपात सादर करू या.

## करा आणि शिका

**चित्रांच्या आधारे जागतिकीकरणाची गोष्ट सांगू या.**

शिक्षकाने खालील चित्रांच्या चिठ्ठ्या तयार कराव्यात. एक विद्यार्थी पुढे येईल. खाली दिलेली पहिली चिठ्ठी त्या विद्यार्थ्याला द्यावी. चिठ्ठीत दिसणाऱ्या माणसाचे नाव आहे 'जग'. ह्या जगाची गोष्ट सांगायला विद्यार्थ्याने सुरुवात करावी. (उदा. जग नावाचा एक माणूस होता...) त्यानंतर शिक्षकाने इतर चिठ्ठ्या मिसळून टेबलावर टाकाव्यात. दुसरा विद्यार्थी समोर येईल, एक चिठ्ठी निवडेल आणि त्या चिठ्ठीच्या आधारे 'जग' ह्या माणसाची सुरू झालेली गोष्ट पुढे सांगेल. ह्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थी एक चिठ्ठी निवडेल आणि गोष्ट पुढे सांगेल. शेवटच्या विद्यार्थ्याला एक कोरी चिठ्ठी मिळेल. त्या विद्यार्थ्याने आपल्याला योग्य वाटेल तशी ती गोष्ट संपवावी.




## २ वाहतुकीची कोंडी



**मनोज :** आजच्या बातम्या वाचल्यात का, बाबा? इतके नवे रस्ते, पूल, महामार्ग, मेट्रो, मोनोरेल, अंडरग्राऊंड रस्ते बांधून तयार होतायत, पण वाहतुककोंडीत काहीच फरक पडत नाहीये. महामार्गांवर अपघात होऊन वाहनांच्या लांबचलांब रांगा लागतायत, शहरात वाहनांची संख्या अमर्याद वाढल्यानं रस्ते अपुरे पडतायत, पावसात रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहतुकीची कोंडी होतेय, लोकलमध्ये शिरताही येत नाहीये. घराबाहेर पडणं नको झालंय आता.

**बाबा :** ह्यावर नजीकच्या भविष्यकाळात काही उपाय सापडेल असं मला तरी वाटत नाही. ह्या विकासकामांच्या योजना आणि त्यांची पूर्तता व्हायला लागणारा अवधी, ह्यांचा काहीच ताळमेळ नसतो. हा अनुभव घेतच माझे काळ्यांचे पांढरे झालेत. माझं ऐका, ह्या क्रूर शहराबाहेर पडा. इथं राहिलात, तर आयुष्यमान हळूहळू कमी होत जाईल, कारण दिवसेंदिवस ही गर्दी अशीच वाढत राहील. आपल्या घरासमोरच्या पुलाचं काम येती काही वर्षं असंच रेंगाळत राहील. मोटरगाड्या आणि इतर वाहनं ह्यांच्या रांगा अशाच दिसत राहतील. वाहनांची कोंडी आणि रहदारीचे कर्कश आवाज ह्यांचा माणसाच्या दैनंदिन जीवनावर विपरीत परिणाम होत राहील.

### रीती भविष्यकाळ Habitual Future Tense

वरील वाक्यांतील 'कमी होत जाईल', 'वाढत राहील', 'रेंगाळत राहील', 'दिसत राहतील', 'होत राहील' ही क्रियापदांची रूपे 'होण्याची', 'वाढण्याची', 'रेंगाळण्याची' व 'दिसण्याची' भविष्यातील रीत किंवा वहिवाट दाखवतात, म्हणून त्यांना 'रीती काळ' असे म्हणतात. एखादी क्रिया **भविष्यकाळात** सतत करण्याची कर्त्याची रीत असेल, तर तो **रीती भविष्यकाळ** असतो.

- रीती भविष्यकाळ = मुख्य क्रियापदाचे अपूर्ण वर्तमानकाळातील रूप + जा / राह ह्या धातूंचे साध्या भविष्यकाळातील रूप

उदा. (मी - करणे) – रीती भविष्यकाळ = मी करत + राहीन मी काम करत राहीन

(ती - करणे) – रीती भविष्यकाळ = ती करत + जाईल ती काम करत जाईल

**'लिहि' ह्या धातूची सर्व रीती काळांतील रूपे**

| रीती वर्तमानकाळ Habitual Present Tense | रीती भूतकाळ Habitual Past Tense | रीती भविष्यकाळ Habitual Future Tense |
|---|---|---|
| मी निबंध लिहीत असतो | मी निबंध लिहीत असे / लिहायचो | मी निबंध लिहीत जाईन / राहीन |

**'करणे' ह्या क्रियापदाची रीती भविष्यकाळात सर्वनामांनुसार बदलणारी होकारार्थी व नकारार्थी रूपे**

| | होकारार्थी रूप |
|---|---|
| मी | करत जाईन / करत राहीन |
| आम्ही / आपण | करत जाऊ / करत राहू |
| तू | करत जाशील / करत राहशील |
| तुम्ही / आपण | करत जाल / करत राहाल |
| तो ती ते | करत जाईल / करत राहील |
| ते त्या ती | करत जातील / करत राहतील |



| | नकारार्थी रूप |
|---|---|
| मी, आम्ही / आपण, तुम्ही / आपण, तो, ती, ते, ते, त्या, ती | करत जाणार नाही / करत राहणार नाही<br>करत जाणार नाहीत / करत राहणार नाहीत |
| तू | करत जाणार नाहीस / करत राहणार नाहीस |

व्याकरण

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ (मी) : मी नेहमीच टेनिस खेळत राहीन. | मी नेहमीच टेनिस खेळत राहीन. |
| आम्ही / आपण | आम्ही / आपण नेहमीच टेनिस खेळत राहू. |
| तू | तू नेहमीच टेनिस खेळत राहशील. |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण नेहमीच टेनिस खेळत राहाल. |
| तो | तो नेहमीच टेनिस खेळत राहील. |
| ती | ती नेहमीच टेनिस खेळत राहील. |
| ते | ते नेहमीच टेनिस खेळत राहील. |
| ते (अ॰व॰) | ते नेहमीच टेनिस खेळत राहतील. |
| त्या (अ॰व॰) | त्या नेहमीच टेनिस खेळत राहतील. |
| ती (अ॰व॰) | ती नेहमीच टेनिस खेळत राहतील. |

**१. वरील 'वाहतुकीची कोंडी' ह्या उताऱ्यातील 'बाबा' शहराच्या भविष्याकडे फारच नकारात्मक दृष्टीने पाहतायत. मनोजची मतं जरा वेगळी आहेत. रीती भविष्यकाळ वापरून स्वतःची मतं व्यक्त करायला मनोजला मदत करू या.**

उदा॰ भविष्यात – लोकसंख्या – कमी – होणे : भविष्यात लोकसंख्या कमी होत जाईल.

क. लोक – सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा – जास्त – वापर करणे

ख. बरेच लोक – घरातून – काम करणे

ग. खरेदीसाठी – आंतरजालाचा – उपयोग – वाढणे

घ. सरकार – जास्त – सक्षम – वाहतुकीचे पर्याय – शोधणे

च. जलवाहतूक आणि हवाईवाहतूक ह्या पर्यायांचे महत्त्व – वाढणे

छ. मोठ्या – शहरांबाहेर – वस्ती – वाढणे

ज. वाहतुकीचे नवे पर्याय – प्रदूषणाची पातळी – कमी होणे

झ. नवी – पर्यावरणस्नेही – इंधने – वापरणे



**२. ध्वनिफीत ऐकून खालील प्रश्न सोडवू या.**

**भविष्यातील वाहतूक यंत्रणा – हायपरलूप वन प्रकल्प**

**क. योग्य उत्तर निवडू या.**

१. हायपरलूप वन प्रकल्पामुळे चेन्नईहून बंगळुरूला जायला लागणारा वेळ -

क. अर्धा तास ख. पाऊण तास

२. अमेरिकेतील हायपरलूप वन ह्या कंपनीचे ------------- हे ध्येय आहे.

क. प्रमुख शहरांना जोडणे ख. पारंपरिक दळणवळण साधनांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणे

३. निर्वात ट्यूबमधून सोडण्यात येणाऱ्या ट्रॅव्हलपॉडचा वेग किती असेल?

क. १२०० किलोमीटर प्रति तास          ख. २१०० किलोमीटर प्रति तास

४. प्रवासी -------------- बसून प्रवास करतील.

क. ट्रॅव्हलपॉडमध्ये          ख. ट्यूबमध्ये



**ख. रिकाम्या जागा भरू या.**

**भविष्यात वाहतूक कशी असेल?**

उदा. एकामागून एक सर्व मोठ्या शहरांत सरकार हायपरलूपची यंत्रणा (बसवणे) बसवत जाईल, त्यामुळे वाहतूक सुरळीत (होणे) होत जाईल.

१. सर्वसामान्य जनता खाजगी गाड्यांचा वापर कमी (करणे) ---------------------------.

२. जास्तीत जास्त लोक हायपरलूपने प्रवास (करणे) ---------------------------.

३. हवेतील प्रदूषणाचे प्रमाण कमी (होणे) ---------------------------.

४. लोकांच्या आरोग्यावर सुधारलेल्या हवामानाचा चांगला परिणाम (होणे) ----------------.

५. प्रवासाचा वेळ कमी (होणे) ---------------------------.

६. कुटुंबासाठी जास्त वेळ (मिळणे) ---------------------------.

७. दैनंदिन जीवनातील वाहतुकीचा ताण कमी (होणे) ---------------------------.

८. त्यामुळे कामातील उत्पादकता (वाढणे) ---------------------------.

## ३ वादविवाद

**मत व्यक्त करणे**

माझा अनुभव असं सांगतो, की...

सारासार / अधिक खोलात जाऊन विचार केला तर...

...च्या सर्वेक्षणानुसार...

**सहमती दर्शवणे**

मी तुमच्या मताशी पूर्णपणे सहमत आहे

मला तुमचं म्हणणं पटतं.

मी सुद्धा तुमच्याच मताचा आहे.

मी तुमच्या मताला दुजोरा देतो.

**विरोध दर्शवणे**

मला तुमचं हे म्हणणं मुळीच मान्य / पटत नाही.

मी अगदी विरुद्ध मताची आहे

मी तुमच्या या विधानाला कडाडून विरोध करतो.

मला हे अशक्य वाटतं.

करा आणि शिका

**एक टॉक शो सादर करू या.**

काही विद्यार्थी खालीलपैकी एक भूमिका निवडतील. प्रत्येक विद्यार्थ्याला एक चिठ्ठी दिली जाईल. त्या चिठ्ठीमध्ये त्या भूमिकेचे प्रातिनिधिक म्हणणे लिहिलेले असेल. त्यानुसार प्रत्येकाने टॉक शोमध्ये आपले मत मांडावे, वादविवाद करावा.

**भूमिका :** निवेदक (निखिल), जागतिकीकरणाचा पुरस्कर्ता (जग बिंद्रा), जागतिकीकरणाचा कट्टर विरोधक (कटप्पा), समन्वय साधणारी एक जण (समन्वया साधू)

**चिठ्ठ्या :**

जागतिकीकरण माणसाला आधुनिक बनवते.

आजचा नागरिक हा 'बहुसांस्कृतिक नागरिक' असलाच पाहिजे.

जागतिकीकरणात सांस्कृतिक वैविध्य नष्ट होऊन एकछापी संस्कृती निर्माण होते.

जागतिकीकरणामुळे देशात नोकरीच्या संधी वाढतात.

जागतिकीकरणामुळे देशातील मूळ संस्कृतीचा ऱ्हास होतो. .

जागतिकीकरणामुळे अविकसित आणि विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाला गती प्राप्त होते.

## ४ निश्चय, संकल्प, योजना

**१. दोन मित्रांमधील संवाद वाचू या.**

**आशिष** : अरे, समीर! खरंच कंटाळा आलाय बघ या दिनक्रमाचा. किती दिवस आपण घाण्याला जुंपलेल्या बैलासारखे चाकोरीत फिरत राहणार? आयुष्याला काही गुणवत्ताच राहिली नाही रे!

**समीर** : मग काय करायचं? काही इलाज आहे का त्याला? बोल.

**आशिष** : इलाज कसा नाही? आपणच काही गोष्टी केल्या पाहिजेत आणि काही गोष्टी टाळल्या पाहिजेत.

**समीर** : म्हणजे?

**आशिष** : आपण आपल्या राहणीमानात बदल केला पाहिजे. बारा तास काम करून एवढा पगार आपण मिळवतो, पण एखादा ताससुद्धा आपल्याला मनासारखा आरामात घालवता येत नाही. मी तर ठरवलंय; नाही, निश्चयच केला आहे, की कमी पगार मिळाला तरी चालेल, पण पुरेसा मोकळा वेळ मिळवायचा. सगळे जास्तीचे, फालतू खर्च कमी केले ना, तर अगदी कमी पैशांमध्ये आपण सुखात राहू शकतो.

**समीर** : हो. त्या भूतानबद्दल वाचलं मी. माणूस सुखी आणि समाधानी असणं हे त्या देशाचं ध्येय आहे.

**आशिष** : माझं असं निरीक्षण आहे, की आपल्या खऱ्या गरजा फार कमी असतात. हे मॉलमध्ये सतत खरेदीला जाणं, इतर काही छंद न जोपासता केवळ टीव्ही बघणं, व्हिडिओ गेम्स खेळत राहणं हे जर आपण बंद केलं, तर साधं शांत जीवन जगता येईल. माझी पुढच्या आयुष्याची योजना अशीच आहे.

**समीर** : जगातल्या कुठल्या तरी देशातल्या प्रकल्पासाठी इथं बसून काहीतरी काम आपण करतो. ते नेमकं काय काम आहे हेही आपल्याला माहीत नसतं. आपण दोघं मिळून नवीन काही तरी उद्योग करण्याचा संकल्प करू या.

**आशिष** : नुसता संकल्प करायचा नाही, तर तो खरोखर अमलात आणायचा.

**निश्चय** : मी निश्चय केला आहे / मी ठरवलं आहे / मी निर्धार केला आहे

**योजना** : मी अशी योजना आखली आहे

**संकल्प** : मी असा संकल्प सोडला / केला आहे.

**२. ह्या दोन मित्रांप्रमाणे आपणही काही निश्चय करू या, संकल्प सोडू या आणि काही योजना आखू या. आपले निश्चय, आपले संकल्प आणि आपल्या योजना इतरांना सांगू या.**


| | |
|---|---|
| निश्चय करणे | उदा. एक नवीन भाषा शिकण्यासाठी वेळ काढण्याचा मी निश्चय केला आहे. |
| | |
| | |
| संकल्प सोडणे | |
| | |
| | |
| योजना आखणे | |
| | |
| | |

३. निश्चय, संकल्प आणि योजनांच्या विचारांवरचा आपला अभिप्राय नोंदवू या.

| निश्चय, संकल्प, योजना | अभिप्राय |
|---|---|
| उदा० रोज व्यायाम करण्याचा तू संकल्प सोडलायस का? | चांगला संकल्प आहे. तू नक्की बारीक होशील. |
| क. जागतिकीकरणावर एक व्याख्यानमाला आयोजित करण्याची त्यांची योजना आहे. | |
| ख. आपल्या खऱ्या गरजा ओळखण्याचा आणि तेवढीच खरेदी करण्याचा निश्चय मी केला आहे. | |
| ग. तुम्ही ऑफिसला रोज चालत जाणार आहात? | |
| घ. मी परदेशी स्थायिक होणार नाही, हा माझा निश्चय आहे. | |
| च. परदेशात स्थायिक झाल्यावर तिथे खेळले जाणारे सगळे धाडसी खेळ खेळण्याचा संकल्प मी सोडलाय. | |
| छ. गावांमध्ये असलेल्या शाळांच्या ग्रंथालयांसाठी पुस्तके जमा करण्याची आमची योजना आहे. | |
| ज. स्थानिक बी-बियाणे टिकवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याची सरकारची योजना आहे. | |
| झ. जाहिरातींना बळी पडून गरज नसलेल्या वस्तू न घेण्याचा माझा संकल्प आहे. | |

## पुणेरी पाटी

मंगळावर गेलेल्या यानाला तेथे एक पुणेरी हॉटेल दिसले. तिथे एक पाटी होती.



## म्हणी आणि वाक्प्रचार

जुनं ते सोनं

अति तिथे माती

अंथरूण पाहून पाय पसरावेत

हे विश्वचि माझे घर

बेडूक फुगला तरी त्याचा बैल होत नाही

## ५ बहुसांस्कृतिकता

**१. फेसबुकवरील एका विचारमंचावरील एक चर्चा वाचू या.**

फेसबुक | मुखपृष्ठ | लॉग आउट

**जागतिकीकरण**



नमस्कार, जागतिकीकरण ह्या विषयावरील आपले मत वाचले. तुम्ही म्हणालात, "जसजसे जागतिकीकरण वाढेल तसतसा देशीवादही वाढत जाईल. आंतरराष्ट्रीयीकरण झालेल्या संस्कृतीमध्ये माणूस पुन्हा आपली हरवलेली मूळ संस्कृती शोधू लागेल." तुमच्या ह्या विधानात किती तथ्य आहे माहीत नाही, परंतु असं खरंच होत असेल तर किती बरं होईल! आपल्या संस्कृतीतले विचार, प्रथा, जगण्याच्या तऱ्हा, खाद्यसंस्कृती अशा कितीतरी गोष्टी लोप पावत आहेत, हे पाहून खूप त्रास होतो.



अहो, एवढा कशाला त्रास करून घेताय? मूळ संस्कृती अशी नसतेच कधी. सतत बदलत असते ती. आणि कोण्या एका ठिकाणची किंवा एका समूहाची नसतेच ती कधी. तिच्यावर अनेक समूहांचा, त्यांच्याबरोबर घडणाऱ्या देवाणघेवाणीचा प्रभाव असतो. अगदी तुमचा सामोसासुद्धा विदेशी आहे बरं! वर ज्या गोष्टी लयाला जात आहेत, त्या विसरा आता.



सामोसा? मी कुठे म्हटलं सामोसा आपल्या संस्कृतीचा भाग आहे? नाहीच आहे. फिरंगी आहे सामोसा. परकीय, परप्रांतीय, परदेशी प्रभावही आपल्याला दिसत नाही, त्यासारखे दुर्दैव नाही! परधार्जिणेपणाचा कळस आहे हा!!!!!!!

**क. वरील चर्चेमध्ये आलेले काही मुद्दे पुढे दिले आहेत. त्या मुद्द्यांसाठी उदाहरणे शोधून लिहू या.**

बहुसांस्कृतिकता  देशीवाद  परधार्जिणेपणा  आंतरराष्ट्रीयीकरण

**ख. आता आपणही वरील विचारमंचावर आपली प्रतिक्रिया मांडू या.**

**नवी प्रतिक्रिया द्या**




**२. संवाद ऐकू या व खालील प्रश्न सोडवू या.**

फारसीने केला फार फेरफार

**क. अस्मिता व सुशांतच्या बाबतीतील योग्य विधाने कोणती?**

**अस्मिता**

- ☐ जागतिकीकरणामुळे स्वदेशी संस्कृतीचा ऱ्हास होतोय असे वाटते.
- ☐ मातृभाषेतून बोलताना क्वचित परकीय शब्द वापरले जाऊ शकतात.
- ☐ फक्त मातृभाषेतून संवाद साधणे सहज शक्य आहे.

**सुशांत**

- ☐ बहुसांस्कृतिकतेमुळे परकीय भाषांना अवास्तव महत्त्व आलंय.
- ☐ परकीय भाषांतील शब्दांचा वापर ही काळाची गरज आहे.
- ☐ दैनंदिन वापरात असलेले अनेक मराठी शब्द ही इतर भाषांची देणगी आहे.


ख. वरील संवादात कोणते शब्द मूळ मराठी नाहीत असे म्हटले आहे?

ग. मराठी भाषेतील कोणते शब्द तुमच्या भाषेतल्या शब्दांशी मिळतेजुळते वाटतात? त्या शब्दांची यादी करू या.

घ. इतर भाषांतून आलेले शब्द जेव्हा एखाद्या भाषेत रूढ होतात, तेव्हा ती भाषा अधिक समृद्ध होते की तिचा ऱ्हास होतो? ह्या प्रश्नावर आपले मत पाच ते दहा ओळींत लिहू या.

## ६ ऐतिहासिक घडामोडी आणि पैशाचे राज्य (भाग १)

१. चार चार विद्यार्थ्यांचे गट करू या. खालील चित्रे पाहू या आणि चर्चा करून त्यांचा योग्य क्रम लावू या. प्रत्येक चित्रासाठी खालीलपैकी एक वाक्य निवडू या.




१. हळूहळू माणूस दगडापासून शस्त्रे तयार करू लागला, तेव्हा त्याचे शिकारीचे कौशल्य वाढले.

२. जंगलात फिरून तो शिकार करू लागला. अवतीभोवती हिंडताना त्याला अनेक मौल्यवान गोष्टी सापडू लागल्या.

३. माणसाने प्रगतीची एकदम उडी मारली, ती शेतीचा शोध लागला तेव्हा. गुहेभोवती असलेली झाडे, जंगल तोडून जमिनीमध्ये आपल्याला हवे ते पीक घेण्याची कला त्याला साध्य झाली, ती फार मोठी घटना ठरली. शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळवण्यात माणूस यशस्वी झाल्यावर तो एका जागी स्थिरावला. शेताशेजारीच घर बांधून तो राहू लागला.

४. माणूस अगदी प्राथमिक अवस्थेमध्ये राहत होता, तेव्हा आसपासच्या परिसरामध्ये कंदमुळे, फळे शोधून खाणे, जमल्यास शिकार करणे आणि थंडी, वारा, ऊन, पाऊस ह्यांच्यापासून संरक्षण मिळवण्यासाठी गुहेमध्ये आश्रय घेणे, असे त्याचे आयुष्य होते.

५. अशी एखादी मौल्यवान गोष्ट, उदा. एखादे पीस, सुंदर दगड, शिंगे, दुसऱ्याला देऊन त्याच्या बदल्यात आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळवणे, ह्यातून देवाणघेवाण सुरू झाली. माणसाची ही अवस्था जवळपास हजारो वर्षे टिकली होती.

६. मग विविध कौशल्ये त्याने आत्मसात केली. जंगले तोडून आसपास त्याने छोटी छोटी गावे वसवली. आपल्या पाठीमागे घर आणि शेते ह्यांचे संरक्षण व्हावे म्हणून घराभोवती कुंपण घालणे, कोणी प्राणी शेतात शिरू नये, म्हणून बाजूने दगड रचणे, हे त्याला जमू लागले.

७. बाजूच्या गावांमध्ये आपल्या वस्तू, धान्ये नेऊन विकायला त्याने सुरुवात केली. त्या बदल्यात आपल्याला हव्या असलेल्या वस्तू तो आणत असे. वस्तुविनिमय चालू होता, पैशाचे राज्य अजून यायचे होते. ज्याच्यापाशी जे कौशल्य होते त्याचा उपयोग करून जो तो स्वत:चे पोट भरू लागला. आता प्रत्येकाला स्वत: शेती करायची गरज उरली नाही.

८. विविध प्रकारचे धागे त्याने शोधले. त्याचे कापड त्याला विणता येऊ लागले. इथूनच व्यापाराला सुरुवात झाली.

**स्थलवाचक शब्दयोगी पदे Postpositions of place**

'भोवती', 'पाशी' आणि 'शेजारी' ही **स्थलवाचक शब्दयोगी पदे** आहेत, कारण ती स्थान दर्शवतात.

**२. ह्या उताऱ्यामधील हिरव्या रंगातील शब्द पाहू या. त्यांतील काही शब्दयोगी पदे आहेत, तर काही क्रियाविशेषणे आहेत. ती ओळखू या आणि त्यांची वेगवेगळी यादी तयार करू या.**

| उताऱ्यातील शब्द | शब्दयोगी पद Postpositions | क्रियाविशेषण Adverbs |
|---|---|---|
| उदा॰ गुहेभोवती | भोवती | |
| | | आसपास |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**३. ह्या शब्दयोगी पदांचे अर्थ समजण्यासाठी खालील चित्रांच्या योग्य वाक्यांशी जोड्या लावू या.**

उदा॰ क. – २

| | |
|---|---|
| क.  | १. ठोकळ्याभोवती चेंडू आहेत. |
| ख.  | २. ठोकळ्यापाशी चेंडू ठेवला आहे. |
| ग.  | ३. ठोकळ्याशेजारी चेंडू आहे. |

**४. कंसातील योग्य क्रियाविशेषण पुढे दिलेल्या वाक्यांतील अधोरेखित शब्दाच्या जागी वापरू या.**

(अवतीभोवती, पाठीमागे, बाजूला, आसपास, बाजूने)



क. नदीच्या कडेने रस्ता बांधणे चालू आहे.

ख. माझ्या घराच्या परिसरात एकही दुकान नाही.

ग. विद्यापीठाच्या मागच्या बाजूला डोंगर आहेत.

घ. आमच्या घराच्या सर्व बाजूंना पूर्वी झाडे होती, आता तिथे एक मॉल उभा आहे.

च. शाळेला लागूनच एक मैदान आहे.

**५. 'आसपास, भोवती, पाशी, शेजारी, बाजूला, बाजूने, पाठीमागे, अवतीभोवती' ह्यांतील योग्य शब्दांचा वाक्याच्या गरजेनुसार वापर करून खालील वाक्ये पूर्ण करू या.**

(अनेक उत्तरे शक्य)

क. ----------------- मॅक्डोनल्डचे दुकान नाही, असा एकही भाग शहरात सापडणार नाही.

ख. (तू) ----------------- क्रेडिट कार्ड असेल, तर खिशात एकही पैसा नसला तरी काही अडणार नाही.

ग. तुमच्या (घर) ----------------- जो मॉल आहे, तिथे नेहमी गर्दी असते.

घ. तंत्रज्ञानामागे धावताना कोणाला ----------------- वळून पाहायलाही वेळ नाही.

च. ----------------- सतत बदल होत असताना आपणही त्यापासून वेगळे राहू शकत नाही.

छ. गोष्ट ऐकण्यासाठी (आजी) ----------------- बसण्यापेक्षा टीव्ही बघणं मुलांना जास्त आवडतं.

ज. ------------------- इतकी गर्दी असल्यामुळे कुठल्या दिशेला जावे तेच कळत नाही.

झ. तिकडे दंगल चालू आहे, तू ------------------- ही फिरकू नकोस.

ट. आईस्क्रीमचे दुकान त्या शाळेच्या ------------------- तरी असेल किंवा शाळेच्या ------------------- असेल.

ठ. ह्याआधी फक्त रस्त्याच्या डाव्या ------------------- कपड्यांची दुकाने होती, आता दोन्ही ------------------- ओळीने कपड्यांची दुकाने आहेत.

## ७ ऐतिहासिक घडामोडी आणि पैशाचे राज्य (भाग २)



व्यापार जसजसा वाढला तसतशी वस्तुविनिमयाऐवजी चलनाची गरज वाढली आणि पैशाचे राज्य सुरू झाले. घरोघरी वस्तू, धान्य किंवा इतर गोष्टींऐवजी पैशाला महत्त्व आले. आता गावोगावी पैशाच्या जोरावर अनेक कामे उभी राहू लागली आणि देशोदेशी व्यापारातून देवाणघेवाण सुरू झाली. देशादेशांमध्ये व्यापारी करार होऊ लागले. व्यापाराच्या निमित्ताने किंवा एखाद्या समृद्ध देशातील संपत्ती लुटण्यासाठी आक्रमणे सुरू झाली. देशोदेशी घडणाऱ्या घटना सर्वदूर कळू लागल्या. एका देशाची समस्या ही दुसऱ्या देशाची संधी अशी परिस्थिती निर्माण झाली. उदाहरणार्थ, भारतात दुष्काळ पडला तेव्हा 'पीएल ४८०' कराराच्या अंतर्गत अमेरिकेने धान्य पुरवठा केला; पण त्याचबरोबर अनेक बंधनेही लादली. कर्जे आणि मदत यांच्या जोरावर बलाढ्य देश कमकुवत देशांवर सत्ता गाजवू लागले. सर्व देशांना खुली अर्थव्यवस्था स्वीकारावी लागली. तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीमुळे अवाढव्य यंत्रसामग्रीकडून प्रचंड प्रमाणात उत्पादन होऊ लागले. ते विकण्यासाठी जाहिरातींच्या मार्गाने ती उत्पादने दारोदारी येऊन पोचली. गरजा निर्माण केल्या जाऊ लागल्या आणि प्रत्यक्ष पैसा खिशात नसताना परस्पर तुमच्या बँकेच्या खात्यातून पैसे डेबिट टाकता येऊ लागले. आज आभासी अशा बिटकॉईन ह्या चलनाद्वारेही जगात कोठेही व्यवहार करता येऊ लागले आहेत. घडोघडी घडणाऱ्या घटनांच्या पाठीमागे कुठला देश असेल हेही आता सांगता येत नाही. ते शोधण्यात प्रत्येक देशाला आपली शक्ती पणाला लावावी लागत आहे. साध्या देवाणघेवाणीपासून सुरू झालेल्या आणि आता गुंतागुंतीच्या झालेल्या जागतिकीकरणाची व्याप्ती अशी आहे.



**क्रियाविशेषणे Adverbs**

घर : प्रत्येक घरात = घरोघरी     वेळ : प्रत्येक वेळी = वेळोवेळी

घरोघरी, दारोदारी, पावलोपावली, घडोघडी, गावोगावी, देशोदेशी ही काही वैशिष्ट्यपूर्ण **क्रियाविशेषणे** आहेत.

**१. वर दाखवल्याप्रमाणे या विशिष्ट शब्दांचे अर्थ लिहू या.**

क. दारोदारी : ----------------------------------------

ख. पावलोपावली : ----------------------------------------

ग. घडोघडी : ----------------------------------------

घ. गावोगावी : ----------------------------------------

च. देशोदेशी : ----------------------------------------

छ. क्षणोक्षणी : ----------------------------------------

ज. प्रांतोप्रांती : ----------------------------------------

झ. गल्लोगल्ली : ----------------------------------------

ट. रस्तोरस्ती : ----------------------------------------

**२. खालील तक्त्यात काही वाक्यांश दिले आहेत, त्यांच्या साहाय्याने वरील विशिष्ट शब्द वापरून वाक्ये तयार करू या.**

उदा. पर्यावरण - सजगता निर्माण होणे


देशोदेशी पर्यावरणाबद्दल सजगता निर्माण होत आहे.

सूर्यचुली - ऊर्जेची बचत

----------------------------------------

हिंडून - वस्तू – विकणे

----------------------------------------



एल.ई.डी. दिवे - खर्चात बचत

----------------------------------------

घराबाहेर - पैसे लागतात

----------------------------------------

पुढे जाणारे तंत्रज्ञान - जुळवून घेणे - ज्येष्ठ नागरिकांना कठीण होणे

----------------------------------------

सणाच्या दिवशी - दुकाने - खाद्यपदार्थ - रेलचेल असणे

----------------------------------------

## ८ जाहिराती समजणे



### करा आणि शिका

तीन तीन विद्यार्थ्यांचे गट करू या. खालीलपैकी एक चित्र निवडून त्याची एक विनोदी जाहिरात लिहू या आणि ती वर्गात सादर करू या. आपण तयार केलेली जाहिरात हे जागतिकीकरणाचे उदाहरण असावे.







## ९ संभाषणकौशल्ये.



**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. प्राणी पाळणे, गरीब मुलांना विनामूल्य शिकवणे, गरीब लोकांना रोजगार मिळवून देणे, जुने कपडे गरजूंना दान करणे, ज्येष्ठ नागरिकांना वेळ देणे)

पहिला विद्यार्थी : तू आयुष्यात कोणतं चांगलं काम केलंस?

दुसरा विद्यार्थी : मी आधी प्राणी पाळायचो, आजही पाळतो.

सर्व विद्यार्थी : अरे वा!

पहिला विद्यार्थी : आणि पुढे काय करणारेस?

दुसरा विद्यार्थी : मी पुढेही प्राणी पाळत राहीन.

सर्व विद्यार्थी : कमाल आहे! तुझा सत्कार केला पाहिजे!



**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. संकल्प सोडणे – संकल्प न सोडण्याचा संकल्प सोडणे, निश्चय करणे – निश्चय न करण्याचा निश्चय करणे, विचार करणे – विचार न करण्याचा विचार करणे, ठरवणे – काही न ठरवण्याचं ठरवणे, योजना आखणे – योजना न आखण्याची योजना आखणे)




पहिला विद्यार्थी : नवीन वर्षासाठी तू काय संकल्प केला आहेस?

दुसरा विद्यार्थी : मी संकल्प न करण्याचा संकल्प केलाय.

पहिला विद्यार्थी : काय? संकल्प न करण्याचा संकल्प?

दुसरा विद्यार्थी : हो, संकल्प न करण्याचा संकल्प.

सर्व विद्यार्थी : काहीतरीच तुझं! संकल्प न करण्याचा संकल्प कोणी करतं का?

**संभाषण करू या.**

काही इलाज नसणे    मी निश्चय केलाय / मी ठरवलंय / माझी अशी योजना आहे
कमी पैशांत आपण सुखात राहू शकतो    फावला वेळ मिळवणे    अमलात आणणे
आपल्याला आपल्या संस्कृतीची काही किंमतच राहिली नाही.    कुठे चाललोय आपण?
ती फार मोठी घटना ठरली.

**चिंटू**






### पहिले मराठी पाऊल

#### ब्रिटिश नभोवाणीवरून जगभर पोहोचलेला पहिला मराठी आवाज

तिचे शालेय शिक्षण पुण्याला आणि नंतर मुंबईच्या सेंट कोलंबा हायस्कूलमध्ये झाले. मॅट्रिकची परीक्षा झाल्यानंतर वेणू चितळे (१९१२ - १९९५) ह्या बुद्धिमान मुलीच्या लग्नाची चर्चा सुरू झाली. तिची पत्रिका पाहून ज्योतिष्याने सांगितले – 'हिचं लग्न झालं तर हिची थोरली बहीण विधवा होईल.' आता? लग्न ठरवावे तर हे संकट; न करावे तर समाजात नाचक्की होणार! वेणूच्या ब्रिटिश शिक्षिका तेव्हा मायदेशी परतत होत्या. त्यांनी तिला लंडनला न्यायचे ठरवले आणि १९३७ साली वेणूताई लंडनमध्ये दाखल झाल्या. मॉन्टेसरी पद्धतीचे शिक्षिका-प्रशिक्षण घेणाऱ्या त्या पहिल्या भारतीय होत्या आणि काही काळासाठी त्यांना मार्गदर्शन केले साक्षात मॉन्टेसरीबाईंनी.




प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर भारतात परतायचे आणि शिक्षिकेची नोकरी करायची असाच वेणूताईंचा विचार होता. पण तसे व्हायचे नव्हते. युरोपात दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला. ब्रिटनही त्यात ओढले गेले आणि देशातून बाहेर पडणे कठीण झाले. शिष्यवृत्ती संपल्यामुळे नोकरी शोधणे वेणूताईंना भाग होते. ब्रिटिश नभोवाणी, म्हणजेच बी.बी.सी.मध्ये, महिलांसाठी नोकऱ्या उपलब्ध असल्याने मॉन्टेसरीबाईंच्या सांगण्यावरून वेणूताईंनी अर्ज केला आणि उत्तम इंग्रजी, लेखनकौशल्य आणि गोड आवाज ह्या गुणांच्या बळावर त्यांना नोकरी मिळाली. लवकरच त्यांचे 'बॉस' म्हणून जगप्रसिद्ध लेखक जॉर्ज ऑरवेल ह्यांची नेमणूक झाली. दोघांनी मिळून साहित्य, राजकारण, संस्कृती, विज्ञान अशा विषयांना वाहिलेले हजारो कार्यक्रम लिहून सादर केले. बातम्यांमधून वेणूताईंचा आवाज देशोदेशी पोहोचला. शिवाय संस्कृत व हिंदी साहित्याच्या अनुवादाचे वाचन, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त कार्यक्रम वगैरे सादर करण्यासाठी वेणूताईंबरोबर होते झियाउद्दीन बुखारी, मुल्कराज आनंद, बलराज आणि दमयंती सहानी, कपूरथळ्याच्या राजकुमारी इंदिरादेवी, स्वतः जॉर्ज ऑरवेल आणि युरोपातील अनेक दिग्गज व्यक्ती. १९४२ मध्ये बी.बी.सी. चा मराठी विभाग सुरू झाला. विभागप्रमुख होत्या अर्थातच वेणूताई. इतर कार्यक्रमांबरोबरच त्यांनी अनेक मराठी पाककृतीही सादर केल्या.

युद्ध संपले. इतरांप्रमाणेच वेणूताईही १९४९ साली भारतात परतल्या. दरम्यान, त्यांच्या दोन इंग्रजी कादंबऱ्याही प्रसिद्ध झाल्या. आपल्या मधुर आवाजाने त्यांनी सारा आशिया खंड गाजवला होता. सरोजिनी नायडू त्यांना 'कोकिळकंठी' म्हणत. विजयालक्ष्मी पंडितांशी वेणूताईंची घनिष्ठ मैत्री होती. परंतु भारतात परतल्यावर विवाह करून त्या 'लीला खरे' झाल्या आणि वेणू चितळेचे इतरांनाच नव्हे, तर त्यांना स्वतःलाच विस्मरण झाल्यासारख्या त्या सार्वजनिक जीवनातून अदृश्य झाल्या.

## दृष्टिक्षेप

### नामे

| | | |
|---|---|---|
| तो वंशभेद | ती बहुसांस्कृतिकता | ते जागतिकीकरण |
| तो पूर्वार्ध, ते - | ती उत्पादकता | ते एकत्रीकरण |
| तो रंगभेद, ते - | ती नैतिकता | ते वेष्टन, ती वेष्टने / नं |
| तो वस्तुविनिमय, ते - | ती घडामोड, त्या घडामोडी | ते औद्योगिकीकरण |
| तो वादविवाद, ते - | ती गुंतागुंत, त्या गुंतागुंती | ते आंतरराष्ट्रीयीकरण |
| तो निर्बंध, ते - | ती बाजारपेठ, त्या बाजारपेठा | ते उदारीकरण |
| तो आकृतिबंध, ते - | ती भांडवलशाही | ते खाजगीकरण |
| तो निधी, ते - | ती व्याप्ती | ते मूल्य, ती मूल्ये / ल्यं |
| तो संकल्प, ते - | ती पूर्तता | ते धोरण, ती धोरणे / णं |
| तो ताळमेळ | ती सजगता | ते भांडवल, ती भांडवले / लं |
| तो अवधी | ती गुहा, त्या - | ते स्थानांतर, ती स्थानांतरे / रं |
| तो बोगदा, ते बोगदे | ती पोकळी, त्या पोकळ्या | ते सार्वभौमत्व |
| तो दुजोरा | ती अर्थव्यवस्था, त्या - | ते मार्गक्रमण |
| | ती जनजात, त्या जनजाती | ते शस्त्र, ती शस्त्रे / स्त्रं |

### क्रियापदे

रेंगाळणे    तरंगणे    गाठणे    विणणे

### क्रियाविशेषणे

कडाडून    नेमके    अमर्याद    तरंगत    सर्वदूर

### विशेषणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| निर्वात | कर्कश | एकछापी | पर्यावरणस्नेही | विकसनशील |
| नेमके | विकसित | सारासार | धोरणात्मक | अविकसित |

### नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. मार्ग बदलणे | गावाच्या दिशेने चाल करून येणाऱ्या हत्तीने मार्ग बदलला आणि तो जंगलाच्या दिशेने गेला. |
| २. मार्ग धरणे | उच्च शिक्षण सोडून कुणालने समाजसेवेचा मार्ग धरला. |
| ३. मार्ग दाखवणे | उच्च शिक्षण घेण्यासाठी शिक्षकांनी संदीपला मार्ग दाखवला. |
| ४. निश्चय करणे | आळशी गौरवने ह्या वाढदिवसापासून रोज सकाळी लवकर उठण्याचा निश्चय केला. |
| ५. निर्धार करणे | काहीही झालं तरी आपलं काम सोडून नोकरीसाठी शहरात न जाण्याचा सचिनने निर्धार केला. |
| ६. संकल्प सोडणे / करणे | चित्राने दर रविवारी एक लेख लिहिण्याचा संकल्प केला आहे. |
| ७. विधान करणे | "शेजाऱ्यांशी आमचे संबंध नेहमीच चांगले असतात," असे विधान राजाभाऊंनी केले. |
| ८. विरोध करणे | सर्व ग्राहकांनी बँकेच्या वेळा बदलण्याच्या निर्णयाला विरोध केला. |
| ९. रेलचेल असणे | गुजरातेत दूधदुभत्याच्या पदार्थांची रेलचेल असते. |
| १०. दुजोरा देणे | " आमचे शिक्षक मराठी छान शिकवतात," नीलने मुख्याध्यापकांना सांगितले. "हो सर, खरंच छान शिकवतात," इतर मुलांनी दुजोरा दिला. |
| ११. योजना आखणे | सायलीने चित्रप्रदर्शनाची योजना आखली आणि प्रदर्शन भरवले. |
| १२. धाप लागणे | प्रथमेश न थांबता धावत आला त्यामुळे त्याला धाप लागली होती. |

### इतर शब्द व क्रियापद जोड्या Other words and Verb combinations

| इतर शब्द + क्रियापद<br>Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. फस्त करणे | बटाटेवडे इतके चविष्ट झाले होते, की दहा मिनिटांतच आम्ही ते फस्त केले. |
| २. लयाला जाणे | १९४७ साली ब्रिटिश साम्राज्य लयाला गेले आणि भारताला स्वातंत्र्य मिळाले. |
| ३. लोप पावणे | काळाच्या ओघात अनेक आदिवासी संस्कृती आणि परंपरा लोप पावत चालल्या आहेत. |
| ४. जुळवून घेणे | बाहेरून महाराष्ट्रात आलेल्या माणसांनी मराठी संस्कृतीशी जुळवून घेतले आहे. |
| ५. शक्ती पणाला लावणे | संग्रामने आपली शक्ती पणाला लावली आणि रस्त्याच्या मध्येच पडलेला मोठा दगड ढकलून बाजूला केला. |

### आता मला हे येतं...

**जागतिकीकरण : फायदे, तोटे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**बातम्या वाचणे, समजणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**रीती भविष्यकाळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**वादविवाद करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**बहुसांस्कृतिकता, वंशभेद, रंगभेद**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**निश्चय, संकल्प, योजना ह्यांबद्दल बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**ऐतिहासिक घडामोडी आणि पैशाचे राज्य**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शब्दयोगी पदे – क्रियाविशेषणे : आसपास, भोवती, पाशी, शेजारी, बाजूला, बाजूने, पाठीमागे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**जाहिराती समजणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# विज्ञान, तंत्र, मंत्र

७







## चला, शिकू या...

- विज्ञान आणि तंत्रज्ञान
- यंत्रे : उपयोग, समस्या,
- शक्य क्रियापदे : उचलवते - उचलवत नाही, करवते - करवत नाही इ.
- लेखनाचे आणि कथनाचे प्रकार
- संबोधन : श्रोतेहो, मित्रहो इ.
- वक्तृत्व
- असो, असू दे
- मंत्र, विज्ञान आणि अंधश्रद्धा ह्यांविषयी बोलणे
- नुकतेच, मघाशी, काल संध्याकाळी, आदल्या दिवशी, पूर्वी, अलीकडेच, यंदा इ.
- शब्दयोगी पदे : साठी / करिता

## १ विज्ञान आणि तंत्रज्ञान

**१. मागील पानावरील चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

क. वरील चित्रांना कोणती शीर्षके द्याल?

ख. कोणती चित्रे 'विज्ञान' हा विषय दाखवतात? तुम्हाला असे का वाटते?

ग. तुमच्या लेखी 'विज्ञान' म्हणजे काय? कोणती चित्रे तुमच्या व्याख्येनुसार आहेत?

घ. विज्ञान आणि तंत्रज्ञान ह्यांचा एकमेकांशी काय संबंध आहे?

च. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मंत्र ह्यांच्यात काय फरक आहे?

छ. विज्ञान आणि विश्वास हे दोन परस्परविरोधी विचार आहेत का? स्पष्टीकरण देऊ या.

**२. खालील विचारढगांमधील वाक्ये वापरून चर्चा करू या.**
**तुमचा कोणत्या गोष्टींवर विश्वास आहे / नाही? त्याचे कारण काय? वैज्ञानिक दृष्टिकोन तयार होण्यासाठी कोणत्या गोष्टी तुम्हाला महत्त्वाच्या वाटतात?**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क. देव | ख. यंत्रे | ग. अणू | घ. भूत | च. ग्रह | छ. शाप |
| ज. मंत्र | झ. पूजाअर्चा | ट. आंतरजाल | ठ. वृत्तपत्र | ड. अनुभव | ढ. बुद्धी |
| ण. श्रद्धा | त. शंका | थ. अंतर्ज्ञान | द. संशोधन | ध. अनुमान | न. राशिभविष्य |
| प. प्रेम | फ. औषध | ब. पुरावा | भ. जादूटोणा | म. गणित | य. विचार |
| र. आत्मा | ल. मन | व. प्रयोग | श. कल्पना | | |

उदा. ह्यावर माझी श्रद्धा आहे.
ही माझी अनुभूती आहे.
काही गोष्टी मानवी कल्पनांपलीकडील असतात.
काही गोष्टी शास्त्रही शोधू शकणार नाही.

उदा. माझा ग्रहांवर पूर्ण विश्वास आहे, कारण ...
हे त्रिकालाबाधित सत्य आहे.
त्यासाठी वैज्ञानिक दाखले देता येतात.
त्यासाठी पुरावे आहेत.
तसा माझा अनुभव आहे. / मी स्वतः ते अनुभवलं आहे.

उदा. ह्या गोष्टींमागे एक अवैज्ञानिक दृष्टिकोन दिसतो.
हे निव्वळ खोटं आहे.
हे अशास्त्रीय आहे.
ह्याला पुरावा काय?
हे अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे प्रकार आहेत.

उदा. माझा मंत्रांवर मुळीच विश्वास नाही. कारण ...
ते सिद्ध झालं नाही अजून.
त्यावर संशोधन चालू आहे अजून.
ती केवळ अंधश्रद्धा आहे.
ते फक्त एक गृहीतक आहे.

करा आणि शिका

**३. एक प्रयोग करू या : गरम फुंकर ! गार फुंकर !**



एका हाताची मागची बाजू तोंडासमोर नेऊ या. ओठात छोटीशी फट ठेवून हातावर श्वास सोडू या. श्वासामुळे गार वाटते. आता ओठाची फट थोडी मोठी करून श्वास सोडू या. श्वासाचा गारवा कमी होईल. तोंड जास्तीत जास्त उघडे ठेवून हाऽऽ असा आवाज करत फुंकर मारू या. ही गरम फुंकर. पहिल्या प्रकारची फुंकर मारताना तोंडातील हवा जास्त दाबाने आणि वेगाने बाहेर येताना थंड होते. तोंड पूर्ण उघडून मारलेल्या फुंकरीचे तापमान शरीराच्या आतल्या भागाइतके असते.

**क. आता चार / पाच विद्यार्थ्यांचे गट करू या आणि आपल्याला माहीत असलेला एक गमतीशीर प्रयोग लिहू या. दुसऱ्या गटाने ती माहिती वाचून तो प्रयोग करून दाखवावा.**

**४. वाचू या.**

विज्ञान आणि तंत्रज्ञान

माणसाने निसर्गाशी दोन प्रकारे संबंध जोडला. आधी त्याला जेव्हा निसर्गातील घडामोडी समजत नव्हत्या, तेव्हा त्याला निसर्गाची भीती वाटत असे. अज्ञानातून निर्माण झालेली ही भीती दूर करण्यासाठी त्याने निसर्गावर नियंत्रण मिळवण्याचे ठरवले. निसर्गावर नियंत्रण मिळवायचे म्हणजे आधी निसर्गाबद्दल ज्ञान मिळवणे आले. हेच ज्ञान म्हणजे विज्ञान आणि त्या ज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोजन म्हणजेच तंत्रज्ञान. मानवाने आपल्या जन्मापासूनच स्वत:च्या गरजा भागवण्यासाठी काही विशेष तंत्रे विकसित केली. या तंत्रांनाच आपण तंत्रज्ञान म्हणत असतो.

विज्ञानाची स्वतःची अशी एक कार्यपद्धती असते. आधी क्रमबद्ध आणि तर्क शुद्धरीतीने आपल्या आणि सभोवतालच्या विश्वाबद्दलचे ज्ञान एकत्र केले जाते. मग ते ज्ञान आणि माहिती पडताळून बघता यावी म्हणून त्यांचे नियम आणि सिद्धांत मांडले जातात.

मनुष्यस्वभाव हा मुळातच जिज्ञासू आहे. ह्या जिज्ञासेतून काही प्रश्न तयार होतात. हे असेच का आणि ते तसे का नाही, ह्या प्रश्नांचा मागोवा घेत आपण शंकांचे निरसन करतो. शंकांचे निरसन होत असतानाच मनुष्याला नवी माहिती मिळते, नव्या तंत्रांचा विकास होतो.

विज्ञानाचा पसारा अवाढव्य आहे. विज्ञानाच्या मूळ तीन शाखा आहेत – नैसर्गिक विज्ञान, सामाजिक विज्ञान आणि औपचारिक विज्ञान. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्र ह्या विज्ञानशाखांचा निसर्गविज्ञानामध्ये समावेश होतो. वैज्ञानिक संशोधनाचे दोन प्रकार आहेत. मूलभूत संशोधन म्हणजे निसर्गाच्या मूलभूत नियमांचा शोध




लावणे. उदाहरणार्थ, मंगळावर जीवसृष्टी असेल का, मेंदू कसे कार्य करतो, पृथ्वीवर जीवसृष्टी कशी निर्माण झाली इ॰ प्रश्नांचा मागोवा घेणे. त्याउलट, व्यावहारिक संशोधनाचे एक ठरावीक ध्येय असते. संगणकाचे कार्य अधिक वेगवान कसे करता येईल, गाडीचे इंधन कसे वाचवता येईल, सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर कसा करता येईल इ॰ हे व्यावहारिक संशोधनाचे प्रश्न. अनेक महत्त्वाचे शोध हे निव्वळ अपघाताने लागले आहेत. उदाहरणार्थ

हेन्री बेक्वेरेल ह्यांनी लावलेला किरणोत्साराचा शोध, अलेक्झांडर फ्लेमिंग ह्यांचा पेनिसिलिनचा सुप्रसिद्ध शोध किंवा रोंजन ह्यांनी लावलेला क्ष-किरणांचा शोध. यशस्वी व्यावहारिक संशोधनाची परिणती नवे तंत्रज्ञान निर्माण करण्यात होते. मनुष्याचे आयुष्य आहे त्यापेक्षा दर्जेदार तसेच सुखकर बनवण्यासाठी जेव्हा नवनव्या वस्तू बाजारात येतात, तेव्हा त्याचे श्रेय तंत्रज्ञानाकडे जाते. उदाहरणार्थ, वेगवान संगणक, मोबाईल फोन, वेगवान विमान, कार, कर्करोगाशी सामना करणारी औषधे इ.

आपण आजपासून १०० वर्षांपूर्वीचे आणि आजचे मानवाचे जीवनमान ह्यांमध्ये तुलना केल्यास जो बदल दिसतो, तो केवळ तंत्रज्ञान आणि त्यामुळे झालेल्या विकासामुळेच आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

**क. वरील उतारा पुन्हा वाचू या आणि खाली दिलेल्या विषयांशी संबंधित शब्द जमा करू या.**




**ख. चूक की बरोबर? स्पष्टीकरण देऊ या.**



१. माणसाला निसर्गाची भीती वाटत असे, त्यातूनच त्याची वैज्ञानिक जिज्ञासा जन्मली.

२. विज्ञानाच्या कार्यपद्धतीमध्ये नियम आणि सिद्धांत मांडणे हे फार महत्त्वाचे आहे.

३. केवळ व्यावहारिक संशोधनच माणसाला उपयोगी पडते.

४. तंत्रज्ञानामुळे देशाचा विकास घडून येतो.

**ग. एका वाक्यात व्याख्या लिहू या.**

१. विज्ञान : ______________________________
______________________________

२. तंत्रज्ञान : ______________________________
______________________________

**घ. प्रत्येकी दोन उदाहरणे देऊ या.**

१. मूलभूत संशोधन : ______________________________
______________________________

२. व्यावहारिक संशोधन : ______________________________
______________________________


**च. योग्य जोड्या लावू या आणि उदाहरण म्हणून प्रत्येकी एक वाक्य लिहू या.**

उदा. १. – च. अनुभव आपले अज्ञान दूर करतो.

| | |
|---|---|
| १. अज्ञान | क. भागवणे |
| २. तुलना | ख. लावणे |
| ३. सिद्धांत | ग. घेणे |
| ४. शोध | घ. करणे |
| ५. मागोवा | च. दूर करणे |
| ६. गरज | छ. मांडणे |

**छ. आपल्याला वेगवेगळे शास्त्रज्ञ आणि त्यांनी लावलेले शोध माहीत आहेत का? व्यक्तींची चित्रे आणि त्यांची नावे ह्यांच्या जोड्या लावू या.**

| | | |
|---|---|---|
| १. |  | क. ॲरिस्टॉटल.<br>हे जीवशास्त्र व प्राणिशास्त्राचे जनक होते. |
| २. |  | ख. आर्किमिडिज.<br>ह्यांनी सापेक्ष घनतेचा सिद्धांत मांडला. |
| ३. |  | ग. कोपर्निकस निकोलस.<br>विश्वाचा केंद्रबिंदू पृथ्वी नसून सूर्य आहे, हा महत्त्वाचा शोध ह्यांनी लावला. |
| ४. |  | घ. गॅलिलिओ गॅलिली.<br>ह्यांनी दुर्बिणीचा शोध लावला. |
| ५. |  | च. न्यूटन.<br>ह्यांनी गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला. |

| | | |
|---|---|---|
| ६. |  | छ. चार्ल्स डार्विन.<br>ह्यांनी सजीवांच्या उत्क्रांतीसंबंधी सिद्धांत मांडला. |
| ७. |  | ज. अल्बर्ट आईन्स्टाईन.<br>अंतर, काळ व गती ह्या सापेक्ष संकल्पना आहेत, हा सापेक्षता सिद्धांत ह्यांनी मांडला. |
| ८. |  | झ. होमी भाभा.<br>ह्या भारतीय शास्त्रज्ञाने भारताच्या अणुऊर्जा विकासकामाचा पाया रचला. |
| ९. |  | ट. आर्यभट्ट<br>ह्या इसवी सन १५०० पूर्वीच्या भारतीय ऋषीने ग्रहांचे व नक्षत्रांचे आवर्तनीय काल अचूक दिले आहेत. |

**ज. चर्चा करू या.**

ज्यांच्यामध्ये मांडलेल्या कल्पना भविष्यात खऱ्या ठरल्या अशी कार्टून्ज्, असे सिनेमे तुम्ही पाहिले आहेत का किंवा अशा विज्ञानकथा वाचल्या आहेत का? तुमच्या मते भविष्यात विज्ञान व तंत्रज्ञान आणखी काय प्रगती करेल? माणसाच्या हातात कोणत्या वस्तू येतील?



उदा. माणसे मंगळावर राहू लागतील...

## २ यंत्रे : उपयोग आणि समस्या

**१. ऐकू या आणि खालीलपैकी कोणत्या उपकरणांचे आवाज आपण ऐकले ते अधोरेखित करू या.**

दूरध्वनी यंत्र कॉफीमेकर जाकिटाची चेन व्हॅक्यूम क्लीनर टूथब्रश हेअर ड्रायर
ड्रॉवर कमोड फ्लश कपडे धुण्याचे मशीन गजर पाण्याचा फिल्टर नळ
प्रिंटर मिक्सर दाराची घंटी माइक्रोवेव्ह

**२. रोजच्या आयुष्यातील यंत्रे**

सकाळी जाग येते तीच घड्याळाच्या गजराच्या आवाजाने. मग ब्रशवर पेस्ट घेऊन आपण दात स्वच्छ घासेपर्यंत गॅसवर चहा किंवा कॉफीमशीनमध्ये कॉफी उकळायला लागते. टोस्टर दोन मिनिटांत छान भाजलेले टोस्ट देतो आणि मग ताज्या वृत्तपत्राबरोबर सकाळची न्याहारी. वाचण्यासाठी फार वेळ नसतो; ऑफिसला जायचं असतं ना! पाणी तापवायला गिझरच लागतो. ओले केस हेअर ड्रायरने सेट करून मी तयार... माझी मेट्रो गाठायला.

**क. वरीलप्रमाणे आपला दिनक्रम सांगू या. आपल्या रोजच्या आयुष्यातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाची उदाहरणे सांगू या.**

**३. यंत्राचं व्यसन**

**क. ऐकू या व या व्यक्ती कशाशिवाय राहू शकत नाहीत ते लिहू या.**



अवनी : ------------------------------------------------

सुमित : ------------------------------------------------

श्री. लेले : ------------------------------------------------

सौ. मंजूषा : ------------------------------------------------

**ख. खालील व्यक्ती कोणत्या यंत्राशिवाय राहू शकत नसतील? कंसातील शब्दांचा वापर करून लिहू या.**

(राहू शकत नाही... / जगायला... लागतात /...जीव की प्राण आहे /...हवंच /...चैनच पडत नाही / हवा असतो /...सांगितलेलं आवडत नाही.)

**गोदावरीआजी (वय ७३)** : ------------------------------------------------

------------------------------------------------

**विकी (वय ५)** : ------------------------------------------------

------------------------------------------------

**भाजीवाले काका** : ------------------------------------------------

डॉक्टर शिंदे : ________________________________________

________________________________________

ट्रेकर श्याम : ________________________________________

________________________________________

वाहनचालक विलास : ________________________________________

________________________________________

भरतनाट्यम शिकवणाऱ्या गुरू श्वेता : ________________________________________

________________________________________

फोटोग्राफर सुशील : ________________________________________

________________________________________


कामवाल्या रखमाबाई : ________________________________________

________________________________________

मी : ________________________________________

________________________________________

**ग. कोणतेही एक यंत्र निवडू या आणि त्यात कोणते बिघाड होऊ शकतात ते लिहू या.**

**घ. मशीन म्हटलं की बिघडणारच !**



**सानेकाका** : नमस्कार, हा अजय सेल्सचाच नंबर आहे ना?

**विक्रेता** : हो, सर ! मी आपल्याला काय मदत करू?

**सानेकाका** : तुमच्याकडे इलेक्ट्रॉनिकच्या वस्तू दुरुस्त करून मिळतात ना?

**विक्रेता** : हो, सर. विक्रीपश्चात सेवा मिळते आमच्याकडे.

**सानेकाका** : माझ्याकडे एक टेप रेकॉर्डर आहे. तो कॅसेटवाला. आजकाल कॅसेटची टेप गुंडाळली जातीये त्यात.

**विक्रेता** : अच्छा. पण माफ करा, सर, आपल्याकडे तो दुरुस्त होऊ शकणार नाही.

**सानेकाका** : असं का?

**विक्रेता** : टेप रेकॉर्डर फारसे विकले जात नसल्यानं त्यातले तज्ज्ञ आमच्याकडे नाहीत. आता सीडी प्लेयरपण कोणी घेत नाही. इतकंच काय, पेन ड्राईव्हवर गाणी वाजवणारं यंत्रही नकोय लोकांना. जास्त करून ब्लू टूथवर चालणारे स्पीकर्स हवे असतात.



**सानेकाका** : हे कसं जमायचं आम्हाला?

**विक्रेता** : ह्यासाठी मात्र आमच्याकडे एका दिवसाचे शिकवणी वर्ग चालतात. त्याविषयी माहिती देऊ का?

**सानेकाका** : हं? त्यासाठी ते यंत्र घ्यावं लागेल ना?

**विक्रेता** : आमच्याकडील उपलब्ध यंत्रांची माहिती देऊ का?

**सानेकाका** : नाही हो! विचार तरी करू द्या जरा!


**च. आजकाल प्रत्येक यंत्राच्या विक्रीपश्चात सेवेसाठी सर्विस सेंटर उपलब्ध असतात. तिथे आलेल्या काही तक्रारी आपण सोडवायचा प्रयत्न करू या. दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करून संवाद लिहू या आणि सादर करू या.**


| यंत्र | तक्रार | विक्रेता |
|---|---|---|
| कपडे धुण्याचे यंत्र | कपडे सुकवत नाही | तंत्रज्ञ घरी येऊन बघून जाईल. |
| भांडी धुण्याचे यंत्र | मध्येच बंद पडते. | वॉरंटी संपल्याने स्वतः दुरुस्तीला घेऊन यावे लागेल किंवा जास्तीचे पैसे द्यावे लागतील. |
| शिलाई यंत्र | टीप पडत नाही | आमच्या वेबसाईटवर माहिती देणारी चित्रफीत बघता येईल. |
| मोबाईल | चार्ज होत नाहीये. | आमच्या स्वतःच्या सर्विस सेंटरलाच आणून द्यावा लागेल. |
| लॅपटॉप | बॅटरी सतत चार्जवर ठेवावी लागते. | नवीन बॅटरी विकत घ्यावी लागेल. |

**छ. लिहू या.**

कल्पना करा, एक दिवस तुमच्या आयुष्यातील सर्व यंत्रे बंद पडली तर काय होईल? चला, अशी एक गोष्ट लिहू या.

## २ अडगळ





आमच्या घरी दोन संसार आहेत. एक माझ्या सासूबाईंचा आणि एक माझ्या सूनबाईचा! ही बघा, आमची दोन स्वयंपाकघरं! एक जरा अडगळीत पडलंय आता, पण वापरात आहेत हो गोष्टी! पूर्वी सासूबाई पाटा-वरवंटा घेऊनच वाटणघाटण करत असत. त्यांच्या मते मिक्सरमध्ये दळलेल्या गोष्टींना ती चव नाहीच! खरंय ते म्हणा! पण आता त्यांना वयपरत्वे हे करवत नाही. त्यांना वाटतं, मी करावं हे सगळं. माझंही वय झालंय आता! माझ्यानं पूर्वीसारखं काम करवत नाही हो! कंबर दुखते, आणि इतकं वाकवत नाही. हे इतके जड दगडी खलबत्ते आणि वरवंटा उचलवत नाही. पण मला ह्या वस्तूंचं मोल कळतं, म्हणून त्या टाकवत नाहीत. मग सासूबाईंची अपेक्षा अशी, की माझ्या हाताखाली सून आलीये, तर तिनं हे सगळं करावं. पण ती नोकरी करते हो! दमून येते. मग नाही सांगवत तिला उगाच, 'हे कर, ते कर'. ह्या पोरी त्यांना जमेल ते करतातच. माझी सून सणावाराला घरी राहतेच. पूर्वी नाही जमायचं तिला, पण आता तिला इतक्या सगळ्या लोकांचा स्वयंपाक करायला जमतं, अगदी माझ्याप्रमाणे. आपणही कौतुक करायला हवं ना? आजकाल माझ्या सासूबाईंनाही साधतं हो, एखाददुसरा कौतुकाचा शब्द बोलणं!

**१. वरील मनोगतातील हिरव्या रंगातील क्रियापदांची यादी अभ्यासू या. त्यांचे मूळ धातू ओळखू या.**

उदा॰ करवत ⟶ करवणे ⟶ करणे ⟶ कर

(करवत, वाकवत, चालवत, उचलवत, टाकवत, सांगवत)

**शक्य क्रियापदे Potential Verbs**

जी क्रियापदे कर्त्याला ती क्रिया करणे शक्य आहे किंवा नाही, त्याच्यात ते सामर्थ्य आहे किंवा नाही हे दाखवतात, त्यांना **'शक्य क्रियापदे'** म्हणतात.

- मूळ धातू + व + प्रत्यय :

  उदा॰ बस + व + त = बसवते (होकारार्थी), बसवत नाही (नकारार्थी)

  (ह्याचप्रमाणे कर, चाल, निज, हस इत्यादी)

- एकाक्षरी धातू + वव + प्रत्यय :

  उदा॰ खा + वव + त = खाववते (होकारार्थी), खाववत नाही (नकारार्थी)

  (ह्याचप्रमाणे पी, दे, घे, ये, ने)

व्याकरण

**सकर्मक 'शक्य क्रियापदे' ही कर्माप्रमाणे चालतात.**



उदा. मला अभ्यास करवतो, पण स्वयंपाक करवत नाही.

मला आंबा बर्फी खाववते, पण पिस्ता बर्फी खाववत नाही.

मला तुझे गाणे ऐकवते / ऐकवतं, पण तिचे गाणे ऐकवत नाही.

**अकर्मक 'शक्य क्रियापदे' ही नपुंसकलिंगी असतात.**

उदा. (चालणे) : दीर्घ आजारानंतर मला आता चालवते / चालवतं, पण पळवत नाही.

**२. खालील क्रियापदांची होकारार्थी आणि नकारार्थी 'शक्य क्रियापदे' तयार करू या.**

क) हसणे ख) रडणे ग) बसणे घ) देणे च) पळणे छ) पिणे ज) राहणे झ) लिहिणे ट) घेणे

**टीप :**

ऐकणे – ऐकवणे, चालणे – चालवणे, बोलणे – बोलवणे, शिकणे – शिकवणे, खेळणे – खेळवणे इ. क्रियापदांचा हा प्रकार आणि शक्य क्रियापदे ह्यांत फरक आहे. आपण पुढे दहाव्या पाठात तो नीट समजून घेऊ या.

**सकर्मक 'शक्य क्रियापद' : खाणे**

<table>
<tr><td>मी</td><td>मला</td><td rowspan="10">आता लाडू खाववतो. / आता लाडू खाववत नाही.<br>आता बर्फी खाववते. / आता बर्फी खाववत नाही.<br>आता कडू कारले खाववते. / आता कडू कारले खाववत नाही.<br>आता मिठाया खाववतात. / आता मिठाया खाववत नाहीत.</td></tr>
<tr><td>आम्ही / आपण</td><td>आम्हाला / आपल्याला</td></tr>
<tr><td>तू</td><td>तुला</td></tr>
<tr><td>तुम्ही / आपण</td><td>तुम्हाला / आपल्याला</td></tr>
<tr><td>तो</td><td>त्याला</td></tr>
<tr><td>ती</td><td>तिला</td></tr>
<tr><td>ते</td><td>त्याला</td></tr>
<tr><td>ते</td><td>त्यांना</td></tr>
<tr><td>त्या</td><td>त्यांना</td></tr>
<tr><td>ती</td><td>त्यांना</td></tr>
</table>

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ आधी मी खूप खेळायचो / चे.<br>आता मला खेळवत नाही. | आता मला खेळवत नाही. |
| आधी आम्ही / आपण खूप खेळायचो. | आता आम्हाला / आपल्याला खेळवत नाही. |
| आधी तू खूप खेळायचास. | आता तुला खेळवत नाही. |
| आधी तुम्ही / आपण खूप खेळायचात. | आता तुम्हाला / आपल्याला खेळवत नाही. |
| आधी तो खूप खेळायचा. | आता त्याला खेळवत नाही. |
| आधी ती खूप खेळायची. | आता तिला खेळवत नाही. |
| आधी ते खूप खेळायचे. | आता त्याला खेळवत नाही. |
| आधी ते खूप खेळायचे. | आता त्यांना खेळवत नाही. |
| आधी त्या खूप खेळायच्या. | आता त्यांना खेळवत नाही. |
| आधी ती खूप खेळायची. | आता त्यांना खेळवत नाही. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मला आता हाताने लिहवत नाही.<br>लिहवत नाही? मग नियमितपणे योग करा. | लिहवत नाही? मग नियमितपणे योग करा. |
| मला आता जास्त चालवत नाही. | चालवत नाही? मग नियमितपणे योग करा. |
| मला आता जास्त खाववत नाही. | खाववत नाही? मग नियमितपणे योग करा. |
| मला आता जास्त बसवत नाही. | बसवत नाही? मग नियमितपणे योग करा. |
| मला आता जास्त काम करवत नाही. | करवत नाही? मग नियमितपणे योग करा. |
| मला आता जास्त उभे राहवत नाही. | उभे राहवत नाही? मग नियमितपणे योग करा. |





**याचप्रमाणे शक्य क्रियापदांच्या बाबतीत सर्वनामांच्या तृतीयेचाही वापर होतो.**

<table>
<tr><td>मी</td><td>माझ्याने, माझ्याच्याने</td><td rowspan="12">आता चालवते. / आता चालवत नाही.<br><br>आता पायऱ्या चढवतात. / आता पायऱ्या चढवत नाहीत.</td></tr>
<tr><td>आम्ही / आपण</td><td>आमच्याने, आमच्याच्याने / आपल्याने, आपल्याच्याने</td></tr>
<tr><td>तू</td><td>तुझ्याने, तुझ्याच्याने</td></tr>
<tr><td>तुम्ही / आपण</td><td>तुमच्याने, तुमच्याच्याने / आपल्याने, आपल्याच्याने</td></tr>
<tr><td>तो</td><td>त्याच्याने, त्याच्याच्याने</td></tr>
<tr><td>ती</td><td>तिच्याने, तिच्याच्याने</td></tr>
<tr><td>ते</td><td>त्याच्याने, त्याच्याच्याने</td></tr>
<tr><td>आम्ही</td><td>आमच्याने, आमच्याच्याने</td></tr>
<tr><td>ते</td><td rowspan="3">त्यांच्यानी, त्यांच्याच्यानी</td></tr>
<tr><td>त्या</td></tr>
<tr><td>ती</td></tr>
</table>

## ४ लेखनाचे व कथनाचे प्रकार

१. तुम्ही वाचन करता का? तुम्ही काय वाचता?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वृत्तपत्र / वर्तमानपत्र | कथा | लेख | पुस्तक | कादंबरी | फेसबुक |
| वाचकांचा पत्रव्यवहार | गोष्ट | पाट्या | कविता | व्हॉट्सॲप | विनोद |
| वाचक प्रतिक्रिया | वेबसाईट | विचारमंच | संपादकीय | | |

२. तुम्हाला कथा वाचायला आवडतात का? कथांचे खालीलपैकी कोणते प्रकार तुम्हाला माहीत आहेत? उदाहरण देऊ या.

| | | | |
|---|---|---|---|
| लोककथा | विज्ञानकथा | परीकथा | पौराणिक कथा |
| नीतिकथा | जातककथा | बोधकथा | ऐतिहासिक कथा |
| दंतकथा | लघुकथा | गूढकथा / रहस्यकथा | |



**३. गरुड आणि घुबडाची कथा वाचू या.**



एक गरुड आणि एक घुबड सतत एकमेकांशी भांडत व एकमेकांची पिल्ले खात असत. शेवटी त्यांनी एकमेकांशी मैत्री करायचे ठरवले आणि एकमेकांच्या पिल्लांना खाणार नाही, अशी शपथ घेतली. घुबड गरुडास म्हणाले, "गड्या! पण माझी पिल्ले कशी असतात, हे तुला माहीत आहे ना? चुकून तू माझ्या पिल्लांना दुसऱ्या एखादया पक्ष्याची समजून गट्ट करशील, अशी मला भीती वाटते."

"खरेच, तुझी पिल्ले कशी असतात, सांग बरं!"

घुबड म्हणाले, "ऐक तर. माझी पिल्ले फार सुंदर असतात. त्यांचे डोळे सुंदर, पिसे सुंदर, सगळेच काही सुंदर असते. ह्या वर्णनावरून माझी पिल्ले कोणती हे तुला सहज समजेल." पुढे एके दिवशी, एका झाडाच्या ढोलीत, गरुडास घुबडाची पिल्ले सापडली. त्यांना पाहून तो म्हणाला, "किती घाणेरडी आणि कुरूप पिल्ले ही! आपली पिल्ले फार सुंदर असतात असे घुबडाने सांगितले आहे. तेव्हा ही घुबडाची पिल्ले नक्कीच नाहीत. ह्यांना मारून खाण्यास काही हरकत नाही." असे म्हणून त्याने त्या पिल्लांचा फडशा पाडला.

**क. ही कथा कोणत्या कथा प्रकारात मोडते ते सांगू या. त्याचे स्पष्टीकरण देऊ या.**

**ख. ह्या कथेतून काय बोध मिळाला?**

**४. खालील मुद्द्यांच्या मदतीने एक गोष्ट लिहू या आणि ती वर्गात वाचून दाखवू या.**

(एक तहानलेला कावळा – उन्हाळा – भर दुपार – व्याकूळ होणे – एका माठात तळाला पाणी – चोच न पोचणे – आजूबाजूला छोटे खडे – चोचीने एक एक गोळा करणे – पाण्यात टाकणे – हळूहळू पाणी वर येणे – चोच पोचणे – समाधान – उडून जाणे – तात्पर्य...)

## ५ वक्तृत्व आणि संबोधन



हॅलो... हॅलो... माईक टेस्टिंग...

'सभेत भाषण करणे हा भारतीयांचा सर्वात आवडता खेळ आहे', अशी भारतीयांची चेष्टा जगात नेहमीच केली जाते. थोडेसे उंच व्यासपीठ, त्यावर बसायला एक खुर्ची, बोलायला एक माईक आणि समोर एकापेक्षा अधिक श्रोते, एवढी सामग्री असली की भारतीय वक्ता चेकाळतोच. 'भाषण ठोकणे' असा मराठीत वाक्प्रचारच आहे. न थांबता धबधब्यासारखे बोलत राहणे आणि समोरच्या श्रोत्याला अर्धमेला केल्याशिवाय न थांबणे, असे ह्या खेळाचे स्वरूप असते. पूर्वी प्रत्येक भाषणाची सुरुवात संबोधनाने होई. साधारणपणे समोर लहान मुले असतील, तर 'बरं का, मुलांनो... !' किंवा 'माझ्या लाडक्या बालमित्रांनो... !'; स्त्रिया असतील, तर 'नमस्कार, भगिनींनो... !'; पुरुष आणि स्त्रिया असा मिश्र श्रोतृवर्ग असेल, तर 'बंधु-भगिनींनो', 'श्रोतेहो', किंवा 'रसिकहो', असे काहीतरी; तरुण श्रोते असतील, तर 'माझ्या तरुण मित्रांनो... (आणि त्यांच्या मैत्रिणींनो!!)' आणि वृद्धसभा असेल, तर

‘आदरणीय श्रोतेहो’... अशी प्रसंगासाठी सुयोग्य संबोधने वापरण्याची पद्धत होती. राजकीय सभा, तिथे वापरली जाणारी संबोधने आणि होणारी भाषणे हा एक स्वतंत्र लेखविषय आहे; त्याबद्दल पुढे कधीतरी बोलू या. आजही सभांमध्ये जुनी संबोधने अधूनमधून ऐकू येतात, पण बऱ्याचदा नुसतेच ‘मित्रांनो, नमस्कार’ किंवा ‘नमस्कार मंडळी’ अशा अनौपचारिक संबोधनानेच भाषणाची सुरुवात होते.




**१. वरील उतारा पुन्हा वाचू या आणि त्यातील निरनिराळ्या संबोधनांची उदाहरणे लिहू या.**

उदा॰ श्रोतेहो...

**संबोधन करताना... While addressing... (Vocative Case)**

- संबोधन करताना नामांचे ‘सामान्य रूप’ होते. उदा॰ ‘बाळ – बाळा’
- लिंगानुसार ‘अरे’, ‘अगं’ किंवा गरज असल्यास आदरार्थी ‘अहो’ असे संबोधन वापरले जाते.

| ए॰व॰ | अ॰व॰ |
|---|---|
| अरे मुला | अरे मुलांनो |
| अगं मुली | अगं मुलींनो |
| अरे बाळा | अरे बाळांनो |
| अहो सर | गुरुजनांनो / गुरुजनहो |

- ‘अरे’, ‘अगं’ आणि ‘अहो’ ही संबोधने स्वतंत्रपणेही वापरली जातात.



माणसाच्या हृदयाचे ठोके वाढवणाऱ्या संबोधनांची यादी केली, त्यात “मित्रोंऽऽऽ!” ह्या संबोधनाने संपूर्ण देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. पहिल्या क्रमांकावर आपलं तेच जुनं संबोधन जागा टिकवून आहे... “अहोऽऽऽ, ऐकलंत का???”

**टीप :**

महाराष्ट्रात पतीला त्याचे नाव न घेता ‘अहो’ व पत्नीला ‘अगं’ म्हणायची पद्धत आहे. बदललेल्या काळानुसार पतीला आता ‘अरे’ म्हणूनही नावासह हाक मारली जाते.

२. भाषणाची रचना

क. एखाद्या व्यासपीठावरून कोणताही विषय मांडताना आपण आपल्या भाषणाचे, त्यातील मुद्द्यांचे योग्य भागांमध्ये विभाजन केले पाहिजे. खालील यादी वाचू या आणि योग्य क्रम लावू या.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | विषयाची ओळख | | सादरीकरणाची रचना | | एका मुद्द्यावरून दुसऱ्या मुद्द्यावर |
| | शेवट आणि आभार | १. | अभिवादन व संबोधन | | अनुकूल / प्रतिकूल बाजू मांडणे |
| | महत्त्वाचे मुद्दे / प्रश्न : यांवर श्रोत्यांना विचार करायला लावणे | | | | |

ख. आता खाली दिलेली वाक्ये वाचू या आणि भाषणामध्ये ती कोणत्या भागात म्हटली जातात ते वरील क्रमानुसार सांगू या.



उदा॰ १. अभिवादन व संबोधन – घ.

वाक्ये :

क. हा होता पहिला मुद्दा. आता मी दुसऱ्या मुद्द्याकडे वळतो. दुसरा मुद्दा असा की... / आता मी दुसऱ्या मुद्द्यावर येतो / बोलतो.

ख. माझ्या सादरीकरणाचे एकूण तीन भाग आहेत. आधी मी ह्या विषयावर / ह्या समस्यांवर एक दृष्टिक्षेप टाकणार आहे. मग मी ह्या विषयावरील / विषयासंबंधीचे महत्त्वाचे प्रश्न मांडणार आहे. / आधी मी ह्या विषयाची सविस्तर माहिती देणार आहे. मग मी ह्या विषयाशी संबंधित मुद्दे थोडक्यात मांडणार आहे. / आधी मी हा विषय सविस्तर मांडणार आहे. मग मी ह्या समस्येवरील जगभरातील मतमतांतरे मांडणार आहे. / शेवटी मी ह्या विषयावरील महत्त्वाचे प्रश्न आपल्यासमोर ठेवणार आहे. / शेवटी मी ह्या विषयावरील माझे वैयक्तिक मत मांडणार आहे. / शेवटी मी ह्या समस्येवर आणि सामाजिक पातळीवर काही उपाय सुचवणार आहे.

ग. आज मी... विषयावर बोलणार आहे. / आज मी... समस्येवर माझी मते मांडणार आहे. / आज मी... ह्या विषयाबद्दल बोलू इच्छितो. / आजच्या माझ्या सादरीकरणाचा विषय आहे... / आज मी आपल्यासमोर... हा विषय मांडणार / सादर करणार आहे...

घ. नमस्कार, श्रोतेहो / माझ्या बंधू आणि भगिनींनो / मित्रमैत्रिणींनो / ...



च. आपण कधी ह्याचा विचार केला आहे का? / आपल्यालाही कधी हा प्रश्न पडला आहे का? / हे कधी तुमच्या लक्षात आलं का? तुम्हाला काय वाटतं...? तुमचं ह्यावर काय मत आहे? ह्यावर तुम्ही काय म्हणाल?

छ. शेवटी मी एवढंच सांगू इच्छितो... / माझं बोलणं संपवण्यापूर्वी मी पुन्हा एकदा थोडक्यात काही महत्त्वाचे प्रश्न आपल्यासमोर मांडतो... शेवटी मला हेही सांगावंसं वाटतं, की... / आपण माझं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. / माझं भाषण शांतपणे ऐकल्याबद्दल धन्यवाद. / माझ्या सादरीकरणावर आपले काही प्रश्न असतील तर ते जरूर विचारावेत.

ज. महत्त्वाची गोष्ट / बाब म्हणजे... / महत्त्वाचा मुद्दा / प्रश्न म्हणजे... / ... ह्या एका अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्याकडे मी आपलं लक्ष वेधू इच्छितो. / मजेशीर गोष्ट म्हणजे... / ... हे विसरून चालणार नाही. / हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. / ह्यावर आपण विचार केला पाहिजे.

**टीप :**

प्रत्येक विद्यार्थ्याने वक्तृत्वाच्या सरावासाठी एक विषय निवडून त्या विषयावर किमान १० मिनिटे बोलावे.

## ६ 'देऊळ' ह्या मराठी चित्रपटातील काही दृश्ये पाहू या.

**१. बरोबर उत्तर अधोरेखित करू या.**




क. गावामध्ये कोणत्या विज्ञान शाखेचे काम चालू आहे? (बायोलॉजी / आर्किऑलॉजी / बॉटनी)

ख. हजार-दीड हजार वर्षांपूर्वीच्या कोणत्या वस्तू उकरून काढल्या जातात? (खापराचे तुकडे / म्हणी)

ग. करडी कोण आहे? (बाय / गाय)

**२. करडी सापडल्यानंतर काय घडले ते लिहू या.**

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

**३. त्या घटनेचा केशव कोणता अर्थ काढतो?**

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

**४. तो काय ओरडत गावाच्या दिशेने पळू लागतो?** ---------------------- **!!**

**५. त्यावर केशवच्या आईची प्रतिक्रिया काय होते?**

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

**६. केशवची आई केशवला घेऊन कुठे आणि का जाते?**

____________________________________________

____________________________________________

**७. अण्णांची प्रतिक्रिया काय होते?**

____________________________________________

____________________________________________

**८. तुम्हाला कोणाचे वागणे पटते? केशवच्या आईचे की अण्णांचे? स्पष्टीकरण देऊ या.**

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

## ७ असो, असू दे...

**१. ‘असो’ हा शब्द खालील वाक्यांत कोणत्या अर्थाने वापरला आहे त्याचा अभ्यास करू या. नंतर क, ख, ग, घ पैकी योग्य तो पर्याय त्या त्या वाक्यापुढे लिहू या.**

क. जे झाले ते झाले  ख. ठीक आहे  ग. हो  घ. असेल तरी

उदा॰ ह्या चराचरातला प्रत्येक जीव जन्मतो, जगतो आणि मरतो. मग ती इवलीशी वेल असो, मोठा हत्ती असो वा माणूस असो. घ) - असेल तरी

१. आजपर्यंत आपण अनेक विषयांवर बोललो, पण ह्या महत्त्वाच्या विषयाचा उल्लेखही केला नाही, हे चुकलेच. असो. परंतु ह्यापुढे असं चालणार नाही, हे लक्षात ठेवू या.

२. मागील पत्रात मी ह्याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहेच, असो.

३. आपण सांगूनही त्यांनी त्याच त्या चुका परत परत केल्या आणि करत आहेत. आपण आणखी काय करणार? असो. परत असं होणार नाही, अशी अपेक्षा करू या.



४. तुमचं म्हणणं आम्हाला पूर्णपणे पटलेलं नाही. असो, पण आम्ही तसं वागायचा प्रयत्न नक्की करू.

५. 'इनोव्हेशन आईनस्टाईनच्या नजरेतून' हे प्रत्येकानं वाचलंच पाहिजे असं पुस्तक आहे. मग तो वाचक कोणत्याही क्षेत्रातील असो.

६. जगण्याची चौकट कोणतीही असो, संघर्ष प्रत्येकाच्याच वाट्याला येतो.

२. असू दे

**क. मिनू प्रत्येक बाबतीत अगदी हट्टी, जराही तडजोड खपवून घेणार नाही. पण तिच्या आवडीची गोष्ट असेल, तर मग आपणहूनच म्हणते, 'असू दे, चालेल मला'. एक संवाद ऐकू या व संवादातील मिनूची वाक्ये बोलू या.**




**आई** : ...

**मिनू** : असू दे, चालेल मला.

**आई** : ...

**मिनू** : असू दे, जमेल मला.

**आई** : ...

**मिनू** : असू दे, करेन मी.

**आई** : ...

**मिनू** : नसू दे. राहीन मी.

**ख. तुम्हीपण तुमच्या आवडीच्या गोष्टीबाबत तडजोड करता का? तुम्ही 'असू दे' कशाला म्हणाल? आणि दुसरा पर्याय कशाला शोधाल? उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये करू या.**

उदा॰ मी आज जे कपडे घालायचं ठरवलं होतं, त्यांना इस्त्री नाहीये. असू दे, घालते तसेच. / नको, दुसरे घालते.

१. माझं आज प्रेझेन्टेशन आहे, पण ते मनासारखं झालं नाहीये.

२. मला आज मुलाखतीला जायचंय, पण मॅचिंग टाय मिळत नाहीये.

३. गाण्याच्या मैफलीला जायचंय. उशीर होणार बहुधा.

४. मैत्रिणीचा वाढदिवस आहे. मी भेटवस्तू आणायचं विसरले की!

५. भाजीत मीठ जास्त झालंय.

**ग. असू दे**



देवा, जो रोज माझ्या स्वप्नात येतो, तो मला खरंच भेटू दे
तो उमद्या स्वभावाचा असू दे
त्याचा बांधा मजबूत असू दे
तो रंगाने सावळा असू दे
तो मनाने कणखर असू दे
तो उच्चशिक्षित असू दे
त्याला चांगली नोकरी असू दे
त्याला भरपूर पगार असू दे
तो उदार असू दे
आणि मुख्य म्हणजे – तो माझ्यावर फिदा असू दे

**हे झाले एका मुलीचे मनोगत. एक मुलगा देवाकडे काय मागेल? वरीलप्रमाणेच काही ओळी लिहू या.**

देवा, जी रोज माझ्या स्वप्नात येते, ती मला खरंच भेटू दे

ती...

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

-------------------------------



## ८ मंत्र, विज्ञान आणि अंधश्रद्धा

एखादी श्रद्धा किंवा एखादा मंत्र चुकीचा किंवा खोटा आहे हे सिद्ध करता आले, तर तो वैज्ञानिक दृष्टिकोन असतो. पुराव्याने सिद्ध केल्यास विज्ञान त्या श्रद्धेला मागे टाकून पुढे जाते. म्हणजेच प्रयोगाला वाव असेल, तर तिथे वैज्ञानिक दृष्टिकोनाला वाव असतो. उदा. माणूस मेल्यावर स्वर्गात जातो. ही श्रद्धा चुकीची आहे किंवा अंधश्रद्धा आहे, हे प्रयोगाने सिद्ध करण्यास वावच नाही. पण तरीही ह्या श्रद्धेला आपण कवटाळून बसलो, तर मग ती अंधश्रद्धा. आणि त्यानुसार पापपुण्याच्या कल्पना बाळगल्या, तर वैज्ञानिक दृष्टिकोनापासून आपण खूपच लांब आहोत असे म्हणावे लागेल. श्लोक आणि मंत्रांवरची श्रद्धाही पारखता येते. हनुमान चालिसा हे श्रद्धेने म्हटले जाणारे स्तोत्र आहे.



"जुग सहस्र योजन पर भानू, लील्यो ताहिमधुर फल जानू" सूर्याचे पृथ्वीपासूनचे अंतर १५३,६००,००० कि.मी. आहे ही माहिती ह्यातून मिळते. आधुनिक विज्ञानानेही हे सिद्ध केले आहे. "ॐ" ह्या एकाक्षरी मंत्रावर संशोधन केल्यावरही हे दिसून आले आहे, की ह्या मंत्रोच्चारामुळे हृदयाचे कार्य सुधारते, रक्ताभिसरण सुधारते आणि मनोबल वाढते. त्यामुळे श्रद्धेने हा मंत्र म्हटल्यास नक्कीच फायदा होईल.

थोडक्यात काय, तर पुराव्याने सिद्ध झाली तर ती श्रद्धा आणि प्रयोगांना वावच नसेल तर ती अंधश्रद्धा, असे म्हणता येईल. प्रत्येक श्रद्धेला प्रश्न विचारला तर वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासता येईल. श्रद्धा डोळस नसेल तर तिला अंधश्रद्धा म्हणावे लागेल.

## ९ काळ

**१. खालील कविता वाचताना रंगीत शब्द लक्षपूर्वक वाचू या.**




मला नुकतीच जाग आली,
संध्याकाळीच पहाट झाली.
आदल्या दिवशी झोपी गेलो,
दुसऱ्या दिवशी जागा झालो.
काल एक स्वप्न पाहिलं



सगळेच आपले मंगळावर पोचले !
मघाशीच आई म्हणाली,
"अलीकडे वेड्यासारखाच वागतोस,
वेळीअवेळी झोपतोस,
वाट्टेल ते बडबडतोस.
मघाशीच म्हटलं बाबांना,
यंदा पाठवा त्याला हॉस्टेलला."
पूर्वी बुवा छान होतं !
मोठं झाल्याचं ओझं नव्हतं.

नुकतीच, अलीकडे, मघाशीच, संध्याकाळी,
आदल्या दिवशी, यंदा, पूर्वी,
वेळीअवेळी, काल

**२. वरील शब्दांपैकी योग्य शब्द खालील चौकटींमध्ये कालक्रमाने लिहू या.**



**३. खालील वाक्यांमध्ये वरील शब्दांपैकी योग्य शब्द रिकाम्या जागी लिहून वाक्ये पूर्ण करा.**

क. -------------------- झालेल्या मराठीच्या परीक्षेत सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले.

ख. -------------------- ते बोलताना अडखळतात, आणि -------------------- बोललेले विसरतात.

ग. -------------------- केलेल्या निवेदनानुसार -------------------- लागलेल्या शास्त्रीय शोधांचे प्रदर्शन शेजारच्या दालनात भरले आहे.

घ. -------------------- केलेली ई-मेल तुला आजही मिळाली नाही? कसं शक्य आहे?

च. --------------------च्या अंदाजपत्रकामध्ये संशोधनासाठी भरपूर आर्थिक तरतूद केली आहे.

छ. -------------------- त्याने स्वत:ची चूक मान्य केली, पण दुसऱ्या दिवशी पुन्हा तीच चूक केली.

ज. रात्री जागून काम करणारे नंतर -------------------- झोपतात.

झ. -------------------- मिळणारी शांतता आणि फावला वेळ -------------------- मिळेनासा झाला आहे.

ट. आमच्या दादाला -------------------- झोप लागली आहे, त्याला उठवू नकोस.

ठ. -------------------- फिरणे आणि सकाळी काम अशी माझी पद्धत आहे.

## १० कोणासाठी?

**मंदार** : देविका, हा मोबाईल तू कोणासाठी आणलायस?

**देविका** : कोणासाठी म्हणजे? तुझ्यासाठी! मी स्वतःकरता कधी काही आणते का?

**मंदार** : का नाही आणत? स्वतःसाठी स्वतः आणायचं नाही आणि हा माझ्यासाठी काही आणत नाही हे जगाला सांगत बसायचं, ही तुझी नेहमीचीच पद्धत आहे.

**देविका** : मी काही चुकीचं बोलते का? तुला कधीच स्वतःपलीकडे काही दिसत नाही. तू बायकोकरता काही करशील, तिच्यासाठी काही आणशील, अशा काहीच अपेक्षा मी तुझ्याकडून करत नाही; पण मुलांसाठी तरी काही तरी करत जा रे! तू गावाहून येतोस, तेव्हा बाबा आपल्याकरता काहीतरी आणतील ह्या आशेवर बसलेली असतात दोघंही. आता आज तू कशासाठी रजा घेतलीयस?



**मंदार** : सिनेमाला जाण्यासाठी.

**देविका** : मग आता असं कर, सिनेमाला जाण्याऐवजी मुलांकरता काही तरी कर. आज त्यांच्याबरोबर बागेत जा, त्यांच्यासाठी थोडा वेळ काढ.

**Postpositions** : वरील उदाहरणांतील 'साठी' आणि 'करता / करिता' हे शब्द **'शब्दयोगी पदे'** आहेत. ती हेतू दर्शवतात, म्हणून त्यांना **'हेतुवाचक शब्दयोगी पदे'** म्हणतात.

**क. खालील वाक्यांमधील 'साठी' आणि 'करता / करिता'च्या जागा बदलून काही फरक पडतोय का ते पाहा !**

१. मी ज्या कामाकरिता येथे आले आहे, ते आधी पूर्ण करते. आपण नंतर बोलू.

२. मिलिंद अरुंधतीसाठी काहीही करायला नेहमीच तयार असतो.

३. हा नवीन अभ्यासक्रम खास आपल्या शाळेतील मुलांकरता तयार केला आहे.

४. कशासाठी इतका अट्टाहास करतायत ती दोघं?

५. मी पोहण्यासाठी तलावात उतरलो; पण पाणी इतकं गार होतं, की लगेच बाहेर पडलो.

६. पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्येक सजीवाला हातपाय हलवावेच लागतात.

७. पर्यावरणासाठी काही लोक खूप काम करतात; पण बरेचसे लोक त्याकरिता काहीच करत नाहीत.

८. सुखी जीवनासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनच गोष्टी खरंच पुरेशा आहेत का?

९. मी अगदी खादाड आहे. मी जगण्यासाठी खात नाही, तर खाण्यासाठी जगतो.



१०. रितेश अभ्यास करण्यासाठी रात्रभर जागतो.



**म्हणी आणि वाक्प्रचार**

आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन

ऐकावे जनाचे करावे मनाचे

**पुणेरी पाटी**



शापित पार्किंग क्षेत्र
कोपरा असल्याने गाडी हमखास घासली जाते. चोरगाडी-गाडी उचलते. टायरमधील हवा कमी होते.
विश्वास नसल्यास अनुभव हीच खात्री!

## ११ संभाषणकौशल्ये.

**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. बबनराव - धावणे, चालणे, बनुताई - वाचणे, ऐकणे, आजोबा - लिहिणे, वाचणे, सखुबाई - उभे राहणे, बसणे, जॉन - स्वयंपाक करणे, खाणे, मस्तराम - ओझं उचलणे, ओझं ढकलणे)



पहिला विद्यार्थी : बबनरावांना आता धाववत नाही.

सर्व विद्यार्थी : अरेरे! किती वाईट!

दुसरा विद्यार्थी : हो, पण ते अजून चालू शकतात.

पहिला विद्यार्थी : हो खरंय. बबनरावांना धाववत नाही, पण ते अजून चालू शकतात.

सर्व विद्यार्थी : हुश्श!

**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. माझं काम - करणे, माझा निरोप - देणे, माझं पत्र - पोचवणे, माझं घड्याळ - शोधणे, माझं पुस्तक - आणणे, माझा चष्मा - दुरुस्त करून आणणे)




पहिला विद्यार्थी : माझं काम तू केलंच नाहीस!

दुसरा विद्यार्थी : हो ना, विसरलोच / विसरलेच!

सर्व विद्यार्थी : विसरलास / विसरलीस? अरे देवा! आता?

पहिला विद्यार्थी : असो! आता माझं मीच करीन.

दुसरा विद्यार्थी : नाही, नाही. मी करीन ना!

सर्व विद्यार्थी : असू दे! करेल त्याचं तो!


**संभाषण करू या.**

| | | |
|---|---|---|
| शंकांचे निरसन करणे | फडशा पाडणे | असे म्हणावे लागेल |
| कवटाळून बसणे | खपवून घेणे | संघर्ष प्रत्येकाच्या वाट्याला येतोच |

संभाषण

**चिंटू**




### पहिले मराठी पाऊल

**विमान चालवण्याचा पहिला प्रयत्न**



सर जे.जे. कलाविद्यालयात कलेचे शिक्षण घेत असतानाच शिवकर बापूजी तळपदे (१८६४ – १९१६) ह्यांना वेदकाळातील विमानविद्येबद्दल कळले. वेदकालीन संस्कृत भाषेचा अभ्यास करून त्यांनी जुने ग्रंथ वाचले. त्यात विमानविद्येबद्दल वाचून आपणही विमान तयार करावे असे त्यांच्या मनाने घेतले. थॉमस एडिसनसारख्या समकालीन संशोधकांनी केलेल्या प्रयत्नांचीही त्यांनी माहिती मिळवली. १८९५ साली मुंबईच्या एका समुद्रकिनाऱ्यावर तळपद्यांनी आपला पहिला प्रयोग केला. आपल्या नवीन यंत्राला त्यांनी 'मरुत्सखा' (वाऱ्याचा मित्र) असे छानसे नावही दिले. बांबूची दंडगोलाकार रचना करून त्यात द्रवरूप पारा भरला. सूर्यप्रकाशामुळे त्यातून हायड्रोजन वायू निर्माण झाला आणि ते 'विमान' उडू लागले.

'ते १५०० फूट उंचीपर्यंत जाऊन खाली पडले' असे काहींनी नोंदवले आहे, तर काहींच्या मते ते काही फारसे उंच गेले नाही किंवा हवेत फार काळ तरंगलेही नाही. एक अभिनव प्रयोग तिथेच थांबला. ते काही असो; तो काळ विचारात घेतला, तर ह्या दिशेने कुणीतरी खटपट करून पाहिली, ही गोष्टही दखल घेण्याजोगीच आहे. शिवकर बापूजी तळपदे ह्यांनी केलेल्या ह्या उपद्व्यापाची नोंद घेऊन काहीच वर्षांपूर्वी 'हवाईजादा' नावाच्या हिंदी चित्रपटाची निर्मिती केली गेली.

**भारतातील पहिली 'अगीची' गाडी - प्रवासी रेलगाडी**



ही 'अगीची गाडी'- म्हणजे प्रवासी रेल्वेगाडी - भारतात प्रथमतः महाराष्ट्राच्या भूमीवर धावली. ३१ ऑक्टोबर, १८५० रोजी या गाडीसाठी मुंबईच्या शीव ह्या उपनगरात लोहमार्ग टाकण्याची सुरुवात झाली. त्यानंतर १६ एप्रिल, १८५३ रोजी, जिथे आज छत्रपती शिवाजीमहाराज टर्मिनस हे स्थानक उभे आहे त्या बोरीबंदर येथून संध्याकाळी ५ वाजता पहिली आगगाडी ४०० ते ५०० माणसे घेऊन निघाली आणि ५७ मिनिटांनी ठाणे येथे पोहोचली. यादिवशी सर्व सरकारी कचेऱ्यांना सुटी देण्यात आली होती. मुंबईकरांप्रमाणेच बाहेरगावाहून आलेल्या लोकांनी हे नवल पाहण्यासाठी गर्दी केली होती.

**हिंदुस्तानी, अगीची गाडी । तिला बांधला मार्ग लोखंडी ।**
**मनाचाही वेग मोडी । मग कैची हत्ती घोडी ।**
**पाहुनी झाली माणसे वेडी । पाऊण तासात ठाण्यास धाडी । ...**

अशा रचनांनी समाजाने ह्या नव्या युगाचे स्वागत केले. वर्षभरातच रेलगाडीचा इतिहास, तिचे शास्त्र आणि तंत्र, जेम्स वॅटचे चरित्र, गाडीचे अंतरंग, सोयी आणि फायदे, अपघाताच्या शक्यता इ. अनेक विषयांची सविस्तर माहिती असलेले 'लोखंडी रस्त्यांचे संक्षिप्त वर्णन' (इ. स. १८५४) हे मराठी (भाषांतरित) पुस्तकही प्रसिद्ध झाले. लेखक होते कृष्णशास्त्री भाटवडेकर. तोवर कल्याणपर्यंतचा मार्ग तयार झाला होता आणि मुंबई-पुणे आणि मुंबई-नाशिक मार्गांचे काम सुरू झाले होते.

**शब्दार्थ :**
कैची : कशाची; कशासाठी
धाडी : (धाडणे) पाठवणे

## दृष्टिक्षेप

### नामे

| | | |
|---|---|---|
| तो अणू, ते - | ती फुंकर, त्या फुंकरा | ते भूत, ती भुते / तं |
| तो अट्टहास | ती फट, त्या फटी | ते अंतर्ज्ञान |
| तो शाप, ते - | ती परिणती | ते गृहीतक, ती गृहीतके / कं |
| तो ग्रह, ते - | ती घनता | ते खतपाणी |
| तो दाब | ती अडगळ, त्या अडगळी | ते औत्सुक्य |
| तो पसारा, ते पसारे | ती ढोली, त्या ढोल्या | ते निरसन |
| तो पाया, ते पाये | ती मैफल, त्या मैफली | ते वक्तृत्व, ती वक्तृत्वे / त्वं |
| तो पाटा, ते पाटे | ती भूतबाधा, त्या - | ते गुरुत्वाकर्षण |
| तो वरवंटा, ते वरवंटे | | ते तात्पर्य, ती तात्पर्ये / र्यं |
| तो मान, ते - | | ते स्तोत्र, ती स्तोत्रे / त्रं |
| तो बेत, ते - | | ते रक्ताभिसरण |
| तो मंत्रोच्चार, ते - | | ते मनोबल |
| तो पूजापाठ, ते - | | |

### क्रियापदे

पडताळणे गाठणे दळणे संबोधणे वेधणे कवटाळणे
पारखणे अडखळणे

### क्रियाविशेषणे

निव्वळ अपघाताने वयपरत्वे

### विशेषणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उमदा | त्रिकालाबाधित | सुयोग्य | अशास्त्रीय | क्रमबद्ध |
| जिज्ञासू | अवैज्ञानिक | मूलभूत | दर्जेदार | कालबाह्य |
| चोखंदळ | परस्परविरोधी | कणखर | अवाढव्य | तर्कशुद्ध |

नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. संबंध जोडणे | श्रद्धा आणि वैज्ञानिक सत्य यांचा संबंध जोडू नये. |
| २. नियम / सिद्धांत मांडणे | असंख्य निरीक्षणे करून आणि निसर्गनियम तपासून वैज्ञानिक सिद्धांत मांडले जातात. |
| ३. पाया रचणे | महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुल्यांनी कष्ट घेऊन स्त्रीशिक्षणाचा पाया रचला. |
| ४. फुंकर मारणे | मेणबत्ती विझवण्यासाठी समीरने फुंकर मारली. |
| ५. विश्वास ठेवणे | पोहायला शिकवणाऱ्या शिक्षकांवर पूर्ण विश्वास ठेवून सईने विहिरीत उडी मारली. |
| ६. फडशा पाडणे / उडवणे | वाघाने हरणाची शिकार केली आणि तासाभरातच शिकारीचा फडशा पाडला. |
| ७. नियंत्रण मिळवणे | समीरने कामात केलेल्या चुका बघून कुलकर्ण्यांचा भयंकर संताप झाला; पण काही क्षणांतच त्यांनी संतापावर नियंत्रण मिळवले. |
| ८. मागोवा घेणे | सतत चोरीच्या तक्रारी आल्यावर मात्र पोलिसांनी गुन्ह्याचा मागोवा घेतला आणि चोरांना अटक केली. |
| ९. सामना करणे | दोन भाषणांमध्ये परस्परविरोधी विधाने केल्यामुळे प्राचार्यांना पत्रकारांच्या प्रश्नांचा सामना करावा लागला. |
| १०. वाव असणे | पर्यावरणशास्त्रात वनस्पती आणि कीटक यांच्या संबंधातील संशोधनाला खूप वाव आहे. |
| ११. लक्ष वेधणे | आपल्या सुंदर केशरचनेमुळे ती सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होती. |
| १२. दृष्टिक्षेप टाकणे | पाहुण्यांनी प्रदर्शनाकडे केवळ एक दृष्टिक्षेप टाकला, कारण प्रदर्शन हिंडून पाहायला त्यांना वेळ नव्हता. |

इतर शब्द व क्रियापद जोड्या Other words and Verb combinations

| इतर शब्द + क्रियापद<br>Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. निरसन करणे | सखीच्या कुठल्याही शंकेचे निरसन करण्यासाठी तिचा बाबा नेहमी तत्पर असतो. |
| २. खपवून घेणे | आमच्या बाई गृहपाठाच्या बाबतीत कंटाळा, गबाळेपणा कधीही खपवून घेत नाहीत. |
| ३. कवटाळून बसणे | शिक्षित लोकही शुभ-अशुभाच्या कल्पनांना कवटाळून बसलेले दिसतात. |
| ४. अज्ञान दूर करणे | पर्यावरणाविषयीचे जान्हवीचे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न मी करत असते, पण ऐकून घेण्याची तिची तयारी नसते. |

आता मला हे येतं...

विज्ञान आणि तंत्रज्ञान

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

यंत्रे : उपयोग, समस्या, तक्रारी

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

शक्य क्रियापदे : उचलवते - उचलवत नाही, करवते - करवत नाही इ॰

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

लेखनाचे आणि कथनाचे प्रकार

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

संबोधन : श्रोतेहो, मित्रहो इ॰

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

वक्तृत्व

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

‘असो’ आणि ‘असू दे’

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

मंत्र, विज्ञान आणि अंधश्रद्धा ह्यांविषयी बोलणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

नुकतेच, मघाशी, काल संध्याकाळी, आदल्या दिवशी, पूर्वी, अलीकडेच, यंदा इ॰

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

शब्दयोगी पदे : साठी / करिता

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ८

# सणवार








## चला, शिकू या...

- विविध सण : नववर्ष, सणांची पक्वान्ने
- स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे, प्रश्नशब्द : कशाशी?
- रीती काळ (उजळणी)
- धातुसाधित भाववाचक नामे
- जोडीने येणारी नामे : चिडचिड, बडबड, हुरहुर इ.
- शब्दयोगी पदे : समक्ष, विरुद्ध, उलट, सह
- स्थलवाचक क्रियाविशेषणे : आतून, बाहेरून, वरून, खालून इ.
- आज्ञार्थी रूपे : मनावर घे, लाजू नकोस इ.
- समूहवाचक नामे
- चित्रकथा

## १ चित्रवर्णन

**१. पहिल्या पानावरील चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

- चित्रांमध्ये सणांशी संबंधित कोणत्या गोष्टी दाखवल्या आहेत?
- चित्रांमधील निरनिराळे लोक सण साजरा करण्यासाठी काय काय करत आहेत?
- माणसे सण का साजरे करतात?


## २ नववर्षाचे स्वागत करणारे विविध सण

**१. नववर्ष म्हणजे उत्साह, आनंद, नव्या आशा, नव्या कल्पना आणि नवे संकल्प. नववर्ष साजरे करण्याच्या विविध सणांची सुंदर चित्रे आपण वर पाहिली. आता त्या चित्रांच्या सणांशी जोड्या लावू या.**

क. दिवाळी    ख. नाताळ    ग. मोहर्रम    घ. होळी    च. संक्रांत    छ. पारशी नववर्ष

**२. तीन - तीन जणांचे गट करून खालील शब्द वाचू या. उदाहरणात दिल्याप्रमाणे त्यापुढील तक्त्यात योग्य त्या जागी योग्य ते शब्द भरून तक्ता पूर्ण करू या. एकच शब्द एकापेक्षा जास्त वेळा येऊ शकतो.**

कार्तिक महिन्यातला १५वा दिवस (ऑक्टोबर-नोव्हेंबर), २५ डिसेंबर, फराळाचे पदार्थ, पक्वान्ने, घराची साफसफाई, आकाशकंदील तयार करणे, मातीचे किल्ले बनवणे, सांताक्लॉज, नातेवाईक व मित्रमंडळींना भेटणे, रमजान ईद, भेटवस्तू देणे, ख्रिसमस ट्री, एकत्र जेवणे, रोशणाई, रांगोळी काढणे, फटाके उडवणे, नातेवाईक, मित्रमंडळी, गुळाची पोळी, नवे कपडे, फराळाचे पदार्थ, होळी पेटवणे, केक, पक्वान्ने, प्रार्थनास्थळांना (मंदिर, मशीद, चर्च, अग्यारी) भेट, रोजे पाळणे, मेणबत्त्या लावणे, शिरखुर्मा, सामूहिक प्रार्थना, काळे कपडे, तिळगूळ, रंगांची उधळण करणे, १४ जानेवारी, वसंत ऋतूची सुरुवात, पुरणपोळी, पतंग उडवणे, मोठ्यांचे आशीर्वाद घेणे, फाल्गुन पौर्णिमा, इस्लामी कॅलेंडरनुसार ९वा महिना



| सण | कधी | पूर्वतयारी | साजरा करण्याची पद्धत | सहभाग | खाद्यपदार्थ |
|---|---|---|---|---|---|
| दिवाळी | कार्तिक महिन्यातला १५वा दिवस (ऑक्टोबर-नोव्हेंबर) | घराची साफसफाई, आकाशकंदील तयार करणे, मातीचे किल्ले बनवणे | नातेवाईक व मित्रमंडळींना भेटणे, भेटवस्तू देणे, एकत्र जेवणे, रोषणाई, रांगोळी काढणे, फटाके उडवणे. प्रार्थनास्थळांना भेट (मंदिर, ... ) | नातेवाईक मित्रमंडळी | फराळाचे पदार्थ, पक्वान्ने |
| नाताळ | | | | | |
| संक्रांत | १४ जानेवारी | | | | |
| रमजान ईद | | | | | |
| होळी | फाल्गुन पौर्णिमा (मार्च) | | | | |
| पारसी नववर्ष / पतेती | नवरोज | | | | |

३. आता वरील सर्व सणांची माहिती परत नीट वाचू या. सण साजरे करण्याच्या पद्धतीत काय साम्य दिसते आणि काय फरक आहे ते पाहून चर्चा करू या.

४. वरील तक्त्यात जमा केलेली माहिती वापरून कोणत्याही एका सणावर एक छोटासा उतारा लिहू या.



करा आणि शिका

५. दोन दोन विद्यार्थ्यांनी एकमेकांना आपल्या प्रांतातील नववर्षाच्या सणाबद्दल माहिती द्यावी. आपल्या जोडीदाराने दिलेली माहिती प्रत्येकाने वर्गासमोर सादर करावी.

६. **वाचू या.**

सणांविषयी थोडेसे...



एकूणच भारतीय समाज उत्सवप्रिय आहे हे खरेच आहे. वर्षभर तऱ्हेतऱ्हेचे सण, समारंभ, उत्सव साजरे करण्यात तो गुंतलेला असतो. मराठी समाजही ह्याला अपवाद नाही. परंपरेने चालत आलेले बहुतेक सगळे सण धर्माचा आणि श्रद्धांचा आधार असलेले, ह्या ना त्या दैवताशी संबंधित असतातच; पण त्याच वेळी ते निसर्गाशी, ऋतुचक्राशी, समाजाच्या जीवनशैलीशीही नाते सांगणारे असतात. ऋतू बदलला, पहिला पाऊस झाला, शेतात नवे पीक आले, सूर्याने आपला मार्ग बदलला, थंडी संपून वसंत ऋतूची चाहूल लागली, अशी अनेक कारणे सण साजरे करण्यामागे असतात. आपल्याला जीवन देणाऱ्या मातीबद्दल, पाण्याबद्दल, प्रकाशाबद्दल, सर्व प्रकारच्या जीवजिवाणूंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केलेली ती कृती असते. जगण्याची ओढ जिवंत ठेवण्याच्या, माणसामाणसामध्ये असलेल्या नात्यांतील प्रेमाचा, आपुलकीचा आणि स्नेहाचा ओलावा टिकवून ठेवण्याच्या गरजेतून अशा सण-उत्सवांची निर्मिती झालेली असते.

आता जीवनशैली फारच बदलली आहे; त्याचबरोबर विचारही बदलले आहेत. पूर्वीप्रमाणे जगण्याची लय निसर्गाच्या लयीशी जुळणारी राहिलेली नाही. त्यामुळे पूर्वीचे अनेक सण आजही साजरे होत असले, तरी त्यांचे स्वरूप मात्र पूर्वीचे राहिलेले नाही. बदलत्या जीवनपद्धतीला अनुरूप असणाऱ्या नव्या सणांची त्यांत भर पडलेली आहे. धार्मिक श्रद्धांशी किंवा विशिष्ट परंपरेशी संबंध न ठेवता निखळ माणूसपणाशी नाते जोडण्याची संधी देणारे नवे उत्सव साजरे होत आहेत, ही एक चांगली गोष्ट आहे. मात्र, आनंदाच्या कल्पनाच बदलल्या आहेत. त्यातील काहींचे स्वागत करण्यासारख्या आहेत तर काहींचे काय करावे ह्याबद्दल संभ्रम आहे. बाजारपेठेने सगळ्या जगण्याचाच ताबा घेतला असल्याने आनंदाच्या कल्पना आणि तो साजरा करण्याच्या पद्धतीही तीच ठरवत आहे. आपल्या रोजच्या जगण्याचे चक्र थांबवून थोडा विराम घेणे तिला परवडत नाही. साधेपणा आणि शांतता तिला मुळातच अमान्य आहे. सण खऱ्या अर्थाने 'साजरे' करण्यापेक्षा ते झगमगाटाने आणि गोंगाटाने गाजवत ठेवणे ही बाजारपेठेची गरज आहे, आणि म्हणूनच ती समाजाचीही आहे. ते काहीही असले, तरी जोवर एका माणसाचे दुसऱ्या माणसाशी नाते आहे, तोवर तरी सण-समारंभांची गरज त्याला भासतच राहील.

**शब्दार्थ :**

अपवाद = नियम सोडून चालणारा; नियमाप्रमाणे नसणारा    कृतज्ञता = उपकारांची जाण

निखळ = शुद्ध    लय = हालचाल करण्याची किंवा पुढे जाण्याची ठरावीक गती

गाजवणे = सर्वत्र खूप बोलबाला किंवा आवाज होत राहील असे करणे

संभ्रम = गोंधळ; स्पष्टता नाही अशी अवस्था    परवडणे = किंमत देण्याची ताकद असणे

जीवजिवाणू = पशू, पक्षी, कीटक इ. सर्व सजीव

अनुरूप = जुळणारा; सारखेपणा असणारा; सुसंगत

चाहूल = कोणी तरी किंवा काही तरी जवळ येत असल्याची होणारी जाणीव

**क. ज्या शब्दांचे अर्थ दिले आहेत त्यांतील योग्य शब्द निवडून ते योग्य जागी वापरू या आणि वाक्ये पूर्ण करू या.**

१. माझा भाऊ आणि माझी वहिनी स्वभाव, आवडीनिवडी, सवयी, विचार अशा सर्वच बाबतीत एकमेकांना -------------------- आहेत.



२. यंदाचे वर्ष क्रिकेटपेक्षा इतर खेळांनीच -------------------- हे चांगले झाले.

३. समीरा पुस्तक वाचत होती, तेवढ्यात मागे कोणी तरी असल्याची -------------------- तिला लागली आणि तिने झटकन वळून पाहिले.

४. आमच्या घरातले सगळे जण दिवस उगवण्यापूर्वीच उठतात; -------------------- फक्त मी.

५. कोणी लहानशी का असेना, पण मदत केली तर त्याबद्दल -------------------- व्यक्त करणे लोकांना अवघड का वाटते?

**ख. वरील उताऱ्यात ही काही विधाने आहेत. ती तुम्हाला पटतात की नाही? कारणांसह स्पष्ट करू या.**

१. जगण्याची ओढ जिवंत ठेवण्याच्या, माणसामाणसामध्ये असलेल्या नात्यांतील प्रेमाचा, आपुलकीचा आणि स्नेहाचा ओलावा टिकवून ठेवण्याच्या गरजेतून अशा सण-उत्सवांची निर्मिती झालेली असते.

२. धार्मिक श्रद्धांशी किंवा विशिष्ट परंपरेशी संबंध न ठेवता निखळ माणूसपणाशी नाते जोडण्याची संधी देणारे नवे उत्सव साजरे होत आहेत, ही एक चांगली गोष्ट आहे.

३. सण खऱ्या अर्थाने ‘साजरे’ करण्यापेक्षा ते झगमगाटाने आणि गोंगाटाने गाजवत ठेवणे ही बाजारपेठेची गरज आहे, आणि म्हणूनच ती समाजाचीही आहे.

**ग. खालील शब्दकोड्यात लपलेले काही सण शोधू या.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जे | मी | कू | ली | ध | न | व | रो | ज | प |
| ह | वी | श | ई | रा | व | नि | वृ | श्रु | दु |
| रं | द्धी | द | द | स | रा | व | दि | स्थि | ल |
| स्त | बु | ड | रु | भा | त्र | शा | वा | री | क्के |
| भ | कृ | ई | स्ट | र | फ | हो | ळी | ण | ष |
| व | र्म | श: | थी | म | क | र | सं | क्रां | त |
| ल | रा | ठी | ठी | झा | ग | म | ग | ती | ल |
| स्वा | तं | त्र्य | दि | न | श | ळ | म | का | व |

**७. 'अगं बाई अरेच्चा' ह्या चित्रपटातील एका गाण्याची चित्रफीत पाहू या.**

**क. ह्यात जेजुरीच्या खंडोबाच्या यात्रेचे वर्णन आले आहे. त्यात कोणकोणत्या गोष्टी दिसत आहेत? खालील यादीमधील गोष्टींपुढे बरोबरची खूण करू या.**

१. बसमध्ये बसून लोक जेजुरीच्या खंडोबाच्या दर्शनाला निघाले आहेत.
२. बैलांना अंघोळ घालून सजवत आहेत.
३. जमीन शेणाने सारवत आहेत.
४. बाजार भरलेला आहे.
५. खंडोबाच्या मंदिराची रंगरंगोटी सुरू आहे.
६. ढोलताशे आणि तुताऱ्या वाजवत आहेत.
७. धार्मिक प्रथेचे चित्रण दिसत आहे.
८. लोक लेजीम खेळत आहेत.
९. दिव्यांची आरास केलेली आहे.
१०. रांगोळ्या काढल्या जात आहेत.





## करा आणि शिका

**८. वादविवाद करू या.**

विद्यार्थ्यांचे गट करू या. प्रत्येक गटाला खालीलपैकी एक चिठ्ठी मिळेल. चिठ्ठीमधील मुद्दे वाचून प्रत्येक गटाने १० मिनिटे चर्चा करून आपली मते तयार करावीत. त्यानंतर सर्व गटांनी एकत्र येऊन एकमेकांसोबत चिठ्ठीमधील मुद्द्यांच्या मदतीने वादविवाद करावा.

**गट १. – मुद्दे :**

- सण साजरे केलेच पाहिजेत.
- सणांमुळे संस्कृती जपली जाते.
- सणांमुळे माणसे एकत्र येतात.
- सणांमुळे माणसे आनंदी राहतात.

**गट २. – मुद्दे :**

- सण साजरे करणे म्हणजे वेळ वाया घालवणे आहे.
- सणांमुळे वायफळ खर्च होतो.
- सणांमुळे धर्मांचा प्रचार होतो.

**गट ३. – मुद्दे :**

- सण असावेत, परंतु साजरे करण्याच्या पद्धती बदलल्या पाहिजेत.
- सण आधुनिक झाले पाहिजेत.

## ३ सण आणि पक्वान्ने


**१. संवाद ऐकू या.**

**क. संवादात खालीलपैकी कोणत्या पदार्थांचा उल्लेख आला आहे?**

| | | |
|---|---|---|
| ☐ चिरोटे | ☐ शेव पुरी | ☐ केक |
| ☐ पाव भाजी | ☐ शिरखुर्मा | ☐ तिळाचे लाडू |
| ☐ मिसळ | ☐ शंकरपाळे | ☐ बासुंदी |
| ☐ सामोसा | ☐ गोड भात | ☐ खोबऱ्याच्या वड्या |
| ☐ अनारसे | ☐ मोदक | ☐ चकल्या |

**ख. पदार्थ व सण ह्यांच्या जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| १. लाडू, करंज्या | अ. मकर संक्रांत |
| २. पाकातल्या पुऱ्या | आ. नारळीपौर्णिमा |
| ३. गुळाच्या पोळ्या | इ. रंगपंचमी |
| ४. नारळीभात | ई. होळी |
| ५. पुरणपोळी | उ. दिवाळी |



१ ______ २ ______ २ ______

४ ______ ५ ______

**ग. खालील शब्दांच्या विरुद्धार्थी शब्द कोणता?**

(सावकाश, पटपट, कष्ट करून, तुटवडा)

१. रेलचेल : ______________________

२. निगुतीने : ______________________

३. आयतं : ______________________

४. झटपट : ______________________

२. खाद्यभ्रमंती



क. वरील चित्रांतील कोणते खाद्यपदार्थ आपल्याला माहीत आहेत ते सांगू या.

ख. भारतातील निरनिराळ्या प्रांतांतील कोणकोणते खाद्यपदार्थ आपल्याला माहीत आहेत ते सांगू या.

ग. महाराष्ट्रातील कोणते शहर कोणत्या खाद्यपदार्थांसाठी प्रसिद्ध आहे ते आंतरजालावर शोधू या, त्या माहितीचा एक कोलाज तयार करू या आणि वर्गात तो कोलाज भिंतीवर लावू या.

च. चित्र आणि पाककृती अशा योग्य जोड्या लावू या.

**१. कांद्याची भजी**

**साहित्य :** ४-५ कांदे, ३-४ मोठे चमचे भरून हरभरा डाळीचे पीठ (बेसन), १५-२० कढीपत्त्याची पाने, मीठ, लाल तिखट, तळायला तेल

**कृती :** कांदा उभा, पातळ चिरावा. त्यात बेसन, तिखट, मीठ, थोडा ओवा आणि कढीपत्त्याची पाने घालून कालवावे. दोन चमचे तेल कडकडीत तापवून ते त्या मिश्रणात घालावे. गरजेनुसार थोडे पाणी घालून पीठ तयार करावे. कढईत तेल तापवून त्यात बेताच्या आकाराची भजी सोडावीत आणि खमंग तळून बशीत काढावीत. ह्या भज्यांबरोबर लसणीची चटणी मस्त लागते.

**२. श्रीखंड**

**साहित्य :** म्हशीचे २ लिटर दूध, ३ वाट्या साखर, केशर, वेलदोडे

**कृती :** दूध तापवून गार झाल्यावर विरजण लावून त्याचे दही करावे. एक पातळ स्वच्छ फडके घ्यावे, ते पसरट भांड्यात पसरून ठेवावे आणि त्यावर दही ओतून कपड्याचे चारही कोपरे बांधून टांगून ठेवावे. ४-५ तासांनी सर्व पाणी निथळून घट्ट गोळा तयार होईल त्याला चक्का असे म्हणतात. चक्क्यात साखर घालून घोटून ठेवावे. थोड्या वेळाने श्रीखंडाच्या यंत्रातून किंवा चाळणीतून गाळून घ्यावे म्हणजे एकसारखे मऊ होईल. मग त्यात वेलदोड्याची पूड आणि दुधात खललेले केशर घालून एकत्र करावे आणि शक्य असल्यास चांदीच्या वाटीत खायला द्यावे. पोळी किंवा पुरीबरोबर छान लागते.


क



ख



ग



**छ. शब्दसंपदा**

एक पदार्थ करताना अनेक क्रिया कराव्या लागतात. वर दिलेल्या पाककृतींमध्ये कोणकोणत्या क्रिया सांगितल्या आहेत त्याची यादी करू या.

उदा. कापणे, कालवणे, ----------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**ज. खालील तक्त्यात निरनिराळे खाद्यपदार्थ बनवताना केल्या जाणाऱ्या क्रिया दिल्या आहेत. ह्या क्रिया कोणत्या पदार्थावर केल्या जातात ते सांगू या.**

(थालीपीठ, इडलीचे पीठ, कोथिंबीर, शिजवलेली डाळ, पीठ, भिजलेली डाळ, मोदक, पोळी, धुतलेले तांदूळ, भाजी)

| उदा. घोटणे | शिजवलेली डाळ |
|---|---|
| लाटणे | |
| निथळणे | |
| उपसणे | |
| परतणे | |
| चाळणे | |
| निवडणे | |
| थापणे | |
| वाफवणे | |
| आंबवणे | |



### करा आणि शिका

**झ.** सगळे जण एका गोलात उभे राहू या. स्वयंपाक करताना लागणारी कृती एकाने विचारायची आणि दुसऱ्याने ती करून दाखवायची. उदा. एक जण विचारेल, "कुटायचं कसं?" दुसरा कुटण्याची क्रिया करून दाखवेल. ज्याला येणार नाही, त्याला अजून एक संधी देऊन दुसरी एखादी क्रिया करायला सांगायची. उदा. "लाटायचं कसं?" सर्व क्रिया ज्याला / जिला येतील तो / ती नक्कीच उत्तम स्वयंपाकी असणार. दुसऱ्या दिवशी त्याने किंवा तिने एखादा चविष्ट पदार्थ स्वतः करून आणावा, कसे?

**ट. आता तुमच्या प्रांतातील एखादी छान पाककृती सांगा व सुंदर छायाचित्रांसह वर्गात एक फलक बनवून त्यावर चिकटवा.**

**ठ. तुमच्या भाषेतल्या स्वयंपाकातल्या क्रियांना मराठी शब्द कोणता आहे ते शोधू या.**

## ४ कशाशी?

**१. संवाद वाचू या.**

**ब्रह्मेकाकू** : काय मेगन, आवडली का गं पुरणपोळी? तूप वाढते हं थोडं तिच्याशी खायला.

**मेगन** : तिच्याशी? म्हणजे मी काय करायचं?

**ब्रह्मेकाकू** : अगं, तू चहाबरोबर बिस्किटं खातेस, खिचडीबरोबर कढी खातेस तसंच त्या पुरणपोळीला तूप लावून खा. कोणी विचारलं, की तू कशाशी खाल्लीस पुरणपोळी, तर सांगायचं, की तुपाशी. तूप नको असेल तर दुधाशी पण खातात हं पुरणपोळी.

**मेगन** : पुरणपोळी मस्त झालीय हं काकू. पण ह्या बाउलमध्ये हे पातळ आणि तिखट काय आहे?

**ब्रह्मेकाकू** : अगं, ती कटाची आमटी आहे.

**मेगन** : ओऽऽ! ती कशाशी खायची?

**ब्रह्मेकाकू** : ती भाताशी खातात.

| काय | कशाशी खातात |
|---|---|
|  |  |
|  |  |

**टीप :**

कोणत्याही खाद्यपदार्थाला केवळ एक विशिष्ट चवच असते असे नाही, तर कित्येक खाद्यपदार्थ, पाककृती विशिष्ट देशांच्या इतिहासाची व संस्कृतीची माहितीही देतात. आता बघा ना, एकच भारतीय पदार्थसुद्धा भारतातील निरनिराळ्या प्रदेशांमध्ये निरनिराळ्या पद्धतींनी बनवला जातो. शिवाय कोणता पदार्थ कधी करावा, कसा करावा, कसा खावा आणि मुख्य म्हणजे कशाशी खावा, ह्याबद्दलही काही अलिखित नियम आहेत.

**पुणेरी पाटी**

आम्ही खाद्यपदार्थांचे पैसे आकारतो; जागेचे भाडे नाही. तेव्हा... खाऊन झाले की बिल देऊन जागा सोडावी.

## ५ कविता वाचू या.

१. वाचू या.

### बालमित्रास

(...)
आठवते ना –
डोहामधलें स्वैर डुंबणे
अंगावरिचे ओले कपडे –
अंगावरती तसेंच सुकणे,
सुकता कपडे पुन्हा पोहणे (...)

आठवते ना –
अर्धा लाडू फोडुनि खाणे
चिंच तोडुनि तुकडा देणे
देवापुढची खडिसाखर ती
गुरवा चुकवुन पळवुन नेणे!



(...)
आठवते ना –
माळवदावर तिसऱ्या प्रहरीं
मस्त आमटी भाकर खाणे
आईच्या पायाशी घोळत
शनिवारी मारुतिला जाणे!

- वि. म. कुलकर्णी

१. वरील कवितेमध्ये क्रियापदांचा नाम म्हणून वापर झाला आहे. त्या नामांची यादी करू या.

उदा. डुंबणे ----------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

व्याकरण

**क्रियापदांचा नामांसारखा वापर Gerund**

क्रियापदांचा नामांसारखाही वापर होतो. ही नामे नेहमी नपुंसकलिंगी असतात.

**२. काही वाक्ये वाचू या.**



क. थंडीत **फिरणे** तुला सोसायला हवे.

ख. **गाणे** म्हणजे तिचा जीव की प्राण!

ग. त्याचे **वागणे** विचित्र वाटले का तुला?

घ. स्वयंपाक **करणे** ही एक कला आहे.

च. तिचे **हसणे** वातावरणात प्रसन्नता निर्माण करते.

छ. एवढ्या गर्दीतून कुठेही **जाणे** आजकाल फार जिकिरीचे झाले आहे.

**३. ठळक केलेली क्रियापदे नामे म्हणून वापरली आहेत. अशी नामे वापरून पुढील विषयावर छोटासा उतारा लिहू या.**

सुट्टीची एक संध्याकाळ

उदा॰ रोज संध्याकाळी फिरणं ही त्या मैत्रिणींची सवयच होती. मोबाईलवरचं गाणं गुणगुणणं आणि चालत राहणं. काही विनोद झाला की त्या जोरात हसायच्या आणि त्यांचं हसणं बघणं हीच इतरांसाठी एक करमणूक असायची...

**४. क्रियापदांच्या जागी योग्य नामे वापरून रिकाम्या जागा भरू या.**

(लिखाण, चावा, घडणावळ, भांडण, शिलाई, जेवण)



उदा॰ सोनाराकडे दागिने **घडवले,** त्याची मजुरी दिली.
सोनाराला दागिन्यांची घडणावळ दिली.

क. शिंप्याने शर्ट **शिवला,** त्याचे पैसे द्यायचे आहेत.

शिंप्याला त्याची ------------------------ द्यायची आहे.

ख. ते एकमेकांशी खूप **भांडले.**

त्यांचं खूप ------------------------ झालं.

ग. ते कुत्रं जाणाऱ्यायेणाऱ्याला **चावतं.**

ते कुत्रं जाणाऱ्यायेणाऱ्याचा ------------------------ घेतं.

च. अरे वा! आज लवकर **जेवलात** वाटतं!

अरे वा! आज तुमचं ------------------------ लवकर झालं वाटतं!

छ. हा लेखक जे **लिहितो,** ते विचार करायला लावते.

ह्या लेखकाचे ------------------------ विचार करायला लावते.

| मूळ क्रियापद Infinitive | क्रियापदाचा नामासारखा वापर Gerund | धातूपासून तयार झालेले नाम Verbal Noun |
|---|---|---|
| घडणे | | |
| शिवणे | | |
| भांडणे | | |
| उदा ॰चावणे | ते चावणे / चावणं | तो चावा, ते चावे |
| जेवणे | | |
| लिहिणे | | |

**५. खालील उदाहरणे वाचू या. नामांची मूळ क्रियापदे लिहू या.**

क. पिकांची **कापणी** या वर्षी पावसामुळे लांबली.

ख. माझ्या मनाला तिला न भेटल्याची **टोचणी** लागून राहिली.

ग. मुले, घर आणि नोकरीमुळे तिची आठवडाभर **फरफट** होतेच.

घ. **महागाई**मुळे गरिबांना जगणे अवघड झाले आहे.

च. तिने केलेल्या अपमानाची **बोच** सतत मनात राहिली.



**६. वरील वाक्यांमध्ये ठळक केलेली नामे कोणत्या क्रियापदांपासून तयार झाली आहेत ते या तक्त्यात लिहू या.**

| क्रियापद | धातूपासून तयार झालेले नाम |
|---|---|
| उदा॰ क. कापणे | ती कापणी |
| | |
| | |
| | |
| | |

व्याकरण

**७. खालील नामे कोणत्या क्रियापदांपासून तयार झाली आहेत ते लिहू या.**

ती शिवण, ती समज, ती समजूत, तो सांगावा, ती चढण, ती शिलाई, ती घडण, ती बोलवा, ती चढाई, ते लेखन, ती घडणावळ, तो लेख, तो चढ, ते लिखाण, ती धाव, तो बोल, ती चाल, ती वागणूक

| नाम | क्रियापद |
|---|---|
| उदा. ती शिवण, ती शिलाई | शिवणे |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |



- **क्रियापद जसेच्यातसे नाम म्हणून वापरले तर ते नपुंसकलिंगी असते.**

  उदा. ते उठणे / उठणं, ते पाहणे / पाहणं, ते लोळणे / लोळणं, ते वाचणे / वाचणं, ते चावणे / चावणं इ.
- **पण त्याच क्रियापदाच्या इतर प्रकारे झालेल्या नामाचे लिंग मात्र वेगळे असू शकते.**

  उदा. तो उठाव, ती पाहणी, ते वाचन, तो चावा इ.
- **धातूंपासून स्त्रीलिंगी नामे :**

  उदा. ती चिडचिड / ती धडधड / ती बडबड / ती मळमळ / ती हुरहुर / ती वळवळ



## म्हणी व वाक्प्रचार

१. **सणांवरून अनेक म्हणी आणि वाक्प्रचार मराठीत रुजले आहेत. म्हणी आणि त्यांचे अर्थ, अशा जोड्या करू या.**

वारी करणे

आधी पोटोबा मग विठोबा

कपिलाषष्ठीचा योग

एकादशीच्या घरी शिवरात्र

ऋण काढून सण करणे

दिवाळी दसरा, हातपाय पसरा

एकादशी अन् दुप्पट खाशी

असेल तर दिवाळी, नसेल तर शिमगा

राजाला दिवाळी काय ठाऊक?

उदा. अतिशय दुर्मीळ अशी चांगली भेट / घटना / प्रसंग घडणे. (कपिलाषष्ठीचा योग)

क. कर्ज काढूनही मौजमजा करणे. ----------------------------------------

ख. ज्याच्याकडे काही नाही त्याच्याचकडे मागणे. ----------------------------------------



ग. सणाच्या निमित्ताने आळशीपणा आणि आराम करणे.

----------------------------------

घ. जवळ पैसा असेल तेव्हा दिवाळीत करावी तशी चैन, पण नसेल तर बेधडक तसे जाहीर करायला मागेपुढे न पाहणे. -----------

-------------------------------------------

च. पुन:पुन्हा एकच गोष्ट करणे. -------------------------------------------------------

छ. कितीही भक्ती असली तरी आधी पोटभर जेवून मगच देवाची आठवण होणे. ------------

--------------------------------------------------------------------------------

ज. श्रीमंत माणूस रोजच चैनीचे आयुष्य जगतो, चांगलेचुंगले खातो, पितो. त्याला दिवाळीचे काय अप्रूप असणार? ------------------------------------------------------

झ. एकादशीचा उपास म्हणून गवगवा करायचा, पण उपासाचे पदार्थ मात्र भरपूर खायचे.

--------------------------------------------------------------------------------

## ६ वकील आणि फिर्यादी यांच्यातील संवाद.



**वकील** : हं, कोर्टासमक्ष घ्या शपथ, देवाशपथ खरं सांगेन.

**फिर्यादी** : अहो, पण मी कुठे म्हणालो खरं सांगणार नाही म्हणून!

**वकील** : तरी घ्यावी लागते शपथ. हे बघा, कोर्टाला सहकार्य करा, नाही तर तुमच्या मित्राबरोबर तुम्हालाही आत टाकू.

**फिर्यादी** : उलट तुम्हीच धमकी देताय की मला! मीच तुमच्याविरुद्ध तक्रार करीन बघा.

**वकील** : मला सांगा, घडलेला प्रसंग तुम्ही समक्ष पाहिला ना?

**फिर्यादी** : अहो वकीलसाहेब, तुम्हीपण होता की तिथंच सरपंचांसह, तरी मला विचारताय?

**वकील** : पण तक्रार तुम्ही केलीये ना सरपंचांविरुद्ध?

**फिर्यादी** : हां मग? घाबरतो की काय! सर्वांसमक्ष सांगेन, त्यांनी माझ्याकडे पैसे मागितले तेव्हा सरपंचासह वकीलसाहेबही होते तिथे.

**वकील** : तुमची फिर्याद सरपंचांविरुद्ध आहे आणि तुम्ही उलट माझ्यावरच आरोप करताय! याउलट तुम्ही कोर्टाला सहकार्य करायला पाहिजे.

**फिर्यादी** : मला शपथ घ्यायला सांगताय? उलट तुम्हीच शपथ घ्यायला पाहिजे.

**वकील** : (न्यायाधीशांना) स...स... साहेब, फिर्यादीची मन:स्थिती आज काही ठीक दिसत नाही. तुम्ही पुढची तारीख द्या.

१. वरील संवादात काही शब्दयोगी पदे आली आहेत. हीच शब्दयोगी पदे क्रियाविशेषण म्हणूनही आली आहेत. असा दोन्ही वापर दाखवणारी संवादातातील वाक्ये लिहू या.

| शब्दयोगी पद (Postposition) | क्रियाविशेषण (Adverb) |
|---|---|
| उदा॰ कोर्टासमक्ष खरं सांगेन. | घडलेला प्रसंग तुम्ही समक्ष पहिला ना? |
| | |
| | |
| | |

२. वरील संवाद पुन्हा वाचू या आणि त्यातील शब्दयोगी पदांचा अर्थ लावू या.

(सोबत, विरोधात, ऐवजी, समोर)

| | |
|---|---|
| कोर्टासमक्ष | कोर्टाच्या साक्षीने, कोर्टाच्या समोर |
| मित्रासह | मित्रा -------------------- |
| सरपंचांविरुद्ध | सरपंचांच्या -------------------- |
| याउलट | याच्या -------------------- |

## ७ इकडून-तिकडून, वरून-खालून

तू इकडून जाणार की येणार तिकडून?
तू वरून उतरणार की चढणार खालून?
तू बाहेरून आत येणार की आतून बाहेर जाणार?
सांग ना, तू नक्की कुठून येणार?



१. कंसातील योग्य क्रियाविशेषणे वापरून एखादी कविता किंवा गोष्ट लिहू या.

(इकडून-तिकडून, आतून-बाहेरून, वरून-खालून, मधून, मागून-पुढून, समोरून)



## करा आणि शिका

**२. एक गमतीचा खेळ खेळू या.**

तुमच्या वर्गाचा एक नेता निवडू या. तो तुमचा नेता आहे म्हणून तो सांगेल तसे तुम्ही करायचे आहे. तो म्हणाला "पुढे", की तुम्ही पुढे जायचे आहे. तो म्हणाला "इकडे", की तुम्ही त्याच्या बाजूला यायचे आहे. "दूर" म्हणेल तेव्हा त्याच्यापासून दूर जायचे आहे. क्रिया करायला चुकेल त्याने एक मराठी कविता वाचून दाखवायची आहे.

### स्थलवाचक क्रियाविशेषणे आणि त्यांची साधित रूपे - (Adverbs of place)

| | अविकारी विशेषण | विकारी विशेषण (लिंग वचनानुसार बदल होतो.) | क्रियाविशेषण – (काही बदल होत नाही.) |
|---|---|---|---|
| **आत** | आतील | आतला / आतली / आतले / आतल्या | आतून / आत |
| **बाहेर** | बाहेरील | बाहेरचा / बाहेरची / बाहेरचे / बाहेरच्या | बाहेरून / बाहेर |
| **वर** | वरील | वरला / वरली / वरले / वरल्या<br>किंवा वरचा / वरची / वरचे / वरच्या | वरून / वर |
| **खाली** | खालील | खालचा / खालची / खालचे / खालच्या | खालून / खाली |
| **मध्ये** | मधील | मधला / मधली / मधले / मधल्या | मधून / मध्ये |
| **समोर** | समोरील | समोरचा / समोरची / समोरचे / समोरच्या | समोरून / समोर |
| **मागे** | मागील | मागला / मागली / मागले / मागल्या<br>किंवा मागचा / मागची / मागचे / मागच्या | मागून / मध्ये |
| **पुढे** | पुढील | पुढला / पुढली / पुढले / पुढल्या<br>किंवा पुढचा / पुढची / पुढचे / पुढच्या | पुढून / पुढे |
| **शेजार** | शेजारील | शेजारचा / शेजारची / शेजारचे / शेजारच्या | शेजारून / शेजारी |
| **इकडे** | इकडील | इकडला / इकडली / इकडले / इकडल्या<br>किंवा इकडचा / इकडची / इकडचे / इकडच्या | इकडून / इकडे |
| **तिकडे** | तिकडील | तिकडला / तिकडली / तिकडले / तिकडल्या<br>किंवा तिकडचा / तिकडची / तिकडचे / तिकडच्या | तिकडून / तिकडे |
| **जिकडे** | जिकडील | जिकडला / जिकडली / जिकडले / जिकडल्या<br>किंवा जिकडचा / जिकडची / जिकडचे / जिकडच्या | जिकडून / जिकडे |
| **लांब** | - | लांबचा / लांबची / लांबचे / लांबच्या | लांबून / लांब |
| **दूर** | - | दूरचा / दूरची / दूरचे / दूरच्या | दुरून / दूर |
| **कुठे? / कोठे?** | - | कुठला? / कुठली? / कुठले? / कुठल्या?<br>कोठला? / कोठली? / कोठले? / कोठल्या?<br>किंवा कुठचा? / कुठची? / कुठचे? / कुठच्या? | कुठून? कोठून? / कुठे? |

**३. कंसातील शब्दाचे योग्य रूप वापरून खाली दिलेली कथा पूर्ण करू या.**

निलयला (मागे) मागच्या दिवाळीत एक गोड अपघात झाला होता. त्याबद्दल त्याने केलेले कथन.



त्या दिवशी जे काही घडलं ते सांगणं फार अवघड आहे. (क) (कुठे) ---------------- सुरू करू कळत नाही! कारण मला झालेला अपघात हा (ख) (मागे) --------------------- दिवाळीत घडला असला, तरी त्याचं मूळ हे माझ्या आयुष्यातील फार पूर्वीच्या एका घटनेत सापडेल.

मला अजूनही नीट आठवतं, मी लहान असताना आमचं वास्तव्य कोल्हापूर जिल्ह्यातल्या एका छोट्या पण टुमदार गावात होतं. आमच्या गावात नदी असल्यामुळे बारमाही पाणी उपलब्ध असे. गावाला लाभलेला हिरवा निसर्ग पर्यटकांना नेहमी आकर्षित करत असे. गावाच्या दोन्ही बाजूंना मोठमोठी झाडं, आणि (ग) (मध्ये) --------------- जाणारी पायवाट. पावसाळ्यात तर आमचं गाव अजूनच बहरून जायचं. (घ) (दूर) ------------- खुणावणाऱ्या हिरव्यागार टेकड्या, झुळझुळ वाहणारे झरे आणि वरती निळंभोर आकाश. आमच्या कुटुंबात आम्ही तीन भावंडं. मी, माझा मोठा भाऊ आणि माझी धाकटी बहीण. मी (च) (मध्ये) -------------- मुलगा असल्यामुळे त्या दोघांचा अत्यंत लाडका. शाळेतून घरी आलो, की आम्हाला नेहमी डोंगरावर जायची घाई असायची. पण आई मात्र उन्हात बाहेर खेळू द्यायची नाही. पण आई झोपल्यावर (छ) (बाहेर) ---------------- इतर मुलांचा आवाज ऐकू आला, की आम्ही हळूच बाहेर पडायचो. मग काय, आम्ही (ज) (इकडे) ---------------- तिकडे आणि (झ) (तिकडे) ---------------- इकडे वेड्यासारखे नुसते पळत सुटायचो.



एकदा मी असाच टेकडीच्या पायथ्याशी खेळत असताना मला (ट) (वर) ---------------- रडण्याचा आवाज आला. वर पाहिल्यावर एक मुलगी टेकडीवर एकटीच रडत बसलेली दिसली. (ठ) (खाली) ---------------- वर जायला मला सहसा जेवढा वेळ लागायचा, त्याच्या निम्म्या वेळेत मी त्या मुलीला मदत करायला वर पोहोचलो. आधी मी तिचं सांत्वन केलं, तिच्या (ड) (डोक्यावर) --------------- हात फिरवला. माझ्या खिशातली एक टॉफी खायला दिली. टॉफी पाहून ती माझ्याशी बोलू लागली. ती तिच्या आईबाबांसोबत आमच्या गावात पाहुणी म्हणून आली होती, परंतु खेळता खेळता ती वाट चुकली होती. मी तिला समजावलं, “अगं, काळजी करू नकोस. तुझे आईबाबा येतीलच लवकर!” (ढ) (मागे) ---------------- माझी भावंडं आणि इतर मित्रही आले. आम्ही तिला आमच्या खेळात सामील करून घेतलं. खूप खूश झाली ती. आणि मग थोड्याच

वेळात मला (ण) (लांब) -------------- तिचे आईबाबा येताना दिसले. मी लगेच तिला विचारलं, "तेच का तुझे आईबाबा?" तेव्हा तिने आनंदाने मला मिठी मारली. तिच्या आईबाबांनीही माझे आणि इतरांचे आभार मानले, आणि ते त्यांच्या मुलीला घेऊन निघून गेले. ते जात असताना मी मात्र तिच्याकडे पाहतच राहिलो. मला वाटलं ती आता मला विसरली. पण नाही. (त) (दूर) ---------------- तिनेसुद्धा पुन्हा मागे वळून माझ्याकडे पाहिलं. तिचे डोळे जणू मला सांगू पाहत होते, की आमची नक्कीच पुढे कधीतरी भेट होणार! आणि मग जवळ जवळ वीस वर्षांनंतर (थ) (मागे) ---------------- दिवाळीत...

**४. दोन दोन विद्यार्थ्यांचे गट करून निलयची गोष्ट पुढे लिहू या. गोष्ट लिहिताना वर दाखवलेली स्थलवाचक क्रियाविशेषणे वापरू या. आपली गोष्ट वर्गासमोर वाचून दाखवू या.**

**८ एक बाबा आपल्या मुलाला काहीतरी सांगतायत. काय सांगतायत? वाचू या.**

**बाबा** : काय रे अजिंक्य, आजकाल सारखा नेहाबरोबर असतोस?

**अजिंक्य** : काय हो बाबा!



**बाबा** : अरे, लाजू नकोस. मैत्रीण ते अगदी खास मैत्रीण असा प्रवास वेगानं चालू आहे तर! छान आहे की! पण तुझ्यापेक्षा वयाने जरा मोठा आणि थोडा अनुभव जास्त म्हणून काही सांगतोय ते ऐक नीट आणि मनावर घे. नाहीतर नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे, असं करू नकोस. नेहा आणि तू वरचेवर भेटत आहात, भेटा; पण तिला लग्नासाठी विचारायची घाई करू नकोस. आधी तिला समजून घे. नेहाच्या मित्रांबद्दल कधी वाईट बोलू नकोस. तिला नाही ते आवडणार. याउलट तिच्या मैत्रिणींचं फार कौतुकही करू नकोस. त्यामुळे गैरसमजच होण्याची शक्यता जास्त. तिच्या कुटुंबातील माणसांना नावं ठेवू नकोस. त्यामुळे तुमच्यात मतभेद होतील. आणि तसे जरी झालेच, तरी वाद नको घालूस. केवळ तिला खूश ठेवण्यासाठी तिची कामं तू नको करूस, पण योग्य वेळी मदत मात्र कर. तिच्याबद्दल कुणी काही बोललं, तर ते तुझ्यापाशीच राहू दे. लगेच शहानिशा करायला जाऊ नकोस. पटत असेल तर बघ बुवा! नाही तर राहू दे.

**अजिंक्य** : नाही हो बाबा, मला अगदी सगळं पटतंय.

**बाबा** : ठीक आहे. आणि हो, नेहासारखंच अभ्यासाचंही घे मनावर.

**अजिंक्य** : बाबा, तुम्हीपण ना!

१. ह्या संवादातील क्रियापदांची आज्ञार्थी रूपे अभ्यासू या. काही नकारार्थी आहेत तर काही होकारार्थी. ही सगळी क्रियापदे खालच्या तक्त्यात भरू या.

| क्रियापदाचे आज्ञार्थी रूप – होकारार्थी Imperative | क्रियापदाचे आज्ञार्थी रूप – नकारार्थी Negative Imperative |
|---|---|
| उदा० मनावर घे. | |
| | उदा० लाजू नकोस |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**टीप :** बऱ्याच क्रियापदांची आज्ञार्थी रूपे केवळ क्रम बदलूनही वापरली जातात.

उदा० मनावर घे – घे मनावर किंवा सांगू नकोस – नको सांगूस.

ही वापराची एक पद्धत आहे. त्याने अर्थामध्ये काहीच फरक पडत नाही. त्यामुळे बोलण्याला विशिष्ट जोर मिळतो आणि बोलणं प्रभावी होतं.

## ९ समूह

मुंबईची कीर्ती ऐकून एक शेतकरी मुंबईला खास भेट द्यायला आला. आगगाडीतून उतरताच बिचारा अगदी भांबावून गेला. केवढी गर्दी, केवढा कलकलाट! बाप रे! जिकडे तिकडे माणसांचे जथ्थे. त्याला सवय होती गायींचे कळप आणि पक्ष्यांचे थवे पाहण्याची आणि त्यांच्या गळ्यातल्या घंटांचा मंजूळ नाद ऐकण्याची. इथं होत्या दुकानांच्या रांगा आणि तो पाहायचा नेहमी खळ्यावरच्या मुंग्यांच्या रांगा. इथं होते कोपऱ्याकोपऱ्यावर विकायला कपड्यांचे ढीग, आणि त्याला आठवत होत्या धान्याच्या राशी. त्याच्या घराला त्यानं कधी कुलूपही लावलं नाही, आणि इथं होत्या कमरेला किल्ल्यांचे जुडगे लावून फिरणाऱ्या श्रीमंत बायका. काही दुकानांमध्ये त्याला दिसल्या पुस्तकांच्या थप्प्या, आणि त्याच्या डोळ्यासमोर येत होत्या लाकडाच्या मोळ्या. इथं दिसत होते कृत्रिम फुलांचे गुच्छ तर त्याच्या मनात दरवळत होता झाडाखालचा फुलांचा सडा.

## समूहवाचक नामे   Collective nouns

१. खाली काही नामे दिली आहेत. लक्षात घ्या की ही नामे नेहमी जोडीनेच येतात. एक उदाहरण दिले आहे ते पाहून ते दोन शब्द एकत्र जोडून या.

केळ्यांचा



घड

किल्ल्यांचा



जुडगा

फुलांचा




गुच्छ

धान्याची / धान्याचा



रास / ढीग

पुस्तकांची




चळत / थप्पी

| धान्याचा / फाईलींचा / कचऱ्याचा / भांड्यांचा ... | ढीग |
|---|---|

| | |
|---|---|
| उदा॰ किल्ल्यांचा जुडगा | एक एक सुटी किल्ली हरवते, म्हणून मी सगळ्या किल्ल्या एकत्र करून किल्ल्यांचा जुडगा बनवला आहे. |
| क. | फ्रूट सॅलड करण्यासाठी मी ------------------------ आणला आहे. |
| ख. | दोन वर्षे पाऊस पडला नाही, त्यामुळे जिथे ———————— असायची तिथे एक दाणाही नाही. |
| ग. | ------------------------ कार्यक्रमात प्रसन्नता आणतात. |
| घ. | परीक्षा झाल्यानंतर त्याने ------------------------ला हातही लावला नाही. |

**२. आता खालील चित्रांमध्ये कोणती समूहवाचक नामे दिसत आहेत ते लिहू या.**

क


ख


ग


घ


च


छ



ज


झ


उदा॰ क. – पक्ष्यांचा थवा (आंब्याची राई, गायींचा कळप, वारकऱ्यांची दिंडी, पक्ष्यांचा थवा, मुंग्यांची रांग, कपड्यांचा ढीग, लाकडाची मोळी, माणसांचा जथा)

## १० चित्रकथा

खाली चार चित्रे दिली आहेत. त्यांच्यावरून आपण एक गोष्ट तयार करू या आणि ती वर्गात सांगू या. गोष्ट सांगताना आपण वर शिकलेली शक्य आणि योग्य तेवढी शब्दयोगी पदे आणि क्रियाविशेषणे वापरायची आहेत आणि रीती काळातील कमीत कमी एक तरी वाक्य यायला हवे. पाहू या प्रयत्न करून.



## ११ संभाषणकौशल्ये.

**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. जास्त टीव्ही न बघणे – फक्त एक तास टीव्ही बघणे, जास्त वेडंवाकडं न बोलणे – गोड गोड बोलणे, वाईटसाईट न ऐकणे – चांगल्या गोष्टी ऐकणे, सारखं सारखं फिरायला न जाणे – घरी जास्त वेळ राहणे, सतत चित्रपट न पाहणे – एखादं पुस्तक वाचणे, रोज दुपारी न खेळणे – थोडं झोपणे, नेहमी बाहेर न जेवणे – कधी स्वतः स्वयंपाक करणे)

पहिला विद्यार्थी : जास्त टीव्ही बघू नका.

दुसरा विद्यार्थी : अरे काय! आम्ही करावं तरी काय?

सर्व विद्यार्थी : हो ना, मग आम्ही करावं तरी काय?

पहिला विद्यार्थी : फक्त एक तास टीव्ही बघा.

दुसरा विद्यार्थी : काय रे / गं? किती कंटाळवाणं!

सर्व विद्यार्थी : हो ना. फारच कंटाळवाणं!



संभाषण

२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.

(उदा. भाकरी – चटणी – पिठलं, बटाटावडा – लोणचं – चटणी, बिर्याणी – रस्सा – कोशिंबीर, थालीपीठ – भाजी – लोणी, मटणपुलाव – वरण – लिंबाचं लोणचं, मेदूवडा – सूप – सांबार, धिरडं – भाजी – तूप, पोळी – सॉस – मुरांबा)



पहिला विद्यार्थी : ही भाकरी मी कशाशी खाऊ?

दुसरा विद्यार्थी : त्यात काय एवढं! कशाशीही खा!

पहिला विद्यार्थी : ठीक आहे, मग मी ही भाकरी चटणीशी खातो.

दुसरा विद्यार्थी : नको, नको. कशाशीही खाऊ नकोस. फक्त पिठल्याशी खा.

सर्व विद्यार्थी : बरं बाबा! पिठल्याशी खा! चटणीशी खायला हरकत नाही.

**चिंटू**



### पहिले मराठी पाऊल

#### मराठीतील पहिले छापील पंचांग



‘एखादा छापलेला कागद पाहिला की स्वर्गातून विमान आल्यासारखे लोक तो पाहायला जमत’, असे ‘मुंबई वर्णन’कार माडगावकर ह्यांनी लिहून ठेवले आहे. अशा छपाईच्या म्हणजेच मुद्रणकलेच्या जादुई क्षेत्रात बारा वर्षांचा एक मुलगा पोटासाठी काम शोधत अपघाताने शिरला. अमेरिकी मिशनच्या छापखान्यात महिना दोन रुपये पगारावर नोकरी करता करता व्यवसायातील सारे बारकावे त्याने शिकून घेतले. त्या मुलाचे नाव गणपत कृष्णाजी पाटील (१७९९-१८६०). हे गोरे लोक हजारो मैलांवरून येतात, आपली भाषा शिकून स्वतःच्या धर्माचा प्रसार करणारी पुस्तके छापतात आणि आपण नुसते बघत बसतो, ही गोष्ट गणपत कृष्णाजींना खटकत असे. लवकरच, नोकरीत मिळवलेले ज्ञान आणि स्वतःची कल्पकता एवढ्या बळावर त्यांनी छपाई यंत्राचे लाकडी प्रारूप स्वतःच तयार केले. त्यावरून लोखंडी यंत्र करवून घेतले. छपाईची शाईही स्वतःच प्रयोग करून तयार केली आणि १८३१ साली स्वतःच्या शिळा छापखान्याची सुरुवात केली. मुहूर्तालाच मराठी पंचांग छापले. सनातनी विचाराच्या लोकांनी ‘धर्म भ्रष्ट केला’ म्हणून खूप विरोध केला. धर्मग्रंथ हाताने आणि ब्राह्मणानेच लिहिलेले असले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. परंतु छापील पंचांगाचा अगदी खेड्यापाड्यापर्यंत इतक्या झपाट्याने प्रसार झाला, की विरोधकांचे काही चालले नाही. गणपत कृष्णाजीं यांनी इ.स. १८४३ मध्येच स्वतःचे टंक (टाईप) तयार करण्याचा प्रयत्न केला. गणपत कृष्णाजींचे हे पहिले ‘पापी’ पाऊल मराठी प्रकाशनक्षेत्राच्या दृष्टीने अनेक कारणांनी मोलाचे ठरले.

#### पहिली मराठी कादंबरी आणि पहिला मराठी थिसॉरस –

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली, तर त्याच काळात काही निग्रही व्यक्तींनी जी कामे उभी केली, ती पाहून मन थक्क होते. बेळगावसारख्या शहरात मुळे नावाच्या एका कर्मठ हिंदू कुटुंबात जन्माला आलेले, लहानपणापासूनच धर्माचा जबरदस्त पगडा असलेले बाबा पदमनजी (१८३१ – १९०६) ह्यांचा पुढे शिक्षणाच्या निमित्ताने काही ख्रिश्चन विद्वानांशी संबंध आला. हळूहळू ख्रिस्तविचारांकडे त्यांचा ओढा वाढत गेला आणि अखेर त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. नंतर लवकरच हिंदू विधवांच्या दुर्दैवी स्थितीचे वर्णन करणारी ‘यमुनापर्यटन’ (१८५७) ही कादंबरी त्यांनी लिहिली. अनेक विचारवंतांच्या मते ही मराठीतील पहिली कादंबरी आहे. बाबांनी ‘अरुणोदय’ हे आत्मचरित्र, विविध सामाजिक समस्यांविषयी अनेक निबंध इत्यादी शंभ्राहून अधिक पुस्तके लिहिली. त्यांचे दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे कोशरचना. दैनंदिन व्यवहारात सर्वसामान्य माणसाला आणि शालेय विद्यार्थ्यांनाही उपयोगी पडतील अशा छोट्या इंग्रजी-मराठी आणि संस्कृत-मराठी कोशांची त्यांनी निर्मिती केली. विशेष म्हणजे, ‘शब्दरत्नावली’ नावाचा पहिला मराठी थिसॉरस त्यांनीच रचला. ह्या पहिलेपणाबरोबरच अशा कामाची भाषेच्या विकासासाठी गरज असते ह्याची जाणीव त्यांना त्या काळातच झाली, हे त्यांचे खरे मोठेपण आहे. आद्य मराठी कादंबरीकार आणि मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचे जनक म्हणून बाबा पदमनजी यांच्या नावाची इतिहासात नोंद झाली.

## दृष्टिक्षेप

**नामे**

| | | |
|---|---|---|
| तो विधी, ते - | ती वारी, त्या वाऱ्या | ते प्रार्थनास्थळ, ती प्रार्थनास्थळे / ळं |
| तो गवगवा | ती रोशणाई, त्या रोशणाया | ते पक्वान्न, ती पक्वान्ने / न्नं |
| तो लाडू, ते - | ती रंगरंगोटी, त्या रंगरंगोट्या | ते विरजण |
| तो अनरसा, ते अनरसे | ती लेजीम, त्या लेजमी | |
| तो चिवडा, ते चिवडे | ती आरास | |
| तो चिरोटा, ते चिरोटे | ती प्रदक्षिणा, त्या - | |
| तो शंकरपाळा, ते शंकरपाळे | ती उधळण | |
| तो खवा | ती रेलचेल | |
| तो पाक | ती निगुती | |
| तो नारळीभात | ती करंजी, त्या करंज्या | |
| तो गूळ | ती चकली, त्या चकल्या | |
| तो तिळगूळ | ती बासुंदी | |
| तो शिरखुर्मा | ती शेवई, त्या शेवया | |

**क्रियापदांपासून तयार होणारी भाववाचक नामे**

| | | |
|---|---|---|
| तो चावा, ते चावे | ती समजूत, त्या समजुती | ते लेखन, ती लेखने / नं |
| तो लेख, ते - | ती लिखावट, त्या लिखावटी | |
| तो सांगावा, ते सांगावे | ती घडणावळ, त्या घडणावळी | |
| तो चढ, ते - | ती घडण, त्या घडणी | |
| तो बोल, ते - | ती चढण, त्या चढणी | |
| | ती बोलवा, त्या - | |
| | ती शिलाई, त्या शिलाया | |
| | ती शिवण, त्या शिवणी | |
| | ती कापणी, त्या कापण्या | |
| | ती फरफट | |
| | ती बोच | |
| | ती समज | |

### समूहवाचक नामे

| | | |
|---|---|---|
| तो जथा, ते जथे | ती रांग, त्या रांगा | |
| तो कळप, ते - | ती रास, त्या राशी | |
| तो ढीग, ते - | ती मोळी, त्या मोळ्या | |
| तो जुडगा, ते जुडगे | ती चळत, त्या चळती | |
| तो थवा, ते थवे | ती राई, त्या राया | |
| तो गुच्छ, ते - | ती दिंडी, त्या दिंड्या | |
| तो सडा, ते सडे | | |
| तो घड, ते - | | |

### क्रियापदे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जागवणे | साधणे | सारवणे | आटवणे | लाटणे | निथळणे |
| उपसणे | परतणे | चाळणे | शिजवणे | थापणे | वाफवणे |
| आंबवणे | सोसणे | रुजणे | गुणगुणणे | | |

### विशेषणे

| | | | |
|---|---|---|---|
| वैशिष्ट्यपूर्ण | ठळक | अलिखित | दुप्पट |

### क्रियाविशेषणे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उगाच | झटपट | निगुतीने | नेमाने | बेधडक | उलट | समक्ष |

### नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. भर पडणे | सहकारी रजेवर असल्यामुळे निखिलच्या कामात दुप्पट भर पडली आहे. |
| २. ताबा घेणे | नव्या सुनेने उत्साहाने संपूर्ण घराचा ताबा घेतला. |
| ३. विराम घेणे | कामाची कितीही घाई असली तरीही मधूनच थोडा विराम घेणे आवश्यक आहे. |
| ४. गरज भासणे | एकट्या राहणाऱ्या माणसाला सामाजिक जीवनाचीही गरज भासते. |
| ५. जाहीर करणे | मी जाहीर करून टाकलं, "आज मी स्वयंपाक करणार नाही." |
| ६. गवगवा करणे | व्यापारी कंपन्यांनी आपला माल खपवण्यासाठी तंत्रज्ञानाचा गवगवा केला आहे. |
| ७. सांत्वन करणे | मालतीबाईंचे सांत्वन केल्यावर त्या बऱ्याच सावरल्या. |
| ८. मिठी मारणे | दहा वर्षांनी भेटलेल्या माझ्या मित्राला मी कडकडून मिठी मारली. |
| ९. ताशेरे ओढणे | बुद्धिवादी लोक समाजातील बुवाबाजीवर ताशेरे ओढतात. |
| १०. पैसे उडवणे | पैसे कमवायला वेळ आणि कष्ट लागतात, पण पैसे उडवायला मात्र काहीच वेळ लागत नाही. |
| ११. फटाके उडवणे | निवडणूक किंवा मॅच जिंकली की लोक फटाके उडवतात. |

### इतर शब्द व क्रियापद जोड्या Other words and Verb combinations

| इतर शब्द + क्रियापद<br>Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. मटकावून टाकणे | मांजर उंदराला एका घासात मटकावून टाकते. |
| २. सामील करून घेणे | "नवीन मुलालासुद्धा तुमच्या खेळात सामील करून घ्यायला पाहिजे," अशी कडक सूचना आजोबांनी दिली. |
| ३. चलबिचल होणे | स्वामीजींनी सुरेन्द्रला 'प्रसाद' दिल्यावर त्याची चलबिचल झाली, पण त्याने अंधश्रद्धा दूर सारली. |
| ४. शहानिशा करणे | कॉपी करताना पकडलेल्या मुलांच्या उत्तरपत्रिका, साहित्य तपासून मुख्याध्यापकांनी शहानिशा केली. |
| ५. मनावर घेणे | नापास झाल्यावर निराश न होता समीरने अभ्यास करण्याचे मनावर घेतले. |

आता मला हे येतं...

**विविध सण : नववर्ष, सणांची पक्वान्ने**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे, प्रश्नशब्द : कशाशी?**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**धातुसाधित भाववाचक नामे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**जोडीने येणारी नामे : चिडचिड, बडबड, हुरहुर इ.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शब्दयोगी पदे : समक्ष, विरुद्ध, उलट, सह**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्थलवाचक क्रियाविशेषणे : आतून, बाहेरून, वरून, खालून इ.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**आज्ञार्थी रूपे : मनावर घे, लाजू नकोस इ.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**समूहवाचक नामे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**चित्रकथा**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

९

# महाराष्ट्र आणि त्यातील प्रमुख शहरे











## चला, शिकू या...


- महाराष्ट्र राज्य व त्यातील प्रमुख शहरांचा अभ्यास करणे : मुंबई आणि पुणे
- क्रियापद-नामाची षष्ठी
- बोलीभाषा
- च, ही, सुद्धा, पण, नं, मात्र, फक्त, केवळ
- अलीकडे, पलीकडे
- जेवढे-तेवढे, जितके-तितके, एवढे / इतके

## १ चित्रवर्णन

**१. पहिल्या पानावरील चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

- चित्रांतील कोणती ठिकाणे तुम्हाला माहीत आहेत? त्या ठिकाणांची वैशिष्ट्ये काय आहेत?
- एखादे ठिकाण प्रसिद्ध होण्यासाठी कोणत्या गोष्टी कारणीभूत असतात?
- एखाद्या प्रांताची ओळख कोणत्या गोष्टींनी तयार होते?

## २ महाराष्ट्र




भारतातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेले महाराष्ट्र हे दुसरे राज्य आहे. महाराष्ट्राच्या रहिवाशांना 'महाराष्ट्रीय' असे संबोधतात. जवळपास ११.२३ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राची मुंबई ही राजधानी आहे. नागपूर शहरास महाराष्ट्राची उपराजधानी, तर पुणे शहरास महाराष्ट्राची 'सांस्कृतिक राजधानी' म्हटले जाते. महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजीमहाराजांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. त्याचबरोबर शहरी भागांमध्ये हिंदी, गुजराती व इंग्रजी ह्या भाषाही बोलल्या जातात. महाराष्ट्रात मराठीच्या अनेक बोलीभाषा आहेत उदाहरणार्थ 'अहिराणी', 'मालवणी', 'वऱ्हाडी' इ॰ राज्यात हिंदू, बौद्ध, मुस्लिम, जैन, शीख, ख्रिश्चन, ज्यू व झरतुष्ट्री धर्मीय लोक राहतात. गोकुळाष्टमी, गणेशोत्सव, होळी, रंगपंचमी व दिवाळी हे महाराष्ट्राचे मुख्य उत्सव आहेत. आज देशभर साजरा केला जाणारा गणेशोत्सव हा सर्वांत मोठा व लोकप्रिय उत्सव आहे. दहा दिवस साजरा होणारा हा उत्सव बुद्धी व विद्येचे दैवत असणाऱ्या गणपतीचा आहे. त्याचबरोबर मकरसंक्रांत, दसरा इत्यादी सणदेखील साजरे केले जातात. स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक सुधारणांच्या चळवळी आणि स्त्री शिक्षणाची चळवळही महाराष्ट्रातूनच सुरू झाली. ह्यात महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, धोंडो केशव कर्वे हे अग्रणी होते.

टीप – झरतुष्ट्री धर्मीय लोक = पारशी लोक

**१. वरील माहिती वाचून खाली दिलेला तक्ता पूर्ण करू या.**

| | |
|---|---|
| राजधानी | मुंबई |
| उपराजधानी | |
| | पुणे |
| लोकसंख्या | |
| राजभाषा | |
| बोलीभाषा | |
| | गोकुळाष्टमी, गणेशोत्सव, होळी, रंगपंचमी व दिवाळी, मकरसंक्रांत, दसरा |
| लोकप्रिय उत्सव | गणेशोत्सव |
| अग्रणी समाजसुधारक | |

**२. खालील चित्रे पाहून आणि कंसातील शब्द वापरून गाळलेल्या जागा भरू या.**

(संत्र्यांचे, सिद्धेश्वराचे, लोकसंख्या, सांस्कृतिक, विद्यापीठ, कुंभमेळा, पर्यटनस्थळे)

**मुंबई**

मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी असून भारतातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत अनेक कंपन्यांची मुख्य कार्यालये आहेत. इथे व्यवसाय व नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध असल्याने भारताच्या विविध भागांतून लोक रोजगारासाठी मोठ्या संख्येने येतात.



## पुणे

जवळजवळ १२०० वर्षांचा ज्ञात इतिहास असलेले पुणे शहर ही महाराष्ट्राची ---------- राजधानी मानली जाते. शिक्षणसंस्था आणि संशोधनसंस्था येथे मोठ्या संख्येने आहेत. पुणे शहराच्या परिसरात आधुनिक उद्योगव्यवसायही खूप प्रमाणात उभे राहिले आहेत. विशेषतः माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भारतातील आघाडीचे शहर, असा लौकिक पुण्याने मिळवला आहे



## नाशिक

हे उत्तर महाराष्ट्रातील एक तीर्थक्षेत्र आणि ऐतिहासिक व औद्योगिक शहर आहे. दर १२ वर्षांनी येथे सिंहस्थ ---------- भरतो. ह्या मुहूर्तावर गोदावरी नदीत स्नान करणे पवित्र मानले जाते. त्यासाठी हिंदू साधू आणि भाविक भारतभरातून मोठ्या संख्येने येथे येतात. द्राक्षांच्या उत्पादनासाठीही नाशिक प्रसिद्ध आहे.



## औरंगाबाद

महाराष्ट्राची पर्यटन राजधानी असा लौकिक असलेल्या ह्या शहरात आणि परिसरात अनेक जागतिक दर्जाची ---------- आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ येथे आहे. वाहनांचे सुटे भाग आणि पेयनिर्मितीच्या कारखान्यांची संख्या औरंगाबाद परिसरात मोठी आहे. मराठवाडा विभागाचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे. इथली अजिंठा-वेरूळची लेणी जगप्रसिद्ध आहेत.



## सोलापूर

महाराष्ट्राच्या दक्षिण भागातील एक प्रमुख शहर; एके काळी कापड गिरण्यांसाठी प्रसिद्ध होते. आज हातमागांवर तयार होणाऱ्या येथील चादरी जगप्रसिद्ध आहेत. येथील ---------- मंदिरही प्रख्यात आहे.



**कोल्हापूर**

हे शहर महालक्ष्मी मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर येथे शिवाजी ---------- ही आहे. शिवाय चित्रकला, चित्रपट, संगीत अशा ललित कलांचे प्रमुख केंद्र म्हणून हे शहर प्रसिद्ध असल्यामुळे त्याला 'कलापूर' असेही म्हणतात. देशात आणि जागतिक पातळीवर गाजत असलेले अनेक क्रीडापटूही इथूनच आलेले आहेत.



**नागपूर**

विदर्भ विभागातील सर्वांत मोठे शहर असलेले नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी आहे. महाराष्ट्र विधानसभेचे वर्षातून एक अधिवेशन येथे भरते. विदर्भात ---------- उत्पादन जास्त प्रमाणात होत असल्याने त्यांची निर्यात जगभर होते.



### ३. मुंबई

पश्चिम भारताच्या समुद्रकिनाऱ्यावरचा सात लहान लहान बेटांचा एक कळप दोनेकशे वर्षांपूर्वी कुणाच्या खिजगणतीतही नव्हता. तुरळक वस्त्या करून राहिलेले कोळी हे तिथले मूळ रहिवासी होते. मुंबादेवी ही त्यांची ग्रामदेवता होती. बेटांवर बाकी वावर होता तो मुख्यतः गुन्हेगारांचा. सोळाव्या शतकात ही बेटे पोर्तुगीजांच्या ताब्यात होती. सतराव्या शतकात ती ब्रिटिशांच्या ताब्यात आली आणि या बेटांचे नशीब फळफळले. भराव टाकून, खाड्या बुजवून ब्रिटिशांनी बेटे जोडली आणि वसवायला घेतले 'शहर मुंबई'. थोड्याच दशकांमध्ये, विशेषतः सुवेझ कालव्याच्या निर्मितीनंतर, मुंबईची 'भारताचे पश्चिम महाद्वार, लंडनखालोखाल ब्रिटिश साम्राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची महानगरी' अशी ओळख निर्माण झाली.

ही तशी तरुण आणि आधुनिक नगरी. इतिहासाचे किंवा परंपरांचे दडपून टाकणारे ओझे उरावर नसलेली; आधुनिकतेचे सारे गुण आणि अवगुण अंगी असलेली; सतत बदलत राहणारी नित्य नवी नगरी. पाणी, जमीन आणि आकाश ह्या तिन्ही मार्गांनी तिच्याकडे सुबत्ता आणि पाठोपाठ माणसांचे लोंढे येत राहिले; आणि आजही येत आहेत.

'मुंबईची सदैव हालचाल होत राहिली. तिला वाळवी कधी लागलीच नाही. तिच्या गुलहौशीपणाबद्दलही चर्चा होत राहिली आहे. फॅशन्सची ती गंगोत्री. अर्थात, मुंबईची चैनबाजी आणि शान केवळ कपड्यांपुरती नाही. 'ही मोहमयी, मस्तवाल महानगरी... तिच्या नादी लागू नये' असा पवित्र इशारा अनेकांनी दिला. गावाकडील निष्पाप माणूस मुंबईला येताच कसा बिघडतो, हे सांगणाऱ्या बोधकथांचा व्यापार कित्येकांनी केला आहे. निष्पापांना बिघडवण्याचे कंत्राट मुंबईने फार वर्षे सांभाळले.


पण मुंबई हाताची जरा सैलच. छानछोकी, टापटीप, थाटमाट तिच्या रक्तातच आहे. इथे दररोज दिवाळी असते, असा तिचा पूर्वीपासूनचा लौकिक आहे. खाण्याजेवण्याच्या अगणित तऱ्हा इथे आहेत आणि ते मिळविण्याच्या सोयीही आहेत. महाराष्ट्राच्या साऱ्या गुणदोषांचा वारसा मुंबईने स्वीकारलेला आहेच, पण त्याहून अधिक काहीतरी तिच्याकडे आहे. पुढची दिशा शोधण्याची धडपड आहे. हिरिरी आणि ताजेपणा आहे. ती विविधांगी आहे, जिवंत आहे. खुंटाला बांधलेली नाही. हीच तिची संस्कृती. ती मराठी संस्कृतीचाच भाग आहे; तिला दिशा दाखवणारी, चैतन्य देणारी आहे.'

- मं॰ वि॰ राजाध्यक्ष

'मुंबई गं नगरी' ह्या ललित निबंधावर आधारित

**क. खालील वाक्‌प्रचारांच्या त्यांच्या अर्थाबरोबर जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| खिजगणतीत नसणे | उदारपणे खर्च करण्याचा स्वभाव असणे |
| नशीब फळफळणे | प्रवाही जगणे नसणे, जनावर खुंटाला बांधून ठेवतात त्याप्रमाणे एकाच जागी अडकून राहणे |
| नादी लागणे | भरभराटीची सुरुवात होणे, चांगल्या गोष्टी घडू लागणे, चांगले दिवस दिसू लागणे |
| वाळवी लागणे | एखाद्या गोष्टीची अजिबात फिकीर नसणे, तिची दखलही न घेणे |
| हाताचा सैल असणे | एखाद्या गोष्टीच्या ऱ्हासाला सुरुवात होणे, वस्तू एकाच जागी खूप काळ ठेवल्याने ती नष्ट होऊ लागणे |
| खुंटाला बांधणे | एकाच गोष्टीच्या किंवा व्यक्तीच्या मागे लागणे, सतत तिचाच विचार करत राहणे |



**ख. वरील वाक्प्रचारांचा पुढील वाक्यांमध्ये योग्य प्रकारे उपयोग करू या.**

१. ग्रामीण भागातील काही कल्पक शिक्षक नवे शैक्षणिक प्रयोग करत असतात; पण शहरी शिक्षक-पालकांच्या ते ------------------ ------------------.

२. ह्या शहरात लाखो लोक ज्या परिस्थितीत राहतात, तिला 'नरक' ही एकच उपमा देता येते. पण कधीतरी आपले ------------------ ------------------ ह्या आशेवर ते तसंच जगत राहतात.



३. "काकू, काका ------------------ ------------------ ---------------- असं तू म्हणते आहेस. मग आमच्या बाबांच्या हाताला काय म्हणशील? गळका? एक पैसा टिकत नाही त्यांच्या हातात."

४. "आई गं, बाबा बघ ना, मला सर्कसला नेतच नाहीये!" "त्याच्या ------------------ ---------------- तर असंच होणार. चिन्मयदादाला विचारून बघ."

५. वर्षानुवर्षे त्या भागात कोणी न फिरकल्यामुळे त्या वाड्याला ------------------ ------------------ आहे.

६. "सुबोध, जरा वेगळा विचार कर आता. त्याच पारंपरिक विचारांच्या ------------------ ------------------ राहू नकोस.

**ग. वरील उताऱ्यातील काही शब्दांचे समानार्थी शब्द वेगवेगळ्या चौकोनांत दिले आहेत. खालील वाक्यांमधील अधोरेखित शब्दांच्या जागी त्या शब्दाचा समानार्थी शब्द लिहून वाक्ये पुन्हा लिहू या.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वावर | तुरळक | हिरिरी | अवगुण | गुलहौशी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वाईट गुण | चैनीची आवड असणारा | जिद्द | विरळ | येणे-जाणे |



१. "गोट्या, डोक्यावरचे ते तुरळक केस तरी कशाला ठेवतोयस? तुळतुळीत गोटा करून टाक."

२. त्या काळी मामासाहेबांचा साहित्य परिषदेमध्ये नियमित वावर असे.

३. नव्या कर्मचाऱ्याची निवड साहेब स्वत:च करत, मात्र नंतर त्याच्या अवगुणांबद्दलच सतत कुरकुर करत.

४. मुळात शेटजी गुलहौशी होतेच. लखनौच्या विलासी वातावरणात ते इतके रमले, की धंद्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले.

५. निवेदिताकडे सांगण्यासाठी चांगले मुद्दे असतात, पण चार लोकांसमोर ते मांडण्याची हिरिरी नसल्याने ती मागे पडते.

मला मुंबईत राहायला मुळीच आवडणार नाही. किती गर्दी असते तिथे!
आणि त्यात तो लोकल ट्रेनचा प्रवास! नको रे देवा! ...

मला मुंबईत राहायला फार आवडेल. इथे प्रत्येकाला रोजगार मिळतो. मुंबईकर दिवसरात्र मेहनत करतात. सगळ्यांना आपलंसं करतं हे शहर.

## ३ फिरण्याची हौस

संवाद ऐकू या.

**१. खालीलपैकी कोणती विधाने ऐकली? योग्य पर्याय अधोरेखित करू या.**

क. दीपकला पुण्यात राहायला आवडेल.

१. हो २. नाही

ख. कोकणातला पाऊस लोकांना बाहेर पडताना विचार करायला लावतो.



१. हो २. नाही

ग. श्रुतीच्या आईचे गाव कोल्हापूर.

१. हो २. नाही

घ. भाषा शिकण्यासाठी कोल्हापुरात अनेक संधी उपलब्ध आहेत.

१. हो २. नाही



च. पुण्यातील लोक रांगड्या स्वभावाचे असतात.

१. हो २. नाही

छ. प्रत्येक शहराचे स्वत:चे असे एक वैशिष्ट्य असते.

१. हो २. नाही

**२. वरील संवादात आलेल्या काही रचना उदाहरणात दाखवल्याप्रमाणेही करता येतात. उदाहरणाप्रमाणे तक्ता पूर्ण करू या.**

| ज्यांना फिरायला आवडते | ज्यांना फिरण्याची हौस आहे |
|---|---|
| क. ज्यांना खायला आणि प्यायला आवडते | |
| ख. ज्यांना शिकायला आवडते | |

**क्रियापद-नामाचे षष्ठीचे रूप - Genitive forms of verbal nouns**

**क्रियापद-नामाचे सामान्यरूप + चा / ची / चे / च्या**

उदा. चालणे - कंटाळा : चालण्याचा कंटाळा
बोलणे - सवय : बोलण्याची सवय
सांगणे - तात्पर्य : सांगण्याचे तात्पर्य

| क्रियापद | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी | अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| **फिरणे** | फिरण्याचा प्रांत | फिरण्याची जागा | फिरण्याचे शहर | फिरण्याचे प्रांत<br>फिरण्याच्या जागा<br>फिरण्याची शहरे |
| **करणे** | करण्याचा सोस | करण्याची आवड | करण्याचे यंत्र | करण्याचे सोस<br>करण्याच्या आवडी<br>करण्याची यंत्रे |
| **बनवणे** | बनवण्याचा व्याप | बनवण्याची पद्धत | बनवण्याचे तंत्र | बनवण्याचे व्याप<br>बनवण्याच्या पद्धती<br>बनवण्याची तंत्रे |



व्याकरण

**३. खालील उदाहरणात दाखवल्याप्रमाणे क्रियापद - नाम + षष्ठी असे रूप वापरून वाक्य परत लिहू या. आवश्यक असेल तिथे सवय / गोडी / हौस / आवड अशी नामे वापरू या.**

उदा. ज्यांना स्वयंपाक करायला आवडते, ते चांगले शेफ बनू शकतात.
ज्यांना स्वयंपाक करण्याची आवड आहे, ते चांगले शेफ बनू शकतात.

क. ज्यांना वाचायला आवडते, त्यांच्यासाठी इथे खास वाचनकट्टे बनवले आहेत.

-----------------------------------------------------------------------

ख. ज्या विद्यार्थ्यांना घोकायला आवडते, त्यांना चांगले गुण पडतीलच असे नाही.

-----------------------------------------------------------------------

ग. महाबळेश्वरमध्ये फिरायला जागा भरपूर आहेत.

-----------------------------------------------------------------------

घ. असं म्हणतात, की बहुतेक पुणेकर दुपारी एक ते चार वाजेपर्यंत झोपतात.

-----------------------------------------------------------------------

## ४ बोलीभाषा

भाषा दर बारा कोसांवर बदलते. महाराष्ट्रामध्ये विविध बोलीभाषा बोलल्या जातात. अशा बोलीभाषांची आंतरजालावर माहिती मिळवू या. कोणत्या भागात कोणती बोली बोलली जाते त्याची नोंद करू या.






गोमू माहेरला जाते हो नाखवा ।
तिच्या घोवाला कोकण दाखवा ॥

दावा कोकणची निळी निळी खाडी
दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी
भगवा अबोली फुलांचा ताटवा ॥१॥

कोकणची माणसं साधी भोळी
काळजात त्यांच्या भरली शहाळी
उंची माडांची जवळून मापवा ॥२॥

सोडून दे रे खोड्या साऱ्या
शिडात शीर रे अवखळ वाऱ्या
झणी धरणीला गलबत टेकवा ॥३॥

- ग. दि. माडगूळकर

**१. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे तक्ता पूर्ण करू या.**

| कवितेचे कवी | कवितेचा विषय | कवितेतील पात्रे | कवितेत वर्णन केलेल्या गोष्टी |
|---|---|---|---|
| | | | |

**२. एका शब्दात उत्तरे लिहू या.**

क. गोमूचे माहेर –

ख. कोकणची माणसं –



**३. खालील आकृती पूर्ण करू या.**




**४. ज्यांचे शेवटचे अक्षर सारखे आहे असे शब्द कवितेत आहेत, ते लिहू या.**

उदा. नाखवा – दाखवा     क. खाडी –     ख. भोळी –     ग. साऱ्या –

अशी शेवटची अक्षरे सारखी असली, की 'शब्दांचे **यमक** जुळते' असे म्हणतात.

**५. खालील ओळींचा आपल्याला समजलेला अर्थ लिहू या.**

क. काळजात त्यांच्या भरली शहाळी –

ख. झणी धरणीला गलबत टेकवा -

**६. तुमच्या घरी आलेल्या पाहुण्यांना तुम्ही तुमच्या गावातील किंवा शहरातील कोणकोणती स्थळे दाखवाल? त्या स्थळांचे थोडक्यात वर्णन करू या.**

## ५ ऐकू या.

### शहर पुणे

१. ध्वनिफीत पुन्हा ऐकू या. पुणेकरांविषयी बोलताना पु. ल. देशपांडे काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द वापरतात. खाली दिलेल्या त्या शब्दांपुढे आपण ऐकलेली माहिती थोडक्यात लिहू या.

| | |
|---|---|
| उदा. तऱ्हा | पुणेकरांची वागण्याची, बोलण्याची एक विशिष्ट तऱ्हा आहे. |
| पाया | |
| जाणीव | |
| व्यासंग | |
| अव्हेर | |
| वृत्ती | |
| समन्वय | |
| उसासा | |

### पुणेरी पाटी

पुणेकरांशी वाद घालायचा असल्यास खालील ३ नियमांचे आकलन आवश्यक :

१. पुणेकरांचे बरोबर असतेच.

२. पुणेकरांचे बरोबरच असते.

३. पुणेकरांचेच बरोबर असते.

जनहितार्थ प्रसारित.




२. अस्सल पुणेकरांची कोणती वैशिष्ट्ये पु. ल. देशपांडे सांगतात? थोडक्यात टिपणे लिहू या.

उदा. तऱ्हेवाईक वागणे, ...

३. आता आपल्या शहरातील लोकांचा स्वभाव कसा आहे, त्यांच्या वागण्याची तऱ्हा कशी आहे ते लिहू या आणि वर्गात वाचून दाखवू या.

४. दोन ते तीन विद्यार्थ्यांचे गट करू या आणि खाली दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करू या.

आमच्या काँक्रीटच्या जंगलातही
सूर्योदय होतो, सूर्यास्त होतो
ढग दाटतात, पाऊसही कोसळतो
आमच्या काँक्रीटच्या जंगलातही
-------------------------------
-------------------------------

आमच्या काँक्रीटच्या जंगलालाही
एक जमीन, एक आकाश, एक क्षितिज असतं
-------------------------------
-------------------------------

आमच्या काँक्रीटच्या जंगलात
-------------------------------
-------------------------------

आमच्या काँक्रीटच्या जंगलात
सजीव सजीव असतातच
निर्जीवही सजीव असतात
कधी ------------------------
कधी ------------------------
अन् तरीही
आमच्या काँक्रीटच्या जंगलात
सूर्योदयही होतो, सूर्यास्तही होतो
अन् तो सुंदरही दिसू शकतो
-------------------------------

- प्रसाद शिरगांवकर

(ही कविता अभ्यासपुस्तकात दिली आहे.)



## ६ संवाद

मीरा : हॅलो, सारा, आज संध्याकाळी मी नाटकाला जाते आहे. तूसुद्धा येशील ना?

सारा : कुठलं नाटक?

मीरा : 'तू फक्त हो म्हण' नावाचं शेखर ताम्हाणेलिखित नाटक आहे. माझ्या एका मैत्रिणीला आवडलंय. आपल्यालापण नक्की आवडेल.

सारा : छे गं, आज जमणार नाही. आजही मला ऑफिसमध्ये भरपूर काम आहे. मात्र उद्या संध्याकाळी जमेल. उद्यासुद्धा प्रयोग आहे का?

मीरा : ए, काय गं! मागे तूच म्हणाली होतीस ना, नाटकाचा बेत ठरला की मला सांग म्हणून? केवळ तू म्हणालीस म्हणून मी तुला विचारते आहे. तू मात्र अजूनही कामाचं कारण देतेयस आणि मला भेटायचं टाळतेयस, हो नं?

सारा : ए वेडाबाई! असं काही नाहीये. मलाही तुला भेटायचंय गं. सांग ना, उद्या चालेल का?

मीरा : नाही गं. फक्त आजच आहे प्रयोग. ये ना गं तू! मजा येईल.

सारा : बरं, मी नक्की प्रयत्न करते आणि तुला कळवते. पण मला जर का नाही जमलं, तर रागावू मात्र नकोस. ठीक आहे? अच्छा!

**Particles :** 'च, 'ही', 'फक्त', 'केवळ', 'न', 'मात्र', 'सुद्धा' आणि 'पण' ह्या शब्दांच्या वापरामुळे आपले बोलणे प्रभावी होते आणि संवादामध्ये जोर येतो.

**१. कंसातील योग्य शब्द वापरून खालील वाक्ये पूर्ण करू या. एका वाक्यात एकापेक्षा जास्त उत्तरेही बरोबर असू शकतात.**

क. आम्ही बागेत चाललो आहोत. (पण / सुद्धा) तुम्ही ------------------ येणार ना?

ख. कोल्हापूरचं मंदिर पाहिलं आहे मी. (च / ही) परवा ------------------ जाऊन आले.



ग. पिशवीच्या तळाशी (फक्त / सुद्धा) ------------------ दोन कांदे उरले होते.

घ. खूप सुंदर आठवणी होत्या त्या. मला (ही / च) आज ------------------ आठवतात.

च. तुम्ही सर्व जण आत आलात तरी चालेल. (फक्त / केवळ) ------------------ चपला तेवढ्या बाहेर काढून ठेवा.

छ. वाढदिवसाच्या पार्टीला सर्वांना बोलावले होतेस तू. (च / ही) मला ------------------ नाही बोलावलेस.

ज. काय आहे बातमी? मला सांगा (नं / हं) ------------------ !

झ. आम्ही आधी आत जातो. (च / नं) मग ------------------ तू ये.

## ७ अलीकडे... पलीकडे...

**१. चित्र आणि वाक्यांच्या जोड्या लावू या.**

क. संदीपचे घर नदीच्या अलीकडे आहे.

ख. नोकरी, घर, पैसा, ह्यापलीकडे जाऊनही विचार करायला हवा.

ग. "डॉक्टर, अलीकडं माझं डोकं खूप दुखतं."

घ. मेघनाचे घर दुकानाच्या पलीकडे आहे.






| | |
|---|---|
| अलीकडे – ह्या बाजूला (स्थलवाचक) on this side of | पलीकडे – त्या बाजूला (स्थलवाचक) on the other side of |
| अलीकडे – आजकाल, सध्या, आधी, अगोदर (कालवाचक) nowadays, these days | पलीकडे - हा विषय सोडून, ह्या गोष्टीशिवाय beyond |

**२. खालील संवाद वाचून त्यात 'अलीकडे' व 'पलीकडे' ह्या शब्दांचा वापर कोणत्या अर्थाने केला आहे ते सांगू या.**

**व्यक्ती १** : एक मिनिट, मला हा पत्ता सांगू शकाल का? मी चितळ्यांचं दुकान शोधतोय.

**व्यक्ती २** : चितळ्यांचं दुकान होय? ते ह्या पुलाच्या पलीकडं आहे.

**व्यक्ती १** : पण ह्या पत्त्यावर तर इंटरनॅशनल बुक स्टोअरजवळ असं लिहिलंय. हे पाहा.

**व्यक्ती २** : बरोबर. पण इंटरनॅशनल बुक स्टोअर पुलाच्या अलीकडं आहे व चितळ्यांचं दुकान पुलाच्या पलीकडं आहे. दोन्ही तशी अगदी जवळजवळ आहेत.

**व्यक्ती १** : अच्छा, असंय तर!

**व्यक्ती २** : तुम्ही असं करा, ह्या गल्लीतल्या रस्त्यानं दुकानात जा, म्हणजे गर्दी कमी लागेल. त्याचं काय आहे, अलीकडं पुण्यात गाड्यांची संख्या खूप वाढलीये ना!

**व्यक्ती १** : बरं बरं. मदत केल्याबद्दल धन्यवाद. कारण मला पुण्यात फक्त सारसबाग माहीतेय. त्यापलीकडं काहीच माहीत नाही.

**३. अर्थ समजून घेऊन गाळलेल्या जागा भरू या. ( अलीकडे / अलीकडं, पलीकडे / पलीकडं)**

क. पाण्याच्या टाकीच्या ------------------------ आमचं घर होतं. →

ख. नदीच्या ------------------------ आमचं गाव आहे. ←



ग. ------------------------ हवेतला उष्मा बराच वाढत चाललाय.

घ. आपलं गाव आणि राज्या ------------------------ जाऊन देशाचा विचार करायला हवा.

च. मला फक्त तो दिवस वाईट होता हे आठवतंय. त्या ------------------------ काहीच आठवत नाहीये.

छ. काय रे सागर, कुठे आहेस? ------------------------ दिसलाच नाहीस!

ज. त्या तिथे ------------------------, तिकडे... , माझिया प्रियेचे झोपडे...



झ. कुंपणाच्या ------------------------ ← घर आहे आणि
------------------------ → रान आहे.

ट. शब्दावाचून कळले सारे, शब्दांच्या ------------------------ले...

ठ. थोडासा ------------------------ ये, म्हणजे फोटो चांगला येईल.

ड. ------------------------ नाक टोचून घ्यायची फॅशन आहे.

ढ. पुरे झाला आता हा विषय. ह्या ------------------------ जाऊन जरा विचार करू या.



## करा आणि शिका

**४. खेळ : शिक्षकाने वर्गातल्या काही वस्तू, – उदाहरणार्थ खुर्ची, टेबल – ह्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांबरोबर एक खेळ खेळावा. "सगळ्यांनी खुर्चीच्या पलीकडे जा." "एकाने दाराच्या अलीकडे या" अशा सूचना द्याव्यात. विद्यार्थ्यांनी सूचनांनुसार कृती करावी.**

**५. महाराष्ट्र गीताची ध्वनिफीत ऐकू या, आपणही हे गीत गाऊ या.**

## महाराष्ट्र गीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।
रेवा वरदा, कृष्णा कोयना, भद्रा गोदावरी ।
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी ।
भीमथडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा ।।



भीती न आम्हा तुझी मुळीही गडगडणाऱ्या नभा ।
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा ।
सह्याद्रीचा सिंह गर्जतो, शिव शंभू राजा ।
दरीदरीतुन नाद गुंजला, महाराष्ट्र माझा ।।



काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी ।
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी ।
दारिद्र्याच्या उन्हात शिजला ।
निढळाच्या घामाने भिजला ।
देशगौरवासाठी झिजला ।
दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा ।।

– राजा बढे


## ८ जेवढे - तेवढे / जितके - तितके / एवढे - इतके

**Correlative adjectives**

१. ही विशेषणे / क्रियाविशेषणे तुमच्या ओळखीची आहेत. त्यांच्यात लिंग-वचनाने होणारे बदल दाखवणारा हा तक्ता पाहू या.

| | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|---|
| एकवचन | जेवढा - तेवढा<br>जितका - तितका<br>एवढा - इतका | जेवढी - तेवढी<br>जितकी - तितकी<br>एवढी - इतकी | जेवढे / जेवढं - तेवढे /तेवढं<br>जितके / जितकं - तितके /तितकं<br>एवढे / एवढं - इतके / इतकं |
| अनेकवचन | जेवढे - तेवढे<br>जितके - तितके<br>एवढे – इतके | जेवढ्या - तेवढ्या<br>जितक्या - तितक्या<br>एवढ्या - इतक्या | जेवढी - तेवढी<br>जितकी - तितकी<br>एवढी - इतकी |
| जेवढे, तेवढे, एवढे... ही विशेषणे जेव्हढे, तेव्हढे, एव्हढे अशीही लिहिली जातात. | | | |

२. आता ह्या विशेषणांचा वापर केलेली वाक्ये पाहू या.



- दोन्ही प्रकारच्या विशेषणांचा अर्थ सारखाच असल्यामुळे कोणतीही जोडी वापरता येते.
  उदा॰ गेल्या वर्षी जेवढा / जितका पाऊस झाला,
  तेवढा / तितका पाऊस यंदाही होईल असे वाटत नाही.
- दोन्ही विशेषणे एकाच नामाकरता किंवा विशेषणाकरता असतील, तर दुसऱ्या वेळी नाम किंवा विशेषण पुन्हा नाही वापरले तरी चालते.
  उदा॰ आमच्या सोसायटीत जितकी लहान मुले आहेत तितकी तुमच्या सोसायटीत नाहीत.
  "जेवढी तू हुशार आहेस तेवढी मी नाही, हे मला आता नीट कळलंय."
- एकाच वाक्यात दोन वेगळी नामे असली, तर विशेषणाचे लिंग-वचनही त्याप्रमाणे बदलते.
  उदा॰ ह्या लॅपटॉपची जेवढी किंमत आहे, तेवढा माझा वर्षभराचा पगार आहे.
  आई जितकी चिडचीड करते, तितका अनुचा हट्टीपणा वाढतो.
- वाक्याचा फक्त दुसरा भागच वापरला, तरी संदर्भाने आपल्याला पूर्ण अर्थ समजू शकतो.
  उदा॰ "झाला तेवढा गोंधळ पुरे झाला. निघा आता!" (= "जेवढा गोंधळ झाला तेवढा गोंधळ पुरे झाला.") वाटले होते तेवढा उशीर झाला नाही. (= जेवढा उशीर होईल असे वाटले होते तेवढा उशीर झाला नाही.)

३. **खालील वाक्यांचा अभ्यास करू या.**

एवढे / इतके की... , एवढेच / इतकेच की... , एवढे / इतके / तेवढे / तितके नसले तरी... , एवढेच / इतकेच नाही / नव्हे. तर... , एवढे / इतके / तेवढे / तितके नाही, पण...



क. एका तासात प्रचंड पाऊस झाला. **एवढा / इतका, की** संपूर्ण गाव पाण्याखाली गेले. (पाऊस **एवढा / इतका** झाला, **की** संपूर्ण गाव...)

ख. "शलाका अचानक निघूनच गेली! तिनं मला सांगून जायला हवं होतं **एवढंच / इतकंच!**" (मला **एवढंच / इतकंच** म्हणायचं आहे **की**, तिनं...)

ग. दिल्लीत डिसेंबरमध्ये खूपच थंडी असते. **तेवढी / तितकी नसली, तरी** नागपूरलाही बऱ्यापैकी थंडी असते. (दिल्लीपेक्षा नागपूरला थोडीशीच कमी थंडी असते.)

घ. सविताच्या आईने लग्नानंतर बारावीची परीक्षा दिली. **एवढेच / इतकेच नाही / नव्हे, तर** तिने नंतर बी. फार्म. करून एका औषधांच्या दुकानात नोकरीही केली.
**(एखाद्या विधानात जास्त महत्त्वाच्या माहितीची भर घालताना 'एवढेच नव्हे' हा शब्दसमूह वापरता येतो. त्यात कोणत्याही कारणाने लिंग-वचनाचा बदल होत नाही.)**

च. सकाळी लोकल गाड्यांना प्रचंड गर्दी असते. दुपारी **तेवढी / तितकी नाही, पण** गर्दी असतेच.
**(पहिल्या विधानाची तीव्रता कमी करणारे दुसरे विधान जोडून घेताना 'तेवढे नाही, पण...' ही रचना उपयोगी पडते.)**

## ११ संभाषणकौशल्ये.

१. **उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा॰ झोपेत चालणे, बोलणे, जेवताना पेंगणे, गाणे ऐकणे, वाचताना टीव्ही पाहणे, रेडिओ ऐकणे बोलताना डोळा मारणे, डोळे मोठे करणे, रडताना हसणे, खाणे, हसताना रडणे, डोळे बंद करणे)

पहिला विद्यार्थी : सिद्धेशला झोपेत चालायची सवय आहे.
सर्व विद्यार्थी : काय? गंमतच आहे!
पहिला विद्यार्थी : हो, आणि रीमाला झोपेत बोलायची सवय आहे.
सर्व विद्यार्थी : काय? गंमतच आहे!
पहिला विद्यार्थी : हो. तुम्हाला झोपेत काय करायची सवय आहे?
सर्व विद्यार्थी : आम्हाला झोपेत झोपायचीच सवय आहे.



संभाषण

**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा. जेवढे – तेवढे / बोलणे – ऐकणे, जितके – तितके / वाचणे – लिहिणे, जेवढे – तेवढे / खाणे – चालणे, जितके – तितके / बोलणे – करणे, जेवढे – तेवढे / खेळणे – अभ्यास करणे, जितके – तितके / पैसे उडवणे – पैसे कमवणे, जेवढे – तेवढे / गोड बोलणे – गोड वागणे)



पहिला विद्यार्थी : तू जेवढं बोलतोस, तेवढं ऐकतोस का?

दुसरा विद्यार्थी : हो, म्हणजे काय! मी जेवढं बोलतो, तेवढंच ऐकतोसुद्धा.

सर्व विद्यार्थी : कमाल आहे!


पहिला विद्यार्थी : हो, आणि मी जेवढं ऐकतो तेवढंच बोलतो. आणि तुम्ही? तुमचं काय?

दुसरा विद्यार्थी : आम्ही एवढं बोलत नसलो तरी खूप ऐकतो.

**चिंटू**






## पहिले मराठी पाऊल

### मुंबई शहराचे वर्णन करणारे पहिले मराठी पुस्तक




एखाद्या शहराविषयी अनेक अंगांनी लिहिण्याची परंपरा भारतात तर नव्हतीच, पण युरोपातही रुजलेली नव्हती. त्या विषयाच्या अभ्यासाची फारशी साधने उपलब्ध नव्हती. अशा काळात गोविंद महादेव माडगावकर नावाच्या गृहस्थांनी मोठ्या खटाटोपाने १८६३ साली 'मुंबईचे वर्णन' हे पुस्तक लिहावे, ही मोठी आश्चर्याची गोष्ट होती. तो आधुनिक मुंबईच्या घडण्याचा काळ होता. एका नव्या ऊर्जेने, उत्साहाने ती सळसळत होती. माडगावकरांनी ते सगळे बारकाईने निरखले, अनुभवले. त्यांच्या लेखनात ती सळसळ जाणवते. त्यांची भाषा ओघवती, साधी, टवटवीत आणि प्रसन्न आहे. एक नवे जग, नवी जीवनशैली, नवा बहुरंगी समाज आकाराला येत होता आणि ते पाहताना त्यांना अगदी लहानसहान गोष्टीविषयी वाटणाऱ्या कुतूहलाचा संसर्ग आजच्या वाचकालाही होतो. तेव्हापासून आजपर्यंत मुंबईवर अनेक पुस्तके झाली, पण माडगावकरांच्या 'मुंबईचे वर्णन'चे स्थान कायम आहे. हे पुस्तक मुंबईच्या 'इंदुप्रकाश' या छापखान्यातून मुद्रित झाले.

### मराठीतील पहिले स्वतंत्र ऐतिहासिक नाटक आणि इतिहासाची चिकित्सा करणारे पहिले मराठी पुस्तक.

विनायक जनार्दन कीर्तने (१८४० – १८९१) आणि नीलकंठ जनार्दन कीर्तने (१८४४ – १८९६) हे दोघे बंधू कर्तृत्ववान होते. विनायकरावांनी 'थोरले माधवराव पेशवे' हे नाटक लिहिले. ते स्वतंत्र आणि ऐतिहासिक तर होतेच, पण मराठीतील पहिले शोकान्त नाटकही होते. भारतीय नाट्यशास्त्राला शोकान्तिका मान्य नाही. हे बंधन तोडणे धाडसाचेच होते, पण ह्या नाटकाचे मात्र कौतुक झाले. तेव्हाच्या साहित्यपंडितांनीही पाश्चात्य वळणाच्या ह्या नव्या प्रयोगाचे स्वागत केले.

ग्रँट डफ ह्या इंग्रज अधिकाऱ्याने मराठ्यांचा सुसंगत इतिहास बरेच कष्ट घेऊन लिहिला. त्यासाठी आवश्यक ती साधनेही त्याला मिळाली होती. पण त्यांचा योग्य तो उपयोग न केल्याने त्याच्या लेखनात अनेक चुका राहून गेल्या होत्या. नीलकंठराव कीर्तन्यांनी त्याबद्दल सडेतोड टीका करणारा 'कॅप्टन ग्रँट डफकृत मराठ्यांचे बखरीवर टीका' हा निबंध लिहिला आणि तो 'पूना यंग मेन्स असोसिएशन' या सभेत वाचला. पुढे तो पुस्तकरूपाने प्रसिद्धही केला. ह्याचा परिणाम होऊन साधनांचा शोध घेण्याचे आणि त्यांचा अभ्यास करून इतिहासाचे संशोधन करण्याचे महत्त्व मराठी अभ्यासकांच्या लक्षात आले. हा निबंध प्रसिद्ध झाला तेव्हा नीलकंठराव अवघ्या तेवीस वर्षांचे होते आणि पुण्यातील डेक्कन कॉलेजात शिकत होते. पुढे त्यांच्या एकंदर संशोधनपर लेखनासाठी त्यांना इंग्रज सरकारने 'रावबहादूर' ही पदवी दिली.

## दृष्टिक्षेप

### नामे

| | | |
|---|---|---|
| तो वावर | ती बोलीभाषा, त्या - | ते खंडपीठ, ती खंडपीठे / ठं |
| तो गुलहौशीपणा | ती खिजगणती | ते चैतन्य , ती चैतन्ये / न्यं |
| तो अवगुण, ते - | ती छानछोकी | ते शव, ती शवे / वं |
| तो लोंढा, ते लोंढे | ती टापटीप | ते उधाण, उधाणे / णं |
| तो थाटमाट, ते - | ती हिरिरी | |
| तो लौकिक | ती काव्यधारा, त्या - | |
| तो अव्हेर | ती (सैनिकांची) तुकडी, त्या तुकड्या | |
| तो असंतोष | ती मुहूर्तमेढ, त्या मुहूर्तमेढी | |
| तो तळ, ते - | | |
| तो कडा, ते कडे | | |

### क्रियापदे

फळफळणे वसवणे घोकणे झुगारणे रोवणे

### विशेषणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अग्रणी | नामांकित | पवित्र | तुरळक | गळका |
| मोहमय | मस्तवाल | निष्पाप | रांगडा | |

### क्रियाविशेषणे

| | |
|---|---|
| निपचित | ध्यानीमनी |

### नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination

| नाम + क्रियापद<br>Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| **१. पाया घालणे** | गोपाळ गणेश आगरकरांनी धार्मिक आणि सामाजिक अंधश्रद्धांना विरोध केला आणि सामाजिक सुधारणांचा पाया घातला. |
| **२. कात्रीत पकडणे** | विरोधी पक्षाने ऐनवेळी ठरावाच्या विरुद्ध मत देऊन सरकारला कात्रीत पकडले. |
| **३. काबीज करणे** | प्रोफेसरांनी वैज्ञानिक सत्य उलगडून दाखवले आणि विद्यार्थ्यांची मने काबीज केली. |
| **४. लौकिक मिळवणे** | नाशिकच्या द्राक्षमळेवाल्यांनी उत्कृष्ट द्राक्षे पिकवून जगभरात लौकिक मिळवला आहे. |
| **५. वाळवी लागणे** | पुस्तकांना वाळवी लागली, की ते किडे सगळ्या पुस्तकांना भोके पाडतात. |
| **६. लक्ष घालणे** | अक्षयने अभ्यासात नीट लक्ष घातले म्हणून त्याला चांगले गुण मिळाले. |
| **७. मिश्या फुटणे** | आलोक चौदा वर्षांचा झालाय, पण त्याला आत्ताच मिश्या फुटल्या आहेत. |
| **८. समन्वय साधणे** | दोन टोकांची मते असणाऱ्या लोकांमध्ये समन्वय साधणे ही एक कला असते. |
| **९. सुट्टी घालवणे** | शाळेला सुट्टी लागली की आम्ही महिनाभर आजी-आजोबांकडे जात असू आणि तिकडेच सुट्टी घालवत असू. |
| **१०. नशीब फळफळणे** | त्या चहावाल्याला लॉटरी लागली आणि त्याचे नशीब फळफळले. |
| **११. प्रयोग करणे** | जगदीशचंद्र बसूंनी वनस्पतींवर अनेक प्रयोग केले आणि आश्चर्यकारक निरीक्षणे नोंदवली. |
| **१२. बेत ठरणे** | आज रात्री सिनेमाला जाण्याचा बेत तर ठरला आहे, पण जेवणाचा बेत काय आहे? |
| **१३. वाद घालणे** | प्रत्येकाचं मत जेव्हा वेगळं असतं, तेव्हा सगळेच एकमेकांशी वाद घालतात. |

**इतर शब्द व क्रियापद जोड्या** **Other words and Verb combinations**

| इतर शब्द + क्रियापद<br>Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. कारणीभूत असणे | त्याचे अपयशच त्याच्या यशाला कारणीभूत आहे. |
| २. खिजगणतीत नसणे | लोकांना फक्त वाघ, सिंह, हत्ती ह्याच प्राण्यांचे आकर्षण असते. कासव, ससा, हरीण असे छोटे प्राणी त्यांच्या खिजगणतीतही नसतात. |
| ३. नादी लागणे | शेखर म्हणाला, "त्या अनोळखी माणसाच्या नादी तू लागू नकोस." |
| ४. खुंटाला बांधणे | "मी शहरात ह्या नोकरीच्या खुंटाला बांधून घेणार नाही, मला गावात जाऊन वेगळं काम करायचं आहे." |
| ५. आशेवर जगणे | मधूला नोकरी लागेल आणि आपली गरिबी संपेल, ह्या आशेवर त्याचे आईवडील जगत होते. |
| ६. आपलसं करणे | संस्थेत येणाऱ्या लहान मुलांशी प्रेमाने वागून सिंधुताई त्यांना आपलेसे करतात. |
| ७. बेजार होणे | उन्हाळ्यामध्ये डास चावल्यामुळे सगळे बेजार होतात. |
| ८. उत्साहाने सळसळणे | उत्साहाने सळसळणारी तरुण मुले अवतीभोवती असली की वातावरणही उत्साहाने भरून जाते. |

### आता मला हे येतं...

**महाराष्ट्र राज्य व त्यातील प्रमुख शहरांचा अभ्यास करणे : मुंबई आणि पुणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**क्रियापद - नामाची षष्ठी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**बोलीभाषा**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**च, ही, सुद्धा, पण, नं, मात्र, फक्त, केवळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**अलीकडे, पलीकडे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**जेवढे - तेवढे / जितके - तितके / एवढे - इतके**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# सामाजिक समस्या आणि सामाजिक मूल्ये

१०












## चला, शिकू या...

- सामाजिक समस्या समजणे, वंचितांचे प्रश्न समजणे
- शासकीय व स्वयंसेवी संस्थांबद्दल माहिती घेणे
- सामाजिक मूल्ये : हे केले पाहिजे किंवा ते करता कामा नये
- बहुधा, बहुतेक, कदाचित, खात्रीने इ॰
- शब्दयोगी पदे : विषयी, संबंधी, बद्दल
- संख्याविशेषणे : फार, पुष्कळ, थोडा,
- एकामागोमाग एक, एकाआड एक, एकापाठोपाठ एक इ॰
- प्रयोजक क्रियापदे : सोडणे - सोडवणे, वाढणे - वाढवणे इ॰
- एकाच क्रियापदाचे अनेक अर्थ : उदा॰ वाटणे, लागणे

## १ चित्रवर्णन

**१. मागील पानावरील चित्रांचे खालील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करू या.**

- चित्रांतील कोणती ठिकाणे तुम्हाला माहीत आहेत? त्या ठिकाणांची वैशिष्ट्ये काय आहेत?
- चित्रात कोणती माणसे दिसत आहेत?
- आपला समाज ह्या माणसांना कशा प्रकारची वागणूक देतो?
- ह्या माणसांच्या काय समस्या आहेत?
- त्या समस्यांचे निवारण कोण आणि कसे करतो?
- ह्या माणसांविषयीचा आपला वैयक्तिक अनुभव काय सांगतो?
- ह्या माणसांचा संदर्भ घेता समाज आणि सामाजिक मूल्ये कशी असावीत असे तुम्हाला वाटते?

## २ वंचित, कमकुवत, दुर्बल...



समाज हा माणसांनी तयार होतो. माणसे असंख्य प्रकारची असतात. ती गुण्यागोविंदाने राहावीत ह्यासाठी लोकशाही व्यवस्था लागते. समाज कसा चालवायचा ह्याबद्दल माणसांचे एकमत असावे लागते, आणि ते शंभर टक्के होणे शक्य नसल्यामुळे शेवटी समाज बहुमताने चालवावा लागतो. ह्याच बहुमतामुळे कळत नकळत समाजामधील माणसामाणसांमध्ये दरी निर्माण होते. लोकशाहीत समाजातील जगण्याचे नियम, कायदे आणि एकूणच समाजातील विविध घटकांना मिळणारे हक्क, हे सर्व बहुमत ठरवते. ही रचना बहुसंख्य माणसांच्या सुखी आयुष्यासाठी जितकी गरजेची आहे, तितकीच ती काही लोकांसाठी पक्षपात आणि भेदभाव करणारी ठरते.

अन्न, वस्त्र, निवारा ही प्रत्येक मनुष्याची प्राथमिक गरज व त्याचा जन्मसिद्ध अधिकार असला, तरी तो प्रत्येकाला मिळतोच असे नाही. बहुसंख्य लोकांचे जगणे, वागणे, त्यांची जगाबद्दलची समज, त्यांचे विचार ह्या सगळ्यांचे साचे बनत जातात. हे साचे समाजाच्या मुख्य प्रवाहाचे भाग बनतात. श्रीमंत, शिक्षित, उच्चवर्णीय, विशेष अधिकार असलेली, शक्तिशाली अशी माणसे ह्या मुख्य प्रवाहाचे मानकरी व प्रतिनिधी होतात.

ह्या मुख्य प्रवाहाबाहेरही माणसे असतात. ती असतात अल्पसंख्याक, दुर्बल, कमकुवत इत्यादी. ती समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आणि वंचित राहतात. समाजाकडून उपेक्षिली जातात. ह्या लोकांना त्यांच्या शारीरिक व्याधींमुळे, त्यांच्या वेगळेपणामुळे, त्यांच्या साच्याबाहेरील अस्तित्वामुळे, आर्थिक अस्थैर्यामुळे किंवा समाजातील पूर्वग्रहांमुळे अनेकदा अन्यायकारक वागणूक मिळते. कित्येकदा कायदादेखील त्यांच्या बाजूने नसतो. सरकार आणि सरकारी संस्थांनी ह्या लोकांसाठी असणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

**१. वरील उतारा पुन्हा वाचू या आणि खाली दिलेल्या अर्थांचे योग्य समानार्थी शब्द शोधू या.**



क. बहुमत = ----------------------

ख. एका पक्षाची तरफदारी = ----------------------

ग. राहण्यासाठी घर = ----------------------

घ. हक्क = ----------------------

च. विचारांची आणि जगण्याची दिशा, ओघ = ----------------------

छ. विशिष्ट मान मिळाला आहे अशी व्यक्ती = ----------------------

**२. योग्य विरुद्धार्थी शब्द शोधू या.**



क. बहुसंख्य × ----------------------

ख. विशेष अधिकार असलेले × ----------------------

ग. स्थैर्य × ----------------------

घ. शक्तिशाली × ----------------------

**३. वरील उताऱ्यात सांगितलेल्या दुर्बल, कमकुवत आणि वंचित लोकांची आपल्या माहितीतील उदाहरणे देऊ या.**

**४. दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करू या. वरील उताऱ्यातील काही महत्त्वाची विधाने खाली दिली आहेत. त्यांतील एक विधान निवडू या. ते विधान आपल्याला बरोबर वाटते का ते सांगू या आणि त्यासाठी आपल्या वैयक्तिक अनुभवातून काही उदाहरणे देऊ या.**

**विधाने :**

क. (बहुमताने समाज चालवण्याची लोकशाहीची) ही रचना बहुसंख्य माणसांच्या सुखी आयुष्यासाठी जितकी गरजेची आहे, तितकीच ती काही लोकांसाठी पक्षपात आणि भेदभाव करणारी ठरते.

ख. बहुसंख्य लोकांचे जगणे, वागणे, त्यांची जगाबद्दलची समज, त्यांचे विचार ह्या सगळ्यांचे साचे बनत जातात. हे साचे समाजाच्या मुख्य प्रवाहाचे भाग बनतात.

ग. ह्या लोकांना (अल्पसंख्याक, दुर्बल, कमकुवत) त्यांच्या शारीरिक व्याधींमुळे, त्यांच्या वेगळेपणामुळे, त्यांच्या साच्याबाहेरील अस्तित्वामुळे, आर्थिक अस्थैर्यामुळे किंवा समाजातील पूर्वग्रहांमुळे अनेकदा अन्यायकारक वागणूक मिळते.

**५. खालीलपैकी एक समस्या निवडू या, तिच्याविषयी आंतरजालावर माहिती गोळा करू या आणि वर्गासमोर हा विषय मांडू या.**

गरिबी   निरक्षरता   स्त्रियांचे प्रश्न   वृद्धांचे प्रश्न   बालकामगार   गुन्हेगारी
व्यसन   भ्रष्टाचार   वेश्याव्यवसाय   जातिव्यवस्था   बेरोजगारी   कचरा
शेतकऱ्यांचे प्रश्न   बालगुन्हेगार   पर्यावरणाचे प्रश्न   कुपोषण   लिंगभेद
आदिवासींचे प्रश्न   हुंडाबळी   समलैंगिक व तृतीयपंथीय यांचे प्रश्न   रोगराई
निर्वासितांच्या समस्या   अंधश्रद्धा   वर्णद्वेष   जलव्यवस्थापन   दुष्काळ
भटक्या विमुक्त जाती   अपंग आणि विकलांग   आपद्ग्रस्त
शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचार   तरुणांच्या समस्या

## ३ स्वयंसेवी संस्था



वंचित लोकांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्था भारतात आणि महाराष्ट्रभर कार्यरत आहेत. समाजातील उपेक्षित लोकांसाठी ह्या संस्था कायम मदतीचा हात पुढे करतात. निराधार, रोगग्रस्त, आपद्‌ग्रस्त, अपंग, विकलांग, वर्णद्वेषाचे बळी, तृतीयपंथीय, शोषित, कुपोषित, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले, महिला, मुले ह्या सर्वांसाठी अशा संस्था स्थापल्या जातात. 'चाईल्ड प्रगती फाऊंडेशन' ही अशीच 'ना नफा ना तोटा' ह्या तत्त्वावर चालणारी एक स्वयंसेवी संस्था. ती संस्था गरीब आणि गरजू लहान मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी कार्य करते. हृदयरोग आणि कर्करोग असलेल्या लहान मुलांवर उपचार करण्यासाठी निधी उभारण्याचे कामदेखील करते.

**१. तुम्हालाही अशा स्वयंसेवी संस्था आणि त्या करत असलेले कार्य माहीत आहे का? कोणत्याही तीन संस्थांबद्दल खालीलप्रमाणे माहिती लिहू या.**

| स्वयंसेवी संस्था | कोणासाठी? | कार्य |
|---|---|---|
| उदा. चाईल्ड प्रगती फाऊंडेशन | गरीब आणि गरजू लहान मुलांसाठी | शिक्षणासाठी, आरोग्यासाठी व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी कार्य करते. |
| | | |
| | | |
| | | |

व्याकरण

**२. हे अनुभव वाचू या.**



संजय : अपंगत्व म्हणजे काही शिक्षा नव्हे! सारंगखेडा येथील संजय स्वतःच्या अपंगत्वावर मात करत त्याचा पारंपरिक व्यवसाय अत्यंत सक्षमपणे करत असून समाजात ताठ मानेने व स्वाभिमानाने जगत आहे. संजयने इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण घेतले आहे. दोन्ही पायांनी अपंग असल्याने, तसेच कुटुंबाची जबाबदारी खांद्यांवर असल्याने त्याला आपला वडिलोपार्जित सुतारकामाचा व्यवसाय चालू ठेवावा लागला. एकीकडे शिक्षण व दुसरीकडे पोटापाण्याचा व्यवसाय चालू ठेवत त्याने आपण अपंग असल्याची भावनाच मनातून काढून टाकली आहे. त्याच्या गावातील लोकांनी तर त्याच्या कष्टांची दखल घेतली आहेच, पण त्याच्या ह्या प्रयत्नांसाठी सरकारनेही त्याची दखल घेतली आहे व त्याला सरकारी नोकरीचे आश्वासन दिले आहे. जीवनात आपण काहीही साध्य करू शकतो, लागते ती फक्त जबरदस्त इच्छाशक्ती!

रोझा : तृतीयपंथीयांच्या बऱ्याच समस्या व प्रश्न आहेत. रोझाचा अनुभवही काहीसा असाच आहे. ती म्हणते, “बहुतेक तृतीयपंथीय शिक्षणापासून वंचित आहेत आणि नजीकच्या भविष्यात ही दु:स्थिती फारशी बदलेल अशी चिन्हे नाहीत. अशिक्षित तृतीयपंथीयांना त्यांचे आईबाप जवळ करत नाहीत आणि समाज त्यांना जगू देत नाही. सर्वांच्या नजरा तिरस्काराने रोखलेल्या असतात. बऱ्याचदा त्यांना घराबाहेर हाकलण्यात येते. जणू तृतीयपंथीय ही परग्रहावरून वस्तीला आलेली अस्पृश्य जमात आहे! त्यांनी जगावे कसे हा यक्षप्रश्न आहे. खरे तर शिक्षणाची गरज त्यांच्यापेक्षाही जास्त त्यांच्या कुटुंबियांना आहे. तृतीयपंथीयांच्या कुटुंबियांचा न्यूनगंड कमी झाला, तर त्यांच्यावर होणारे अन्याय कमी होतील. त्यासाठी त्यांना समाजाची आश्वासक साथ हवी.”

**क. वरील अनुभवकथनांमध्ये कोणत्या प्रश्नांची चर्चा केली आहे? हे प्रश्न कसे सोडवले गेले किंवा कसे सोडवले जाऊ शकतील?**

| समस्या | उपाय / मदत |
|---|---|
| | |
| | |

## करा आणि शिका

दोन ते तीन विद्यार्थ्यांचे गट करू या. आपल्याला माहीत असलेल्या एका सामाजिक कार्यकर्त्याची मुलाखत घेऊ या आणि ती मुलाखत वर्गात सादर करू या.

**४. चर्चा करू या.**

क. देशातील सामाजिक समस्यांचा तुमच्याशीही संबंध आहे असे तुम्हाला वाटते का?

ख. देशातील सामाजिक समस्या सोडवण्यासाठी आपणही वैयक्तिक पातळीवर काही करू शकतो का?

करा आणि शिका

**५. सामाजिक कार्य करण्याच्या नावीन्यपूर्ण कल्पना**




पुण्यात आणि महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी काही मंडळे गणेशोत्सवासाठी जमा केलेले पैसे समाजोपयोगी कामासाठी वापरतात. उदाहरणार्थ पुण्याचे सेवा मित्रमंडळ गेली ११ वर्षे 'मामाच्या गावची सफर' असा उपक्रम राबवते. शहरातील बेघर मुलांच्या गरजा ओळखून त्यांना काही दिवस मंडळाकडून मामाच्या घरी बोलावले जाते. मुलांना बागा, सर्कस, सिनेमा दाखवून त्यांचे लाड पुरवले जातात. अंधशाळेतल्या मुलांची पावसाळ्यात सहल नेली जाते. काही गणेश मंडळांकडून गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारीही उचलली जाते. पूर्व प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता ओळखून गेली पंचवीस वर्षे अरण्येश्वर मंडळातर्फे यशस्वीपणे बालवाडी चालवली जाते.

**क. समाजात कसे वागावे ह्यासाठीचे काही संकेत खाली दिले आहेत. ते वाचू या आणि उदाहरणात दाखवल्याप्रमाणे त्या संकेतांचा वापर करून वाक्ये तयार करू या.**

उदा॰ वंचित लोकांशी नेहमी सहृदयतेने वागले पाहिजे. आपण त्यांना कमी लेखता कामा नये.
अपंग माणसांच्या समस्या आपण जाणून घेतल्या पाहिजेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करता कामा नये.
तृतीयपंथीयांना नोकऱ्यांच्या संधी दिल्या पाहिजेत. सरकारने त्यांना समाजातून वगळता कामा नये.
वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना माणूस म्हणून वागवले पाहिजे. आपण त्यांना तुच्छ लेखता कामा नये.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

करा आणि शिका

**करा आणि शिका**

ख. चार ते पाच विद्यार्थ्यांचे गट करू या. कोणतीही एक सामाजिक समस्या निवडून तिच्या निवारणासाठी एक नावीन्यपूर्ण कल्पना सुचवू या. आपली कल्पना वर्गासमोर मांडू या. आपण सुचवलेल्या कार्याची सविस्तर माहिती देऊ या.

## ४ शासकीय कारभार

**१. प्रमोद काकडे सरकारी कार्यालयात त्यांच्या एका कामासाठी येतात. त्यांच्यात आणि तेथील कर्मचाऱ्यांमध्ये घडलेला संवाद ऐकू या.**


**खालील गोष्टी संवादात कोणत्या क्रमात घडतात?**

- ☐ जोश्यांची भेट
- ☐ राण्यांची भेट
- ☐ काकड्यांचे वैतागणे
- ☐ काकड्यांचे पहिल्या मजल्यावर जाणे
- ☐ लोबो मॅडमची सही
- ☐ काकड्यांचे तिसऱ्या मजल्यावर जाणे
- ☐ जोश्यांची दिलगिरी व्यक्त करणे



**२. एखाद्या गोष्टीची खात्री किती आहे हे सांगण्यासाठी खालील शब्द आपण वापरतो. ते शब्द खालील पिरॅमिडमध्ये योग्य क्रमाने लिहू या.**

(कदाचित, बहुधा, एकंदरीत, खात्रीने, अशक्य, नक्की)



**३. प्रत्येकी चार ते पाच विद्यार्थ्यांचे गट करू या आणि खालीलपैकी एका प्रसंगावर संवाद लिहू या. संवाद वर्गासमोर सादर करू या.**



क. तुम्ही एका कचेरीत एक अर्ज घेऊन गेला आहात, परंतु तेथील कारकून तुम्हाला कोणतीच माहिती देत नाही.

ख. एक लहान मुलगा बाबांना खूप प्रश्न विचारतोय, पण बाबा त्याच्या प्रश्नांची खात्रीशीर उत्तरे देत नाहीत.

ग. आसावरी काळे त्यांच्या नातवाच्या जन्मदाखल्याचा अर्ज करायला कचेरीत गेल्या आहेत, पण कचेरीत कोरा अर्ज शिल्लक नाहीये.

घ. मनोहर देशमुख आधारकार्ड घेऊन आले आहेत, पण कार्डावरचे नाव चुकले आहे.

**४. खाली काही अर्जांचे नमुने दिले आहेत. ते वाचू या.**

<u>बँकेत लॉकर उघडण्यासाठी अर्ज :</u>

शाखाधिकारी,<br>भारत सहकारी बँक,<br>विक्रोळी शाखा

दिनांक : १ मार्च, २०१८

विषय : आपल्या शाखेमध्ये सेफ डिपॉझिट लॉकर उघडणे.

महोदय,

आपल्या शाखेमध्ये माझे बचत खाते क्र. १५२०४७८९३० आहे. शिवाय माझी मुदत ठेव रु. १,००,०००/- ह्याच शाखेमध्ये पाच वर्षांसाठी ठेवलेली आहे. काही महत्त्वाच्या गोष्टी सुरक्षित ठेवण्यासाठी मला एका लॉकरची आवश्यकता आहे.

आपल्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे A टाईप च्या लॉकरचे भाडे दर वर्षी रु. २५००/- आहे, ते माझ्या बचत खात्यात डेबिट टाकावे ही विनंती.

शक्य तेवढ्या लवकर मला A टाईपचा लॉकर देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

आपला विश्वासू,

(शंकर मानकर)

दिनांक : १३ / ८ / २०१८

पोलीस इन्स्पेक्टर,

खेरवाडी पोलीस ठाणे,

मुंबई

विषय : डेबिटकार्डाचा दुरुपयोग झाल्याची तक्रार नोंदवणे.

महोदय,

मी, संतोष माकुडे, राहणार कलानगर, मुंबई, अशी विनंती करतो की माझी तक्रार नोंदवून घ्यावी. काल, दिनांक १२ / ८ /२०१८ रोजी संध्याकाळी ७ ते ७.१५ च्या दरम्यान माझे डेबिटकार्ड वापरले गेल्याचे माझ्या लक्षात आले. त्यावेळी मी गाडी चालवत होतो म्हणून माझ्या मोबाईलवर आलेले 'ओटीपी'चे मेसेज मी पाहिले नव्हते. घरी आल्यावर मी ते वाचले. मी लगेच माझ्या बँक खात्याची शिल्लक तपासल्यावर माझ्या लक्षात आले, की माझ्या खात्यातील एकूण ३०,००० रुपये ऑनलाईन खर्च केले गेले आहेत.

मी ह्यापूर्वी कधीही माझ्या खात्याबद्दल वा माझ्या डेबिटकार्डाबद्दल कोणतीही माहिती कोणालाही दिलेली नाही. तेव्हा, कृपया, माझी तक्रार नोंदवून घ्यावी आणि माझ्या खात्यातून गेलेल्या रकमेचा तपास लावावा ही विनंती. वर माझा घरचा पत्ता दिलेला आहेच आणि बाकीच्या तपशिलासाठी आवश्यक ती कागदपत्रे जोडली आहेत.

आपला नम्र,

(संतोष माकुडे)

पत्ता : फ्लॅट क्रमांक १३२ / ए, जगत विद्या, कलानगर, वांद्रे (पू.) मुंबई ४०००५१

**क. वरील दोन्ही अर्जांचा अभ्यास करू या आणि पुढीलपैकी एका विषयासंबंधी अर्ज लिहू या.**

१. वाहनचालक परवान्याचे नूतनीकरण

२. कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अर्ज

३. आधारकार्ड जोडणी



## ५ एक मुलाखत




**हर्ष** : नमस्कार, विराट! दक्षिण आफ्रिकेच्या संघाविरुद्ध मिळालेल्या आजच्या विजयाबद्दल खूप खूप अभिनंदन!

**विराट** : धन्यवाद. खरं तर ह्या विजयाचं श्रेय सगळ्या संघाचं आहे.

**हर्ष** : नक्कीच. पण तुझा आजचा खेळ विशेष चांगला होता. तू सध्या फिट राहण्यासाठी विशेष प्रयत्न करतो आहेस ना? त्या प्रयत्नांविषयी आम्हाला काही सांगू शकशील का?

**विराट** : हो. मी सध्या वेगळ्या पद्धतीचं फिटनेसचं ट्रेनिंग घेत आहे. त्याचा मला खूप फायदा होतो आहे. माझा स्टॅमिनाही वाढला आहे. शिवाय शास्त्रीसरांकडून क्रिकेटचं तंत्र चांगलं शिकायला मिळत आहे.

**हर्ष** : अरे वा, खूपच छान! भारतीय क्रिकेट संघाचा कॅप्टन म्हणून तू अशीच कामगिरी पुढे चालू ठेवावीस हीच आम्हा सर्वांची इच्छा आहे.

**विराट** : खूप खूप धन्यवाद!

**हर्ष** : आता एक शेवटचा प्रश्न.

**विराट** : हो, विचार ना.

**हर्ष** : पूर्वी तू लग्नासंबंधी बोलताना म्हणाला होतास, की माझा लग्नावर विश्वास नाही. मग आता लग्न करावंसं वाटावं असं काय झालं?

**विराट** : व्हायचंय काय? प्रेमात पडलो एवढंच!!

व्याकरण

**बद्दल, संबंधी आणि विषयी – शब्दयोगी पदे**
**regarding, concerning – Postpositions**
**'बद्दल, संबंधी आणि विषयी' ह्या तिन्ही पदांचे अर्थ साधारण एकसारखेच आहेत.**
**अर्थ : एखाद्या विषयाशी संलग्न किंवा विषयाला जोडून.**

**१. खालील वाक्यांश वापरून चर्चा करू या.**




- तृतीयपंथियांबद्दल माझे मत तितकेसे चांगले नाही, कारण...
- वर्णद्वेषाविषयी माझा स्वतःचा असा काही अनुभव नाही, परंतु...
- वृद्धाश्रमासंबंधी मला अजून काही माहिती घ्यायला आवडेल...

## ६ वर्तमानपत्रातील मथळे

- २०२० पर्यंत भारतात इंटरनेट ग्राहकांची संख्या आताच्या तुलनेत दुप्पट.
- वाढती लोकसंख्या, दळणवळणाची वाढती साधने व वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी शासनाचा एकेरी रस्त्यांचे दुपदरीकरण व दुपदरी रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय.
- 'एक लाख द्या, घराचे बुकिंग करा' योजनेचा पुष्कळ लोकांना फायदा.
- खेड-शिवापूर रस्त्यावर वाहनांची कोंडी नित्याची.
  महामार्गाचे सहापदरीकरण सुरू.
  खंबाटकी घाटातही रस्ता रुंदीकरणाचे काम चालू.
- निर्माता दिग्दर्शक डेव्हिड धवन ह्यांचे कोट्यवधींचे प्रोजेक्ट. वरुण धवन करणार त्यांच्या आगामी चित्रपटात दुहेरी भूमिका.
- सोन्याच्या भावात गेल्या दहा वर्षांत पाचपट वाढ. ऐन लग्नसराईत सामान्य जनता चिंतेत.
- फक्त तीन लाखांचे भांडवल घालून तरुणीने सुरू केला फॅशन डिझायनिंगचा व्यवसाय. दोन वर्षांत मिळवला तिप्पट नफा!
- ह्या उन्हाळ्यात दिल्लीच्या उष्म्यात परत किंचित वाढ. दिल्लीकर हैराण.
- सुरत चिटफंड प्रकरणात हजारो लोकांचे पैसे बुडाले. नागरिक हवालदिल.

**१. वरील मथळ्यांमधील संख्यावाचक विशेषणे शोधू या.**


**संख्याविशेषणे Quantitative Adjectives**

**ही विशेषणे संख्या अथवा आवाका दर्शवतात. संख्येशी निगडीत काही विशेषणे पट अथवा पदर हे शब्द लावून तयार होतात. उदा. दुप्पट, ...**



**२. आता ह्या विशेषणांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करू या.**

| संख्या | पदर | पट |
|---|---|---|
| एक | एकपदरी / एकेरी  | एकपट |
| दोन | दुपदरी / दुहेरी | दुप्पट  |
| तीन | ------------------ / ------------------ | ------------------ |

| संख्या | पदर | पट |
|---|---|---|
| चार | चौपदरी  | ---------------------- |
| पाच | पाचपदरी | ---------------------- |
| सहा | ---------------------- | ---------------------- |
| सात | ---------------------- | ---------------------- |
| आठ | ---------------------- | ---------------------- |
| नऊ | ---------------------- | नऊपट |
| दहा | ---------------------- | दसपट / दहापट |

**३. खाली डाव्या वर्तुळात असलेल्या शब्दांच्या उजव्या वर्तुळात असलेल्या अर्थांशी जोड्या लावा आणि त्या शब्दांपासून वाक्ये तयार करा.**

उदा॰ वजन कमी करण्यासाठी व्यायाम करणे गरजेचे आहे ह्यावर सर्वांचे नेहमीच एकमत असते.

एकमत
एकमेव
एक-रकमी
एकपाठी
एकमजली

एकाच वेळी संपूर्ण रक्कम देणे किंवा घेणे
एकदाच वाचून जो सर्व मजकूर लक्षात ठेवतो तो
असे दुसरे कोणी नसणे
सर्वांचे एकच मत असणे
एकच मजला असलेली इमारत

दुभाषी
दुक्कल
दुतर्फा
दुधारी
दुतोंडी

दोघांची जोडी
दोन्ही बाजूंना
एका भाषेतून दुसऱ्या भाषेत तोंडी भाषांतर करणारा
दोन तोंडे असणारा प्राणी किंवा वस्तू
दोन्ही बाजूंना धार असणारी वस्तू

तिपाई
तिप्पट
तिकोनी
तिमजली
तिमाही

तीन पाय असणारे फर्निचर
तीन कोन असणारी आकृती
तीन मजले असणारी इमारत
तीन महिन्यांनी येणारे नियतकालिक / येणारी परीक्षा
तीनने गुणून येणारी रक्कम

चौफेर
चौपट
चौपाई
चौघी
चौकोन

चारने गुणून येणारी रक्कम
चार पाय असणारी खाट
चार बायका / मुली
चार कोन असणारी आकृती
चारही दिशांना असणारे...

पंचकोन
पंचरंगी
पंचकर्म
पंचाक्षरी
पंचमांश

पाचवा भाग
पाच कामे
पाच अक्षरी शब्द
पाच रंग असलेला
पाच कोन असलेली आकृती

**४. आता पुढील विशेषणे वापरून वाक्ये लिहू या.**

(फार, पुष्कळ, थोडा, किंचित)

उदा॰ फार / नुकसान : यंदाच्या पावसात पिकांचे फार नुकसान झाले.

थोडी / वाढ :

पुष्कळ / फायदा :

किंचित / बर्फवृष्टी :

असेही म्हणतात बरं का :

तू अगदी मूर्ख आहेस! तू तर शतमूर्ख आहेस!

माहीत आहे, तू दसपट शहाणी आहेस! शहाणी आहेस अगदी!


**५. खालील उतारा वाचून त्यातील अधोरेखित शब्दांचे अर्थ समजून घेऊ या.**

स्वयंपाकघराच्या भिंतीच्या कडेने मुंग्यांची एक रांग चालली होती. अगदी शिस्तीत एकीमागोमाग एक चालणाऱ्या मुंग्या पाहून छोट्या राणाला फारच मजा वाटत होती. बराच वेळ त्या रांगेकडे तो एकटक पाहात होता. मग त्यानं एकदम त्या रांगेत बोट घातलं. तशा एकीपाठोपाठ एक मुंग्या त्याच्या हातावर चढायला लागल्या. त्याचीही त्याला मजाच वाटत होती. मग एकीनंतर एक मुंग्या जशा त्याला चावायला लागल्या, तसा राणा किंचाळून मोठयाने रडायला लागला. त्याचं रडणं पार पुढच्या अंगणापर्यंत ऐकू जात होतं. त्याला काय झालंय हे पाहायला घरातले सर्वच एकामागून एक धावत आले. आईनं त्याचा हात पटकन शेजारीच असलेल्या पाण्याच्या कळशीत बुडवला, दादानं धावत जाऊन मलम आणलं, आजी हातावर फुंकर घालू लागली, बाबा उगीचच बोबड्या शब्दात त्याची समजूत घालू लागले. आपल्या भोवती एकाशेजारी एक असा गोल करून उभ्या असलेल्या ह्या सगळ्यांकडे पाहून राणाला परत खूपच गंमत वाटली आणि तो खळखळून हसायला लागला.









**क. योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरू या.**

(एकापुढे एक, एकाआड एक, एकावर एक, एकाला लागून एक, एकाआड एक, एकापेक्षा एक, एकामागे एक, एकाशेजारी एक, एकामागून एक)

१. -------------- -------------- असं ठेवण्याऐवजी -------------- -------------- अशी पुस्तकं ठेवलीस, तर बरीच जागा वाचेल.

२. मोगरा आणि गुलाबाच्या झाडांच्या कुंड्या -------------- -------------- ठेवल्या तर जास्त शोभून दिसतील ना?

३. बाबांना इतका मोठा सन्मान मिळालाय! त्यांचं अभिनंदन करण्यासाठी -------------- -------------- लोक येतायत. रीघच लागलीय नुसती! एकाच वेळी सगळे आले तर बरं होईल ना?

४. त्या खोल फडताळात मीनाक्षीने सगळ्या बरण्या -------------- -------------- अशा व्यवस्थित लावून ठेवल्या. पण कशात काय ठेवलंय हे लक्षात नाही राहिलं तिच्या.

५. आपण जर -------------- -------------- दिवस असं कामावर आलो तरी चालण्यासारखं आहे.

६. मला माझ्या वाढदिवसाला -------------- -------------- सुंदर भेटवस्तू मिळाल्या.

७. तिकीट काढण्यासाठी -------------- -------------- असं ओळीत उभं राहण्यापेक्षा -------------- -------------- असं ओळीत उभं राहावं असं नाही का तुम्हाला वाटत?

**७ रेडियो कार्यक्रम पाहू या व खालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

**क. योग्य पर्याय निवडू या.**



१. बुलेट कोणाकडे आहे?

क. महादेव ख. सखदेव

२. 'बुलेट काढणे आहे' या वाक्याचा संवादातील अर्थ-

क. बुलेट घराबाहेर काढणे ख. बुलेट विकणे

३. किती सालचे मॉडेल आहे?

क. १९८१ ख. १९८६

४. गाडीवर किती रुपये खर्च झाले आहेत?

क. ५०,००० ख. १५,०००

५. गाडीच्या मालकाला गाडी खरेच विकायची आहे का?

क. हो ख. नाही

चर्चा - महादेवच्या बोलण्यातील ढंगावरून तो महाराष्ट्रातील कोणत्या गावचा आहे असे वाटते?

**ख. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहू या.**

१. गाडीचे ॲव्हरेज साधारण काय आहे?

-----------------------------------------------------------------------------------

२. महादेवचा व्यवसाय कोणता असेल असे वाटते?

-----------------------------------------------------------------------------------

## ८ वाक्प्रचार आणि म्हणी

**१. 'केलेला उपदेश निष्फळ ठरणे' ह्या अर्थाची म्हण ओळखू या.**

क. आयत्या बिळावर नागोबा   ख. नाव मोठं लक्षण खोटं   ग. पालथ्या घड्यावर पाणी

**२. 'दुखणे एका ठिकाणी आणि उपाय भलतीकडेच' ह्या अर्थाची कोणती म्हण नाही ते ओळखू या.**

क. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही   ख. डोळ्यात केर अन कानात फुंकर

ग. आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी

## ९ प्रेरणा

पक्षी आकाशात उडतात, भरारी घेतात आणि विश्रांतीसाठी एखाद्या झाडावर बसतात; तितक्यात झाडाखाली खेळणारी मुलं हुर्रर्र करून त्यांना उडवतात. हा खेळ त्यांना कुणी शिकवला थोडाच आहे? मुळीच नाही. त्यांची तीच शिकली आहेत. मोठी माणसं मुलांना जसं वागवतात तशीच ती इतरांशी वागतात. पाखरांना असा त्रास देणं हे त्याचंच उदाहरण. मुलं आपली आपण वाढतातच; पण डोळसपणानं वाढवली, तर ती जास्त चांगले नागरिक होऊ शकतात हे खरंच आहे. सर्वांसमोर चार शब्दही बोलायला लाजणारी मुलं योग्य प्रेरणा मिळाली तर मोठ्यांना लाजवणारी अचाट कामेही करून दाखवतात.



उडणे



उडवणे



बसणे



बसवणे

**१. वरील उताऱ्यात काही क्रियापदांची दोन रूपे दिसत आहेत त्यांचा अभ्यास करू या आणि खालील तक्ता पूर्ण करू या.**

| उताऱ्यातील क्रियापदाचे रूप | मूळ क्रियापद | उताऱ्यातील क्रियापदाचे दुसरे रूप | मूळ क्रियापद |
|---|---|---|---|
| उडतात | उडणे | उडवतात | उडवणे |
| शिकली | शिकणे | शिकवला | शिकवणे |
| | वागणे | वागवतात | |
| वाढतात | | | |
| | लाजणे | | |

**प्रयोजक क्रियापद Causative Verbs**

मूळ धातू + वणे = प्रयोजक क्रियापद

उदा॰ उडणे : उड + वणे = उडवणे, शिकणे शिकवणे,
वागणे - वागवणे, वाढणे - वाढवणे, लाजणे - लाजवणे

**अर्थ : वाक्यातील क्रियेच्या कर्त्याकडून अन्य कोणी तरी एखादी क्रिया करवून घेतो तेव्हा...**

उदा॰ ते मूल बसते. आई त्या मुलाला बसवते.

व्याकरण

**२. पुढील वाक्यांमध्ये कंसात दिलेल्या क्रियापदांच्या जोड्यांमधील क्रियापदांची योग्य रूपे लिहू या.**

(मिळणे-मिळवणे, समजणे-समजावणे, हसणे-हसवणे, वाकणे-वाकवणे, नाचणे-नाचवणे, कळणे-कळवणे, रडणे-रडवणे, करणे-करवणे)



१. विनोद सांगून जो हसवतो, त्याला मात्र विनोद सांगताना हसता येत नाही. कारण तोच जर हसला, तर विनोदाची मजाच निघून जाते.

२. "वीणा, समीहाला मुलगा झाला, ही सुमित्राने ---------------- बातमी तुला ---------------- का?"

३. शिक्षकांनी जीव तोडून कविता ---------------- तरी राजूला ती ---------------- नाहीच. त्यामुळे शिक्षकांनी जेव्हा विचारलं, "मुलांनो, समजली का कविता?" ह्या प्रश्नाला मान कशी डोलवावी ते त्याला ----------------.

४. त्या मंत्रिमहोदयांचा दरारा इतका आहे की, ते त्यांच्या हाताखालच्या लोकांना नजरेच्या इशाऱ्यावर ---------------- आणि ते लोकही फायद्यासाठी ----------------.

५. सोसाट्याच्या वाऱ्याने झाडाची फांदी ---------------- आणि माकडांनी तिच्यावर बसून ती अजूनच ----------------.

६. खरं म्हणजे चित्रपट बघताना मी कधी ---------------- नाही; पण काल पाहिलेल्या हृदयस्पर्शी चित्रपटाने मात्र मला ----------------.

७. "ही पुस्तकं कपाटात लावण्याचं काम आजच्या आज ----------------; जर तुझ्याच्याने होणार नसेल, तर मुलांकडून ---------------- घे. आणि पुस्तकं कपाटात नीट लागली की मला दाखव."

८. विनोबांचे अनेक भाषांवर प्रभुत्व होते; ते काही त्यांना सहजपणे ---------------- नव्हते. अतिशय कष्टाने आणि व्यासंगाने त्यांनी ते ---------------- होते.

## १० 'वाटणे'

**१. खालील उतारा वाचू या आणि 'वाटणे' ह्या क्रियापदाचे कोणकोणते अर्थ दिसत आहेत ते ओळखू या.**

(**अर्थ** : दिसणे, समजणे, देणे, भावना असणे / होणे, असा समज आहे का?, विशिष्ट पद्धतीने दाब देऊन चुरा किंवा लगदा करणे)

आजी आजोबांना 'झंगड' म्हणते कारण त्यांना दगड गोळा करायचा छंद आहे. कुठे कुठे भटकून ते तऱ्हेतऱ्हेचे दगड गोळा करत असतात. "हा असा धरून बघ. तुझ्या मधुबालाचं नाक (क) वाटतं की नाही?" सिनेमातल्या कुठल्याही काळातल्या कुठल्याही नटीचे नाव मधुबालाच असते असे त्यांना (ख) वाटते. मी मान डोलावून 'हो' म्हणतो आणि विषय संपवतो.

दिवाळीमध्ये ते दगड सगळ्या मित्रांना आणि नातेवाइकांना (ग) वाटण्याचा आणि त्यावरून आजी-आजोबांच्या वार्षिक भांडणाचा कार्यक्रम होतो.

"सणासुदीचं दगड कसले (घ) वाटता हो! फुकटातला दानशूरपणा! ते लोक काही बोलत नाहीत, पण मनातून काय (च) वाटत असेल त्यांना!"

"लोक माझं कौतुक करतात! तुलाच हेवा (छ) वाटतो माझा. आणि तुझ्या कैऱ्या! त्या फुकटच्या नसतात (ज) वाटतं!"



आमच्या वाड्यात आंब्याची दोन झाडे आहेत. ती दरवर्षी न कंटाळता पोतेभर कैऱ्या देतात. आजी अख्ख्या गल्लीला त्या (झ) वाटून टाकते. हे काम अर्थात मलाच करावे लागते. पुढचे चार दिवस घरोघरच्या बायकांना कैरी घालून डाळ (ट) वाटणे, कैरीची चटणी (ठ) वाटणे, पन्हे करणे हाच उद्योग असतो.

पंचवीस बायकांच्या पाककृतींची चव चाखून मी आणि आजोबा बेजार होतो. मी लहान होतो तेव्हा ह्या सगळ्याची गंमत (ड) वाटायची. आता कटकट (ढ) वाटते. "आजी, दरवर्षी काय गं हे तुझं गावभर (ण) वाटावाटी करणं! आता मी नाही जाणार. मला लाज (त) वाटते," मी किरकिरतो.

"घेण्याची लाज (थ) वाटायला हवी, नानू, देण्याची नाही," आजी शांतपणे म्हणते, "आपल्याकडे जे आहे ते चार जणांना (द) वाटलं ना, की आपल्याला दामदुपटीनं परत मिळतं. तुझ्या आजोबांना दगड आणि मला कैऱ्या, कधी कमी पडल्या आहेत का? नाही ना?"

**शब्दार्थ :**

| | | |
|---|---|---|
| झंगड | = | चक्रम; इतरांपेक्षा वेगळेच वागणारा किंवा वेगळा विचार करणारा |
| सणासुदीचं | = | सणाच्या काळात; सणाच्या निमित्ताने |
| पन्हे | = | उकडलेल्या कैऱ्यांचे गूळ घालून केलेले थंड पेय |
| वाटावाटी | = | खूप लोकांना वाटण्याची कृती |
| दामदुपटीनं | = | गुंतवलेल्या रकमेएवढेच व्याज मिळाल्यावर होईल तेवढ्या रकमेइतके |

## ११ संभाषणकौशल्ये.

**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा॰ अवघड धडा – समजणे / समजावणे, इतके शब्द – शिकणे / शिकवणे, मार्क – वाढणे / वाढवणे, वर्गात इतके हसणे / हसवणे, वर्गात इतके रडणे / रडवणे)



पहिला विद्यार्थी : हा अवघड धडा तुला कसा समजला?

दुसरा विद्यार्थी : समजला नाही, शिक्षकांनी समजावला.

सर्व विद्यार्थी : हो, हो! शिक्षकांनी समजावला.

**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

(उदा॰ रडणे / रडवणे, हसणे / हसवणे, कांदा / चॉकलेट, काम / पगार, तिखट पदार्थ / गोड पदार्थ, आईचा राग / आईचे प्रेम, वाईट आठवण / चांगली आठवण)



पहिला विद्यार्थी : तू खूप रडलास का?

दुसरा विद्यार्थी : रडलो नाही, ह्या कांद्यानं मला रडवलं.

सर्व विद्यार्थी : काय सांगतोस? कांद्यानं रडवलं?

दुसरा विद्यार्थी : हो, हो! ह्या कांद्यानं रडवलं.


पहिला विद्यार्थी : खरंच? मग तू हसलास कसा?

दुसरा विद्यार्थी : हसलो नाही, ह्या चॉकलेटनं मला हसवलं.

सर्व विद्यार्थी : ओहो! कांद्यानं रडवलं आणि चॉकलेटनं हसवलं.

संभाषण

**चिंटू**







### पहिले मराठी पाऊल

**पहिली महिला नाट्यसंगीतकार**



आधुनिक महाराष्ट्राला आपल्या रंगभूमीचा, विशेषतः संगीत नाटकांच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरेचा, मोठाच अभिमान आहे. मात्र, सुरुवातीच्या काळात रंगमंचावर तर सोडाच, पण प्रेक्षागृहातही महिलांना प्रवेश नव्हता, हे आज खरे वाटणार नाही. अर्थात, टप्प्याटप्प्याने परिस्थिती बदलत गेली आणि नाटक बघण्यासाठी स्त्रियांना वेगळी का होईना, पण जागा मिळू लागली.

अशा काळात एका गुणवान महिलेवर मंचावरील नाही, तरी पडद्यामागील एक महत्त्वाची जबाबदारी सोपवली गेली आणि तिने त्या संधीचे अक्षरशः सोने केले. त्या कलावतीचे नाव होते सुंदराबाई जाधव (१८८५ - १९५५). त्या 'बाई सुंदराबाई' ह्या नावानेही ओळखल्या जात. गायनाचार्य भास्करबुवा बखले ह्यांच्या सांगण्यावरून एका नामवंत नाटक कंपनीने बाईंना एका नाटकासाठी संगीत दिग्दर्शन करण्याची विनंती केली. नाटकाचे लेखक होते राम गणेश गडकरी, प्रमुख भूमिकेत होते गायक नट बालगंधर्व आणि नाटकाचे नाव होते 'एकच प्याला'. नाटकाला आणि संगीताला अभूतपूर्व यश आणि लोकप्रियता मिळाली.

सुंदराबाई स्वतः शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताच्या उत्कृष्ट गायिका होत्या. हिंदी आणि उर्दू भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. निरक्षर असूनही आपल्या कलागुणांच्या बळावर त्यांनी त्या काळातील महान गायकांच्या दरबारात स्थान मिळवले होते. सुंदराबाई काळाबरोबर चालणाऱ्या

होत्याच, पण काळाची पुढची पावलेही ओळखणाऱ्या होत्या. रेडिओच्या सुरुवातीपासून त्या रेडिओसाठी गात होत्या. शिवाय, यंत्रासमोर गायला तयार नसणाऱ्या गायिकांच्या घरी जाऊन त्यांची ध्वनिमुद्रणासाठी मनधरणी करत होत्या. कामाचा दर्जा आणि आत्मसन्मान सांभाळत स्त्रियांच्या कर्तृत्वाला प्रतिष्ठा आणि मान्यता मिळवून देणाऱ्या सुंदराबाईंसारख्या कलावंतांमुळे आधुनिक मराठी समाजाची काही पावले पुढे पडली.

## दृष्टिक्षेप

### नामे

| | | |
|---|---|---|
| तो वंचित, ते - | ती वागणूक, त्या वागणुकी | ते अस्थैर्य |
| तो दुर्बल, ते - | ती अनास्था | ते नूतनीकरण |
| तो भेदभाव, ते - | ती सहृदयता | ते फडताळ, ती फडताळे / ळं |
| तो साचा, ते साचे | ती बरणी, त्या बरण्या | |
| तो पूर्वग्रह, ते - | ती रीघ | |
| तो बोजा, ते बोजे | ती दिरंगाई | |
| तो यक्षप्रश्न, ते - | ती दिलगिरी | |
| तो न्यूनगंड, ते - | ती पार्श्वभूमी | |
| तो वर्णद्वेष | ती कामगिरी, त्या कामगिऱ्या | |
| तो तिरस्कार | ती कळशी, त्या कळश्या | |
| तो तिटकारा | | |
| तो डोळसपणा | | |
| तो दरारा | | |
| तो ढंग, ते - | | |

### विशेषणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शासकीय | अशासकीय | तटस्थ | निर्वासित | विमुक्त |
| विकलांग | वडिलोपार्जित | उज्ज्वल | अस्पृश्य | निराधार |
| जबरदस्त | हृदयस्पर्शी | शोषित | बोबडा | |

### क्रियापदे

| | | | |
|---|---|---|---|
| वगळणे | शोभणे | निवारणे | उपेक्षिणे |

### क्रियाविशेषणे

| | | | |
|---|---|---|---|
| गुण्यागोविंदाने | कदाचित | बहुधा | एकंदरीत |
| हवालदिल | कार्यरत | संलग्न | दिलगीर |

### नाम व क्रियापद जोड्या Noun and Verb combination

| नाम + क्रियापद Noun + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. लाड पुरवणे | नातवंडांचे लाड पुरवायला आजी-आजोबा नेहमी तत्पर असतात. |
| २. जबाबदारी उचलणे | प्रत्येकाने आपल्याला झेपणाऱ्या एखाद्या सामाजिक कामाची जबाबदारी उचलावी. |
| ३. भूमिका बजावणे | समाजात वावरताना प्रत्येकाने चांगल्या नागरिकाची भूमिका बजावली पाहिजे. |
| ४. वागणूक देणे | समाजात कष्टाची कामे करणाऱ्यांना चांगली वागणूक दिली पाहिजे. |
| ५. आळा घालणे | आपली विचारसरणी बदलली तर भेदभावाला आळा घालता येईल. |
| ६. भेदभाव करणे | निसर्ग माणसाला जमीन, पाणी, हवा देताना भेदभाव करत नाही. |
| ७. दखल घेणे | समारंभाला चारुता आली होती, पण कुणीही तिची दखल घेतली नाही. |
| ८. गंमत वाटणे | कार्यक्रमात ज्यांनी छान नकला केल्या ते मोठे अधिकारी आहेत हे कळल्यावर मला मोठी गंमत वाटली. |
| ९. उपक्रम राबवणे | दर रविवारी आसपासच्या मुलांना घरी जमवून गोष्ट सांगण्याचा उपक्रम आम्ही राबवतो. |

### इतर शब्द व क्रियापद जोड्या Other words and Verb combinations

| इतर शब्द + क्रियापद Other words + Verb | वाक्यात उपयोग |
|---|---|
| १. निवारण करणे | जिल्हाधिकाऱ्यांनी नळ योजना मंजूर केली व पाण्याच्या समस्येचे निवारण केले. |
| २. तुच्छ लेखणे | एखाद्याला आपल्या बुद्धिमत्तेचा गर्व होतो, तेव्हा तो इतरांना तुच्छ लेखतो. |
| ३. दरी निर्माण होणे | सामाजिक विषमता, वर्णद्वेष, जातिभेद ही समाजातील वेगवेगळ्या समूहांमध्ये दरी निर्माण होण्याची कारणे आहेत. |
| ४. कार्यरत असणे | नोकरीतून निवृत्त झाल्यानंतरही जोशी कार्यरत आहेत म्हणून त्यांची तब्येत उत्तम राहिली आहे. |
| ५. ताठ मानेने जगणे | पूर्वी कर्ज न घेता जगणे हा ताठ मानेने जगण्याचा निकष होता. |
| ६. बेजार होणे | उन्हाळ्यामध्ये डास चावल्यामुळे सगळे बेजार होतात. |

आता मला हे येतं...

**सामाजिक समस्या समजणे, वंचितांचे प्रश्न समजणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शासकीय व स्वयंसेवी संस्थांबद्दल माहिती समजणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सामाजिक मूल्ये : हे केले पाहिजे किंवा ते करता कामा नये**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**बहुधा, बहुतेक, कदाचित, खात्रीने इ.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शब्दयोगी पदे : विषयी, संबंधी, बद्दल**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**संख्याविशेषणे : फार, पुष्कळ, थोडा, किंचित, निम्मा, दुप्पट, दुपदरी, चौपट इ. समजणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**एकामागोमाग एक, एकाआड एक, एकापाठोपाठ एक इ.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रयोजक क्रियापदे : सोडणे - सोडवणे, वाढणे - वाढवणे इ.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**एकाच क्रियापदाचे अनेक अर्थ : उदा. वाटणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# व्याकरण आराखडा

## क्रियापदे

१ धातुसाधिते व कृदन्ते
२ धातुसाधित विशेषणे
३ बदलले आहे / बदललेले आहे
४ शक्य क्रियापदे
५ क्रियापदाचे आज्ञार्थी रूप
६ क्रियापद-नामाची षष्ठी
७ प्रयोजक क्रियापदे
८ काळ

## नामे

९ भाववाचक नामे
१० क्रियापदांचा नामांसारखा वापर
११ धातुसाधित नामे
१२ समूहवाचक नामे
१३ निश्चय, योजना, संकल्प

## विशेषणे

१४ दोघी – दोन्ही, दोघे – दोन्ही, दोघं – दोन्ही
१५ पुरेसा
१६ छोटासा, लहानसा... शब्दयोगी पदे - कडून वरून खालून मधून
१७ जेवढे - तेवढे / जितके - तितके / एवढे - इतके
१८ संख्याविशेषणे
१९ असा, असला, तसा, तसला, जसा, कसा, कसला

## अव्यये

२० स्थलवाचक क्रियाविशेषणे
२१ स्थलवाचक क्रियाविशेषणे आणि त्यांची साधित रूपे
२२ कालवाचक क्रियाविशेषणे
२३ अलीकडे... पलीकडे...
२४ समक्ष, विरुद्ध
२५ घरोघरी, वेळोवेळी ...
२६ स्थलवाचक शब्दयोगी पदे
२७ कालवाचक शब्दयोगी पदे
२८ व्यतिरेकवाचक शब्दयोगी पदे
२९ साठी, करता / करिता – हेतुवाचक शब्दयोगी पदे
३० ऐवजी, पैकी
३१ -समक्ष, -सह, -विरुद्ध, -उलट
३२ बद्दल, संबंधी, विषयी
३३ पुरता
३४ विशेषणांचा / क्रियाविशेषणांचा शब्दयोगी पदांसारखा वापर
३५ केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये
३६ च, ही, मात्र ...
३७ कदाचित, बहुधा, एकंदरीत ...

## विभक्तिप्रत्यय

३८ '-ऊन'चा वापर
३९ क्रियापद + -ऊन
४० 'चा', 'ची', 'चे', 'च्या'
४१ संबोधन करताना
४२ विभक्तिप्रत्यय

## क्रियापदे (Verbs)

### १ (पाठ २) धातुसाधिते किंवा कृदन्ते (Participles)

धातूला 'णे, ताना, ऊन, त,' असे विविध प्रत्यय लागून तयार होणाऱ्या शब्दांना **धातुसाधिते** किंवा **कृदन्ते** असे म्हणतात.

| प्रकार | उदाहरण | धातू | प्रत्यय | कार्य |
|---|---|---|---|---|
| -णे कृदन्त | त्याचे बोलणे मला फार आवडते. | बोल | णे | नाम |
| -त कृदन्त | तो खात खात एकीकडे भाजी बनवतो. | खा | त | क्रियाविशेषण |
| -ता कृदन्त | येता येता तिने फळे विकत घेतली. | ये | ता | क्रियाविशेषण |
| | तो पहाटे पाच वाजता उठतो | वाज | ता | क्रियाविशेषण |
| | गाता गळा आहे, थंड पिऊ नकोस. | गा | ता | विशेषण (विकारी) |
| -ताना कृदन्त | कामाला येताना तो डबा आणतो. | येत | ताना | क्रियाविशेषण |
| -ऊ कृदन्त | अमनला खाऊ आवडला. | खा | ऊ | नाम |
| -ऊन कृदन्त | वर्तमानपत्र वाचून झालं. | वाच | ऊन | क्रियाविशेषण |

### २ (पाठ २) धातुसाधित विशेषणे (Participial Adjectives)

उदा॰ गाणारी मुलगी गायलेले गाणे

धातू + ता प्रत्यय = वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषण — उदा॰ उगव + ता = उगवता सूर्य

धातू + णारा प्रत्यय = भविष्यकालवाचक धातुसाधित विशेषण — उदा॰ खा + णारा = खाणारी मुलगी

धातू + लेला प्रत्यय = भूतकालवाचक धातुसाधित विशेषण — उदा॰ वाच + लेला = वाचलेले पुस्तक

पण

कर (के) + लेला = केलेले काम

**टीप :**

कधी कधी धातूला केवळ '-ला / -ली / -ले / -ल्या' हे प्रत्यय लावूनही भूतकालवाचक धातुसाधित विशेषण तयार होते.

उदा॰ झाक + ली = झाकली मूठ, गेल्या वर्षी, दिल्या घरी इ॰

## ३ (पाठ २) बदलले आहे / बदललेले आहे, चालवली आहे / चालवलेली आहे ...

**क्रियापदाचे रूप बदलते, अर्थ नाही**

मी ज्या कार्यक्षेत्रात काम करते ते आधी पुरुषप्रधान होते. पण आज जग बदलले आहे.

उदा॰ मी ज्या कार्यक्षेत्रात काम करते ते आधी पुरुषप्रधान होते. पण आज जग बदललेले आहे.

## ४ (पाठ ७) शक्य क्रियापदे (Potential Verbs)

- कर्त्याला एखादी क्रिया करणे शक्य आहे किंवा नाही, त्याच्यात ते सामर्थ्य आहे किंवा नाही हे दाखवणारी क्रियापदे.

उदा॰ तिला आता चालवते.

* मूळ धातू + व + प्रत्यय :

उदा॰ चाल + व + त = चालवते (होकारार्थी), चालवत नाही (नकारार्थी)
(ह्याचप्रमाणे कर, चाल, निज, हस इ॰)

एकाक्षरी धातू + वव + प्रत्यय :

उदा॰ खा + वव + त = खाववते (होकारार्थी), खाववत नाही (नकारार्थी)
(ह्याचप्रमाणे पी, दे, घे, ये, ने इ॰)

**सकर्मक 'शक्य क्रियापदे' - कर्माप्रमाणे**

उदा॰ खाणे, पिणे

| पु॰ | स्त्री॰ | नपुं॰ |
|---|---|---|
| पेरू खाववत नाही. | पिस्ता बर्फी खाववत नाही. | दूध पिववत नाही. |
| | पण | |
| आंबा खाववतो. | आंबा बर्फी खाववते. | ताक पिववते / पिववतं |

**अकर्मक 'शक्य क्रियापदे' - नपुंसकलिंगी**

उदा० चालणे : दीर्घ आजारानंतर मला आता चालवते / चालवतं, पण पळवत नाही.

| | | |
|---|---|---|
| मी | मला, माझ्याने, माझ्याच्याने | आता चालवत नाही. / आता चालवते. |
| तू | तुला, तुझ्याने, तुझ्याच्याने | आता पायऱ्या चढवत नाहीत. / आता पायऱ्या चढवतात. |
| तुम्ही / आपण | तुम्हाला, तुमच्याने, तुमच्याच्याने / आपल्याला, आपल्याने, आपल्याच्याने | |
| तो | त्याला, त्याच्याने, त्याच्याच्याने | |
| ती | तिला, तिच्याने, तिच्याच्याने | |
| ते | त्याला, त्याच्याने, त्याच्याच्याने | |
| आम्ही | आम्हाला, आमच्याने, आमच्याच्याने | |
| ते (अ०व०) | | |
| | त्यांना, त्यांच्यानी, त्यांच्याच्यानी | |
| त्या (अ.०व०) | | |
| ती (अ०व०) | | |

**टीप :**

शक्य क्रियापदांचा प्रयोग सामान्यत: नकारार्थी वाक्यांत होतो.

### ५ (पाठ ८) क्रियापदाचे आज्ञार्थी रूप (Imperative)

उदा०

| सर्वनामे (द्वि० पु०) | होकारार्थी | नकारार्थी |
|---|---|---|
| तू | शांत बस. | दंगा करू नकोस. |
| तुम्ही, आपण | शांत बसा. | दंगा करू नका. |

## ६ (पाठ ९) क्रियापद-नामाचे षष्ठीचे रूप (Genetive forms of Verbal Nouns)

उदा. चालणे - कंटाळा : चालण्याचा कंटाळा

बोलणे - सवय : बोलण्याची सवय

सांगणे - तात्पर्य : सांगण्याचे तात्पर्य

**क्रियापद-नामाचे सामान्यरूप + चा / ची / चे / च्या**

| क्रियापद | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी | अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| **फिरणे** | फिरण्याचा प्रांत | फिरण्याची जागा | फिरण्याचे शहर | फिरण्याचे प्रांत<br>फिरण्याच्या जागा<br>फिरण्याची शहरे |
| **करणे** | करण्याचा सोस | करण्याची आवड | करण्याचे यंत्र | करण्याचे सोस<br>करण्याच्या आवडी<br>करण्याची यंत्रे |
| **बनवणे** | बनवण्याचा व्याप | बनवण्याची पद्धत | बनवण्याचे तंत्र | बनवण्याचे व्याप<br>बनवण्याच्या पद्धती<br>बनवण्याची तंत्रे |

## ७ (पाठ १०) प्रयोजक क्रियापदे (Causative Verbs)

उदा. उडणे – उड + व + णे = उडवणे

शिकणे – शिकवणे

वागणे – वागवणे

वाढणे – वाढवणे

**मूळ धातू + व + णे = प्रयोजक क्रियापद**

- **अर्थ :** वाक्यातील क्रियेचा कर्ता, ती क्रिया स्वतः करत नसून, ती क्रिया तो दुसऱ्या कोणाला तरी करायला लावतो.

उदा. ते मूल बसते. आई त्या मुलाला बसवते.

## ८ काळ (Tenses)

| सामान्य (Simple Tense) | वर्तमानकाळ (Present) | भूतकाळ (Past) | भविष्यकाळ (Future) |
|---|---|---|---|
| मराठी | मी बसतो / बसते | मी बसलो / बसले | मी बसेन |
| इंग्रजी | I sit | I sat | I will sit |
| हिंदी | मैं बैठता / बैठती हूँ | मैं बैठता था / बैठती थी | मैं बैठूँगा / बैठूँगी |
| | | | |
| **अपूर्ण (Continuous Tense)** | **वर्तमानकाळ (Present)** | **भूतकाळ (Past)** | **भविष्यकाळ (Future)** |
| मराठी | मी बसत आहे | मी बसत होतो / होते | मी बसत असेन |
| इंग्रजी | I am sitting | I was sitting | I will be sitting |
| हिंदी | मैं बैठ रहा / रही हूँ | मैं बैठ रहा था / रही थी | मैं बैठ रहा होऊँगा / रही होऊँगी |
| | | | |
| **पूर्ण (Perfect Tense)** | **वर्तमानकाळ (Present)** | **भूतकाळ (Past)** | **भविष्यकाळ (Future)** |
| मराठी | मी बसलो / बसले आहे | मी बसलो होतो / बसले होते | मी बसलो /बस ले असेन |
| इंग्रजी | I have sat | I had sat | I would have sat |
| हिंदी | मैं बैठा / बैठी हूँ | मैं बैठा था / बैठी थी | मैं बैठ चुका होऊँगा / चुकी होऊँगी |
| | | | |
| **रीती काळ (Habitual Tense)** | **वर्तमानकाळ (Present)** | **भूतकाळ (Past)** | **भविष्यकाळ (Future)** |
| मराठी | मी बसत असतो / असते | बसत असे / असायचो / असायचे / बसायचो / बसायचे | बसत राहीन / जाईन |
| इंग्रजी | I sit (usually) | I used to sit | I will keep sitting |
| हिंदी | मैं बैठा करता / करती हूँ | मैं बैठा करता था / करती थी | मैं बैठता रहूँगा / बैठती रहूँगी<br>मैं बैठा रहूँगा / बैठी रहूँगी |

### सर्व काळांतील रूपे : प्रथम पुरुष एकवचन

### All Tenses : First Person Singular

| काळ<br>Tense | वर्तमानकाळ<br>(Present) | भूतकाळ<br>(Past) | भविष्यकाळ<br>(Future) |
|---|---|---|---|
| सामान्य<br>Simple | मी बसतो / बसते | मी बसलो / बसले | मी बसेन |
| अपूर्ण<br>Continuous | मी बसत आहे | मी बसत होतो / होते | मी बसत असेन |
| पूर्ण<br>Perfect | मी बसलो / बसले आहे | मी बसलो होतो / बसले होते | मी बसलो / बसले असेन |
| रीती काळ<br>Habitual | मी बसत असतो / असते | बसत असे/ असायचो / असायचे / बसायचो / बसायचे | बसत राहीन / जाईन |

### सर्व काळांतील सर्वपुरुषी व सर्ववचनी रूपे

### All tenses, persons and numbers

सामान्य / साधा काळ – होकारार्थी		**Simple Tense – Affirmative**

| एकवचन | | | | अनेकवचन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ | सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
| मी | बसतो / बसते | बसलो / बसले | बसेन | आम्ही / आपण | बसतो | बसलो | बसू |
| तू | बसतोस बसतेस | बसलास बसलीस | बसशील | तुम्ही / आपण | बसता | बसलात | बसाल |
| तुम्ही / आपण | बसता | बसलात | बसाल | तुम्ही / आपण | | | |
| तो | बसतो | बसला | बसेल | ते | बसतात | बसले | बसतील |
| ती | बसते | बसली | | त्या | | बसल्या | |
| ते | बसते / बसतं | बसले / बसलं | | ती | | बसली | |

### सामान्य / साधा काळ – नकारार्थी  Simple Tense – Negative

| एकवचन | | | | अनेकवचन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ | सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
| मी | बसत नाही | बसलो / बसले नाही | बसणार नाही | आम्ही/ आपण | बसत नाही | बसलो नाही | बसणार नाही |
| तू | बसत नाहीस | बसला / बसली नाहीस | बसणार नाहीस | तुम्ही / आपण | बसत नाही | बसला नाहीत | बसणार नाही |
| तुम्ही / आपण | बसत नाही | बसला नाहीत | बसणार नाही | तुम्ही / आपण | | | |
| तो | | बसला नाही | | ते | | बसले नाहीत | |
| ती | बसत नाही | बसली नाही | बसणार नाही | त्या | बसत नाहीत | बसल्या नाहीत | बसणार नाहीत |
| ते | | बसले / बसलं नाही | | ती | | बसली नाहीत | |

### अपूर्ण काळ – होकारार्थी  Continuous Tense – Affirmative

| एकवचन | | | | अनेकवचन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ | सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
| मी | बसत आहे | बसत होतो / होते | बसत असेन | आम्ही / आपण | बसत आहोत | बसत होतो | बसत असू |
| तू | बसत आहेस | बसत होतास / होतीस | बसत असशील | तुम्ही / आपण | बसत आहात | बसत होता | बसत असाल |
| तुम्ही / आपण | बसत आहात | बसत होता | बसत असाल | तुम्ही / आपण | | | |
| तो | | बसत होता | | ते | | बसत होते | |
| ती | बसत आहे | बसत होती | बसत असेल | त्या | बसत आहेत | बसत होत्या | बसत असतील |
| ते | | बसत होते / होतं | | ती | | बसत होती | |

## अपूर्ण काळ – नकारार्थी Continuous Tense – Negative

| एकवचन | | | | अनेकवचन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ | सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
| मी | बसत नाही आहे | बसत नव्हतो / नव्हते | बसत नसेन | आम्ही / आपण | बसत नाही आहोत | बसत नव्हतो | बसत नसू |
| तू | बसत नाही आहेस | बसत नव्हतास / नव्हतीस | बसत नसशील | तुम्ही / आपण | बसत नाही आहात | बसत नव्हता | बसत नसाल |
| तुम्ही / आपण | बसत नाही आहात | बसत नव्हता | बसत नसाल | तुम्ही / आपण | | | |
| तो | बसत नाही आहे | बसत नव्हता | बसत नसेल | ते | बसत नाही आहेत | बसत नव्हते | बसत नसतील |
| ती | | बसत नव्हती | | त्या | | बसत नव्हत्या | |
| ते | | बसत नव्हते / नव्हतं | | ती | | बसत नव्हती | |

## पूर्ण काळ – होकारार्थी Perfect Tense – Affirmative

| एकवचन | | | | अनेकवचन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ | सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
| मी | बसलो / बसले आहे | बसलो होतो / बसले होते | बसलो / बसले असेन | आम्ही / आपण | बसलो आहोत | बसलो होतो | बसलो असू |
| तू | बसला / बसली आहेस | बसला होतास / बसली होतीस | बसला / बसली असशील | तुम्ही / आपण | बसला आहात | बसला होता | बसला असाल |
| तुम्ही / आपण | बसला आहात | बसला होता | बसला असाल | तुम्ही / आपण | | | |
| तो | बसला आहे | बसला होता | बसला असेल | ते | बसले आहेत | बसले होते | बसले असतील |
| ती | बसली आहे | बसली होती | बसली असेल | त्या | बसल्या आहेत | बसल्या होत्या | बसल्या असतील |
| ते | बसले / बसलं आहे | बसले होते / बसलं / होतं | बसले / बसलं असेल | ती | बसली आहेत | बसली होती | बसली असतील |

**पूर्ण काळ – नकारार्थी** **Perfect Tense – Negative**

<table>
<tr><th colspan="4">एकवचन</th><th colspan="4">अनेकवचन</th></tr>
<tr><th>सर्वनामे</th><th>वर्तमानकाळ</th><th>भूतकाळ</th><th>भविष्यकाळ</th><th>सर्वनामे</th><th>वर्तमानकाळ</th><th>भूतकाळ</th><th>भविष्यकाळ</th></tr>
<tr><td>मी</td><td>बसलो / बसले नाही आहे</td><td>बसलो नव्हतो / बसले नव्हते</td><td>बसलो / बसले नसेन</td><td>आम्ही / आपण</td><td>बसलो नाही आहोत</td><td>बसलो नव्हतो</td><td>बसलो नसू</td></tr>
<tr><td>तू</td><td>बसला / बसली नाही आहेस</td><td>बसला नव्हतास / बसली नव्हतीस</td><td>बसला / बसली नसशील</td><td>तुम्ही / आपण</td><td rowspan="2">बसला नाही आहात</td><td rowspan="2">बसला नव्हता</td><td rowspan="2">बसला नसाल</td></tr>
<tr><td>तुम्ही / आपण</td><td>बसला नाही आहात</td><td>बसला नव्हता</td><td>बसला नसाल</td><td>तुम्ही / आपण</td></tr>
<tr><td>तो</td><td>बसला नाही आहे</td><td>बसला नव्हतो</td><td>बसला नसेल</td><td>ते</td><td>बसले नाही आहेत</td><td>बसले नव्हते</td><td>बसले नसतील</td></tr>
<tr><td>ती</td><td>बसली नाही आहे</td><td>बसली नव्हतो</td><td>बसली नसेल</td><td>त्या</td><td>बसल्या नाही आहेत</td><td>बसल्या नव्हत्या</td><td>बसल्या नसतील</td></tr>
<tr><td>ते</td><td>बसले / बसलं नाही आहे</td><td>बसले नव्हते / बसलं / नव्हतं</td><td>बसले / बसलं नसेल</td><td>ती</td><td>बसली नाही आहेत</td><td>बसली नव्हती</td><td>बसली नसतील</td></tr>
</table>

## (पाठ ८) रीती काळ – होकारार्थी Habitual Tense – Affirmative

| एकवचन | | | | अनेकवचन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ | सर्वनामे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
| मी | बसत असतो / असते | बसत असे / असायचो / असायचे / बसायचो / बसायचे | बसत जाईन / बसत राहीन | आम्ही / आपण | बसत असतो | बसत असू / असायचो / बसायचो | बसत जाऊ / बसत राहू |
| तू | बसत असतोस / असतेस | बसत असस / असायचास / असायचीस बसायचास / बसायचीस | बसत जाशील / राहशील | तुम्ही / आपण | बसत असता | बसत असा / असायचा(त) / असायच्या(त) बसायचा(त) / बसायच्या(त) | बसत जाल / बसत राहाल |
| तुम्ही / आपण | बसत असता | बसत असा / असायचा(त) / असायच्या(त) बसायचा(त) / बसायच्या(त) | बसत जाल / बसत राहाल | तुम्ही / आपण | | | |
| तो | बसत असतो | बसत असे / असायचा / बसायचा | बसत जाईल / बसत राहील | ते | बसत असतात | बसत असत / असायचे / बसायचे | बसत जातील / बसत राहतील |
| ती | बसत असते | बसत असे / असायची / बसायची | | त्या | | बसत असत / असायच्या / बसायच्या | |
| ते | बसत असते / असतं | बसत असे / असायचे / असायचं / बसायचे / बसायचं | | ती | | बसत असत / असायची / बसायची | |

**रीती काळ – नकारार्थी** **Habitual Tense – Negative**

| एकवचन | | | | अनेकवचन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **सर्वनामे** | **वर्तमानकाळ** | **भूतकाळ** | **भविष्यकाळ** | **सर्वनामे** | **वर्तमानकाळ** | **भूतकाळ** | **भविष्यकाळ** |
| **मी** | बसत नसतो / नसते | बसत नसे / नसायचो / नसायचे / बसायचो / बसायचे नाही | बसत जाणार नाही / बसत राहणार नाही | **आम्ही / आपण** | बसत नसतो | बसत नसू / नसायचो / बसायचो नाही | बसत जाणार नाही / बसत राहणार नाही |
| **तू** | बसत नसतोस / नसतेस | बसत नसस / नसायचास / नसायचीस बसायचा / बसायची नाहीस | बसत जाणार नाहीस / बसत राहणार नाहीस | **तुम्ही / आपण** | बसत नसता | बसत नसायचा(त) / नसायच्या(त) / बसायचा बसायच्या नाही(त) | बसत जाणार नाही / बसत राहणार नाही |
| **तुम्ही / आपण** | बसत नसता | बसत नसायचा(त) / नसायच्या(त) / बसायचा बसायच्या नाही(त) | बसत जाणार नाही / बसत राहणार नाही | **तुम्ही / आपण** | | | |
| **तो** | बसत नसतो | बसत नसे / नसायचा / बसायचा नाही | बसत जाणार नाही / बसत राहणार नाही | **ते** | बसत नसतात | बसत नसत / नसायचे / बसायचे नाही(त) | बसत जाणार नाहीत / बसत राहणार नाहीत |
| **ती** | बसत नसते | बसत नसे / नसायची / बसायची नाही | | **त्या** | | बसत नसत / नसायच्या / बसायच्या नाही(त) | |
| **ते** | बसत नसते / नसतं | बसत नसे / नसायचे / नसायचं / बसायचे / बसायचं नाही | | **ती** | | बसत नसत / नसायची / बसायची नाही(त) | |

## पूर्ण वर्तमानकाळ, पूर्ण भूतकाळ, पूर्ण भविष्यकाळ

**पूर्ण काळात सकर्मक क्रियापद कर्माप्रमाणे चालवले जाते.**

### पूर्ण वर्तमानकाळ – होकारार्थी Present Perfect – Affirmative

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण<br>तुम्ही / आपण | ए॰व॰<br>अ॰व॰ | धडा वाचला आहे<br>धडे वाचले आहेत | कादंबरी वाचली आहे<br>कादंबऱ्या वाचल्या आहेत | पुस्तक वाचले / वाचलं आहे<br>पुस्तके / पुस्तकं वाचली आहेत |
| तू | ए॰व॰<br>अ॰व॰ | धडा वाचला आहेस<br>धडे वाचले आहेस | कादंबरी वाचली आहेस<br>कादंबऱ्या वाचल्या आहेस | पुस्तक वाचले / वाचलं आहेस<br>पुस्तके / पुस्तकं वाचली आहेस |
| त्याने / त्यांनी,<br>तिने / त्यांनी,<br>त्याने / त्यांनी | ए॰व॰<br>अ॰व॰ | धडा वाचला आहे<br>धडे वाचले आहेत | कादंबरी वाचली आहे<br>कादंबऱ्या वाचल्या आहेत | पुस्तक वाचले / वाचलं आहे<br>पुस्तके / पुस्तकं वाचली आहेत |

### पूर्ण वर्तमानकाळ – नकारार्थी Present Perfect – Negative

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण<br>तुम्ही / आपण | ए॰व॰<br>अ॰व॰ | धडा वाचला नाही आहे<br>धडे वाचले नाही आहेत | कादंबरी वाचली नाही आहे<br>कादंबऱ्या वाचल्या नाही आहेत | पुस्तक वाचले / वाचलं नाही आहे<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नाही आहेत |
| तू | ए॰व॰<br>अ॰व॰ | धडा वाचला नाही आहेस<br>धडे वाचले नाही आहेस | कादंबरी वाचली नाही आहेस<br>कादंबऱ्या वाचल्या नाही आहेस | पुस्तक वाचले / वाचलं नाही आहेस<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नाही आहेस |
| त्याने / त्यांनी,<br>तिने / त्यांनी,<br>त्याने / त्यांनी | ए॰व॰<br>अ॰व॰ | धडा वाचला नाही आहे<br>धडे वाचले नाही आहेत | कादंबरी वाचली नाही आहे<br>कादंबऱ्या वाचल्या नाही आहेत | पुस्तक वाचले / वाचलं नाही आहे<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नाही आहेत |

**पूर्ण भूतकाळ – होकारार्थी** **Past Perfect – Affirmative**

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण<br>तुम्ही / आपण | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला होता<br>धडे वाचले होते | कादंबरी वाचली होती<br>कादंबऱ्या वाचल्या होत्या | पुस्तक वाचले होते / वाचलं होतं<br>पुस्तके / पुस्तकं वाचली होती |
| तू | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला होतास<br>धडे वाचले होतेस | कादंबरी वाचली होतीस<br>कादंबऱ्या वाचल्या होत्यास | पुस्तक वाचले होतेस / वाचलं होतंस<br>पुस्तके / पुस्तकं वाचली होतीस |
| त्याने / त्यांनी,<br>तिने / त्यांनी,<br>त्याने / त्यांनी | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला होता<br>धडे वाचले होते | कादंबरी वाचली होती<br>कादंबऱ्या वाचल्या होत्या | पुस्तक वाचले होते / वाचलं होतं<br>पुस्तके / पुस्तकं वाचली होती |

**पूर्ण भूतकाळ – नकारार्थी** **Past Perfect – Negative**

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण<br>तुम्ही / आपण | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला नव्हता<br>धडे वाचले नव्हते | कादंबरी वाचली नव्हती<br>कादंबऱ्या वाचल्या नव्हत्या | पुस्तक वाचले नव्हते / वाचलं नव्हतं<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नव्हती |
| तू | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला नव्हतास<br>धडे वाचले नव्हतेस | कादंबरी वाचली नव्हतीस<br>कादंबऱ्या वाचल्या नव्हत्यास | पुस्तक वाचले नव्हतेस / वाचलं नव्हतंस<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नव्हतीस |
| त्याने / त्यांनी,<br>तिने / त्यांनी,<br>त्याने / त्यांनी | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला नव्हता<br>धडे वाचले नव्हते | कादंबरी वाचली नव्हती<br>कादंबऱ्या वाचल्या नव्हत्या | पुस्तक वाचले नव्हते / वाचलं नव्हतं<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नव्हती |

**पूर्ण भविष्यकाळ – होकारार्थी** **Future Perfect – Affirmative**

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण<br>तुम्ही / आपण | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला असेल<br>धडे वाचले असतील | कादंबरी वाचली असेल<br>कादंबऱ्या वाचल्या असतील | पुस्तक वाचले / वाचलं असेल<br>पुस्तके / पुस्तकं वाचली असतील |
| तू | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला असशील<br>धडे वाचले असशील | कादंबरी वाचली असशील<br>कादंबऱ्या वाचल्या असशील | पुस्तक वाचले / वाचलं असशील<br>पुस्तके / पुस्तकं वाचली असशील |
| त्याने / त्यांनी,<br>तिने / त्यांनी,<br>त्याने / त्यांनी | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला असेल<br>धडे वाचले असतील | कादंबरी वाचली असेल<br>कादंबऱ्या वाचल्या असतील | पुस्तक वाचले / वाचलं असेल<br>पुस्तके / पुस्तकं वाचली असतील |

**पूर्ण भविष्यकाळ – नकारार्थी** **Future Perfect – Negative**

| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुसकलिंगी |
|---|---|---|---|---|
| मी, आम्ही / आपण<br>तुम्ही / आपण | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला नसेल<br>धडे वाचले नसतील | कादंबरी वाचली नसेल<br>कादंबऱ्या वाचल्या नसतील | पुस्तक वाचले / वाचलं नसेल<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नसतील |
| तू | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला नसशील<br>धडे वाचले नसशील | कादंबरी वाचली नसशील<br>कादंबऱ्या वाचल्या नसशील | पुस्तक वाचले / वाचलं नसशील<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नसशील |
| त्याने / त्यांनी,<br>तिने / त्यांनी,<br>त्याने / त्यांनी | ए.व.<br>अ.व. | धडा वाचला नसेल<br>धडे वाचले नसतील | कादंबरी वाचली नसेल<br>कादंबऱ्या वाचल्या नसतील | पुस्तक वाचले / वाचलं नसेल<br>पुस्तके / पुस्तकं वाचली नसतील |

## नामे (Nouns)

### ९ (पाठ १) भाववाचक नामे (Abstract Nouns)

| भाववाचक नामे अशी तयार होतात : | उदाहरण मूळ शब्द + प्रत्यय | तयार रूप |
|---|---|---|
| १. नामापासून | गुलाम + गिरी = | गुलामगिरी |
| २. क्रियापदापासून | (धुणे) मूळ धातू 'धू' + आई = | धुलाई |
| ३. विशेषणापासून | सुंदर + य = | सौंदर्य |

## १० (पाठ ८) क्रियापदांचा नामांसारखा वापर (Gerund)

उदा。 त्याचे वागणे विचित्र वाटले का तुला?
स्वयंपाक करणे ही एक कला आहे.

- ही नामे नेहमी नपुंसकलिंगी असतात.

## ११ (पाठ ८) धातुसाधित नामे (Verbal Nouns)

उदा。 सोनाराकडे दागिने घडवले, त्याची मजुरी दिली.
सोनाराला दागिन्यांची घडणावळ दिली.
ते एकमेकांशी खूप भांडले.
त्यांचं खूप भांडण झालं.

| मूळ क्रियापद Infinitive | क्रियापदाचा नामासारखा वापर Gerund | धातूपासून तयार झालेले नाम Verbal Noun |
|---|---|---|
| घडणे | ते घडणे / घडणं | ती घडणावळ, त्या घडणावळी |
| भांडणे | ते भांडणे / भांडणं | ते भांडण, ती भांडणे |
| खेळणे | ते खेळणे / खेळणं | तो खेळ, ते खेळ<br>तो / ती खेळाडू, ते / त्या खेळाडू |
| वागणे | ते वागणे / वागणं | ती वागणूक, त्या वागणुकी |
| लिहिणे | ते लिहिणे / लिहिणं | ते लिखाण<br>ते लेखन<br>तो लेख, ते लेख |

- धातूंपासून स्त्रीलिंगी नामे :

उदा。 चिडणे - ती चिडचिड, धडधडणे - ती धडधड, बडबडणे - ती बडबड, मळमळणे - ती मळमळ, हुरहुरणे - ती हुरहुर, वळवळणे - ती वळवळ

## १२ (पाठ ८) समूहवाचक नामे (Collective Nouns)

उदा。 किल्ल्यांचा जुडगा, पुस्तकांची चळत / थप्पी / पुस्तकांचा ढीग, फुलांचा गुच्छ, पक्ष्यांचा थवा, लाकडाची मोळी इ。

## १३ (पाठ ९) निश्चय, योजना, संकल्प (useful phrases)

**निश्चय** : मी निश्चय केला आहे / मी ठरवलं आहे / मी निर्धार केला आहे.
**योजना** : मी अशी योजना आखली आहे.
**संकल्प** : मी असा संकल्प सोडला / केला आहे.

## विशेषणे (Adjectives)

### १४ (पाठ ४) दोघी - दोन्ही, दोघे - दोन्ही, दोघं - दोन्ही (both and both of)

| | | | |
|---|---|---|---|
| **दोन** | ते दोघे सिनेमाला गेले. | त्या दोघी सिनेमाला गेल्या. | ती दोघे / दोघं एकत्र खेळत होती. |
| | | **पण** | |
| **दोन** | ते दोन्ही मुलगे हुशार होते. | त्या दोन्ही मुली हुशार होत्या. | ती दोन्ही बाळे शांत होती. |

### १५ (पाठ ४) पुरेसा (adequate, enough, satisfactory, sufficient)

उदा॰ पुरेशी चर्चा झाली असेल तर काही तरी निर्णय घेऊ या.

लक्षात ठेवा :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (तो) पैसा | (ती) चर्चा | (ते) शिक्षण | (ते) कपडे | (त्या) भाज्या | (ती) पुस्तके |
| पुरेसा | पुरेशी | पुरेसे | पुरेसे | पुरेशा | पुरेशी |

### १६ (पाठ ५) छोटासा, लहानसा...

उदा॰ लहानसा ससा, छानशी बाहुली

- लहानसा, छानसा असे शब्द वापरले की, ज्या वस्तुमात्रांसाठी ही विशेषणे वापरली आहेत, त्यांच्याबद्दल जास्त आपलेपणा व्यक्त होतो आणि भाषेचा गोडवा वाढतो.

विकारी विशेषणे – पुढीलप्रमाणे बदल होतो

| **विशेषण** | **पुल्लिंग** | | **स्त्रीलिंग** | | **नपुंसकलिंग** | |
|---|---|---|---|---|---|---|
| उदा॰ छोटा | ए॰व॰ : | छोटासा | ए॰व॰ : | छोटीशी | ए॰व॰ : | छोटेसे / छोटंसं |
| | अ॰व॰ : | छोटेसे | अ॰व॰: | छोट्याशा | अ॰व॰ : | छोटीशी |
| | सा॰रू॰ : | छोट्याशा | सा॰रू॰ : | छोट्याशा | सा॰रू॰ : | छोट्याशा |

### १७ (पाठ ९) जेवढे – तेवढे / जितके – तितके / एवढे – इतके (Correlative Adjectives)

| | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** | **नपुंसकलिंग** |
|---|---|---|---|
| **एकवचन** | जेवढा – तेवढा<br>जितका – तितका<br>एवढा – इतका | जेवढी – तेवढी<br>जितकी – तितकी<br>एवढी – इतकी | जेवढे /जेवढं – तेवढे /तेवढं<br>जितके / जितकं – तितके /तितकं<br>एवढे / एवढं – इतके / इतकं |
| **अनेकवचन** | जेवढे – तेवढे<br>जितके – तितके<br>एवढे – इतके | जेवढ्या – तेवढ्या<br>जितक्या – तितक्या<br>एवढ्या – इतक्या | जेवढी – तेवढी<br>जितकी – तितकी<br>एवढी – इतकी |

**जेवढे, तेवढे, एवढे... ही विशेषणे जेव्हढे, तेव्हढे, एव्हढे अशीही लिहिली जातात.**

- **दोन्ही प्रकारच्या विशेषणांचा अर्थ सारखाच असल्यामुळे कोणतीही जोडी वापरता येते.**

उदा. गेल्या वर्षी जेवढा / जितका पाऊस झाला, तेवढा / तितका पाऊस यंदाही होईल असे वाटत नाही.

- **दोन्ही विशेषणे एकाच नामाकरता किंवा विशेषणाकरता असतील, तर दुसऱ्या वेळी नाम किंवा विशेषण पुन्हा नाही वापरले तरी चालते.**

उदा. आमच्या सोसायटीत जितकी लहान मुले आहेत तितकी तुमच्या सोसायटीत नाहीत.
"जेवढी तू हुशार आहेस तेवढी मी नाही, हे मला आता नीट कळलंय."

- **एकाच वाक्यात दोन वेगळी नामे असली, तर विशेषणाचे लिंग-वचनही त्याप्रमाणे बदलते.**

उदा. ह्या लॅपटॉपची जेवढी किंमत आहे, तेवढा माझा वर्षभराचा पगार आहे.
आई जितकी चिडचिड करते, तितका अनुचा हट्टीपणा वाढतो.

- **वाक्याचा फक्त दुसरा भागच वापरला, तरी संदर्भाने आपल्याला पूर्ण अर्थ समजू शकतो.**

उदा. "झाला तेवढा गोंधळ पुरे झाला. निघा आता!" (= "जेवढा गोंधळ झाला तेवढा गोंधळ पुरे झाला.")
वाटले होते तेवढा उशीर झाला नाही. (= जेवढा उशीर होईल असे वाटले होते तेवढा उशीर झाला नाही.)

## १८ (पाठ १०) संख्याविशेषणे (Quantitative Adjectives)

उदा. दुप्पट, एकेरी, चौपदरी, पुष्कळ, किंचित ...

ही विशेषणे संख्या अथवा आवाका दर्शवतात.

संख्येशी निगडित काही विशेषणे पट अथवा पदर हे शब्द लावून तयार होतात.

| संख्या | पदर | | पट |
|---|---|---|---|
| एक | एकपदरी | एकेरी | एकपट |
| दोन | दुपदरी | दुहेरी | दुप्पट |
| तीन | तीनपदरी | तिहेरी | तिप्पट |
| चार | चौपदरी | | चौपट |
| पाच | पाचपदरी | | पाचपट |
| सहा | सहापदरी | | सहापट |
| सात | सातपदरी | | सातपट |
| आठ | आठपदरी | | आठपट |
| नऊ | नऊपदरी | | नऊपट |
| दहा | दहापदरी | | दसपट / दहापट |

- **अनिश्चित संख्याविशेषणे** - फार, पुष्कळ, भरपूर, जरा, थोडा, किंचित...

## १९ (पाठ १) असा, असला, तसा, तसला, जसा, कसा, कसला - विशेषण / क्रियाविशेषण (Adjectives / Adverbs)

| सर्वनाम | असा | असला | तसा | तसला | जसा | कसा | कसला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | असा | असला | तसा | तसला | जसा | कसा | कसला |
| मी | अशी | असली | तशी | तसली | जशी | कशी | कसली |
| आम्ही / आपण | असे | असले | तसे | तसले | जसे | कसे | कसले |
| तू | असा | असला | तसा | तसला | जसा | कसा | कसला |
| तू | अशी | असली | तशी | तसली | जशी | कशी | कसली |
| तुम्ही / आपण | असे | असले | तसे | तसले | जसे | कसे | कसले |
| तो | असा | असला | तसा | तसला | जसा | कसा | कसला |
| ती | अशी | असली | तशी | तसली | जशी | कशी | कसली |
| ते | असे / असं | असले / असलं | तसे / तसं | तसले / तसलं | जसे / जसं | कसे / कसं | कसले / कसलं |
| ते | असे | असले | तसे | तसले | जसे | कसे | कसले |
| त्या | अशा | असल्या | तशा | तसल्या | जशा | कशा | कसल्या |
| ती | अशी | असली | तशी | तसली | जशी | कशी | कसली |

### अव्यये (Indeclinavles)

## २० (पाठ ७) स्थलवाचक क्रियाविशेषणे (Adverbs of place)

आसपास, बाजूला, बाजूने, पाठीमागे, अवतीभवती...

उदा॰ आसपास – आमच्या गावाच्या आसपास एकही चित्रपटगृह नाही.

बाजूला – घराच्या बाजूला एक तरी मैदान हवे.

बाजूने – नदीच्या बाजूने एक रस्ता जातो.

पाठीमागे – मावशीच्या घराच्या पाठीमागे एक भलामोठा डोंगर आहे.

अवतीभवती – जरा अवतीभवती लक्ष असू दे, म्हणजे कळेल काय चाललंय ते.

## २१ (पाठ ८) स्थलवाचक क्रियाविशेषणे आणि त्यांची साधित रूपे

| | अविकारी विशेषण | विकारी विशेषण (लिंग वचनानुसार बदल होतो.) | क्रियाविशेषण – (काही बदल होत नाही.) |
|---|---|---|---|
| आत | आतील | आतला / आतली / आतले / आतल्या | आतून |
| बाहेर | बाहेरील | बाहेरचा / बाहेरची / बाहेरचे / बाहेरच्या | बाहेरून |
| वर | वरील | वरला / वरली / वरले / वरल्या<br>किंवा<br>वरचा / वरची / वरचे / वरच्या | वरून |
| खाली | खालील | खालचा / खालची / खालचे / खालच्या | खालून |
| मध्ये | मधील | मधला / मधली / मधले / मधल्या | मधून |
| समोर | समोरील | समोरचा / समोरची / समोरचे / समोरच्या | समोरून |
| मागे | मागील | मागला / मागली / मागले / मागल्या<br>किंवा<br>मागचा / मागची / मागचे / मागच्या | मागून |
| पुढे | पुढील | पुढला / पुढली / पुढले / पुढल्या<br>किंवा<br>पुढचा / पुढची / पुढचे / पुढच्या | पुढून |
| शेजार | शेजारील | शेजारचा / शेजारची / शेजारचे / शेजारच्या | शेजारून |
| इकडे | इकडील | इकडला / इकडली / इकडले / इकडल्या<br>किंवा<br>इकडचा / इकडची / इकडचे / इकडच्या | इकडून |
| तिकडे | तिकडील | तिकडला / तिकडली / तिकडले / तिकडल्या<br>किंवा<br>तिकडचा / तिकडची / तिकडचे / तिकडच्या | तिकडून |
| जिकडे | जिकडील | जिकडला / जिकडली / जिकडले / जिकडल्या<br>किंवा<br>जिकडचा / जिकडची / जिकडचे / जिकडच्या | जिकडून |
| लांब | - | लांबचा / लांबची / लांबचे / लांबच्या | लांबून |
| दूर | - | दूरचा / दूरची / दूरचे / दूरच्या | दुरून |
| कुठे? / कोठे? | - | कुठला? / कुठली? / कुठले? / कुठल्या?<br>कोठला? / कोठली? / कोठले? / कोठल्या?<br>किंवा<br>कुठचा? / कुठची? / कुठचे? / कुठच्या? | कुठून?<br>कोठून? |

## २२ (पाठ ७) कालवाचक क्रियाविशेषणे (Temporal Adverbs)




## २३ (पाठ ९) अलीकडे... पलीकडे...

उदा.

| | | |
|---|---|---|
| तो डोंगर नदीच्या अलीकडे आहे. | अलीकडे | – ह्या बाजूला (स्थलवाचक) (on this side of) |
| त्या मॉलच्या पलीकडे एक बाग आहे. | पलीकडे | – त्या बाजूला (स्थलवाचक) (on the other side of) |
| अलीकडे मला छान झोप लागते. | अलीकडे | – आजकाल, सध्या, आधी, अगोदर (कालवाचक) (nowadays, these days) |
| स्वत:पलीकडेही जरा विचार करत जा. | पलीकडे | – हा विषय सोडून, ह्या गोष्टीशिवाय (beyond) |

## २४ (पाठ ८) समक्ष, उलट

उदा. समक्ष – हा प्रसंग तुमच्या समक्ष घडला का?

उलट – चूक तुझी आणि उलट माझ्यावर काय रागावतेयस?

## २५ (पाठ ६) घरोघरी, वेळोवेळी...

घर : प्रत्येक घरात = घरोघरी

वेळ : प्रत्येक वेळी = वेळोवेळी

उदा. घरोघरी – घरोघरी मातीच्या चुली.

देशोदेशी – आंतरजालामुळे देशोदेशी घडणाऱ्या घटना काही क्षणांतच सर्वदूर पोहोचतात.

## २६ (पाठ ६) स्थलवाचक शब्दयोगी पदे (Postpositions of place)

उदा॰ भोवती, पाशी आणि शेजारी...

| | |
|---|---|
| क.  | १. ठोकळ्यापाशी चेंडू ठेवला आहे. |
| ख.  | २. ठोकळ्याभोवती चेंडू आहेत. |
| ग.  | ३. ठोकळ्याशेजारी चेंडू आहे. |

-वरून, -खालून, -मधून, -कडून

उदा॰ -वरून – आज वर्गात शिकवलेलं सगळं डोक्यावरून गेलं.
-खालून – मेट्रो ट्रेन जमिनीखालूनही जाते.
-मधून – भर कार्यक्रमामधून असं उठून जाऊ नकोस.
-कडून – वरिष्ठांकडून बातमी आली की लगेच कळवतो आम्ही तुम्हाला.

## २७ (पाठ ३) कालवाचक शब्दयोगी पदे (Temporal Postpositions)

-आधी, -नंतर

उदा॰ -आधी – मी झोपण्याआधी रोज दूध पितो.
-नंतर – हात-पाय धुतल्यानंतरच जेवायला मिळेल.

## २८ (पाठ ३) व्यतिरेकवाचक शब्दयोगी पदे

-व्यतिरिक्त, -शिवाय, -वाचून, -खेरीज (besides, in addition to, apart from)

- ‘व्यतिरिक्त’= ‘खेरीज’ : संबंधित व्यक्तीला, वस्तूला अथवा कृतीला धरून / मोजून

  उदा॰ मला युरोपातल्या देशांपैकी जर्मनी हा देश आवडतो.
  त्याच्याव्यतिरिक्त / त्याच्याखेरीज मला स्पेनही आवडतो.

- ‘शिवाय’ = ‘वाचून’ : संबंधित व्यक्तीला, वस्तूला अथवा कृतीला वगळून

  उदा॰ मला युरोपातल्या देशांपैकी जर्मनी हा देश आवडतो.
  त्याच्याशिवाय दुसरा कुठलाही देश आवडत नाही.
  माझी बायको माहेरी गेली आहे. तिच्यावाचून मला करमत नाही.

- 'शिवाय' = 'नाहीतर', 'अन्यथा'

  उदा. "तू अगोदर रडणं थांबव आणि काय झालं ते नीट सांग. त्याशिवाय मला ते कळणार कसं?"

- 'शिवाय' = 'त्याचप्रमाणे,' 'त्याचबरोबर' (उभयान्वयी अव्यय म्हणून)

  उदा. सोहेलने गणितात डॉक्टरेट मिळवली आहे. शिवाय, त्याला संगीत आणि साहित्य ह्या विषयांमध्येही रस आहे.

### २९ (पाठ ७) साठी, करता / करिता – हेतुवाचक शब्दयोगी पदे (for)

उदा. ताई, तुझ्यासाठी कुरिअर आलंय बघ.
जरा आमच्याकरता वेळ काढत जा अधूनमधून.

### ३० (पाठ ५) ऐवजी, पैकी (instead of, among)

एक गोष्ट सोडून दुसरी गोष्ट निवडण्यासाठी - ऐवजी

उदा. मी केळ्याऐवजी आंबा खाईन.

दोन किंवा अधिक गोष्टींतून एकाची किंवा काहींची निवड करण्यासाठी – पैकी

उदा. केळं आणि आंबा ह्यांपैकी मी आंबा खाईन.

### ३१ (पाठ ८) -समक्ष, -सह, -विरुद्ध, -उलट

उदा. –समक्ष – कोर्टासमक्ष खरं सांगेन, खोटं सांगणार नाही.
–सह – संध्याकाळी तू एकटीच येणार आहेस की तुझ्या कुटुंबियांसह?
–विरुद्ध – आपल्याविरूद्ध काहीतरी कट रचला जातोय.
–उलट – आजारी असताना कसली एवढी धावपळ. याउलट तू आराम केला पाहिजेस.

### ३२ (पाठ १०) बद्दल, संबंधी आणि विषयी (regarding, concerning)

- **अर्थ** : एखाद्या विषयाशी संलग्न किंवा विषयाला जोडून.

  उदा. लग्नाबद्दल अजून मी काही ठरवलं नाही.
  येथील पर्यटनाविषयी काही माहिती हवी असेल तर आंतरजालावर ह्या संकेतस्थळाला जरूर भेट द्या. अर्थशास्त्रासंबंधी मला काही विचारू नकोस.

### ३३ (पाठ ४) पुरता (adequate, enough, satisfactory, sufficient)

उदा. आठवड्यापुरत्या भाज्या आणून ठेव.

लक्षात ठेवा :

| (तो) पैसा | (ती) चर्चा | (ते) शिक्षण | (ते) कपडे | (त्या) भाज्या | (ती) पुस्तके |
|---|---|---|---|---|---|
| पुरता | पुरती | पुरते | पुरते | पुरत्या | पुरती |

३४ (पाठ १) विशेषणांचा / क्रियाविशेषणांचा शब्दयोगी पदांसारखा वापर (Adjectives / Adverbs used as Postpositions)

| | विशेषण / क्रियाविशेषण<br>adjectives / adverbs | शब्दयोगी पदासारखा वापर<br>usage as postpositions |
|---|---|---|
| योग्य | योग्य वेळ आली, की मी लग्न करीन. | माझ्यायोग्य मुलगा मिळाला, की मी लग्न करीन. |
| लायक | ह्या कामासाठी तो अगदी लायक उमेदवार आहे. | माझ्यालायक नोकरी मिळाल्याशिवाय मी नोकरी करणार नाही. |
| लायक | मुलाखतीनंतर त्या पदासाठी ती लायक ठरली नाही. | ती नोकरी तिच्यालायक नव्हती. |
| सारखा | सारखा ताप येणे चांगले नाही. | तिचा स्पर्श फुलासारखा कोमल आहे. |

३५ (पाठ ४) केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये (Interjections)

उदा॰ बाप रे! केवढा मोठा हा पर्वत! (आश्चर्य)

शाब्बास! छान काम केलंस! (कौतुक)

**केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये आणि भाव ह्यांचा प्रातिनिधिक तक्ता**

| आनंद | शोक / वेदना | आश्चर्य | कौतुक | संमती | विरोध | तिरस्कार | संबोधन | भीती | लज्जा | फजिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | ॐ | ओहो | शाब्बास | हां | छे | हुं: | अगं | बाप रे | अय्या | हात्तिच्या |
| वा वा | आऽऽ | अबब | वाहवा | ठीक | छट् | थू: | अरे | देवा | इश्श | हुर्रे |
| आहा | अरेरे | बाप रे | छान | बरं | हॅट् | श्शी | अहो | हु:हु: | अगंबाई | |
| ओहो | अयाई | अहाहा | मस्त | अच्छा | अं हं | हुडुत | ए | | | |
| अहाहा | हाय | अगग्गं | यंव | जी | छे छे | हुड | शुक शुक | | | |
| | हाय हाय | अरेच्या | खाशी | आईशपथ | उंहूं | फुस् | रे | | | |
| | अगाई / आई गं | | फक्कड | झकास | हॅ: | हट् | | | | |
| | | | | | | छा: | | | | |
| | | | | | | हॅ: | | | | |

**टीप :**

- केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये सामान्यतः वाक्याच्या आरंभी येतात!
- केवलप्रयोगी अव्ययापुढे नेहमी उद्गारवाचक चिन्ह (!) हवे.

### ३६ (पाठ ९) 'च', 'ही', 'मात्र' ... (Emphatic Particles)

उदा॰ हे काम आजच पूर्ण व्हायला हवं.
अजूनही तू घरच्या कपड्यांमध्येच? निघायची वेळ झाली!

- अशा शब्दांच्या वापरामुळे बोलणे प्रभावी होते आणि संवादामध्ये जोर येतो.

च, ही, फक्त, केवळ, न, मात्र, सुद्धा, पण इ॰

### ३७ (पाठ १०) कदाचित, बहुधा, एकंदरीत, ... (Words of estimative probability)

- एखाद्या गोष्टीची खात्री किती आहे हे सांगण्यासाठी वापरले जाणारे शब्द



### विभक्तिप्रत्यय

**३८ (पाठ ५) '-ऊन' चा वापर (Termination of the Ablative Case)**

उदा. पोटातून भुकेने हाक दिली.
पोटातून = पोट + आत + ऊन
दारातून शेतकरी आत आला.
दारातून = दार + आत + ऊन

**३९ (मागील भागात) क्रियापद + '-ऊन' (Verb + Termination of the Ablative Case)**

उदा. - पटकन काम संपवून चल माझ्यासोबत. संपवून – संपवणे + ऊन
- खाऊन झाल्यावर अभ्यासाला बस. खाऊन – खाणे + ऊन

**४० (मागील भागात) 'चा', 'ची', 'चे', 'च्या' (Terminations of the Genitive Case)**

| | पु. | स्त्री. | नपुं. |
|---|---|---|---|
| एकवचन | मिलिंदचा भाऊ | मिलिंदची बहीण | मिलिंदचे / मिलिंदचं मूल |
| अनेकवचन | मिलिंदचे भाऊ | मिलिंदच्या बहिणी | मिलिंदची मुले / मुलं |

**लक्षात ठेवा :** मिलिंदचा भाऊ – मिलिंदच्या भावाचा भाऊ.
मिलिंदचे लग्न – मिलिंदच्या लग्नाला बरेच पाहुणे आले होते.
पहाटेची वेळ – पहाटेच्या वेळी प्रसन्न वाटते.

**४१ (पाठ ७) संबोधन करताना... (While addressing... - Vocative Case)**

- संबोधन करताना नामांचे 'सामान्य रूप' होते. जसे 'बाळ – बाळा'.
- लिंगानुसार 'अरे', 'अगं' किंवा गरज असल्यास आदरार्थी 'अहो' असे संबोधन वापरले जाते.

| ए.व. | अ.व. |
|---|---|
| अरे मुला | अरे मुलांनो |
| अगं मुली | अगं मुलींनो |
| अरे बाळा | अरे बाळांनो |
| अहो सर | गुरुजनांनो / गुरुजनहो |

- 'अरे', 'अगं' आणि 'अहो' ही संबोधने स्वतंत्रपणेही वापरली जातात.

## ४२ विभक्तिप्रत्यय (Suffixes)

| विभक्ती | प्रत्यय | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| | शब्दांची रूपे | | |
| प्रथमा | --- | मूल | मुले |
| द्वितीया | स, ला, ते<br>स, ला, ना, ते | मुलास, मुलाला | मुलांस, मुलांना |
| तृतीया | ने, ए, शी<br>नी, ही, ई, शी | मुलाने, मुलाशी | मुलांनी, मुलांशी |
| चतुर्थी | स, ला, ते<br>स, ला, ना, ते | मुलास, मुलाला | मुलांस, मुलांना |
| पंचमी | ऊन, हून<br>ऊन, हून | मुलाहून | मुलांहून |
| षष्ठी | चा, ची, चे<br>चे, च्या, ची | मुलाचा, मुलाची, मुलाचे<br>मुलाचे, मुलाच्या, मुलाची | मुलांचा, मुलांची, मुलांचे<br>मुलांचे, मुलांच्या, मुलांची |
| सप्तमी | त, ई, आ<br>त, ई, आ | मुलात | मुलांत |
| संबोधन | ---<br>नो | मुला | मुलांनो |

## Photo Credits

| |
|---|
| Abhideo२१ |
| Abhinav Saxena |
| Anatoly Terentiev |
| Ampersandyslexia |
| Blossom Ozurumba |
| Dharmadhyaksha |
| Ipaat at English Wikipedia |
| Joe Zachs |
| Kruttika Bhosale |
| Lensbug.chandru |
| Pixabay |
| R D'Lucca |
| Rahul Dharmadhikari |
| Saloni Desai |
| Shrinivas kulkarni |
| Sneha Sonal |
| Suyogaerospace |
| Urbzoo |
| Yoursamrut |

## Marathi Textbook for Level 3

- Creative exercises, tests, glossary and answer key
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the language
- For young and adult learners
- For classroom study as well as for self learners
- Language skills: Understanding, speaking, reading, writing Marathi

**The set contains:**

1. A Textbook
2. A Workbook
3. A Glossary
4. DVD (With audio & audio-visual content)
   https://mu.ac.in/mymarathi3

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in

मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

9 789353 518233

**Price:** Rs. 1250 | 25 USD | 20 EUR